


महाराष्ट्राचे जिल्हे

पुणें

महाराष्ट्राचे जिल्हे

[illegible]

पुणें

किंमत ४० नये पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्याचें प्रकाशन

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय

पुणें जिल्हा

१. परिचय :

ऐतिहासिक पार्श्वभूमि : थोर व्यक्ति : प्रमुख वैशिष्ट्यें : इतिहास : स्वराज्याचा उदय : सामाजिक सुधारणा व राजकीय जागृति : महाराष्ट्र राज्य स्थापना.

२. भौगोलिक रचना आणि शासन व्यवस्था :

पाऊसपाणी : पिकें : नैसर्गिक संपत्ति : लोक–भाषा–संस्कृति : प्रमुख यात्रा : जिल्हा शासनव्यवस्था : न्यायदान : पोलिसांच्या कल्याणाचीं विविध कामें : मध्यवर्ति कारागृह : जिल्हा पोलीस दल.

३. कृषि उत्पादन आणि नैसर्गिक संपत्ति :

भूभाग : बियाणें व रासायनिक खतें : भूसंरक्षण : शेती सुधारणा मोहिम : तगाई कर्जे : वनसंपत्ति : वनमहोत्सव : पशुसंवर्धन आणि संरक्षण : लोकर उत्पादन व कोंबडी पालन : पुणें दूध योजना.

४. सहकार :

सेवा सहकारी संस्था : खरेदी विक्री संघ : घर बांधकाम : औद्योगिक सहकार : सहकारी साखर कारखाने : वेअरहाऊसिंग : शेतकी बाजारांचें नियमन.

५. व्यवसाय आणि उद्योगधंदे :

औद्योगिक वाढ : मच्छिमारी.

६. शैक्षणिक प्रगति :

प्राथमिक शिक्षण : माध्यमिक शिक्षण : शालागृहांस मदत : शिष्यवृत्त्या नाटयस्पर्धा : समाजशिक्षण : तांत्रिक शिक्षण : एस्. एस्. सी. बोर्ड : पुण विश्वविद्यालय : मांजरी येथील शेतकी शिक्षण : समाजकल्याण : सर्टिफाइड स्कूल्स.

७. सार्वजनिक बांधकाम आणि दळणवळण :

दळणवळण : सार्वजनिक बांधकाम : खडकवासला धरण : कालवे : घोड-धरण योजना : भाटघर धरण व वीज योजना : शेटफळ तलाव : पहिल्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण झालेलीं कामें : दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण झालेलीं कामें व चालू कामें.

८. आरोग्य व्यवस्था :

सार्वजानक आरोग्य व वैद्यकीय मदत (ग्रामीण विभाग) : कुटुंब नियोजन : बी. सी. जी. : बी. जे. मेडिकल कॉलेज व वसतिगृह : कोंढवा कुष्ठ रुग्णालय : औंध हॉस्पिटल, पुणें.

९. स्थानिक स्वराज्य संस्था व इतर विविध :

जिल्हा लोकल बोर्ड : ग्रामपंचायती : पुणें शहर : वाहतूक : औद्योगिक वसाहत : नगरपालिका.

१०. समाज विकास :

जिल्हा विकास मंडळ : स्थानिक विकास योजना : समाज विकास गट : कुटिरोद्योग व औद्योगिक सहकार : पुरंदर तालुका : आंबेगांव तालुका : शिरूर तालुका : भोर वेल्हे विकास गट : सर्वोदय : मुळशी धरण विभाग सर्वोदय केंद्र : कल्याण विस्तार योजना.

११. संकीर्ण :

पोस्ट : पुणें जिल्ह्यांतील टेलिफोन व्यवस्था : अल्पबचत : स्टेट ट्रॅन्स्पोर्ट, पुणें विभाग : पुणें जिल्ह्यांतील वर्तमानपत्रें : आकाशवाणी : प्रसिद्धी कार्यालयें : ग्रामीण रेडिओ विभाग : सावकारी नियंत्रण.

१३. प्रेक्षणीय स्थळें आणि जुनी व नवी तीर्थक्षेत्रें :

आळंदी : बनेश्वर : भाजे : भीमाशंकर : भाटघर : देहू : जेजुरी : कार्ले : लोणावळा–खंडाळा : मल्हारगड : नरसिंगपूर : खडकवासला धरण : राजगड : राजमाची : रांजणगांव गणपती : विचित्रगड : सिंहगड : शिवनेरी : तोरणा : नॅशनल डिफेन्स ॲकेडमी : दापोडी वर्कशॉप : वेधशाळा : शनिवार वाडा : पर्वती : आगाखान पॅलेस : पॅनिसिलीनचा कारखाना.

१२. कोणाकडे कशाची चौकशी करावी :

पुणें जिल्हा सिंहावलोकन.

पुणें जिल्हा

१ : परिचय

प्राचीन काळांत पुणें जिल्हा हा आंध्र, चालुक्य, राष्ट्रकूट, किंवा यादव यांच्या साम्राज्याचा भाग होता. जुन्नर भागास त्या काळीं असाधारण महत्त्व होतें. घाटमाथा आणि तळकोंकण यामधील व्यापार व्यवहार जुन्नर मार्गेंच चालत असे. बहामनी साम्राज्याच्या कालावधींत तो भाग अहमदनगरची निजामशाही आणि विजापूरची आदिलशाही यांचा भाग गणला जाई. दुसऱ्या बाजीरावानें १८१८ मध्यें हा भाग इंग्रजांच्या स्वाधीन करण्याअगोदर शंभर वर्षें पुणें हें मराठ्यांच्या राजधानीचें केंद्र होतें.

ऐतिहासिक पार्श्वभूमि

महाराष्ट्राची संत परंपरा येथेंच उगम पावली आणि पूर्णावस्थेसहि येथेंच पोहोंचली. ज्ञानदेवांनीं येथून १३ मैलावरील इंद्रायणी कांठीं वसलेल्या आळंदी क्षेत्रांत वारकरी सांप्रदायाचा पाया घातला तर देहू या पंधरा मैलांवरील गांवीं तुकोबांनीं वास्तव्य करून या सांप्रदायाचा कळस उभारला. म. ज्योतिबा फुले या अलीकडील संतश्रेष्ठानें याच पूण्यभूमींत 'बहुजन हिताय' आपली काया झिजवली.

मराठी राज्याचे संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज,याच जिल्ह्यांत शिवनेरीवर जन्मले आणि स्वातंत्र्य आंदोलनाची धुळाक्षरेहि त्यांनीं पुणें जिल्ह्यांतच गिरवलीं. अटकेपार झेंडा फडकविणारे सेनानी राघोबादादा पेशवे, महादजी शिंदे आणि यवनांच्या प्रबल सैन्याची दाणादाण करणारे रणधुरंधर तानाजी, येसाजी, संताजी, धनाजी, बाजी प्रभु यांसारख्या वीर श्रेष्ठांनीं शौर्याच्या उज्ज्वल परंपरा येथेंच निर्माण केल्या. भारताला राजकीय जागृति आणण्यासाठीं 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही गर्जना पुण्याच्याच लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनीं केली. समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, भांडारकर, चिपळूणकर, भारत-

थोर व्यक्ति

रत्न महर्षि धोंडो केशव कर्वे आदि नररत्नांच्या विद्वत्ता, स्वार्थत्याग, देशभक्ति, समाज कल्याणाची तळमळ, आदि गुणांनीं पुण्याच्या अखिल भारतीय कीर्तीत मोलाची भर घातली आहे.

प्रमुख वैशिष्ट्यें

सदर्न कमांडची मध्यवर्ती कचेरी, नॅशनल डिफेन्स ॲकडमी, वेधशाळा, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पेनिसिलीन फॅक्टरी, सर्व्हेटस् ऑफ इंडिया सोसायटी, भारत इतिहास संशोधन मंडळ, दापोडी येथील एस्. टी. चें सेंट्रल वर्कशॉप आदींमुळें पुणें शहरास असाधारण महत्त्व प्राप्त झालें आहे. प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून तर त्याचा लौकिक गेलीं कित्येक वर्षें दुमदुमत आहे. आरोग्यदायक हवा, बेताचाच पाऊस, वाहतुकीचें केंद्र आणि सांस्कृतिक केंद्र म्हणूनहि पुण्याचें वैशिष्ट्य आगळेंच आहे. मुंबई–बेंगलोर या राष्ट्रीय सडकेवरील मुंबई–मद्रास–बेंगलोर या रेल्वे मार्गावरील पुणें हें महत्त्वाचें रेल्वे–स्टेशन असल्यामुळें पुण्याहून बाराहि महिने अखंड वाहतूक चालू असते.

इतिहास

दोन हजार वर्षांपासून पुणें आणि आसपासचा भाग भरभराटीस आलेला आहे. या विभागावर अनेक राज्यकर्त्यांनीं वेगवेगळ्या काळांत राज्य केलें आहे. पहिल्या शतकांत आंध्रभृत्य किंवा शटकर्णी वंशाच्या बेदिश्री राजाचे आधिपत्याखालीं हा मुलुख होता. दुसऱ्या शतकांत बुद्ध धर्मियांचा प्रभाव अधिक असल्याचें लेण्यांतील शीलालेखांवरून आढळतें. आंध्रभृत्य वंशाचें राज्य येथें चौथ्या शतकापर्यंत असल्याचा पुरावा उपलब्ध आहे. त्यानंतरच्या ९०० वर्षांच्या काळांत पुणें विभागामध्यें कोठलेंहि प्रभावी सरकार अस्तित्वांत असल्याचें आढळत नाहीं.

नगर, सातारा, सोलापूर, नाशिक येथील माहितीवरून या भागांत इ. स. ५५७ ते ९३७ पर्यंत येथें चालुक्य आणि राष्ट्रकूट घराण्यांनीं राज्य केलें असावें. राष्ट्रकुटांचें राजवटींतच पुणक अथवा पुण्यक नगरास (हलींच्या पुण्यास) जिल्ह्याचें प्रमुख ठाणें करण्यांत आलें.

इ. स. १२९४ त अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरीच्या यादवांचा पराभव केल्यानंतर आणि इ. स. १२३८ मध्यें महमद तघलकानें दौलताबाद (देवगिरी) राजधानी करून तेथें आपलें ठाण मांडल्यानें या भागांत मुसलमानी राजवट आली.

बहामनी राज्याचे कालावधींत पुणें भागास शांतता आणि सुव्यवस्था मिळाल्यानें (१३४७ ते १४९०) हा काळ भरभराटीचा गेला. इ. स. १३९६ ते १४०७ या अकरा वर्षांत मात्र दुर्गादेवीच्या भयंकर दुष्काळानें लोकांना अन्नान्न दशा आली होती. परंतु मलिक–उत-तुजर यानें कसण्यास तयार असणाऱ्या लोकांना जमिनी वाटल्या आणि गांवांची पुनर्रचना करण्याचा कसोशीनें प्रयत्न केला. त्यानें आपली राजधानी चाकण येथें आणली होती. महंमद गावान या बहामनी राज्याच्या मंत्र्यानेंहि राज्यव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर निजाम उलमुकाकडे राज्यव्यवस्था गेली. त्याचा मुलगा मलिक अहंमद, ज्यानें पुढें निजामशाहीची स्थापना केली, त्यानें आपली राजधानी चाकणहून जुन्नरला नेली.

चाकणचा सुभेदार शैनुद्दीन यानें १४८६ मध्यें शहा विरुद्ध बंड पुकारलें. याचवेळीं अनेक मराठा किल्लेदारानींहि निजामशाही झुगारून देण्याचा प्रयत्न केला. शिवनेरी येथील हिंदु किल्लेदाराचा मोड करून मलिक अहंमदनें किल्ला काबीज केला त्यावेळीं तेथें साठवून ठेवलेला पांच वर्षांचा महसूल त्याला मिळाला. मलिक अहंमदनें इ. स. १४८६ त बहामनी राज्याचें नियंत्रण झुगारून स्वतंत्र निजामशाही स्थापन केली म्हणून महमदशहा बहामनी (तिसरा) यानें विजापूरचा

युसुफ आदिलखान आणि चाकणचा शैनुद्दीन यांस त्याचा बिमोड करण्यास सांगितले. विजापूरच्या युसुफ आदिलखानानें यावेळीं अलिअहमदचा कित्ता गिरवून बहामनी सत्ता झुगारली म्हणून मलिक अहमदला चाकण घेणें सुकर झालें.

मलिक अहमद नंतर बुऱ्हाण निजाम निजामशाहीचे गादीवर आला. त्याने जुन्नरला राजधानी केली आणि भावर सेन नांवाच्या हिंदूस आपला मंत्री (पेशवा) नेमलें. १५६२ मध्यें हुसेन निजाम शहा या निजामशाहीच्या तिसऱ्या वारसाने विजयानगरच्या रामराजापासून आणि विजापूरच्या अलिअदिलशाहापासून संरक्षण मिळावे म्हणून जुन्नर भागांतील दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेतला. त्यानंतर सलाबतखानानें पुणें विभागाच्या अर्थव्यवस्थेची घडी बसविण्याचा प्रयत्न केला पण त्यास १५९५ मध्यें मोगलांच्या हल्ल्यास तोंड द्यावें लागलें. याचवेळीं स्थानिक मराठा सरदारांस अधिक सत्ता देण्याचें धोरण आंखले गेलें. मालोजी भोसले यांचेकडे यावेळीं शिवनेरी व चाकण हे किल्ले व सुपे आणि पुणें परगण्यांचा कारभार आला.

इ. स. १६०० मध्यें मोगलांनीं नगर घेतलें. परंतु अकबराच्या मृत्यूनंतर (१६०५) त्यांच्या कारभारांत ढिलाई आली. यावेळीं निजामशाहीच्या मलिकंबर नांवाच्या सरदाराने मुर्तझा (दुसरा) यास गादीवर आणून राजधानी पुन्हा जुन्नरला हलविली. मलिकंबराने आपल्या कारकिर्दींत राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्थेची घडी बसविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. जमीनधाऱ्याची पद्धत त्यानेच सुरू केली.

स्वराज्याचा उदय

शहाजी राजे यांनीं १६२९ मध्यें निजामशाहीचा संबंध तोडून पुण्यास बस्तान बसविलें व आपल्या पुण्याकडील जहागिरी कायम करून घेतल्या. विजापूरच्या भागांतील आपल्या जहागिरी घेण्यास ते कर्नाटकात गेले त्यावेळीं शिवनेरी किल्ल्यावर त्यांच्या शूर पुत्राचा–शिवाजीचा–जन्म झाला. माता जिजाबाई व गुरु दादोजी कोंडदेव यांनीं शिवाजी महाराजांना उत्कृष्ट शिक्षण दिलें. याच काळांत पुण्यांतील सध्याच्या जिजामाता बागेच्या जागेत रंगमहाल किंवा लालमहाल नामक इमारतींत शिवरायांचे वास्तव्य होतें.

शहाजहान बादशहाचे मृत्यूनंतर शिवाजी महाराजांनीं पुण्याच्या उत्तरेकडील आणि वायव्येकडील भाग आपल्या आधिपत्याखालीं आणला. या भागांतील कोळी लोकांनी मोगल सत्ता झुगारून दिल्यामुळें औरंगजेब चिडला होता. त्याने जुन्नरनजिक मोठ्या प्रमाणावर कोळी लोकांचा संहार केला. जुन्नरला आज काळा चबुतरा नांवानें उभी असलेली वास्तु हें त्या ठिकाणीं औरंगजेबानें केलेल्या या संहाराचें स्मारक आहे. १६५७ मध्यें महाराजांनीं जुन्नरवर स्वारी करून तो भाग परत मिळविला. औरंगजेबाशीं सलगीचीं बोलणीं करून मुलुख घेण्याचें कार्य चालू ठेवायचें हेंच महाराजांचें धोरण असे. शहाजीराजांच्या मृत्यूनंतर महाराज आणि औरंगजेब यांच्यामध्यें उघडपणें वैर येऊन पुणें विभागांत सतत युद्धाचें अनिश्चित वातावरण राहिलें. परंतु औरंगजेब शिवाजीमहाराजापुढें नेहमी नामोहरण होत राहिला.

शिवाजी महाराजांच्या काळांत पुणें भागाची एकंदरींत भरभराट होत होती. खेड्यांतून वेगवेगळीं पिकें तर घेतलीं जातच पण गहूं आणि कापूस यांसारखीं बाहेरून आणलेलीं पिकेंहि शेतकरी घेऊ लागले होते.

१७१४ मध्यें बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाली आणि १७४९ पासून पुणें हें मराठी राज्याचें महत्त्वाचें कैंद्र झालें. इ. स. १७५१ मध्यें निजाम मराठी राज्यावर स्वारी करून पुण्यापर्यंत आला होता. परंतु मराठी सैन्यानें त्यास परतविले. इ. स. १७६० मध्यें उदगीरच्या लढाईंत निजामाचा पराभव झाल्यानंतर शिवनेरी किल्ला मराठ्यांकडे आला. इ. स. १७६३ मध्यें पुन्हा निजाम पुण्याकडे आला परंतु राक्षसभुवनच्या लढाईत त्याचा पराभव होऊन त्याला परतावे लागलें. १७६९ मध्यें जानोजी भोसले यांनी पुणें लुटण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा बीमोड करण्यांत आला.

बाळाजी बाजीराव पेशवे आणि माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दींत राज्यकारभाराच्या दृष्टीनें अनेक सुधारणा करण्यांत आल्या. इ. स. १८०३–०४ साली पडलेल्या दुष्काळानें पुणें उजाड झालें. पुढील दहा वर्षें मात्र पुण्याची पुन्हां वाढ होत जाऊन लोकसंख्या एक लाखापर्यंत गेली. नोव्हेंबर १८१७ मध्यें दुसऱ्या बाजीरावाच्या पराभवानंतर पुण्यांत इंग्रजी अंमल सुरू झाला. इंग्रजांनीं सिंहगड, पुरंदर वगैरे किल्ले एकामागून एक घेतले आणि बाजीराव त्यांचे स्वाधीन झाला.

सैनिकी सुरक्षिततेच्या दृष्टीनें ब्रिटिशांनीं जुन्नर आणि शिरूर येथें सैन्यदल ठेवलें. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांस कंपनी सरकारनें पुणें विभागाचे कमिशनर नेमलें व त्यानें कॅ. एच. डी. रॉबर्टसन् यांची पुण्याचे कलेक्टर आणि न्यायाधिश म्हणून नेमणूक केली. एल्फिन्स्टननें येथें शांतता, सुरक्षितता आणि सुबत्ता नांदावी म्हणून पद्धतशीर प्रयत्न केले.

१८२६ ते १८३० या काळांत उमाजी नाईक यानें रामोशांना संघटित करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड केलें. परंतु उमाजी नाईकास पकडल्यानंतर तें शमलें. त्यानंतर कोळी लोकांनींहि १८३० मध्यें आणि त्यानंतर भाऊ खरे, चिमणाजी जाधव, नाना दरबारे वगैरे मंडळींनीं १८३९ ते ४६ या काळांत ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड केलें. परंतु तें अयशस्वी झालें. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचे पडसाद पुण्यांत मर्यादित प्रमाणांतच उमटले.इ.स. १८७९ मध्यें वासुदेव बळवंत यांनीं केलेल्या रामोशांच्या उठावानंतर हीं बंडें कायमची शमलीं.

१८७६ नंतर पुण्यास सेंट्रल डिव्हिजन कमिशनरची कचेरी उघडण्यांत आली व १८६२ मध्यें पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्यें कायदे मंडळाचें पहिलें अधिवेशन झालें. या नंतरच्या काळांत शांतता मिळाल्यानें राज्यकारभारांत खूपच सुधारणा एकामागोमाग एक अशा करण्यांत आल्या.

सामाजिक सुधारणा व राजकीय जागृति

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत पुणें हें सामाजिक सुधारणेचें महत्त्वाचें कैंद्र झालें होतें. न्यायमूर्ति रानडे, महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर आदि समाज सुधारकांनीं अस्पृश्यता निवारण, स्त्री–स्वातंत्र्य वगैरेसाठीं पुण्यांतील पुराण मतवाल्याविरुद्ध जोराची चळवळ केली. भारताच्या राजकारणांत, २० व्या शतकाच्या आरंभी, पुण्यास वास्तव्य करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीमुळें महाराष्ट्रास मानाचें स्थान लाभलें होतें. पुण्याच्या गोपाळकृष्ण गोखले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, वि. दा. सावरकर आदींनींहि महाराष्ट्रांत राजकीय जागृति करण्याचे कामांत मोलाची सेवा केली आहे.

ब्रिटिश राजवटींत मुंबई प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांत २८ जिल्हे होते. त्यापैकीं ४ कर्नाटकाचे, १० गुजरातचे आणि १४ जिल्हे पश्चिम महाराष्ट्राचे होते. १ नोव्हेंबर १९५६ रोजीं भारतांत झालेल्या भाषाधार प्रांत रचनेनुसार ४३ जिल्ह्याचें द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वांत आलें. कैंद्र सरकारनें या निर्णयाचा फेरविचार केला आणि १ मे १९६० रोजीं

महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांचे स्वतंत्र राज्य अस्तित्वांत आले. या राज्य निर्मितींत मोठा आनंदोत्सव सर्वत्र साजरा करण्यांत आला. ज्या छत्रपति शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्राचें पहिलें स्वतंत्र राज्य निर्माण केलें, त्यांची जयंती २७ एप्रिल रोजीं असल्यानें याच शुभदिनीं,

महाराष्ट्र राज्य-स्थापन

त्यांच्या जन्मस्थळीं म्हणजे शिवनेरीवर महाराष्ट्र राज्य निर्मिर्ति महोत्सव राज्य सरकार आणि शिवस्मारक समिति यांच्या सहकार्यानें मुख्य मंत्री श्री. य. ब. चव्हाण यांच्या हस्तें मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. त्यावेळचे बांधकाम व सध्याचे शिक्षण खात्याचे मंत्री श्री. बाळासाहेब देसाई हे शिवस्मारक समितीचे अध्यक्ष असून शिवनेरीच्या पायथ्याशीं महाराजांचे कायमचे स्मारक उभारण्यासाठीं त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

२. भौगोलिक रचना आणि शासन व्यवस्था

पुणें जिल्ह्याच्या पूर्वेस नगर, आग्नेयेस सोलापूर, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस कुलाबा, आणि वायव्येस ठाणे या जिल्ह्यांच्या सरहद्दी भिडलेल्या आहेत. क्षेत्रफळ ६,०२,७०५ चौरस मैल असून लोकसंख्या १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें १९,५०,९७६ आहे. दर चौरस मैलास लोकसंख्येचें हें प्रमाण ३२३·७ असें पडतें. एकूण खेडीं १४७५ असून मोठी गांवे अथवा शहरें ३६ आहेत.

पुणें जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या रांगा असून त्यांची समुद्र सपाटीपासून उंची सर्वसाधारणपणें १००० ते २००० फूट आहे. कित्येक कडे मात्र ३ ते ४ हजार फूट उंचीचे देखील आहेत. उत्तर सरहद्दीवरील हरिश्चंद्र गडाची उंची सर्वांत अधिक म्हणजे ४६७० फूट आहे.

सह्याद्रीच्या या कडेपठारांत लोहगड, विसापूर, सिंहगड, पुरंदर हे अवघड किल्ले शिवकालीन इतिहासाची साक्ष देत आजहि चांगल्या स्थितींत उभे आहेत.

पाऊसपाणी

पुणें जिल्ह्यांतील नद्या पूर्ववाहिनी असून त्या पश्चिमेकडील डोंगराळ भागांत उगम पावतात. भीमा ही सर्वांत मोठी नदी भीमाशंकर येथें उगम पावून जिल्ह्याच्या मध्यवर्ती भागांतून १०० मैल वाहात जाते. तिला वेळ, घोड, मीना, कुकडी, भीमा, इंद्रायणी, मुळा–मुठा, पवना आणि नीरा या जिल्ह्यांतून वाहणाऱ्या इतर महत्त्वाच्या नद्या मिळतात. पावसाळ्यांत या नद्या दुथडी वाहतांना दिसल्या तरी उन्हाळ्यांत त्यांना फारच थोडें पाणी राहते. जिल्ह्यांत नैसर्गिक असा एकहि तलाव नाहीं.

पुरंदर, भोर, वेल्हें, मुळशी, मावळ, खेड, आंबेगांव आणि जुन्नर, या पश्चिमेकडील तालुक्यांचा बराच भाग डोंगराळ असून तेथें वर्षभरांत ४० पासून २०० इंचापर्यंत पाऊस पडतो. या उलट, शिरूर, दौंड, इंदापूर आणि बारामती या पूर्वेकडील तालुक्यांना कमी आणि अनियमित पावसामुळें वारंवार दुष्काळासारख्या आपत्तींना तोंड द्यावें लागतें. या भागांत अवघा १० ते १५ इंच पाऊस वर्षाकांठी पडतो.

जिल्ह्याचें सर्वसाधारण हवामान सम असतें. उन्हाळ्यांत उष्णतामान सर्वसाधारणपणें १०६ डिग्रीज् फॅ. पर्यंत जातें. गेल्या ६५ वर्षांत फक्त दोन वेळा तें ११० डिग्रीज् पर्यंत गेल्याची नोंद आहे. खंडाळा लोणावळा हीं थंड हवेचीं ठिकाणें २००० फूटापेक्षां अधिक उंचीवर असून तेथें असंख्य लोक उन्हाळ्यांत येत असतात. पुणें शहराची हवा तर बाराहि महिने चांगली असल्यानें या शहराचा विस्तार झपाट्यानें होऊं लागला आहे.

पिकें:—प्रमुख पीक ज्वारी हेंच असलें तरी पश्चिमेकडील डोंगराळ भागांत भात व नाचणी, उत्तरेकडील भागांत बाजरी व बटाटा आणि इतरत्र गहूं, हरभरा, कापूस आणि भुईमूग हीं पिकें घेतलीं जातात.

पुणें जिल्ह्याचें पर्जन्यमान (५० वर्षांची सरासरी)

गांवाचें नांव	सह्याद्रीपासून अंतर (मैल)	एकूण पाऊस (इंच)
पुणें	३२	२६·४९
पौड	१५	५९·८४
खेड	२४	२५·८७
जुन्नर	१२	२८·८१
शिरूर	६६	२०·०५
बारामती	६२	२०·०२
दौंड	८०	१८·१४
इंदापूर	९०	२१·७६
तळेगांव ढमढेरे	५०	२१·२७
वडगांव	१८	४१·८३
लोणावळा	०	१७०·०८
आळंदी	४५	२३·३६
घोड	१८	२१·००
सासवड	३०	२२·०२
जेजुरी	३४	१९·८४

पुणें जिल्ह्याची लोकसंख्या कशी वाढत गेली हें पुढील तक्त्यावरून दिसेल.

साल	एकूण लोकसंख्या	ग्रामीण लोकसंख्या	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	नागरी लोकसंख्या	एकूण लोकसंख्येशी प्रमाण
१८८१...	९,००,६२१	७,३४,०५५	८१·५	१,६६,५६६	१८·५
१८९१...	१०,६७,८००	८,५०,०७२	७९·६	२,१७,७२८	२०·४
१९०१...	९,९५,३३०	७,७५,२१७	७७·९	२,२०,११३	२२·१
१९११...	१०,७१,५१२	८,३२,२५०	७७·६	२,३९,२६२	२२·४
१९२१...	१०,०९,०३३	७,३०,७७२	७२·४	२,७८,२६१	२७·६
१९३१...	११,६९,७९८	८,५७,०९८	७३·२	३,१२,७००	२६·८
१९४१...	१३,५९,४०८	९,७०,८३५	७१·४	३,८८,५७३	२८·६
१९५१...	१९,५०,९७६	११,१६,२५३	५७·२	८,३४,७२३	४२·८

गल्या ७० वर्षांच्या काळांत ग्रामीण भागांतील लोक शहराकडे कसे आकर्षिले गेले हेंहि वरील तक्त्यावरून लक्षांत येईल.

जिल्ह्यांत मौल्यवान खनीज पदार्थ फारसे मोठ्या प्रमाणांत सांपडत नाहींत. चुनखडी आणि जिप्सम पूर्वेकडील विभागांत थोड्या प्रमाणांत आढळतात. येथील हिरवट काळा किंवा करड्या रंगाचा खाणीतून मिळणारा दगड कठीण, भक्कम आणि टिकाऊ असल्यानें इमारतींच्या बांधकामात त्याचा फार उपयोग केला जातो. जिल्ह्याच्या पश्चिम भागांतील डोंगराळ प्रदेशांत कमी अधिक प्रमाणांत जंगलें असून त्यांत हिरडा, आपटा, शिकेकाई, मोहेऐन, भेडा या जातीचीं झाडें प्रामुख्यानें आहेत. इतरत्र सर्व-साधारणपणें लिंब, बांभूळ, आंबा, हींच झाडे बहुतांशीं आढळतात. पूर्व भागांत झाडांची संख्या अत्यंत कमी असून मैलचे मैल उजाड माळरानें आढळतात.

नैसर्गिक संपत्ति

विरळ जंगलामुळें जिल्ह्यांत हिंस्र श्वापदांची संख्या फारशी नाहीं. लोणावळा, खंडाळा, भीमाशंकर या भागांत क्वचित् वाघ दिसतात. इतरत्र तरस, लांडगा, कोल्हा, खोकड, मुंगूस, ससा, सांबर, चितळ, हरण, भेकर हे छोटे वन्यपशू मधून मधून आढळतात.

१९५१ च्या खानेसुमारीनुसार जिल्ह्याची लोकसंख्या १९,५०,९७६ इतकी असून ती दर चौरस मैलास ३२३ इतकी दाट आहे. यामध्यें १७,८४,०७४ हिंदू असून मुसलमान ९०,५८५, ख्रिश्चन ३७,२४३ व जैन २२,३१२ असून शीख, पार्शी, ज्यू वगैरे जमातीहि नांदत आहेत. पुरुषापेक्षां स्त्रियांचें प्रमाण नेहमींच कमी असून १९५१ मध्यें तें दर हजार पुरुषास ९३९ स्त्रिया असे होते. पुणें जिल्ह्यांतील लोकसंख्या गेल्या ८० वर्षांत दुपटीने वाढली आहे.

लोकभाषा-संस्कृति

गेलीं कित्येक वर्षें मराठी राज्याचें केंद्र असलेल्या या जिल्ह्यांत मराठी भाषा बोलणारांचे प्रमाण साहजिकच अधिक आहे. १९ लाख लोकांपैकीं १६,८५,००० लोकांची मातृभाषा मराठी आहे. पुणेरी मराठी भाषा विशेष शुद्ध असते आणि तीच सर्वत्र प्रमाण मानली जाते.

पुणेरी पगडी, पुणेरी जोडा, वगैरे शब्द आतां इतिहास जमा होण्याचे बेतांत असले तरी पन्नास वर्षांपूर्वीं पायांत जोडा, धोतर, लांब कोट व डोक्यावर लाल पगडी हा पुरुषांचा आदर्श पोषाख समजला जात असे. स्त्रियाहि नऊवारी इरकली लुगडे व कटकीच्या चोळ्या वापरीत असत. कालमानाप्रमाणें पोषाखांत बदल होत आहे.

जिल्ह्याच्या डोंगराळ भागांत आदिवासी, ठाकर, महादेव कोळी या जातीचे लोक राहात असून अपुरी जमीन आणि मर्यादित उद्योगामुळें हे लोक गरीब अवस्थेंत आहेत. इतरत्र बहुसंख्येनें आढळून येणारा मराठा समाज मुख्यतः शेतीवरच अवलंबून आहे. जिराईत शेतीमुळें त्यांची शेती कष्टाची झाली आहे. तरी विहिरी खोदून, ताली बंधारे बांधून किंवा अन्य मार्गानें अधिक उत्पन्न काढण्यासाठीं ते एकसारखे राबत असतात.

जिल्ह्यांत सर्वसाधारणपणें चैत्र व वैशाख महिन्यांत गांवोगांव जत्रा भरतात. या जत्रांत देवादिकांच्या पूजेबरोबरच कुस्त्यांचा फड आणि लोकरंजनासाठीं तमाशाचे कार्यक्रम केले जातात. प्रमुख जत्रा पुढील ठिकाणीं भरतात. भिमाशंकर येथें महाशिवरात्रीस श्री शंकराची यात्रा, जेजुरी येथें चैत्र शु॥ पौर्णिमेस खंडोबाची जत्रा, आळंदी येथें कार्तिक वद्य एकादशीस श्रीसंत ज्ञानेश्वरांची यात्रा व देहू येथें फाल्गुन वद्य द्वितीयेस श्रीसंत तुकाराम महाराजांची यात्रा या या जिल्ह्यांत भरणाऱ्या प्रमुख यात्रा होत.

प्रमुख यात्रा

केवळ जिल्हा शासन व्यवस्थेचें केंद्र म्हणूनच पुण्यास महत्त्व नाहीं तर येथें समाज कल्याण, जंगल, शेती, आरोग्य, सहकार, तुरुंग व शिक्षण या खात्यांच्या राज्य पातळीवरील मुख्य कचेऱ्याहि आहेत. शिवाय पुणें विभाग कमिशनरांची कचेरीहि पुण्यास कौन्सिल हॉलमध्यें आहे. या विभागात पुणें, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर हे जिल्हे येतात. जिल्हाधिकारी कलेक्टर, पुणें यांची कचेरी स्टेशन रोडवर असून त्यांचेमार्फत जिल्ह्याचा महसूल, कूळ कायदा अंमलबजावणी, वतनें, विकास कामें इ. कामें चालतात. कलेक्टर हेच जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट असतात. त्यांचे कचेरीमार्फत जिल्ह्यांत शांतता, सुव्यवस्था राखणें, उपहारगृहें, गिरण्या चालविणेसाठीं, बंदूक धारण करण्यासाठीं, किंवा परदेशी जाण्यासाठीं परवाने दिले जातात. कलेक्टर हेच जिल्हा विकास मंडळ, जिल्हा माजी सैनिक मंडळ, पोलिस सल्लामार समिती, जिल्हा समन्वय समिती, जिल्हा पुरवठा समिती वगैरे समित्यांचे अध्यक्ष असतात.

जिल्हा शासन व्यवस्था

पुणें जिल्ह्यांत पुणें शहर, हवेली, जुन्नर व बारामती वगैरे विभागासाठीं प्रांत अधिकारी आहेत. त्यांच्या कचेऱ्या अनुक्रमें कलेक्टर कचेरी, खडकी कचेरी, खेड आणि बारामती येथें आहेत. तालुक्यांच्या कामकाजावर देखरेख करण्याचें कार्य प्रांताधिकारी करतात. कूळ कायदा, वतन वगैरे संबंधींचे दावे या अधिकाऱ्यांपुढें चालतात. प्रांताधिकारी सब् डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट म्हणूनहि काम करतात.

तालुक्याचे मामलेदार हे जमीन महसूल, कूळ कायदा अंमलबजावणी, जमिनीची हक्क नोंदणी, पिकांची आणेवारी, जन्ममृत्यु नोंदणी, वगैरे कामें पाहतात. विकास कार्यासाठीं प्रत्येक तालुक्यांत ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर नेमलेले असतात.

पुणें जिल्हा आणि शहर असे पोलिस दलांचे दोन स्वतंत्र भाग असून त्यांच्या कचेऱ्या लष्कर भागांत हेडपोस्ट ऑफिसजवळ आहेत. जिल्ह्यांत शांतता आणि सुव्यवस्था ठेवण्याचें कार्य, तसेंच पोलिस, दारूबंदी वगैरे कायद्यांची अंमलबजावणी करणें इ. कामें पोलिस दलामार्फत होतात.

जिल्हा शेतकी अधिकारी, पुणें ४ यांची कचेरी फर्ग्युसन रोडवर असून त्यांचे कचेरीमार्फत सुधारलेल्या शेतीचा प्रचार, खत व बियाणें वांटप, पीक स्पर्धा, कीड प्रतिबंधक उपाय योजणें वगैरे कार्य केलें जातें. विकास योजना सुरू असलेल्या सर्व तालुक्यांत शेतकी अधिकारी नेमलेले असतात आणि इतरत्र शेतकी मदतनीसांमार्फत शेतकी खात्याचें कार्य चालतें.

असि. रजिस्ट्रार को--ऑपरेटिव्ह सोसायटीज, लक्ष्मी रोड, पुणें २ यांच्याकडे सहकारी संस्था नोंदणें, त्यांच्या कार्यपद्धतीवर देखरेख ठेवणें व त्या कार्यक्षम करणें अशी कामें असतात.

जिल्हा आरोग्याधिकारी, पुणें ४ यांची कचेरी फर्ग्युसन रोडवर रामनारायण बंगल्यांत असून जिल्ह्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रावर देखरेख ठेवणें, साथीच्या रोगांवर प्रतिबंधक उपाय योजणें, दूध वांटप केंद्रें चालविणें वगैरे कामें केलीं जातात.

जिल्हा शिक्षणाधिकारी, पुणें १ यांची कचेरी सेंट्रल बिल्डिंगचे आवारांत असून त्यांचेमार्फत प्राथमिक व माध्यमिक शाळांची तपासणी करणें, अभ्यासक्रमावर देखरेख ठेवणें, शाळांना विविध योजनांखालीं आर्थिक मदत देणें, स्कॉलरशिप इ. कामें केलीं जातात. जिल्हा स्कूलबोर्ड, अध्यापक विद्यालयें वगैरेवरहि त्यांची देखरेख असते.

डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर पुणें ३ यांची कचेरी पुणें मुंबई रस्त्यावर असून त्यांचेमार्फत जंगलवाढीच्या अंमलबजावणी आणि जंगल संरक्षण व संवर्धन हीं कामें केलीं जातात.

एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर पुणें पूर्व भाग यांची कचेरी सेंट्रल बिल्डिंगचे आवारांत आहे. त्यांचेमार्फत रस्ते, इमारती, बंगले वगैरे नेहमीची कामें होतातच, शिवाय लोणावळा आणि महाबळेश्वर येथील हौशी प्रवाशांसाठीं उघडण्यांत आलेल्या हॉलिडे कँपसाठीं आगाऊ रिझर्व्हेशन केलें जातें. पश्चिम भागासाठीं स्वतंत्र कचेरी जवळच आहे.

एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर पुणें इरिगेशन डिव्हिजन यांची कचेरी ससूनजवळ लोकलबोर्डानें बांधलेल्या नवीन इमारतींत असून त्यांचेमार्फत छोट्या तलावांची कामें आणि पाण्याचें बागायत शेतीसाठीं नियमित वाटप करणें हीं कामें केलीं जातात.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी पुणें यांची कचेरी २१, डॉ. आंबेडकर रस्ता, पुणे १ येथें असून त्यांचे कचेरीमार्फत मागासलेल्या वर्गाच्या सर्वांगीण उन्नतिसाठीं विविध योजना राबविल्या जातात. तसेंच फी सवलत, वसतिगृहांना आर्थिक मदत देणें, नाट्य-संगीत, तमाशा इ. सांस्कृतिक महोत्सव साजरे करणें आदि कामेंहि केली जातात.

डिस्ट्रिक्ट लेबर ऑफिसर पुणें यांची कचेरी पुणें मुंबई रस्त्यावर शिवाजीनगर स्टेशननजीक असून त्यांचेमार्फत कामगार वर्गाचे हितसंबंध पाहिले जातात.

एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची प्रादेशिक कचेरी पुणें येथें इलेक्ट्रिक पॉवर हाऊसनजिक असून या कचेरीमार्फत बेकारांची नोंद करून त्यांना योग्य रोजगार पुरविण्याच्या दृष्टीनें मार्गदर्शन केलें जातें.

सुपरिंटेंडेंट ऑफ प्रोहिबिशन अँड एक्साईजची कचेरी पुणें स्टेशनसमोर असून तिचेमार्फत संस्कार केंद्रे चालविणें, स्पिरीट वगैरे मद्यार्क युक्त पदार्थांसाठीं परवाने देणें, सिनेमा, कलापथकें आदि करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें दारूबंदीचा प्रचार करणें आदि कामें केलीं जातात.

डिस्ट्रिक्ट व सेशन्स न्यायालय जिल्ह्यांतील वरिष्ठ न्यायालय होय. या न्यायालयाचे मुख्य अधिकारी जिल्हा (न्यायाधिश) व सेशन्स न्यायाधिश असतात. जिल्ह्यांत दोन प्रकारचीं न्यायालयें

न्यायदान

असतातः--१ *दिवाणी न्यायालयें*:—जिल्हा न्यायालय, सिव्हील जज्ज सि. डी. व सिव्हील जज्ज ज्यु. डी. यांची न्यायालयें. २ *फौजदारी न्यायालयें*—सेशन्स न्यायालय, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटस् फर्स्ट क्लास व स्पे. ज्यु. मॅजिस्ट्रेटस् फर्स्ट क्लास यांची न्यायालयें.

दिवाणी न्यायालयाचे अधिकार क्षेत्र दोन गोष्टींनीं मर्यादीत असतें:-१ प्रादेशिक अधिकार क्षेत्र, २ आर्थिक अधिकार क्षेत्र. सिव्हिल जज्ज ज्यु. डि. कोर्टाचे अधिकार क्षेत्र सरकारने नेमून

दिवाणी न्यायालयें

दिलेल्या कांहीं तालुक्यापुरते तें मर्यादित असते, व त्यांचे कोर्टांत १०,००० रु. पर्यंतचे दावे चालतात. सिव्हील जज्ज सि. डी. चे कोर्ट बहुधा जिल्ह्याच्या ठिकाणीं असते, व या कोर्टाचे अधिकार क्षेत्रांत रुपये १०,००० वरील कोणत्याही रकमेपर्यंत दावे चालतात व अशा दाव्याकरतां त्याचे प्रादेशिक अधिकार क्षेत्र संपूर्ण जिल्ह्यापुरते असते; याशिवाय सदरहू कोर्ट यांचे अधिकार ते ज्या जिल्ह्याचे ठिकाणच्या तालुक्यांत असते, त्या तालुक्याची प्रादेशिक मर्यादा ठरविलेली असते अगर याशिवाय इतर कांहीं गांवें अगर तालुके सरकारने दिवाणी काम चालविण्यासाठीं अशा तालुक्यास जोडले असतील तर त्या

प्रादेशिक मर्यादेपर्यंत त्यांचे अधिकार सिव्हील जज्ज ज्युनिअर डि. कोर्टाप्रमाणें विषयाची किंमत रुपये १०,००० अगर त्यापेक्षां कमी असलेले दावे त्या क्षेत्रांपुरते चालविण्याचा त्यांना अधिकार असतो. या प्रमाणें हल्लीचे सिव्हील जज्ज सि. डी. कोर्टास हवेली तालुका, मुळशी तालुका व दौंड तालुक्यांतील २९ गांवे यांतून निर्माण होणारे रुपये १०,००० पर्यंतचे दावे चालविण्याचाहि अधिकार आहे. याशिवाय सि. डिव्हिजन कोर्टास जिल्ह्यांतील, सरकारतर्फे अगर सरकारविरुद्ध कोणत्याहि किंमती-पर्यंतचे दावे असतील तर असे दावे चालविण्यास फक्त त्यांनाच अधिकार असतो, म्हणून सरकारतर्फेचे अगर सरकार विरुद्ध असलेले सर्व दावे त्यांचे कोर्टांत दाखल केले जातात.

सिव्हिल जज्ज सि. डी. या कोर्टास काम जास्त असल्यास त्यांना मदतनीस म्हणून जॉ. सिव्हिल जज्ज सि. डी. अगर जॉ. सिव्हिल जज्ज ज्यु. डी. अशा जज्जांची मदत दिली जाते. रुपये १०,००० अगर त्यापेक्षां कमी असलेल्या दाव्यास अगर प्रकरणास रेग्युलर मुकदमा वगैरे संबोधिले जाते व १०,००० पेक्षां जास्त किंमतीचे दाव्यास अगर प्रकरणांस स्पेशल मुकदमा वगैरे म्हणून संबोधिले जाते. वरील प्रकारच्या दाव्याखेरीज व त्यांतून निर्माण होणारे प्रकरणाखेरीज, हिंदु मॅरेज ॲक्ट खालचे सर्व अर्ज चालविण्याचा अधिकार फक्त सिव्हिल जज्ज सि. डी. या कोर्टासच असतो, व त्यामुळें असे अर्ज या कोर्टांतच दाखल केले जातात व त्यास मॅरेजपिटीशन्स् असें संबोधिले जाते. याशिवाय विवि-क्षीत मर्यादा सोडून नादारी ॲक्ट खालचे सर्व अर्ज चालविण्याचा या कोर्टासच अधिकार असतो.

ज्या ठिकाणीं स्मॉल कॉज कोर्ट नसते, अशा ठिकाणीं सिव्हिल जज्ज ज्यु. डी. कोर्टास अगर सि. जज्ज सि. डी. कोर्टास सरकारनें त्या त्या कोर्टास (वैयक्तिक न्यायाधिशांस) स्मॉल कॉज कोर्टाचे अधिकार दिलेले असतात; अशा दाव्यांना अगर प्रकरणांना स्मॉल कॉज मुकदमे संबोधिले जाते.

सि. जज्ज ज्यु. डी. कोर्टास स्मॉल कॉज कोर्टाचे अधिकार रुपये ५०० पर्यंत व सि. जज्ज सि. डी. चे कोर्टास असे अधिकार रु. १५०० पर्यंत वैयक्तिकरित्या सरकारकडून दिले जातात.

जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार :

१. दिवाणी अव्वल कामें चालविणें.
२. अपीलाचीं कामें चालविणें. (रुपये १००० चे किंमतीपर्यंतचीं)
३. चौकशी अर्जाचीं कामें चालविणें.

दिवाणी अव्वल कामांत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

१. जिल्हा न्यायाधिशास सर्व प्रकारची दिवाणी कामें चालविणेचा अधिकार असतो. परंतु सिव्हिल प्रोसिजर कोड प्रमाणे दिवाणी काम हें प्रथम अधिकार असलेल्या खालचे कोर्टांतच दाखल करावें, असा नियम असलेमुळें सर्व दिवाणी कामें त्या त्या खालचे कोर्टांत प्रादेशिक मर्यादेप्रमाणें व आर्थिक मर्यादेप्रमाणें सि. जज्ज ज्यु. डी. अगर सि. जज्ज सि. डी. यांचे कोर्टांतच दाखल केलीं जातात व चालविलीं जातात. परंतु सुट्टीचे दिवसांत अगर अशीं कोर्टस् कांहीं कारणास्तव बंद असल्यास अशीं कामें जिल्हा न्यायाधिश कोर्टांत दाखल केलीं जातात व चालविला जातात.

याशिवाय स्पेशल ॲक्टस खालीं जीं कामें फक्त जिल्हा न्यायाधिशासच चालविण्याचा अधिकार असतो, अशीं अव्वल कामे या कोर्टांतच दाखल केलीं जातात व चालविलीं जातात. उदाः—

१) लॅण्ड ॲक्विझिशन ॲक्टखालील प्रकरणें.
२) पार्शी मॅरेज ॲक्टखालील प्रकरणें.

३) स्पे. मॅरेज ॲक्टखालील प्रकरणें.
४) पब्लिक ट्रस्ट ॲक्टखालील प्रकरणें.
५) सक्सेशन ॲक्टखालील प्रकरणें.
६) गार्डिअन ॲण्ड वॉर्डस् ॲक्टखालील प्रकरणें.
७) को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्टखालील प्रकरणें.
८) कंपनी ॲक्टखालील प्रकरणें व ट्रेड मार्क ॲक्टखालील प्रकरणें.
९) सि. प्रो. कोडखालील प्रकरणें, वगैरे.

२. अपीलाचे कामामध्यें खालील गोष्टींचा समावेश होतो.

१) सि. प्रो. कोडप्रमाणें दाखल होणारीं अपीलें व क्रि. अपीलें.
२) स्पे. ॲक्टखालीं होणारीं अपीलें उदा.:—
अ) बी. ए. डी. आर. खालील अपीलें.
ब) इन्सॉलव्हन्सी ॲक्टखालील अपीलें.
क) रेन्ट ॲक्टखालील अपीलें. वगैरे.

३. चौकशी अर्जः—

(अ) सि. प्रो. कोड. (ब) रेन्ट ॲक्ट. (क) कांहीं स्पे. ॲक्टस् खालील अर्जांचा समावेश होतो.

स्मॉल कॉजेस् कोर्ट

जिल्ह्याचे ठिकाणीं म्हणजे पुणे येथें सरकारनें स्वतंत्र स्मॉल कॉजेस कोर्ट स्थापन केले आहे. या कोर्टास २००० रुपयापर्यंतचे जंगम मिळकती बाबतींत दावे चालविण्याचा अधिकार आहे. या कोर्टाची प्रादेशिक मर्यादा हवेली तालुका, मुळशी तालुका व दौंड तालुक्यांतील २९ गांवें ही आहे. या कोर्टास बॉम्बे रेन्ट ॲक्ट खालील त्यांच्या क्षेत्रांतील लागू केलेल्या मर्यादेंत निष्पन्न झालेले सर्व दावे चालविण्याचा तसेंच वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट व मिनिमम वेजेस ॲक्ट खालील सर्व प्रकरणें (त्यांचे अधिकार क्षेत्रांतील) चालविणेचा अधिकार आहे. पूना म्यु. कॉर्पोरेशन ॲक्टखालीं कॉर्पोरेशनच्या असेसमेन्ट वगैरे बाबतच्या निकालाविरुद्ध अपीलें ऐकण्याचाहि त्यांना अधिकार आहे. सरकार वेळोवेळा जीं जीं कामें करण्यास अधिकार देतील तीं तीं सर्व ज्युडिशिअल कामें करण्याचा या कोर्टास अधिकार असतो. उदा.:-इलेक्शन याद्याबाबत तक्रारी ऐकणें व त्या कायम करणें, वगैरे.

हल्ली या कोर्टांत दोन न्यायाधिश काम करतात.

याशिवाय या कोर्टास रजिस्ट्रारचें कोर्ट जोडलेलें आहे. रजिस्ट्रार यांना रुपये १०० अगर त्याचे आंतील सर्व दावे चालविण्याचा अधिकार असतो.

फौजदारी न्यायालयें:—सर्व फौजदारी खटले प्रथम ज्यु. मॅजिस्ट्रेट यांचे कोर्टांत दाखल होतात. ज्यु. मॅजिस्ट्रेट यांस सरकारनें नेमून दिलेल्या प्रादेशिक भागांतून (ठराविक तालुक्यांतून अगर गांवांतून) निर्माण होणाऱ्या फौजदारी खटल्याचा निकाल करण्याचा अधिकार आहे.

ज्यु. मॅजिस्ट्रेटचे प्रकारः–

१) ज्यु. मॅजिस्ट्रेट फर्स्टक्लास.
२) ज्यु. मॅजिस्ट्रेट वर्ग २.
३) ज्यु. मॅजिस्ट्रेट वर्ग ३.
४) स्पे. ज्यु. मॅजिस्ट्रेट.

न्यायदान आणि अंमलबजावणी स्वतंत्र झाल्यापासून वर्ग २ चे व वर्ग ३ चे मॅजिस्ट्रेट अस्तित्वांत नाहींत.

ज्यु. मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास यांचे अधिकार खालीलप्रमाणें असतातः–

१) यांना दोन वर्षांपर्यंत साधी अगर सक्त मजुरीची शिक्षा तसेंच रुपये २००० पर्यंत दंडाची शिक्षा देण्याचा अधिकार असतो.

या शिवाय यांना क्रि. प्रो. कोडप्रमाणें इतर सर्व कामें चालविण्याचा अधिकार आहे.

स्पेशल ज्यु. मॅजिस्ट्रेटः– सरकारला मे. हायकोर्टाचे विचारानें ठराविक केसेस्‌बाबत अगर एखाद्या सार्वजनिक क्षेत्रामध्यें निर्माण होणाऱ्या केसेस्‌बाबत केसेस् चालविण्यासाठीं एखाद्या मॅजिस्ट्रेटांस विशेष अधिकार देतां येतात व अशा प्रकारें विशेष अधिकार दिलेल्या मॅजिस्ट्रेट यांना स्पे मॅजिस्ट्रेट म्हणून संबोधिलें जातें व त्यांना सि. प्रो. कोड अन्वयें जरूर ते अधिकार दिले जातात. अशा प्रकारची स्पे. ज्यु. मॅजिस्ट्रेटचीं कोर्टस् पुणें जिल्ह्यांत पुढीलप्रमाणें आहेत.

१. स्पे. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट ॲन्टीकरप्शन्, पुणें.
२. ,, ,, व्हेइकल, पुणें.
३. ,, ,, पुणें म्यु. पल कार्पोरेशन, पुणें.
४. ,, ,, रेल्वे, पुणें.
५. ,, ,, रेल्वे, दौण्ड.

या कोर्टाची अधिकार क्षेत्रें व सरकारनें नेमून दिलेल्या विशिष्ट खटले चालविण्यापुरते त्यांचे अधिकार मर्यादित असतात व बाकीचे सर्व खटले त्या त्या ज्यु. मॅजिस्ट्रेट फ. क्लास यांचे कोर्टात चालतात.

एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटः–याशिवाय ॲडमिनिस्ट्रेशनसाठीं व शांतता प्रस्थापित करण्यासाठीं जिल्ह्यामध्यें पुढीलप्रमाणें एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटस्‌हि सरकारकडून नेमले जातात.

१. जिल्हा मॅजिस्ट्रेट.
२. सब् डि. मॅजिस्ट्रेट (फर्स्ट क्लास) वर्ग १.
३. तालुका मॅजिस्ट्रेट.
४. स्पे. एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट.

वरील मॅजिस्ट्रेटस्‌कडे जिल्ह्यांत गुन्हे होऊं नयेत, म्हणून जरूर ते इलाज करण्याची व शांतता राखण्यासाठीं जरूर ते उपाय योजण्याचीं कामें असतात. एक्झिक्यूटिव्ह मॅजिस्ट्रेटस् हे डि. मॅजिस्ट्रेटच्या देखरेखीखालीं कामें करतात.

सेशन्स् जज्जेस्:– से. जज हे जिल्ह्यांतील फौजदारी न्यायदानाचे बाबतींतील सर्वोच्च अधिकारी असतात. त्यांना अगर ॲडिशनल सेशन जज्ज यांना कायद्यानें कोणत्याहि गुन्ह्याबाबत दिलेली कोणतीहि शिक्षा देतां येते. फांशीची शिक्षा मात्र त्यांना हायकोर्टाच्या मंजुरीनें देतां येते.

असिस्टंट सेशन जज्ज यांना फाशीचे शिक्षेशिवाय अगर जन्मठेपेचे शिक्षेशिवाय अगर १० वर्षांपेक्षां जास्त नाहीं, अशी कोणतीहि कायद्यानें ठरविलेली शिक्षा देतां येते.

सेसन्स जज्ज यांना खालीलप्रमाणें कामे करावी लागतात.

१. फौजदारीचें अव्वल काम.

२. फौजदारीचें अपिलाचें काम.

३. फौजदारीचें रिव्हिजनचें काम.

फौजदारीचे अव्वल कामामध्यें खालील कामांचा समावेश होतो.

(अ) *सेशन्स केसेस चालविणें*– वर उल्लेख केल्याप्रमाणें ज्यु. मॅजिस्ट्रेट फ. कोर्टास जास्तींत जास्त फक्त २ वर्षांची सजा व २००० रुपये दंडाची शिक्षा देण्याचा आधिकार असतो व त्यामुळें त्या शिक्षेपेक्षा कायद्यानें जास्त शिक्षा असलेले गुन्हे चालविण्याची कामें सेशन्स कोर्टांत पाठवितात, म्हणजेच सेशन कमिट करतात. अशा केसेसना सेशन कोर्टांत सेशन्स केस म्हणून संबोधिले जातें व त्या कोर्टाचे अव्वल काम म्हणून चालविल्या जातात.

याशिवाय सेशन्स् कोर्टास क्रि. लॉ अमेन्डमेंट ॲक्टप्रमाणें सरकारनें ठरवून दिलेले कांही स्पे. खटले चालविण्याचा आधिकार असतो व अशा स्पे. क्रि. केसेस हें त्यांचें अव्वल फौजदारी काम म्हणून समजलें जातें.

(ब) *ॲपेलेट फौजदारी कामें*:–क्रि.प्रो. कोड अन्वयें ज्यु. मॅजिस्ट्रेटस् यांचे हुकूमावरील सर्व अपिलें चालविण्याचा सेशन्स कोर्टास अधिकार असतो. तसेच असि. सेशन जज्ज यांनीं दिलेल्या अगर सरकारनें जास्त शिक्षा देणेचा अधिकार दिलेल्या मॅजिस्ट्रेटस् यांच्या चार वर्षांच्या आंतील शिक्षेविरुद्ध केलेले अपील सेशन्स कोर्टासच चालाविण्याचा अधिकार असतो.

मॅजिस्ट्रेटच्या निकालाविरुद्ध केलेलीं अपीलें चालविण्याचा अधिकार अडि. सेशन जज्ज यांना तसेंच असिस्टन्ट सेशन जज यांनाहि असतो.

एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट अगर डि. मॅजिस्ट्रेट यांच्या कांहीं विविक्षित निकालावरील अपीलें सेशन्स कोर्टास चालविण्याचा अधिकार असतो.

क्रि. प्रो. कोड अन्वयें सेशन्स कोर्टास आपण होऊन अगर अर्जावरून आपल्या आधिकार कक्षेंतील ज्यु. मॅजिस्ट्रेटस् यांचे कोर्टांतील प्रकरणें मागवून घेऊन तीं तपासण्याचा म्हणजे त्यांनीं दिलेले निकाल किंवा शिक्षा ह्या योग्य व कायदेशीर रितीनें दिल्या गेल्या आहेत कीं नाहींत हें तपासून पाहण्याचा अधिकार आहे व त्यांत फेरफार करण्याचाहि अधिकार आहे.

फौजदारी चौकशी कर्ज

सर्व क्रिमिनल कोर्टास इंडियन पि. कोड खालीं गुन्ह्याबाबत व इतर कायद्याखालील गुन्ह्याबाबत सर्व फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार आहे. तसेंच, अज्ञान गुन्हेगारांचे खटले चालविण्याचाहि अधिकार ज्यु. मॅ. फ.कोर्टास असतो व ज्या ठिकाणीं असे अज्ञान गुन्हेगारांचे जास्त खटले असतात, त्या

ठिकाणीं सरकारचे हुकुमावरून स्वतंत्र ज्युव्हेनाईल कोर्ट्स स्थापिलीं जातात. अशा कोर्टांत खटले चालविणेसाठीं दोन ऑनररी मॅजिस्ट्रेट्स् असतात. त्यांना मदत म्हणून सरकार एका ज्यु. मॅजि. फर्स्ट क्लासची–प्रिसायडिंग ऑफिसर ज्युव्हेनाईल कोर्ट म्हणून नेमणूक करते. ज्युव्हेनाईल कोर्ट पुणें जिल्ह्यांत (पुणें व बारामती) या दोन ठिकाणीं आहेत.

फौजदारी गुन्ह्यांचे दोन प्रकार :

१. कॉग्नीझिबल ऑफेन्स.
२. नॉन कॉग्नीझिबल ऑफेन्स.

कॉग्नीझेबल ऑफेन्स म्हणजे ज्या गुन्ह्यांबाबत पोलिसांस आरोपीला चौकशीकरितां वारन्टाशिवाय अटक करतां येते. नॉन कॉग्नीझिबल ऑफन्स म्हणजे पोलिसास कोणत्याहि गुन्ह्याबाबत मॅजिस्ट्रेटच्या वॉरंटाशिवाय अटक करतां येत नाहीं. बेलबेल व नॉन बेलेबल असेहि गुन्ह्याचे प्रकार आहेत.

बेलेबल ऑफेन्स म्हणजे ज्या गुन्ह्यांबाबत पोलिसास अगर कोर्टास आरोपीस कायद्यान्वये जामिनावर सोडतां येते असे गुन्हे. वरील गुन्ह्याशिवाय जे गुन्हे आहेत ते सर्वच नॉन बेलेबल आहेत.

सरकारनें फौजदारी व दिवाणी कोर्टांबाबतच्या प्रादेशिक मर्यादा एकच ठरविलेल्या आहेत. त्यामुळें ज्या ठिकाणीं दिवाणी व फौजदारी कामें भरपूर असतात त्या ठिकाणीं सिव्हिल जज्ज व ज्यु. डी. मॅजि. ची कोर्टस् वेगवेगळीं असतात व ज्या ठिकाणीं फौजदारी व दिवाणी हीं दोन्हीं कामें वेगवेगळ्या जज्जांनीं चालविण्याइतकी नसतात त्यावेळीं त्या ठिकाणीं दिवाणी व फौजदारी अधिकार एकच जज्ज चालवितो व अशा जज्जांस सिव्हिल जज्ज ज्यु. डी. अगर सि. डी. आणि ज्यु. मॅजि. वर्ग १ असा दर्जा असतो.

पुणें येथें दिवाणी व फौजदारी कामें जास्त असल्यामुळें दिवाणी कामें सिव्हिल जज्जेस चालवितात व फौजदारी कामें ज्यु. मॅजिस्ट्रेटस् चालवितात. याप्रमाणें पुणें येथें एकूण ५ सिव्हिल जज्जेस सि. डी. व चार सिव्हील जज्जेस ज्यु. डी. ची कोर्टस दिवाणी कामासाठी आहेत व ज्यु. मॅजिस्ट्रेटची एकूण ७ कोर्टस् व स्पे. मॅजि. चीं ४ कोर्टस् फौजदारी कामासाठीं नेमलेलीं आहेत. तसेंच पूना कॅन्टोनमेंट येथें व खडकी कॅन्टोनमेन्ट येथें अशी २ ज्यु. मॅजि. कोर्टस् त्या त्या विभागासाठीं नेमलेलीं आहेत.

तालुका कोर्टांत दोन्ही प्रकारचीं कामें म्हणजे फौजदारी व दिवाणी कमी असल्यामुळें तीं सि. जज्ज ज्यु. डी. व ज्यु. मॅजि. वर्ग १ यांनाच करावीं लागतात. अशा प्रकारचीं कोर्टस् पुढील ठिकाणीं आहेत.

१. घोडनदी, २. जुन्नर, ३. वडगांव, ४. सासवड, ५. खेड, ६. बारामती, ७. भोर.

बारामती येथें फौजदारी व दिवाणी कामें जास्त असल्यामुळें फौजदारी कामें स्वतंत्र मॅजिस्ट्रेटकडे दिलीं जातात.

वरील योजनेनुसार पुणें शहरांत डिक्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज यांचेशिवाय २३ न्यायालयें असून जिल्ह्यांत बारामती, घोडनदी, जुन्नर, वडगांव, सासवड, भोर, खेड–आंबेगांव, हवेली, मुळशी, दौंड, दौंड रेल्वे; पुणें कॅन्टो. व खडकी अशी सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन व ज्युडिशिअल मॅजि. वर्ग १ यांची कॉर्टस् आहेत.

जिल्ह्यांतील सर्व कोर्टांवर देखरेख ठेवणें व त्यांची तपासणी करणें व इतर सर्व ॲडमिनी-स्ट्रेटिव्ह कामें मे. डिस्ट्रिक्ट जज्ज व सेशन जज्ज यांना करावीं लागतात.

पुणें शहर पोलीस दल

पुणें शहर पोलिस दल प्रमुख, या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं शहरांतील शांतता, सुव्यवस्था, गुन्हेगारी प्रतिबंध, रहदारी नियंत्रण व जनतेला आवश्यक त्यावेळीं मदत देणें इत्यादि कामें शहरपोलीस पहातात. पुणें शहरांत फरासखाना, विश्रामबाग वाडा, खडक, डेक्कन जिमखाना, बन्ड गार्डन, मिलटरी लाईन्स., खडकी व कॅन्टोनमेंट या ठिकाणीं या दलाचीं केंद्रें आहेत. पोलीस हेडक्वार्टर्सवर वायरलेस स्टेशन असून फिरत्या वायरलेस ग्रिडकरितां विश्रामबाग वाड्यांत कंट्रोल रूम आहे.

पोलिसांच्या कल्याणाचीं विविध कामें

पोलीस व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणाकरितां पोलीस वेलफेअर फंडातून पुढील विविध कामें करण्यांत येतात.—(१) प्रसूति गृह—५२,००० रु. खर्चून भांबुर्डा पोलिस हेडक्वार्टर्स-वर २४ खाटांचे एक प्रसूति गृह नुकतेच बांधण्यांत आलें. त्यासाठीं आवश्यक तो मेडिकल स्टाफ सरकारनें नेमला आहे. (२) दवाखाना—पोलिस हेडक्वार्टर्सवर दवाखाना असून पोलिस व त्यांच्या कुटुंबियांना विनामूल्य औषधें देण्यांत येतात. तसेंच गरजूंना महाग औषधें विकत घेण्याकरितां पोलिस फॅमिलीज वेलफेअर फंडामधून आर्थिक सहाय्यहि दिलें जातें.

(३) कुटुंब नियोजन केंद्र—पोलिस हेडक्वार्टर्सवर कुटुंब नियोजन केंद्र असून तेथें कुटुंबनियोजनावर व्याख्यानें दिलीं जातात. संततिनियमनाकरितां शस्त्रक्रिया करवून घेणाऱ्या पोलिसांना आगावू रोख रकमा देण्यांत येतात.

(४) दूधकेंद्र—पोलिसांच्या मुलांकरितां सर्व पोलिस लाईन्सवर दूध पुरवठा केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत.

(५) मुलांकरितां बाग—पोलिस हेडक्वार्टर्सवर सर्व खेळांच्या साधनांनीं युक्त अशी एक बाग खास मुलाकरितां ठेवण्यांत आली आहे.

(६) सिनेमाचे कार्यक्रम—करमणुकीकरतां वेगवेगळ्या पोलीस लाईन्सवर सिनेमाचे कार्यक्रम घेतले जातात.

(७) सांस्कृतिक कार्यक्रमाकरितां प्रेक्षागृह—बॅडमिंटन खेळण्याची सोय असलेलें एक प्रेक्षागृह पोलिस हेडक्वार्टर्सवर बांधण्यांत आलें आहे.

(८) फिरतें वाचनालय—दिनांक १-१०-१९५७ पासून पुणें शहरांत एक फिरतें वाचनालय पोलिसांसाठीं सुरु करण्यांत आलें आहे.

(९) शैक्षणिक मदत—दरवर्षीं होणाऱ्या वार्षिक परीक्षेंत शेंकडा ५० टक्के अथवा त्याहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पोलिस पालकांना शिक्षणाकरितां आर्थिक सहाय्य दिलें जातें.

(१०) प्रोव्हिजन स्टोअर्स—पोलिसांच्या उपयोगाकरितां पोलिस हेडक्वार्टर्सवर प्रोव्हिजन स्टोअर्स नुकतेंच उघडण्यांत आलें आहे.

महाराष्ट्र राज्यांतील सर्वांत मोठा तुरुंग म्हणून पुण्याजवळचा 'येरवडा मध्यवर्ती कारागृह' मानला जातो. ऐतिहासिक दृष्ट्याहि या कारागृहाचें महत्त्व फार मानलें जातें. याचें कारण स्वातंत्र्य-पूर्व काळांत स्वातंत्र्यासाठीं झगडणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी आदि बरेच राष्ट्रीय पुढारी या ठिकाणीं तुरुंगवास भोगीत होते. आजहि या कारागृहांत दररोज सरासरी २५०० ते २६०० कैद्यांची राहण्याजेवण्याची व्यवस्था आहे. तुरंग सुधारणेच्या तत्त्वानुसार या कारागृहामध्यें अनेकविध योजना आंखण्यांत आल्या आहेत.

मध्यवर्ती कारागृह

या जेलमध्यें साधारणपणें दोन वर्षांपासून तो अगदीं जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्यापर्यंतचे गुन्हेगार ठेवले जातात. शिक्षा भोगून कारागृहाबाहेर बाहेरच्या जगांत वावरतांना त्यांना जबाबदारीनें सामाजिक जीवन जगतां यावें यासाठीं अनेक प्रकारचे सुसंस्कार कैद्याच्या मनावर घडविले जातात. कैद्यांची आवड निवड लक्षांत घेऊन त्यांना योग्य तें काम दिलें जातें. कैद्यांची मानसिक उन्नति व्हावी या दृष्टीनें सांस्कृतिक कार्यक्रम, रेडिओ, कँटीन आदींची सोय करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें तुरुंगाबाहेरील क्रीडा स्पर्धेतून भाग घेण्याची संधि कांहीं चांगल्या वर्तणुकीच्या कैद्यांना दिली जाते. त्यासाठीं जेलजवळच एक स्वतंत्र व विस्तीर्ण असें क्रीडांगण असून नुकतेंच एक " खुलें नाट्यगृह " बांधण्यांत आलें आहे. कारागृहांतील अशिक्षित कैद्यांना शिक्षण मिळावें या दृष्टीनें रोज साक्षरता वर्ग चालविले जातात व शालेय शिक्षणाबाबतहि सवलती दिल्या जातात. आज या तुरुंगांतील कांहीं सुशिक्षित कैद्यांनीं एक हस्तलिखित सुरू केलें असून त्याचे अंक नियमितपणें प्रकाशित होत असतात.

शिक्षा भोगून तुरुंगांतून बाहेर पडल्यावर नोकरी व्यवसाय मिळण्याच्या दृष्टीनें सोयीचें जावें म्हणून कैद्यांना विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांचें शिक्षण दिलें जातें. या ठिकाणीं सुतारकाम, हातमागकाम, रंगकाम, चित्रकला, छपाई, शिवणकाम, धोबीकाम, लोहारकाम, चांभारकाम, कापडाचे चिंध्यापासून कागद तयार करणें वगैरेंचें शिक्षण दिलें जातें.

सामाजिक जबाबदारीचें जीवन जगण्याची संवय लागावी म्हणून दीर्घ मुदतीची शिक्षा झालेल्या परंतु उत्तम वर्तणुकीच्या कैद्यांना सुटण्यापूर्वीं कांहीं काळ ' खुल्या तुरुंगांत (Open Jail) ठेवण्यांत येतें. सुटल्यानंतर आपलें जीवन चांगल्यारीतीनें प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें कैद्यांना मदत व्हावी म्हणून या ठिकाणीं संपर्क अधिकाऱ्याची खास नेमणूक करण्यांत आली आहे. जेलमधील जेलर्स आणि गार्डिंग स्टाफ या लोकांना कैद्यांशीं वागतांना कशा रीतीनें वर्तन ठेवावें या विषयींचें शास्त्रीय शिक्षण देण्यासाठीं " जेल ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूल " नांवाची संस्था या ठिकाणीं सुरू करण्यांत आली आहे.

ज्या छापखान्यांमधील बहुसंख्य कामगार हे शिक्षा झालेले गुन्हेगार असतात अशा तऱ्हेचा महाराष्ट्र राज्यांतील एक सरकारी छापखाना म्हणून पुणें येथील येरवडा प्रिझन प्रेसकडे बोट दर्शवितां येईल. या छापखान्यांतील बहुतेक सर्व कामें कैद्याकडेच आहेत. त्यांच्या जोडीला बाहेरूनहि कांहीं पगार देऊन कामगार ठेवण्यांत आले आहेत. १८८६ सालीं या छापखान्याचें कामकाज छोट्या प्रमाणा-वर सुरू झालें आणि १९१२ सालीं या छापखान्याचें काम मोठ्या प्रमाणावर आजच्या प्रशस्त इमार-तींत चालू झालें. पूर्वीं या छापखान्याला कमी काम पडत असे. परंतु महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर २६ जिल्ह्यासाठीं लागणारें साहित्य या छापखान्याला पुरवावयाचें असल्यानें छापखान्याचें कामकाज इतकें वाढलें कीं ती मागणी पूर्ण करण्यासाठीं दुबार पद्धतीनें छापखाना चालवावा लागत आहे.

प्रिझन प्रेस, पुणें

या प्रेसमध्यें निरनिराळ्या विभागांत अद्यावत पद्धतीनें कामकाज केलें जातें. फॉर्म्स स्टोअर विभागाकडून सरकारी कचेऱ्यांतून जे विविध प्रकारचे फॉर्मस् वापरले जातात ते पुरविण्याची व्यवस्था केली जाते. राज्यांतील सर्व सरकारी अधिकाऱ्यांना जवळ जवळ ३००० वेगवेगळ्या नमुन्याचे फॉर्मस् पुरविले जातात. सरकारी कचेऱ्यांना लागणारी विविध प्रकारची स्टेशनरी याच प्रेसकडून पुरविली जाते.

याशिवाय सरकारी गॅझेटस्, राज्याचें अंदाजपत्रक, असेंब्लीचें कामकाज, इंडियन लॉ रिपोर्टस्, एस. एस. सी. परीक्षेच्या उत्तरपत्रिका, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्टस्, हवामान खात्याचे रिपोर्टस्, सेल्स टॅक्स आणि टेनन्सी फॉर्मस्, निरनिराळ्या खात्याचे ग्रंथ, रिपोर्टस् ब्रोचर्स आदि विविध प्रकारच्या कामांची छपाई या प्रेसला करावी लागते. सुमारें ५२५ मजूर कैदी आणि ३०० पगारी नोकरांना पुरेलसें काम या प्रेसमध्यें आहे. हा प्रेस पुण्यापासून ६ मैल अंतरावर आहे. तेथें १०० पगारी नोकरांची रहाण्याची सोय सरकारनें केली आहे. छापखान्यांतील कामगारांच्या करमणुकीसाठीं ' करमणूक केंद्र ' ' बांधण्यांत आलें आहे. कामगारांनीं सहकारी पद्धतीवर १) को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, २) धान्य दुकान, ३) उपहार गृह या तीन संस्था चालविल्या आहेत.

जिल्हा पोलिस दल

ग्रामीण विभाग–पुणें जिल्हा पोलीस दल ग्रामीण विभागाची मुख्य कचेरी, पुणें लष्करमध्यें जनरल पोस्ट ऑफिस जवळ असून त्या दलाचे प्रमुख म्हणून स्वतंत्र जिल्हा पोलिस दल प्रमुख काम पहातात. या दलाचे विभाग व उपविभाग खालील ठिकाणीं आहेतः—

पोलिस स्टेशनचें नांव	आौट पोस्ट
१) लोणी काळभोर	१ लोणीकंद
	२ उरुळी कांचन
	३ उरुळी देवाची
२) शिरूर	—
३) तळेगांव ढमढेरे	१ पाबळ
४) सासवड	—
५) जेजुरी	१ वाल्हा
	२ नीरा
६) बारामती	१ माळेगांव
७) दौंड	१ केडगांव
	२ पाटस
	३ यवत
	४ रावणगांव
८) वडगांव निंबाळकर	१ सुपे
	२ पंधारे (सब् पोस्ट)
९) इंदापूर	१ भिगवण
	२ बावडा
	३ लासूर्णे
	४ सणसार

पोलिस स्टेशनचें नांव	आौट पोस्ट
१०) भोर	१ किकवी
	२ शिंदेवाडी
	३ नसरापूर
	४ पसरे
	५ हिर्दोशी
११) वेले	१ मार्गासनी
	२ केळद
	३ आंबेगांव
१२) हवेली	१ चिंचवड
	२ मोशी
	३ पिंपरी
	४ खेडशिवापूर
	५ औंध
	६ खडकवासला
	७ कोंढवे (एन्.डी.ए.)
१३) जुन्नर	१ ओतूर
	२ इंगळूज
	३ मठ
	४ घाटघर

पोलिस स्टेशनचें नांव	औट पोस्ट	पोलिस स्टेशनचें नांव	औट पोस्ट
१४) घोडेगांव	१ आंबेगांव	१७) नारायणगांव	१ पिंपळवंडी
	२ मंचर	१८) चाकण	१ आळंदी
	३ निगडाळे		२ पायट
१५) खेड	१ वाफगांव	१९) पौड	१ मुळशी
	२ वाडा		२ कोळवण
१६) वडगांव मावळ	१ तळेगांव दाभाडे	२०) लोणावळा	१ खंडाळा
	२ खटकाळे	२१) देहू रोड	—

शहर पोलीस दलाप्रमाणेंच जिल्हा पोलीस दलासहि वेल्फेअर फंडांतून सर्व सवलती मिळतात.

३. कृषि उत्पादन व नैसर्गिक संपत्ति

पुणें जिल्ह्याच्या एकूण ३८,४४,४४३ एकर क्षेत्रांपैकीं २६,०५,८७२ एकर जमीन वेगवेगळ्या पिकाखालीं आहे. ज्वारी, भात, बाजरी, गहूं, कपाशी, ऊस, भुईमूग, बटाटे हीं येथील प्रमुख पिकें आहेत. भोर, मुळशी, मावळ, जुन्नर, आंबेगांव या तालुक्यांतील डोंगराळ भागांत पाऊस भरपूर पडत असल्यानें भात हें मुख्य पिक आहे. तर शिरूर, दौंड, बारामती, इंदापूर या भागांत पाऊस अगदीं कमी पडत असल्यामुळें रब्बी ज्वारी हेंच प्रमुख पीक आहे. आंबेगांव खेड भागांत बटाट्याची पिके वर्षांतून दोनदा घेतली जातात. हवेली, बारामती, इंदापूर या भागांत पाटस्थळाखालील जमीनींत ऊंस पिकविला जातो. बाजरी, कपाशी, कडधान्यें वगैरे पिके जिल्ह्यांतील जवळ जवळ सर्व भागातच कमी अधिक प्रमाणांत घेतली जातात.

भूभाग

१९५८—५९

एकूण क्षेत्र	३८,४४,४४३ एकर
लागवडीखालीं नसणारी (जंगल रस्ते इमारती वगैरे)	९,९२,९४५
पडीत	२,३५,९५०
लागवडीखाली (गायरानें—वगैरे) येण्याजोगी	१,१२,१४९
पेरलेले क्षेत्र	२४,०३,३९९ एकर
एकूण लागवडी खालील क्षेत्रः—	२६,०५,८७२ एकर
	पैकीं २ लाख एकरांत दुबार पिकें.

शेतामध्यें नवीन सुधारलेलें बियाणें पेरल्यास अधिक उत्पन्न येतें असा अनुभव शेतकऱ्यांनीं घेतल्यानें बियाण्याची मागणी सारखी वाढत आहे. या मागणीनुसार पुरवठा करता यावा म्हणून १९५८ पासून जिल्ह्यांत १० बियाणें उत्पादन केंद्रें शेतकी खात्यानें सुरू केलीं आहेत. या केंद्रामुळें भात, ज्वारी, गहूं, हरभरा व बाजरीचें बियाणें भरपूर प्रमाणांत उपलब्ध झाले आहे. अमोनियम सल्फेट, सुपर फॉस्फेट वगैरे रासायनिक खतांची उपयुक्तता पटल्यानें या खतांची मागणी वाढत आहे. १९५५ सालीं जिल्ह्यांत ६००० टन खताचें वांटप करावें लागत असे तेथें आतां

बियाणें व रासायनिक खतें

दरसाल १५००० टनाहून अधिक खत पुरवावे लागत आहे. खत वाटपाचें काम जिल्ह्यांतील सहकारी संस्थेकडेच सोपविले आहे.

शेतकी खात्यामार्फत नवीन बियाणें, खते, सुधारलेल्या पद्धती, कीडनाशक द्रव्यें याबाबत प्रचार आणि प्रसार केल्यामुळें शेतीचें उत्पन्नांत १५ टक्क्यावर वाढ झाली आहे.

पिकाचें नांव	पिकाखालील क्षेत्र (सरासरी)	खात्यामार्फत सुधारलेल्या पद्धति व बी-बियाणाखालीं व्यापलेलें क्षेत्र (गेल्या पांच वर्षांचे आंकडे) सरासरी
भात	१,१६,९०० एकर	३१,५०० एकर
बाजरी	३,६५,००० एकर	२,२५,००० एकर
ज्वारी	११,४६,५०० एकर	६,८७,००० एकर
गहूं	५४,३०० एकर	१६,००० एकर
हरबरा	६४,००० एकर	२१,३०० एकर
ऊंस	२२,००० एकर	२०,००० एकर
कापूस	२०,००० एकर	१७,००० एकर
भुईमूग	५३,८६० एकर	९५,००० एकर
बटाटा	१४,८०० एकर	१४,००० एकर

जिल्ह्यांतील बियाणें उत्पादन केंद्रें आणि त्यामधून तयार करण्यांत आलेलें बियाणें ह्याचा तक्ता पुढील पानावर दिला आहे.

उताराच्या जमिनींना ताली घातल्यानें त्यामध्यें पावसाचे पाणी मुरते आणि तालीखालील विहिरींना अधिक पाणी येतें. तालीमुळें मोठ्या पावसांत जमिनीचे फूल (कस) वाहून जात नाहीं.

भूसंरक्षण


कमी पावसाच्या भागांत तालीमुळें थोड्या पावसांतहि चांगली पिके येतात. वरील कारणास्तव अधिक धान्य उत्पादन मोहिमेंत ताली घालण्यांत प्राधान्य देण्यांत येऊन शेतकऱ्यांच्या संघटनामार्फत सरकारनें तगाई कर्जें देऊन गेल्या पांच वर्षांत एक लाख एकराहून अधिक जमिनीस ताली घालून घेतल्या आहेत. दुष्काळी शिरूर तालुक्यास याबाबतींत अग्रक्रम देण्यांत आला आहे.

डोंगर भागांत टेरेसिंग करून अधिक उताराच्या भात जमिनींना ताली घालण्यांत येत असून मुळशी–मावळ–भोर भागांत १००० वर क्षेत्रास अशा ताली गेल्या दोन वर्षांत घालून झाल्या आहेत. ताली बांधून झाल्यानंतर विहिरींना अधिक पाणी लागते म्हणून ताली घातलेल्या क्षेत्रांत नवीन विहिरी खोदण्याची मोहिम गेल्या वर्षीं हातीं घेण्यांत आली असून एक वर्षाच्या कालावधींत २७०० नवीन विहिरी खोदून झाल्या आहेत. यांपैकीं १५०० वर विहिरी एकट्या शिरूर तालुक्यांत आहेत.

जिल्ह्यांतील बियाणें उत्पादन केंद्रें आणि त्यामधून तयार करण्यांत आलेलें बियाणें

बियाणें केंद्रें	भात		बाजरी		ज्वारी		गहूं		हरभरा	
	५८–५९|५९–६०		५८–५९|५९–६०		५८–५९|५९–६०		५८–५९|५९–६०		५८–५९|५९–६०	
	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.	मण शे.
डकला–नायगांव	१८७-१७	२२२-००	—	—	४-३५	८-००	२६-३०	३०-००	७-१०	१६-००
दौंड	—	—	—	१-००	१२-१४	२५-००	०-०६	—	४-३२	५-००
भोर	१३२-३०	१०३-३०	—	१-००	—	५-००	१५-०८		२१-३५	२०-००
चऱ्होली	—	—	—	९-००	९५-००	५८-००	—	२०-००	६-१०	४०-००
घोडेगांव	—	—	५६-१०	१४-३०	५७-२०	४०-००	१२-१०	५-०८	७-२०	१६-३०
इंदापूर	—	—	—	—	१५-१४	४८-००	—	३०-००	१-७½	०-०६
मकुम	१४०-३९	१०५-०३	—	—	५-००	५-००	—	—	१३-२०	१०-००
जुन्नर	—	—	२८-२८	३४-००	१५-००	६०-००	३५-००	५२-००	—	१०-००
शिरूर	—	—	—	—	४७-०९	४०-००	—	—	—	—
खेड	—	—	३९-३७	८-२०	१३८-३५	८३-००	४६-००	३५-००	१६-२०	१६-००
	४६१-०६	४३०-३३	१२४-३३	६८-१०	३८९-२७	३७२-००	१३५-१४	१७७-०८	७६-१४½	१३३-३६

स्वाभाविक विभाग



शेतीसुधारणा मोहिम

अधिक धान्योत्पादन करण्याचे उद्देशानें शेतकी खात्यानें शेतकऱ्यांना बियाणें, खतें पुरवून सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्यास प्रोत्साहन देण्यासाठीं रबी व खरीप मोहीम हातीं घेतली आहे. या मोहिमेस बरेच यश येऊन अशा पद्धतीनें पुढील प्रमाणें क्षेत्र व्यापले आहे. या मोहिमेत जिल्ह्यानें गेल्या वर्षी १५ टक्क्याहून अधिक उत्पादन वाढविल्याबद्दल १०,००० रु. चें बक्षीस मिळविलें आहे. भात ३०,००० एकर, ज्वारी ४५,००० एकर, बाजरी ५०,००० एकर, गहूं ५,००० एकर, भुईमूग ५००० एकर, कापूस १७,००० एकर.

ज्वारी खालीं या जिल्ह्यांत ½ हून अधिक क्षेत्र आहे. शेतकी खात्यानें संशोधन करून पुरस्कार केलेल्या पुणेरी पद्धतीचा अवलंब शेतकरी अधिकाधिक प्रमाणांत करीत आहेत. ठराविक अंतरावर टोकून ज्वारीचा पातळ पेरा करायचा व या पिकाची शास्त्रोक्त पद्धतीनें कोळपणी खुरपणी करून वाढ करायची हें या पद्धतीचे मुख्य अंग आहे. जिल्ह्यांत पुणेरी पद्धतीनें लागवड १५००० वर एकरांत होऊं लागली आहे.

जपानी पद्धतीनें भातशेती केल्यास उत्पादनांत पंधरा टक्क्याहून अधिक वाढ होते. तीन वर्षांपूर्वी जिल्ह्यांत प्रायोगिक भातशेतीची योजना हातीं घेण्यांत आली. त्यानुसार शेतकऱ्यांना बियाणें, खतें व तांत्रिक मार्गदर्शन देण्यांत येत आहे. आज अशा तऱ्हेनें सुधारलेल्या भात शेतीखालीं ३७,००० एकर क्षेत्र आलें आहे.

कपाशीची लागवड जिल्ह्यांत १८८१ ते १९४७ या काळांत अगदीं नाहीशी झाली होती. त्यानंतर लांब धाग्यांच्या कापसाची लागवड करण्याची मोहिम हातीं घेण्यांत आली. थोड्याशा बागायती पाण्यावर शेतकऱ्यांना कपाशीमुळें बरीच रोख रक्कम हाताशीं येत असल्यानें शेतकरी मोठ्या प्रमाणांत कपाशीची लागवड करीत आहेत. १९५५ सालीं जिल्ह्यांत ७००० एकर क्षेत्रांत कापूस पिकविला गेला तर आतां हें क्षेत्र २० हजार एकरापर्यंत गेलें आहे.

शेतकी खात्याच्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं असलेल्या डेपोवर कीडनाशक औषधें व तीं फवारण्यासाठीं लागणारीं अवजारे ठेवण्यांत आली असून ती नाममात्र मोबदला घेऊन गरजू शेतकऱ्यांना देण्यांत येतात. १९५९–६० सालापासून आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांना औषधें फवारण्याचीं यंत्रें देण्यांत येत आहेत.

जिल्ह्यांत लागवडीखालीं असलेल्या ३८ लाख एकर क्षेत्रापैकीं २ लाख एकर क्षेत्रांत बागायती पिके घेतली जातात; यापैकीं ४४ टक्के क्षेत्र विहिर बागायतीखालीं आहे. पंचवार्षिक योजनेनुसार हातीं घेतलेल्या पाटबंधाऱ्यांच्या आणि तलाव विहिरींच्या योजनेमुळें पुढील दोन वर्षांत जिल्ह्यांत बागायत क्षेत्राखालीं दुप्पट जमीन येईल असा अंदाज आहे.

पुरंदर, हवेली, खेड, जुन्नर, व आंबेगांव या भागांत भाजीपाल्याची व फळबागांची लागवड वाढत असून त्याखालीं ३६,५८८ एकर क्षेत्र आहे.

विहिरी खोदण्यासाठीं किंवा शेतीच्या तत्सम कामासाठीं शेतकऱ्यांना तगाई कर्ज देण्यांत येत असते. हें तगाई कर्ज जिल्हा कलेक्टर कचेरी आणि लँड मॉर्गेज बँक अशा दोन्ही खात्याकडून देण्यांत येतें. जिल्हा कलेक्टर कचेरीकडून २५०० रुपयापर्यंत तगाई देण्यांत येऊन त्यावर ४½% सवलतीच्या दरानें व्याज घेतलें जातें. तसेंच लँड मॉर्गेज बँकेमार्फत ३००० रुपयापर्यंत तगाई दिली जाते व त्यावरहि ४½% सवलतीच्या दरानें व्याज घेण्यांत येतें.

तगाई कर्जें

कोणत्याहि शेतकऱ्याला तीन हजार रुपयापेक्षांहि जास्त रक्कम तगाई कर्ज म्हणून लँड मॉर्गेज बँकेमार्फत मिळूं शकते परंतु त्यावरील व्याजाचा दर सात टक्के असतो.

पुणें जिल्ह्यांतील बागायत क्षेत्र १९५८–५९

१) सरकारी पाटबंधारे	९३,५४५ एकर
२) खाजगी पाटबंधारे	७,६०१ ,,
३) तलावाखालीं भिजणारे क्षेत्र	३,०९७ ,,
४) विहिर बागायत	९३,९४२ ,,
५) इतर बागायत	१,९६३ ,,
६) एकूण बागायत क्षेत्र	२,००,१४८ एकर

पुणें जिल्ह्यांतील सन १९४९–५० मधील लागवडीखालील क्षेत्रें

तालुका	गांवें	एकूण क्षेत्र	लागवडीखालील क्षेत्र	जंगलें
हवेली	१२४	३,२९,३९०	२,१२,६२९	३५,३५५
इंदापूर	८३	३,६२,३४८	२,६४,५५५	३१,५३३
खेड	१४५	३,३९,४६५	२,४२,२१७	४५,४३३
बारामती	६४	३,४१,६११	२,४१,०३५	१७,६२३
पुरंदर	९५	३,०८,०१३	२,२२,५८७	२४,२७६
मावळ	१५७	२,६२,४१८	१,३७,१९३	५६,४५८
जुन्नर	१४५	३,३५,४५९	२,३५,५४४	५३,४११
शिरूर	७८	३,८४,५६५	३,१७,२०६	१५,३९४
दौंड	६५	३,१८,७१६	२,१२,६७७	३५,६६७
आंबेगांव	१०६	२,६४,३९५	१,४७,९६६	६७,४४०
मुळशी	१५०	१,६७,३४६	४०,१२५	२८,९१०
पुणें शहर	१०	२९,६१४	९,७४४	५८०
भोर	१७९	१,८०,०८३	६१,६३५	४५,६५०
वेल्हे	१३१	१,३६,३९७	९४,४७३	२४,८१५
पुणें जिल्हा	१,५३२	३७,५९,८२०	२४,३९,'८६	४,७२,५४५

पुणें जिल्हा पिकाखालील क्षेत्र (१९५८–५९)

	अन्नधान्याखालील क्षेत्र	इतर पिकाखालील क्षेत्र	एकूण लागवडीखालील क्षेत्र
आंबेगांव	१,३०,५४३		१,७६,००१
बारामती	२,३६,४९७		२,५६,८५७
भोर	६३,४६२		१,१८,४१७
दौंड	२,१०,३९७		२,२९,००८
हवेली	१,४९,९२८		२,२६,९०२
इंदापूर	२,४३,३९५		२,६९,९३१
जुन्नर	२,१२,१३४		२,५८,६१६
खेड	१,६०,७८२		२,५८,३८३
मावळ	६५,९१५		१,६४,३४४
मुळशी	६९,०२५		८३,५४०
पुणें शहर	३,८३१		७,९१७
पुरंदर	१,८७,७१०		२,१४,८७१
शिरुर	२,२९,७५८		२,६९,७२१
वेल्हे	२६,७५०		६१,३६४
एकूण	१९,९०,१२७		२६,०५,८७२

पुणें जिल्ह्यांतील बागायत क्षेत्र, (१९४७-४८)

पिकें	सरकारी पाट बंधारे	खाजगी पाट बंधारे	विहिरी	इतर	एकूण	त्या पिकाखालीं असलेल्या क्षेत्राशीं शेंकडा प्रमाण	एकूण बागायत क्षेत्राशीं शेंकडा प्रमाण
भात	५,३६१	१७	९१५	...	६,२९३	९.५	३.२
गहूं	७,०३६	५५३	८,६६८	१११	१६,३६८	३५.९	८.४
बार्ली	१३९	...	६	...	१४५	३१.५	०.७
ज्वारी	६५,७६४	३१७	२४,९९८	३९०	९१,४६९	१०.४	४७.०
बाजरी	११,९८९	२१६	५,२३८	...	१७,४४३	४.२	८.८
मका	३७१	१,०३१	...	...	१,४०२	८९.३	०.७
डाळी इ.	३,६५८	१५६	४,८९४	५४१	९,२४९	५.४	४.६
ऊंस	१३,१४०	...	३,०९४	१८	१६,२५२	९४.५	८.३
इतर अन्नधान्यें	६,३९८	४६०	१७,९८७	...	२४,८४५	६२.७	१२.७
भाजीपाला फळे व इतर	१,६७८	३३७	४,२५०	...	६,२६५	६.२	३.२
चारा	१,१२५	...	३,७२९	...	४,८५४	१.०	२.४
एकूण बागायत क्षेत्र	१,१६,६५९	३,०८७	७३,७७९	१,०६०	१,०४,५८५	८.८	१००
दुहंगामी बागायत क्षेत्र	९,९८८	९९४	१६,३७९	१३४	२७,४९५	...	...
नक्त बागायत क्षेत्र	१,०६,६७१	१,०९३	५७,४००	९२६	१,७७,०९०	८.०	..

जिल्ह्याचे आकारमान विचारात घेतले तर येथील जंगलांनी व्यापलेले क्षेत्रफळ आणि त्यावरील झाडेझुडपें यांची स्थिती थोडी निराशाजनक आहे असें म्हणावें लागेल. जिल्ह्याच्या ६०२७.५ चौ. मैल क्षेत्रफळापैकीं फक्त ७४० चौ. मैलांत जंगले आहेत. पैकीं ४९५ चौ. मैल जंगल खात्याचे ताब्यात असून बाकी २४५ चौ. मैल महसूल खात्याकडे आहे. बहुतेक चांगली जंगले पश्चिमेकडील अधिक पावसाच्या डोंगराळ भागाला आहेत. त्यात सांग, हिरडा, शिकेकाई, आपटा, व इतरत्र लिंब, बाभूळ, चींच, त्यासारखी कमी पावसात येणारी झाडे आढळतात. पूर्व भागांत उजाड माळरानें आणि डोंगरच सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येतात.

वनसंपत्ति

पुणें जिल्ह्यांतील जंगलापासून सालींना अंदाजे तीन ते चार लाखापर्यंत उत्पन्न मिळत असून त्याची वर्गवारी पुढील तक्त्यांत आढळेल.

साल	इमारती माल	जळाऊ माल	बांबू	गवत व चारणी	इतर जंगले किरकोळ	एकूण
	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.
१९४८–४९	१,१४,१८९	१,५०,९४०	७९२	४२८५३	१६०५२	३२४८२६
१९४९–५०	१,१५,३००	८७,३८०	—	५१०८६	३५७४२	२८९५०८
१९५०–५१	८९,८६४	५४,५८९	—	५४१२२	२६५३६	२२५१११
१९५१–५२	५३,५९०	९७,२७१	४५४५	५३५२४	३५६७६	२४६७९७
१९५२–५३	६५,१६७	८२,४७०	३५७२	५८४२५	३०५८४	२४०७७३
१९५३–५४	४५,२४९	७६,८०६	१६९४	६०९८१	४१४६०	२२६१९०
१९५४–५५	४४,९२३	९१,१४३	६४३	४८५३०	४३७५८	२२८९९७
१९५५–५६	५४,०९०	९२,६४९	१०	४९८१०	५०५७२	२४७१३१
१९५६–५७	१,२४,७३९	१,१७,९०४	१४२	६२६६८	३५९७८	३४१४३१
१९५७–५८	५४,२९९	१,०३,५५४	८६	५४५४०	३१७७९	२४४२५८
१९५८–५९	१,२४,५३५	१,२४,२७३	२२८	५६११३	३७२०७	३७३३५६
१९५९–६०	१,६२,९६६	१,४३,७३७	१३६०	६२२६३	४३८८५	४१४६११

वारंवार पडणाऱ्या अवर्षणामुळें आणि झाडांच्या बेसुमार तोडीमुळें जिल्ह्याच्या पूर्व भागांतील झाडी नष्ट झाली आहे. माळरानें उजाड झाली आहेत आणि डोंगर, झाडोऱ्या अभावी उघडे बोडके दिसत आहेत. इतरत्र थोडी फार झाडे दिसत असली तरी एकंदरीत या जिल्ह्यांत जंगलाची वाढ मोठ्या प्रमाणांवर होणें जरूर आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत जिल्ह्यामध्यें जंगलवाढीच्या पुढील योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत.

सिंहगड किल्ल्याच्या एक मैल त्रिज्येत जंगलाची वाढ करून छाया देणारी आणि शोभा वाढविणारी झाडे ४५० एकरांत लावण्यांत आली आहेत.

शिवनेरी किल्ल्याच्या सभोवती १०० एकर क्षेत्रांत आणि पुण्याजवळ पर्वती टेकडीवरील ६ एकर क्षेत्रांत वरील प्रमाणेंच जंगलवाढ करण्यांत येत आहे.

काजूंच्या निर्यातीमुळें परदेशी चलन उपलब्ध होत असल्यानें काजू झाडांची लागवड करण्याचा प्रयत्न जंगल खात्यामार्फत मावळ, मुळशी आणि आंबेगांव तालुक्यांत चालू आहे.

काजूची लागवड

मुंबई–पुणें रस्त्यावर; तळेगांव दाभाडे ते वडगांव मावळ, या रस्त्याच्या बाजूस असलेल्या डोंगराच्या रांगात काजू रोपांची विशेष मोठ्या प्रमाणांत लागवड करण्यांत आली आहे. आजपर्यंत १५०० एकर जमिनींत काजूच्या झाडांची लागवड करण्यांत आली असून लावलेल्या रोपांची संख्या १½ लाखाहून अधिक आहे. आणखीहि ८०० एकर जागेत काजू लागवड करण्यांत येणार आहे.

इमारतीसाठीं उत्तम लांकूड म्हणून सागाच्या झाडांचा बहुमोल उपयोग होतो. आंबेगांव तालुक्यांत २०० एकर क्षेत्रांत सुमारे २०,००० सागाची रोपे लावण्यांत आली असून त्यांची वाढ

साग

समाधानकारक होत आहे. ओसाड भागांत जंगलें निर्माण करण्याचें कार्य जिल्ह्यांत २२०० एकर क्षेत्रांत हातीं घेण्यांत आलें आहे. उतारावर चर किंवा खड्डे घेऊन त्यांत निरनिराळ्या जातीच्या झाडांचे बी पेरण्यांत येतें. चरांमुळें ओलावा टिकतो आणि झाडांची अधिक जोमानें वाढ होते. कित्येक डोंगर उतारावर अशा तऱ्हेनें लावलेली झाडे १०–१२ फूट उंचीची झालेलीं आहेत. निकृष्टावस्थेला पोहोचलेल्या जंगलामधील उजाड भागात चर व खड्डे घेऊन झाडें लावण्याचें काम खडकवासला आणि कात्रज भागांत हातीं घेण्यांत आले आहे. ३६५ एकर क्षेत्रांत लावलेलीं झाडें समाधानकारकरित्या वाढत आहेत.

घायपातांच्या पानापासून वाख काढतात आणि या वाखाचा उपयोग दोऱ्या करण्याकडे मोठ्या प्रमाणावर केला जातो. शेतकरी आपापल्या शेताच्या बांधावर घायपात वाढवीत असतात. त्यामुळें शेताचें संरक्षण होते आणि थोडेफार उत्पन्नहि मिळतें. जंगल खात्याने लागवड केलेल्या सर्व जंगलाच्या सभोवती घायपाताचे कुंपण घालण्याची योजना आंखली असून आजपर्यंत २७२ मैल लांबीचे कुंपण घालून झाले आहे.

पुणें शहरांतील जंगलांतील उत्पन्नांचें आयातीवर विशेष लक्ष ठेवण्यासाठीं तीन तपासणी नाकी उघडलेली असून जंगल मालाच्या वाहतुकीवर तेथून देखरेख ठेवली जाते. जंगलांतील माल चोरीस जाऊं नये म्हणून फिरती जीप मोटार ठेवण्यांत आली असून त्यामुळें चोरीच्या प्रकारांना आळा बसला आहे. जंगल खात्याच्या कामगारांना जंगलांतच रहावें लागतें. त्यांच्या सोयीसाठीं आतांपर्यंत सात ठिकाणीं इमारती बांधण्यांत आल्या आहेत.

दरसाल जिल्ह्यांत वनमहोत्सव पाळण्यांत येतो. पावसाळ्यांत एक आठवडाभर जिल्ह्यांत सर्वत्र सभा घेऊन वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचें महत्व पटविलें जातें. सामुदायिक वृक्षारोपणाचे

वनमहोत्सव

कार्यावर विशेष भर दिला जातो. विलायती बाभूळ, गुलमोहर, इ. झाडांचें चांगलें बीं शेतकऱ्यांना विनामूल्य वाटण्यांत येते. जंगल खात्यातर्फें जिल्ह्यांत चार ठिकाणीं नर्सरी तयार करण्यांत येतात व त्यांतून आंबा, चिंच, गुलमोहर, काजू इ. जातींचीं दोन लाखावर रोपें शेतकऱ्यांना वांटण्यांत येतात. दिवसेंदिवस शेतकऱ्यांमध्यें झाडें लावण्याची आणि तीं जगविण्याची प्रवृत्ती वाढत असून पूर्वीं याबाबतींत उदासीन असलेले लोक आज अहमहिकेनें वनमहोत्सव कार्यक्रमांत भाग घेतांना दिसतात.

पुणें जिल्ह्यांत जनावरांवर उपचार करण्याकरितां तेरा दवाखाने असून त्यांपैकीं तीन जिल्हा लोकल बोर्डामार्फत आणि एक बारामती नगरपालिकेमार्फत चालविला जातो. इतर ९ दवाखाने

सरकारतर्फे चालविले जातात. पुढील ठिकाणीं हे दवाखाने आहेत. १) पुणें, २) भोर, ३) उरुळी कांचन, ४) बेबड ओहोळ, ५) पौड, ६) सासवड, ७) मंचर, ८) इंदापूर, ९) तळेगांव ढमढेरे, १०) खेड, ११) जुन्नर, १२) केडगांव १३) बारामती. हवेली आणि पुरंदर तालुक्यांतील विकास योजनेचा कालावधी पुरा झाल्यामुळें १) मोशी २) लोणकंद, ३) राजेवाडी, ४) गराडे, ५) परिंचे ६) खानापूर येथील उपचार केंद्रें सरकारतर्फे चालविण्यांत येत आहेत. याशिवाय सध्यां चालू असलेल्या विकासगटांत पुढीलप्रमाणें उपचार केंद्रें चालविण्यांत येत आहेत.

पशुसंवर्धन आणि संरक्षण

शिरूर:—१) कवठे २) शिरूर. **खेड:**—१) आळंदी २) चाकण ३) वाडे ४) पाईट. **आंबेगांव:**—१)धामणी २) आंबेगांव. **भोर:**—१) वेल्हे महाल २) हरडोशी.

पुढील ठिकाणीं कृत्रीम गर्भधारणेचीं उपकेंद्रें आहेत:—१) सासवड, २) खेड, ३) बारामती, ४) उरुळी कांचन, ५) तळेगांव ढमढेरे, ६) बेबड ओहोळ, ७) जुन्नर.

जनावरांच्या दवाखान्याचे डॉक्टर आणि उपचार केंद्रांवरील स्टॉकमेन आजूबाजूच्या खेड्यांत नियमित जाऊन जनावरांवर औषधोपचार करीत असतात.

गतवर्षीं ३२४ ठिकाणीं जनावरांचे रोगाच्या सांथीचा प्रादुर्भाव झाला म्हणून दीड लाखावर जनावरांना लस टोंचण्याचें काम जिल्ह्यांतील गुरांच्या डॉक्टरांनीं केलें.

जिल्ह्यांत ठिकठिकाणीं ठेवलेल्या वळूंचीं वर्गवारी:—१) स्वतःच्या खर्चानें ठेवलेले खिलार १२ वळू. २) अर्ध्या किंमतीत पुरविलेले खिलार ६४ वळू. ३) पैदास सुधारण्याचे योजनेनुसार खिलार १२ वळू. ४) इतर योजनेनुसार सिंधी–८, डांगीं–१८, सुरती २२ असे एकूण १३६ वळू आहेत.

प्रत्येक तालुक्यांत ठेवलेल्या वळूंची वर्गवारी—(१) इंदापूर खिलार २१. (२) शिरूर खिलार ३०. (३) हवेली खिलार ६. (४) भोर खिलार ९; सिंधी ८; सुरती २२. (५) आंबेगांव खिलार १०. (६) पुरंदर खिलार ८ व इतर ४. असे एकूण १३६ वळू आहेत.

पुणें जिल्ह्यांत अडीच लाख मेंढ्या असून त्यापासून सालीना अडीच लाख पौंड लोंकर निघते. तिची किंमत अडीच लाख रु. इतकी असते. या धंद्यावर ५००० मेंढपाळ जिल्ह्यांत पोट भरत आहेत. केडगांव ता. दौंड आणि मदनवाडी ता. इंदापूर येथें दोन लोकर उत्पादन केंद्रें आहेत. धनगरांना त्यांच्या जवळील मेंढ्यांची पैदास सुधारावी म्हणून १५० मरीनो मेंढे देण्यांत आले आहेत. आणि ६५ मेंढपाळांना सुधारलेल्या जातीचे मेंढे खरीदण्यासाठीं प्रत्येकीं १०० रु. याप्रमाणें मदत देण्यांत आली आहे. मेंढयांच्या पैदाशीत सुधारणा करण्यासाठीं शिवाजीनगरमध्यें शिप ब्रिडींग फार्म उघडण्यांत आले आहे.

लोकर उत्पादन व कोंबडी पालन

१९५६ च्या जनावरांच्या खानेसुमारीनुसार जिल्ह्यांत साडेसात लाख कोंबड्या आहेत. त्यापैकीं ८५ टक्के कोंबड्या खेड्यांत असून कोंबड्या पाळणें हा शेतकऱ्यांचा प्रमुख जोडधंदा आहे. स्थानिक कोंबड्या अत्यंत निकृष्ट प्रतीच्या असल्यानें त्यांची पैदास सुधारण्यासाठीं खडकी येथें प्रमुख केंद्र असून ताथवडे आणि चिंचवड येथें उपकेंद्रें आहेत. याशिवाय मांजरी, पुणें, शिरूर, नारायण-

गांव, लोणावळा, कामशेत, जुन्नर, घोडेगांव, इंदापूर, तळेगांव, बारामती, व पिरंगुट येथें खाजगी कुक्कुट उत्पादन केंद्रें आहेत. खडकी येथील केंद्रांत कोंबडी पालनाचे शिक्षण वर्गहि घेण्यांत येतात.

जिल्ह्यांत १७ सायलो पिट्स् (हिरवे गवत सांचविण्याचे खड्डे) असून त्यापैकीं १४ खड्ड्यासाठीं प्रत्येकीं ४०० रु. मदत सरकारतर्फे देण्यांत आली आहे.

जनावरांसाठीं लस

ही संस्था १९४७–४८ सालीं स्थापन करण्यांत आली असून तिचे कार्यालय व संशोधन केंद्र मुंबई येथें पशुवैद्यक महाविद्यालयाच्या आवारांत होतें. जागेच्या सोयीसाठीं ही संस्था १९५९ मध्यें पुण्यास गणेश रस्त्यावर नवीन अिमारत बांधून तेथें आणण्यांत आली आहे. जनावरांच्या रोगांचें संशोधन करून त्यावर प्रतिबंधक लस तयार करणें हेंच या संस्थेचें प्रमुख कार्य आहे. आज संस्थेमध्यें पुढील रोगावर प्रतिबंधक लस तयार करण्यांत येत आहे.

१) घटसर्प २) फऱ्या ३) राणीखेत (कोंबड्यासाठीं) ४) शेळ्या व मेंढ्या यांना होणारा देवी रोग ५) नेहमीच्या वापरांतील सलाअीन. सध्यां या लसींचे १० ते १५ लाख डोसेस तयार करण्यांत येत असले तरी ते जनावरांची संख्या लक्षांत घेता अत्यंत अपुरे आहेत म्हणून तिसऱ्या पंच-वार्षिक योजनेत त्यांचे उत्पादन वाढविण्यांत येणार असून त्यामुळें राज्यांतील ४० टक्के जनावरांचें तरी रोगापासून संरक्षण करतां येईल असा विश्वास वाटतो.

पुणें दूध योजना

राज्यांतील दूध टंचाईची परिस्थिती सुधारण्यासाठीं पूर्वीच्या मुंबई सरकारनें १९४६ मध्यें दुग्ध व्यवसाय विकास विभाग या नांवाचा एक स्वतंत्र विभाग शेतकी खात्यांत निर्माण केला. या विभागांत दोन शाखा होत्या. एका शाखेकडे जनावरे बाळगणाऱ्यांना शास्त्रीय सल्ला देणें हें काम होते तर दुसऱ्या शाखेकडे या प्रश्नासंबंधी संपूर्ण माहिती गोळा करून ती सरकारकडे सादर करून परिस्थितीत सुधारणा करण्याचे दृष्टीनें उपाय सुचविणें हें काम होते.

१ ऑक्टोबर १९५८ पासून सरकारनें दुग्ध व्यवसायाच्या विकासाकरितां स्वतंत्र खाते निर्माण केले व त्या खात्यांतच पूर्वीच्या दुग्ध व्यवसाय विभागाचा समावेश केला. दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या दुसऱ्या शाखेतर्फे पूर्वीच्या मुंबई राज्यांतील अनेक मोठ्या शहरांची पहाणी कर-ण्यांत आली. अहमदाबाद, बडोदा, सुरत, नाशिक, सोलापूर, पुणें, नगर, बेळगांव, हुबळी, धारवाड वगैरे शहरांचा समावेश या पहाणींत करण्यांत आला होता. सर्वसाधारणपणें या पहाणींत असे दिसून आले कीं शहरवासीयांस मिळणारे दूध अत्यंत निकृष्ट प्रतीचे असते व त्याचें प्रमाण अत्यंत अपुरे असते. जनावरांची निगाहि चांगली ठेवली जात नाहीं. खेड्यांत दूध निर्माण केले तर तें शहरांपर्यंत आणून गिऱ्हाइकांकडे पोचविण्याची सुलभ सोय नाहीं. खेड्यांत दूध स्वस्त मिळत असूनहि तें शहरांत मात्र हव्या त्या भावानें विकण्यांत येतें.

वरील योजनेनुसार सन १९४८ सालीं पुणें शहराची पहाणी केली, त्यांत असें आढळून आलें कीं शहरांत एकूण ४५,५०० शेर दूध (व दुधाचे पदार्थ) वापरण्यांत येतें. यापैकीं सुमारें १६,५०० शेर शहरांत निर्माण करण्यांत येतें. व सुमारे २९००० शेर दूध आजूबाजूच्या खेड्यां-तून शहरांत येतें. दरडोई सुमारें दीड छटाकापेक्षां (३ औंस) कमी दूध वांटणींस येतें. त्यांतील २.४ औंस दुधाचे रूपानें व ०.६ औंस दुधाचे पदार्थांचे रूपानें मिळते. भेसळ फार मोठ्या प्रमाणांत करण्यांत येते. कांहीं ठिकाणीं तर ६९ टक्केपर्यंत पाणी मिसळल्याचें आढळून आलें.

ही परिस्थिती सुधारण्यासाठीं दुग्ध व्यवसाय विकास विभागातर्फे मोठ्या शहरांसाठीं दूध पुरवठा योजना सुचविण्यांत आली. त्यानुसार पुण्याच्या सध्यांच्या दूध योजनेची सुरवात १६ जानेवारी १९५० च्या पहाटे करण्यांत आली. सुरवातीला बेबडओहोळ या पवन मावळ खोऱ्यांतील एका गांवांतील फक्त ११ लोकांनीं १६० शेर दूध पुरविलें. दूध पुरविणाऱ्या गवळ्यांना सकाळीं घेतलेल्या दुधाचे पैसे सकाळीं व संध्याकाळीं घेतलेल्या दुधाचे पैसे संध्याकाळीं रोख द्यावे लागत. दूध तपासण्यासाठीं लॅक्टोमीटरच फक्त वापरतात अशी त्यांची समजूत होती पण योजनेतर्फे जेव्हां दुधांत तुपाचा अंश किती आहे हें तपासण्यासाठीं गर्बर्स फॅट टेस्टिंग सेंट्रिफ्युगल मशिन वापरण्यांत येऊं लागलें तेव्हां भेसळ करण्याची संवय पडलेल्या लोकांना ते जड जाऊं लागले व त्यांनीं त्यास थोडासा विरोध पण केला परंतु जेव्हां त्यांना दुधाचे भाव जास्त मिळण्याची आशा दिसली तेव्हां त्यांनीं आपला विरोध मार्गे घेतला.

दूध वाटप

दूध विक्रीसाठीं पुणें शहरांत सुरवातीस सहा विक्री केंद्रें काढण्यांत आली. प्रत्येक केंद्रावर एक केंद्र चालक व एक मदतनीस असे दोन नोकर ठेवण्यांत आले. प्रथमतः त्यांना ठराविक मासिक पगार देण्यांत येत होता पण त्यानंतर त्यांना दूध विक्रीस प्रोत्साहन मिळावे म्हणून पगाराऐवजीं दर मणास बारा आणे याप्रमाणें त्यांनीं विकलेल्या दुधावर कमिशन देण्यांत येतें. या पद्धतीमुळें दूध विक्रीत झपाट्यानें वाढ झाली. ही पद्धत आतां बंद करून पुन्हां ठराविक मासिक पगार सुरूं करण्यांत आला आहे.

पुण्यांतील गिऱ्हाइकांनाहि स्वच्छ, ताजें व सकस दूध वेळचे वेळीं व योग्य त्या भावानें मिळूं लागल्यानें त्यांचेकडूनहि योजनेचें स्वागत चांगल्या प्रकारें झाले.

दूध पुरविणारे खेड्यांतील गवळी, दूध वापरणारे शहरांतील नागरिक व योजना तोट्यांत न गेल्यामुळें सरकार, या तिर्हींच्या सहकार्यामुळें योजनेची यशस्विता सिद्ध झाली आहे. त्यामुळें तींत वाढ करण्याचे सरकारनें ठरविलें. सुरवातीस दररोज ७५ मण दूध गोळा होत असे ते आतां जवळ जवळ ४०० मण दूध गोळा होत आहे. अल्पावधींत आणखीहि जादा दूध विविध ठिकाणांहून गोळा करण्याची योजना कार्यान्वित होईल. दूध संकलन केंद्रांची संख्या पण आतां वाढत असून आज १४ केंद्रांतून दूध गोळा करण्यांत येत आहे. पूर्वीं शहरांत फक्त सहा दूध विक्री केंद्रें होती तेथें आता ७४ विक्री केंद्रें चालूं आहेत.

यंत्रानें शुद्धिकरण

दूध खेड्यांत गोळा करतांना तेथें त्याची स्निग्धता व ताजेपणा यांची तपासणी करून मगच ते घेण्यात येतें. घेतल्यानंतर ते बर्फांत ठेवून थंड करून, बरण्यांत भरून, बरण्या सील करून सरकारी वाहनांतून पुण्यास आणण्यांत येतें. दूध हा नाशवंत पदार्थ असल्यामुळें तो टिकविण्याचा प्रयत्न करणें जरूर असते. म्हणून खेड्यांत दूध घेतल्याबरोबर ते बर्फांत ठेवून थंड करण्यांत येतें व त्यामुळें त्यांतील अनिष्ट अशा जंतूंची वाढ खुंटविण्यांत येते. दूध पुण्यास आल्यावर तें यंत्रांत तापवून, थंड करून मग विकण्यांत येतें. अगदीं सुरवातीला यंत्रानें दूध न तापवितां घरगुती पद्धतीप्रमाणेंच तापविण्यांत येत होते. पण लवकरच लहान पाश्चराईझर (दूध तापविण्याचें यंत्र) बसविण्यांत आला. आतां वाढत्या योजनेंत मोठें यंत्र बसविण्यांत आलें आहे. या यंत्रावर एका तासांत सुमारें ५० ते ६० मण दूध तापवितां येतें. दूध तापविल्यानंतर ते ताबडतोब थंड करणें अवश्य असतें व तीहि क्रिया यंत्रानेंच केली जाते. अशा तऱ्हेनें थंड केलेलें दूध शीतगृहांत ठेवण्यांत येतें व ते दुसरे दिवशीं गिऱ्हाईकांना

पुरविण्यांत येतें. दूध तापविल्यामुळें त्यांतील अनिष्ट जंतू मरतात व थंड केल्यामुळें जे कांहीं राहिले असतील त्यांची वाढ खुंटते. त्यामुळें दूध नासण्याची शक्यता तर कमी होतेच पण दुधाची प्रतहि सुधारते.

पूर्वीं सुटे दूध विकण्यांत येत होते व त्यामुळें दुधाच्या शुद्धतेबद्दल व मापाबद्दल शंभर टक्के खात्री देतां येत नसे. पण आतां बाटल्यांची पद्धत सुरूं झाल्यामुळें मापाचा व भेसळीचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. गिऱ्हाईकांनाहि बाटल्यांतून दूध देण्याची पद्धति फार पसंत पडली आहे. बाटल्या भरण्याचें काम यंत्रानें केलें जातें.

सहकारी प्रयत्न

हल्लीं योजनेमध्यें जवळ जवळ १४०० शेतकरी दूध घालीत आहेत. आतांपर्यंत त्यांचे-कडून वैयक्तिकरीत्या दूध घेण्यांत येत असे. पण आतां त्यांच्या सहकारी संस्था काढण्याचा प्रयत्न चालूं आहे. सध्यां १३ सहकारी संस्थांकडून दूध घेण्यांत येतें. लवकरच सर्व दूध संकलन केंद्रावर सहकारी संस्थामार्फतच घेण्यांत येईल. योजनेतर्फे दूध उत्पादकांत बचत करण्याची आवड निर्माण करण्यांत येत आहे. कांहीं दूधवाल्यांची खेड्यांतील पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकेंत खातीं उघडण्यांत आलीं आहेत. दर पंधरा दिवसांनीं मिळणाऱ्या दुधाच्या बिलाच्या रकमेंतून कांहीं रक्कम ते पोस्टांतील स्वतःच्या खात्यांत भरीत असतात. लवकरच सर्व दूधवाल्यांची खातीं पोस्टांत उघडण्यांत येतील अशी अपेक्षा आहे.

घरपोंच दूध

योजनेतर्फे घरपोंच दुधाची योजना पण सुरूं करण्यांत आली आहे. त्यासाठीं तीन चाकी सायकल रिक्षा व नेहमीच्या सायकली वापरण्यांत येतात. सध्या ही योजना प्रायोगिक अवस्थेंत असून सुमारें ७०० ग्राहकांना या योजनेखालीं दूध पुरविण्यांत येत आहे. या गिऱ्हाइकांकडून दर लिटरला (लिटर–१ शेर ६ तोळे) सहा नये पैसे जास्त भाव घेण्यांत येतो. ही योजनाहि लोकप्रिय होत आहे व आज अनेक लोकांकडून या योजनेचा फायदा मिळावा म्हणून अर्ज येत आहेत.

सरकारी दूध योजनेत पूर्वीं फक्त कोरे दूधच पुरविण्यांत येत असे. दूध शुद्ध व स्वस्त असल्यामुळें त्याचा भाव थोडासा जास्त असे. व त्यामुळें गरीब लोकांना त्याचा जास्त फायदा घेता येत नसे. पण जानेवारी १९५९ पासून स्वस्त दुधाची (टोन्ड) सोय पण योजनेमार्फत करण्यांत आली आहे. टोन्ड मिल्क या नांवाने ओळखले जाणारे दूध आज गिऱ्हाइकांत फार लोकप्रिय होत आहे व त्याची मागणी दिवसें दिवस वाढतच आहे. पण पावडरच्या मर्यादित पुरवठ्यामुळें या दुधाचा जास्त पुरवठा करतां येत नाहीं. कारण हे दूध कोऱ्या दुधांत पाणी आणि मिल्क पावडर मिसळून तयार केलें जातें.

शेतीस जोड धंदा

पुणें दूध योजना मुळशी, मावळ, खेड व हवेली तालुक्यांतील शेतकऱ्यांना आणि पुणें शहरां-तील गिऱ्हाईकांना उपयुक्त ठरली आहे. १३७ खेड्यांतील १४०० वर खेडुतांना दुधाचा जोड-धंदा मिळाला आहे. दूध खेड्यांत गोळा केल्यामुळें खेडुतांचा शहरांत जाण्याचा वेळ व पैसा वांचतो. दूध विक्रीसाठीं गिऱ्हाइकें शोधण्याचा प्रश्न निर्माण होत नाहीं. दुधाला योग्य व ठराविक असे भाव जागेवरच मिळतात. शेतीला अनुषंगित असा जोडधंदा असल्यामुळें व पैसे दर पंधरा दिवसांनी नियमित मिळत असल्यामुळें हात खर्चाला ते उपयोगी पडतात. जनावरे वाढल्यामुळें खत अधिक मिळते त्यामुळें जमि-नीचा कस वाढविण्यास मदत होत आहे. शहरवासीयांना पूर्वीं अशुद्ध आणि पाणीमिश्रित दूध घेऊन

आपली गरज भागवावी लागत असे. आज पुण्यांतील १०,००० कुटुंबांना, ०·८४ रु. आणि टोन्ड ०.४२ रु. शेर या दरानें ताजे व शुद्ध दूध नियमित मिळत आहे.

शहरांतील गिऱ्हाइकांना चांगलें सकस व निर्भेळ दूध योग्य भावांत व वक्तशीरपणें मिळण्याची सोय या योजनेंत आतां झाली आहे.

पुणें दूध योजनेची प्रगति कशी झाली हें पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

		१६–१–१९५०	१–११–१९६०
१	दूध देणाऱ्या गवळ्यांची संख्या	११	१४००
२	दूध देणाऱ्या खेड्यांची संख्या	१	१३७
३	मिळालेलें दूध	१६६ शेर	१४५०० लिटर (१लिटर=१शेर६तोळे)
४	विकले गेलेलें दूध	१३५ शेर	कोरे दूध ८७७० लि. टोन्ड दूध ५७५० लि.
५	दूध खरेदीसाठीं लागणारी रक्कम (मासिक)	२५०० रु.	२,५०,००० रु.
६	दूध संकलन केंद्रें	१	१४
७	दूध विक्री केंद्रें	६	७४
८	सहकारी सोसायट्या	—	१३
९	दूध ग्राहकांची संख्या	३५०	१०,०००
१०	घरपोंच दूध घेणारांची संख्या	—	७००

दूध योजनेच्या १४ ट्रक गाड्या दूध जमविण्याचे आणि त्याचें वांटप करण्याचें काम करीत असतात.

४ सहकार

पुणें जिल्ह्यांत सहकारी चळवळीनें चांगलेच बाळसे धरले असून प्रत्येक लहान सहान खेड्यांतहि तिचे लोण पोंहोचलें आहे. शेतकऱ्यांना बियाण्यासाठीं कर्जें देण्यापासून तो दरसाल लाखो रुपयांची उलाढाल करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यापर्यंतची कामें निरनिराळ्या सहकारी संस्था करीत आहेत. जून १९६० अखेर या जिल्ह्यांत १३४६ सहकारी संस्थांची नोंद झाली असून त्यांचे १,९६,८९९ सभासद आहेत. या संस्थांचे शेअर भांडवल २,२७,१६,७३६ रु. असून खेळते भांडवल १४,६९,५१,०६९ रु. इतके आहे. या संस्थांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणें आहे.

मध्यवर्ति, बँक १, भूतारणा बँक १, शेतकी पत पुरवठा सहकारी सोसायट्या ७५८, अ) क्रेडिट सोसायट्या ५९, ब) मोठ्या विविध कार्यकारी सोसायट्या ८१, क) लहान विविध कार्यकारी सोसायट्या ११४, ड) सेवा सहकारी सोसायट्या ५०४, अर्बन बँक्स १४, अर्बन सोसायट्या १०, पगारदार नोकरांच्या सोसायट्या ९७, मच्छीमार संस्था ५, खरेदी विक्री संस्था १४, दूध पुरवठा संस्था २४, तालुका डेव्हलपमेंट बोर्ड १०, विणकर सोसायट्या १६, अितर औद्योगिक संस्था ९३, मजूर संस्था २६, सूत गिरणी १, ग्राहक संस्था ६२, गृह निर्माण संस्था १२४, सामुदायिक शेतकी संस्था, २२, पाणी पुरवठा संस्था २३, सुपरवायाझिंग युनियन्स १२, सहकारी साखर कारखाने (पैकी २ चालू) ३, सहकारी तेल गिरणी १, धान्य संस्था १३, कोंबडी पालन संस्था १, अितर सहकारी संस्था १५.

जून १९५० अखेर जिह्यांत फक्त ६५५ सहकारी संस्था होत्या. गेल्या दहा वर्षांच्या कालावधींत ही संख्या दुपटीवर गेली आहे. सरकारच्या नवीन धोरणानुसार प्रत्येक खेड्यांत ग्रामीण भागाच्या गरजा भागविण्यासाठीं एक सेवा सहकारी संस्था काढण्याचे ठरले आहे. त्यानुसार २०५ नवीन सेवा सहकारी संस्था नोंदण्यांत आल्या असून २९९ क्रेडिट सोसायट्या आणि ५ धान्य सोसायट्यांचे सेवा संस्थेंत रूपांतर करण्यांत आले.

सेवा सहकारी संस्था

पुढील तक्त्यावरून सहकारी पतपेढ्यांच्या प्रगतिची कल्पना येईल.

तपशील	३०-६-१९५०	३०-६-१९५९
१. संस्थांची संख्या	३७८	७५८
२. सभासद संख्या	२६५८७	८९८९३
३. भाग भांडवल	७३७४५३ रु.	६५५२५५९ रु.
४. गंगाजळी व इतर निधी.	७६४४३० रु.	१४००६६६ रु.
५. खेळते भांडवल	३६२७७५२ रु.	२८६३६१८७ रु.

शेतीचा माल साठविण्याची सोय नसल्यास उंदीर, घुशी किंवा किडीमुळें त्याचे मोठ्या प्रमाणांवर नुकसान होते. हा नाश थांबावा म्हणून सरकार गुदामे बांधण्यासाठीं सहकारी संस्थांना तीन चतुर्थांश रक्कम कर्ज आणि मदत देते. एक चतुर्थांश सरकारी मदतीचा उपयोग करून १२ गांवीं गुदामें बांधण्यांत आली या शिवाय २६ गुदामे संस्थांनीं भाड्याने घेऊन माल साठविण्याची सोय केली आहे.

गुदामें बांधणेसाठीं सरकारी योजना पुढीलप्रमाणें आहे.

अ. नं.	गुदामाचा प्रकार	आकार	अंदाजे खर्च	मिळणारे कर्ज	अनुदान
१	मोठ्या आकाराचे गुदाम	१००'×४०'	४०,०००	३०,०००	१०,०००
२	मध्यम आकाराचे गुदाम	५०'×४०'	२०,०००	१५,०००	५,०००
३	लहान आकाराचे गुदाम	४०'×२०'	१०,०००	७,५००	२,५००

लिफ्ट इरिगेशन—पुणें जिल्ह्यांत २३ शेती पाणी पुरवठा संस्था नोंदण्यांत आल्या असून सात संस्थांचें कार्य सुरू झालें आहे. त्यांची सभासद संख्या १५९३ असून भाग भांडवल ३,५९,८३२ रु. इतके आहे. नदीवर किंवा मोठ्या विहिरींवर पंप बसवून या संस्था सभासद शेतकऱ्यांच्या जमिनींना पाणी पुरवतात. तीन नवीन संस्था सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

दूध पुरवठा—चोवीस दूध पुरवठा करणाऱ्या संस्था स्थापण्यांत आल्या असून त्या मार्फत पुणें दूध योजनेस दूध पुरवठा केला जातो. सभासदांना दुभतीं जनावरें घेण्यासाठीं कर्जें दिलीं जातात. सभासद संख्या ९९० असून त्यांचे शेअर भांडवल २६१५० रु. इतके आहे. वर्षामध्यें या संस्थामार्फत १,७०,४८३ रु. चें दूध विकण्यांत आले आणि त्यामुळें ३६५७ रु. नफा झाला.

मध्यवर्ति सहकारी बँक—या बँकेमार्फत शेतकऱ्यांना योग्य तारणावर त्यांची गरज भागविण्यासाठीं कर्जें देण्यांत येतात. या बँकांच्या २४ शाखा जिल्ह्यांत काम करीत असून त्यामार्फत आतांपर्यंत २,२५,०४,३०९ रु. कर्ज वाटण्यांत आलें. पैकीं १,५०,६१,७०६ रु. वसूल झाले असून बँकेस १९५९–६० सालांत ३,२३,८०४ रु. इतका नफा झाला आहे.

अ. नं.	तपशील	३०-६-५०	३०-६-६०
१.	संस्था	१	१
२.	सभासद संख्या	३७३४	६६६४
३.	भाग भांडवल	४०८१५०	२४८१४७०
४.	गंगाजळी व इतर निधी	४७३८०३	१६११५५४
५.	खेळते भांडवल	१२५०६९२२	४६०२९७६१

या शिवाय दीर्घ मुदतीचें कर्ज पुरविण्याचें काम लँड मॉर्टगेज बँक करीत असते. शहरी भागांत पगारदार नोकरांच्या सोयीसाठीं १२४ सहकारी संस्था काम करीत असन त्यांच्या प्रगतीची रूपरेषा पुढील तक्त्यांत आढळेल.

१.	संस्थांची संख्या	७०	१२४
२.	सभासद संख्या	२७१२७	५४२२०
३.	भाग भांडवल	१५१२५५४	४८९०७२६

४.	गंगाजळी व इतर निधी	६८२१७५	२०१०२७२
५.	खेळतें भांडवल	७०७९८५२	२१११६८१०

जून १९६० अखेर या संस्थांमध्यें १,२३,५७,५६० रु. च्या ठेवी गुंतविलेल्या असून २,०४,९१,४७३ रु. इतके कर्ज सभासदांना पुरविण्यांत आलें आहे. या संस्थांना गतवर्षी ३,६४,३७३ रु. इतका नफा झाला. या संस्थांमध्यें १४ अर्बन बँकांचा समावेश आहे.

खरेदी विक्री संघ

जिल्ह्यांत १४ खरेदी विक्री संस्था आहेत. त्यांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें आहे. जिल्हा संघ १, तालुका संघ ८, फळे भाजीपाला संघ ३ इतर २. पुढील आंकड्यावरून या संस्थांच्या वाढीची माहिती कळेल.

	१९५०	१९६०
१) संस्था	५	१४
२) सभासद	३६१	४५७३
३) भाग भांडवल	३८२००	६,३९,८०९
४) विक्री	६,२३,९३४	६५,९१,७८३

या संस्थामार्फत लोखंडी पत्रे, खतें, बियाणे विकत घेण्यासाठीं कर्जे दिलीं जातात. ग्रामीण भागाच्या गरजेच्या वस्तूंचें वांटप केलें जातें. शेतकऱ्यांनीं आपल्या मालाची खरेदी व विक्री या संघामार्फतच करावी म्हणून जारीने प्रयत्न चालू असून पुणें जिल्हा संघ आणि निरा कॅनॉल्स संघ यांनीं या बाबतींत प्रशंसनीय कार्य केलें आहे.

जिल्ह्यांत १० तालुका विकास मंडळें असून त्यांच्यामार्फत सुधारलेल्या शेतीच्या पद्धती, रासायनिक खतांचा वापर, नवीन बियाणें वगैरे बाबत प्रचार केला जातो.

सामुदायिक शेती

जिल्ह्यांत २२ सामुदायिक शेती सहकारी संस्था नोंदण्यात आल्या असून त्यापैकीं १६ संस्थांचे कार्य सुरू झालें आहे. चार संस्थांना जमिनी मिळावयाच्या आहेत. मांजरी जवळील सुभाष सहकारी संस्थेचे कार्य आदर्शावत चालू आहे. सामुदायिक शेती संस्थांचे ७०४ सभासद असून भाग भांडवल १,६०,७१० रु. इतके आहे. गंगाजळी व निधी १,२१,४०४ रु. आहे. या संस्थांना ८,०४,१८६ रु. कर्ज देण्यांत आलें आहे. १९५९-६० सालात या संस्थांनीं ४,७६,२३२ रु. किंमतीचा माल उत्पादन करून विकला आहे.

घर बांधकाम

शहरांतील आणि मोठ्या गांवातील जागेची टंचाई दूर व्हावी म्हणून सरकार सहकारी घरबांधणी संस्थांना सढळ हातानें मदत करतें. मागास वर्गाच्या सहकारी संस्थांना तर जागा मोफत देणें, बिनव्याजी कर्ज देणें आणि आर्थिक मदत देणें अशा सवलती असल्यानें जिल्ह्यांत या क्षेत्रांत भरीव कार्य होत आहे. जून १९६० अखेर अशा १२४ संस्था नोंदण्यात आल्या. त्यांपैकीं ५७ संस्था मागास वर्गाच्या लोकांसाठीं आहेत. वरील सर्व संस्थांचे ६०६६ सभासद असून भाग भांडवल ८,५१,६७१ रु. इतकें आहे. गंगाजळी व इतर निधी ६ लाखावर असून खेळतें भांडवल ६९,१२,६१५ रु. आहे. या संस्थांनी आतापर्यंत ४३७ घरें बांधून पुरी केलीं आहेत.

पुणें जिल्ह्यांत एकूण निरनिराळ्या वीस व्यवसायांत काम करणाऱ्या कारागीरांच्या (ता. ३०–६–६० अखेर) संस्थांचे एकूण ८३०० कारागीर सभासद असून शेअर भांडवल व रिझर्व फंड मिळून एकूण भांडवल रु. ७,३०,४४७ आहे. या संस्थांनीं सरकार-
कडून तसेंच पुणें जिल्हा को--ऑपरेटिव्ह बँक व ग्रामोद्योग मंडळाकडून **औद्योगिक सहकार**
रु. १५ लाखांचे भांडवल कर्ज म्हणून घेतलें आहे. ता. ३०–६–६०
अखेरच्या वर्षांत या संस्थांनीं एकूण २२॥। (पावणेतेवीस) लाखाचा व्यवहार केला आहे. या संस्थांमध्यें खालील संस्थांचा समावेश होतो.

१) हातमाग	९	७) जिल्हा औद्योगिक संघ	१	१३) केन अँड बांबू काम	३
२) लेदर विणकर	७	८) सूत गिरणी	१	१४) सुतारकाम व लोहार काम	९
३) मजूर संघ	२४	९) कातडी कमविणाऱ्यांच्या संस्था	५	१५) धातूकाम	५
४) जंगल कामगार	२	१०) वर्ग व्यवसाय	१३	१६) कुंभारकाम	५
५) दोर काम	१०	११) तेलोत्पादक	१५	१७) महिला	९
६) इतर	१४	१२) नीरा ताडगूळ उत्पादक	३		

या संस्थांतील कांहीं प्रमुख कामकाजासंबंधीचा उल्लेख करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

१) शिवाजी टेक्स्टाईल वर्क्स सहकारी सोसायटी लि. भोर

पूर्वी भोर येथें लक्ष्मी टेक्स्टाईल मिल्स म्हणून एक खाजगी मिल होती. युद्धोत्तर कापड व्यावसायिक मंदीमुळें सदर मिल बंद झाली व भोर व आजूबाजूच्या खेड्यांत राहणाऱ्या सुमारें २५० कामगारांच्या नोकरीवर गंडांतर आलें. तथापि मिल मध्यें काम करणाऱ्या कामगारांनीं स्थानिक प्रतिष्ठित नागरिकांच्या मदतीनें सहकारी संस्था स्थापन करून ती चालविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें वरील संस्था स्थापन केली. कामगारांनीं संस्थेंत शेअर भांडवल म्हणून एका रकमेनें रु. २८,५०० शेअर भांडवल जमा केलें. सरकारनेंहि या कामगारांच्या उपक्रमास मदत म्हणून सदर संस्थेनें रु. ३०,००० चे शेअर खरेदी केले व मिलची मालमत्ता व खेळत्या भांडवलासाठीं रु. ५,००,००० चें कर्ज दिलें. गेल्या वर्षाच्या सुरवातीपासून सदर मिल चालू असून सदर मिलमध्यें सध्या ४१०० चात्या चालू असून दोन पाळीमध्यें एकूण २०० कामगार काम करतात. या सहकारी मिलचें मासिक उत्पन्न ५०,००० पौंड सुताचे असून संस्थेचा दैनंदिन कारभार सरकार नियुक्त कामगार प्रतिनिधी, तसेंच सरकारी प्रतिनिधी यांच्या व्यवस्थापक मंडळामार्फत समाधानकारकरित्या चालू आहे. संस्था २० नंबरचे सूत काढत असून थोडक्याच काळांत अल्पसा नफा मिळवू शकली आहे.

२) समाज कल्याण यंत्र कामगार सहकारी सो. लि. खडकी

मध्यम वर्गीय महिलांना उद्योग देण्याचे दृष्टीनें सदर संस्था सन १९५७ मध्यें मे. किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. खडकी यांच्या सहकार्यानें स्थापन करण्यांत आली. किर्लोस्कर ऑइल एंजिन्सना लागणाऱ्या बेअरिंग्जचे उत्पादन या संस्थेमार्फत मे. किर्लोस्कर ऑइल एंजिन्सनें घेण्याचें मान्य केल्यामुळें तसेंच कारखान्यासाठीं लागणारी तांत्रिक मदत तसेंच जागा इत्यादीबाबत सहकार्य केल्यानें सदर संस्था अस्तित्वांत येऊं शकली. संस्थेचे अद्यावत पद्धतीचे यंत्र कार्यालय असून सध्यां १५ महिला ह्या कारखान्यांत काम करतात. प्रत्येक महिला कामगाराला मासिक वेतन रु. ७० ते ११० पर्यंत मिळते. संस्थेचे कामकाज सौ. यमूताई किर्लोस्कर यांच्यामार्फत समाधानकारकरित्या

चालू आहे. संस्थेला मध्यवर्ती समाज कल्याण मंडळानें रु. ८०,००० कारखाना व यंत्रसामुग्रीसाठीं आर्थिक मदत दिलेली आहे.

३) इलेक्ट्रिकल वर्क्स को–ऑपरेटिव्ह सो. लि. पुणे.

ही संस्था सन १९५८ मध्यें इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्ट वर्क्स मध्यें काम करणाऱ्या कारागीरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठीं स्थापन करण्यांत आली. या संस्थेमध्यें एकूण २० सभासद असून संस्थेतर्फे सरकारी इलेक्ट्रिकल कामाचे मध्यें घेण्यांत येतात. १९५९–६० मध्यें संस्थेनें १ लाख रुपये किंमतीचे कामाचे मक्ते पूर्ण केले असून संस्थेला ७८० रु. नफा झाला. संस्थेचें स्वत:चें भांडवल ९१२० रु. असून सरकारी शिफारशीवर बँकेकडून रु. १४,००० चे कर्ज घेतलें आहे. याशिवाय रु. ३००० चें कर्ज व मदत संस्थेला सरकारकडून देण्यांत आलेली आहे.

४) भवानी मेटल वर्क्स को--ऑप. सो. लि. पुणे.

ही सोसायटी स. १९५९ सालीं नोंदण्यांत आली. संस्थेचे २३ सभासद असून संस्थेनें कुकरचे उत्पादनाचे काम हाती घेतले आहे. संस्थेच्या यंत्र कार्यालयांत सध्यां १५ कामगार सभासद काम करीत असून संस्थेचे शेअर भांडवल रु. ४०७५ इतके आहे. याशिवाय संस्थेला सरकारी शिफारशीवर रु. १०००० बँकेकडून कर्ज देण्यांत आलें आहे. उत्तम दर्जाच्या मालाचे उत्पादन हें संस्थेचें वैशिष्ठ्य आहे.

५) रेडिओ को. ऑफ इलेक्ट्रॉनिक्स. लि. पुणे

ही संस्था १९५८ मध्यें नोंदण्यांत आली. ह्या संस्थेनें रेडिओ जुळवणी करण्याचे व त्या संबंधीची दुरुस्ती इत्यादी कामकाज हातीं घेतलें आहे. या संस्थेच्या एकूण १५ सभासदांपैकीं १४ सभासद काम करतात. या संस्थेचे शेअर भांडवल रु. ७२०० असून बाहेरील कर्ज रु. १०००० घेतलें आहे.

६) पुणे हातमाग विणकर सहकारी सोसायटी लि. पुणे

युद्धजन्य परिस्थितींत या सोसायटीनें सुत वांटपाचें कामकाज करून सभासदांना उत्पादनासाठीं लागणारा कच्चा माल पुरविण्याचें काम केलें. तथापि युद्धजन्य परिस्थितीनंतर सरकारी हातमाग विकास योजनेनुसार प्रत्यक्ष उत्पादनाचें काम हातीं घेतलें. संस्थेनें ३ हातमाग विक्री केंद्रें व अद्यावत रंगणी गृह चालविले असून ३५० माग संस्थेच्या उत्पादनाखालीं आहेत. संस्थेनें बँकेकडून व सरकारकडून हातमाग विकास योजनेनुसार रिझर्व्ह बँक कर्ज योजनेनुसार रु. ५०,००० कर्जाऊ भांडवल घेतलें आहे. संस्थेची सभासद संख्या ९३५ असून स्वत:चें भांडवल सुमारें रु. ७५,००० चें आहे. ह्या संस्थेचा वार्षिक व्यवहार १० लाख रु. पर्यंत आहे. सोसायटींत उत्तमोत्तम हातमागाच्या साड्या तयार होतात.

७) गणेश टेक्स्टाईल विणकर को. ऑप. सोसायटी. लि.

हातमाग व्यवसायांत काम करणाऱ्या बऱ्याच विणकर कारागीरांची उत्पादनाची स्वत:चीं साधनें नसल्यामुळें बरीच कुचंबणा होते. बऱ्याचवेळां खाजगी उत्पादनावर त्यांचे आर्थिक जीवन अवलंबून असते; ही प्राथमिक गरज लक्षांत घेऊन या संस्थेनें हातमागाचा गणेश पेठेत एक कारखाना चालविलेला आहे. त्या कारखान्यांत हातमाग व अन्य हत्यारें व अवजारें असून संस्थेनें

४० हातमाग चालविले आहेत. एकूण ६० सभासद काम करतात. संस्थेचे स्वतःचे रंगणीगृह असून सरकारी शिफारशीवर रु. ८००० बँकेकडून खेळते भांडवल कर्ज घेतलें आहे.

८) नवविधान औद्योगिक सहकारी सोसायटी लि. पुणें.

मध्यम वर्गांत महिलांना काम पुरविण्याचे हेतुनें ह्या संस्थेची स्थापना १९५६ मध्यें करण्यांत आली. मध्यमवर्गीय महिलांना घरांतील कामकाज संभाळून किमान ५ ते ६ तास झेपेल असे काम करून किमान मासिक ५० ते ६० रु. पर्यंत वेतन देता यावे ह्या हेतूनें संस्थेनें सरकारकडून रु. ८१००० चे कर्ज घेऊन पुणें येथें डेक्कन जिमखान्यावर चोक्स व नाइट लॅम्प्स् इत्यादि मालाच्या उत्पादनासाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रीने युक्त असा कारखाना उभारलेला आहे. संस्थेनें चोक्स व नाइट लॅम्प्स्चे उत्पादन सुरू केले असून संस्थेच्या कारखान्यांत १५ महिला सभासद काम करतात.

९) पुणे लेदर वर्क्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. पुणे

चर्मकाम व्यवसायांत काम करणाऱ्या कारागिराना नियंत्रित काम पुरविण्याच्या उद्देशाने ही संस्था १९४७ सालीं स्थापन करण्यांत आली व त्याचप्रमाणें संस्थेनें चर्म वस्तू उत्पादनाचें काम हातीं घेतले आहे. तसेंच संस्था सरकारला लागणाऱ्या चर्मवस्तूच्या पुरवठ्याचे काम करते व सरकारी खात्यांना सरासरी १॥ ते १॥। लाख रुपये किंमतीचा माल सभासदांकडून उत्पादन करून पुरविते. संस्थेच्या यंत्रालयांत सध्या ३० सभासद काम करीत असून कारखान्यांत अद्यावत यंत्रसामुग्री आहे. संस्थेने सरकारकडून रु. ८५००० चें कर्ज घेतलें आहे. याशिवाय खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मदतीनें एक चर्मकाम विक्रीचें केंद्र नुकतेंच रविवार पेठेंत सुरू केलें आहे.

१०) सर्वोदय लेदर वर्क्स को–ऑपरेटिव्ह सोसायटी. लि. पुणे

चर्मकार सभासदांना संपूर्ण वर्षभर सरकारी निमसरकारी चर्म वस्तू पुरविण्याची कंत्राटी कामे घेऊन सभासदाकरिता त्या वस्तु तयार करून घेऊन सभासदांना वर्षभर नियमित काम पुरविणें हें ह्या संस्थेचे वैशिष्ट्य होय. संस्थेने शिवाजी नगर येथें कारखाना चालविलेला असून कारखान्यांत २६ सभासद नियमितपणें काम करीत असतात. संस्थेचे वार्षिक सरासरी उत्पादन रु. २ ते २॥ लाखाचे आहे. संस्थेचे स्वतःचे भांडवल रु. २०,२९५ चें असून कर्जाऊ भांडवल रु. ६८,६४५ चें उभारलें आहे. संस्था " अ " वर्गात असून पुणें जिल्हा सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेनें उत्तम संस्था म्हणून संस्थेला ढाल दिलेली आहे.

११) पुणे लेबर कॉन्ट्रॅक्ट सहकारी सोसायटी लि. पुणे

ही संस्था ता. ३०–३–५७ रोजीं रजिस्टर करण्यांत आली असून या संस्थेचे मजूर सभासद २५ आहेत. सरकारी खात्यामार्फत तसेंच निमसरकारी कामाचे मक्ते घेऊन ही संस्था सभासदांना काम पुरविते. सन १९५९–६० सालांत संस्थेने सुमारे २,००,००० किंमतीची कामें पूर्ण केली व रु. १६०० चा नफा मिळविला. भांडवल रु. ४४०० चें असून बँकेकडून रु. १४,००० चे खेळत्या भांडवलाकरिता कर्ज घेतलें आहे.

१२) येरवडा गाडी वडार मजूर सहकारी सोसायटी लि. पुणे.

या संस्थेचे वडार बेलदार इत्यादी मागासलेल्या जमातीतील लोक सभासद आहेत. सरकारी व निमसरकारी वा खाजगी खाणी घेऊन बांधकामासाठीं लागणारे दगड, खडी, माती इत्यादी माल खाणींतून काढून विक्री करणें हें या संस्थेचें वैशिष्ट्य होय. ही संस्था येरवडा येथें काम करीत असून संस्थेचे ४०३ सभासद आहेत. संस्थेचें स्वतःचे रु. ७०,५०१ चें भांडवल आहे. दरसाल सरासरी ५,००,००० ची उलाढाल होत असते.

१३) खात्यातर्फें मागासलेल्या, कारागिरांना सुशिक्षित बेकारांना, वंशपरंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांना, व स्टेट एड टू इंडस्ट्रिज रुल्स १९३५ या योजनानुसार आर्थिक मदत देण्यांत येते. अशा तऱ्हेनें पुणें जिल्ह्यांत एकूण २५० कारागिरांना रु. २,७२,९०० चे आर्थिक सहाय्य देण्यांत आलेले आहे.

१४) कारागिरांना आधुनिक हत्यारें, अवजारें व त्यांचा उपयोग व नवीन उत्पादन पद्धतीची माहिती व शिक्षण देण्यासाठीं औद्योगिक सहकार खात्यातर्फें पुणें जिल्ह्यांत एकूण ४ प्रशिक्षण केंद्रें चालविण्यांत आली आहेत. त्यापैकीं पौड व पुणे येथें २ वेतकाम व बांबूकामाच्या शाळा आहेत. बारामती येथे दोरकामाची शाळा आहे. पुणें येथें धातुकाम व नकशी कामाची शाळा चालविण्यांत आली आहे. या शाळांतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. २० प्रमाणें मासिक शिष्यवृत्ती देण्यांत येते. पुणें शहरांतील शाळांतील विद्यार्थ्यांना रु. २५ प्रमाणें शिष्यवृत्ती देण्यांत येते.

सहकारी साखर कारखाने

शेतीच्या मालाला योग्य किंमत देण्याच्या बाबतींत सहकारी साखर कारखान्यांनीं बारामती भागांतील शेतकऱ्यांच्या जीवनांत मोठीच क्रांती केली आहे. गुळाच्या भावांतील चढ-उतारामुळें या भागांतील शेतकऱ्यांना आपल्या ऊंसाच्या किंमतीबद्दल कधींहि शाश्वती नसे. १९५६ सालीं मालेगांव आणि सणसर भागातील शेतकऱ्यांनीं एकत्र येऊन सहकारी प्रयत्नानें आणि सहकारी मदतीनें उभारलेल्या साखर कारखान्यांमुळें शेतकऱ्यांना आपल्या ऊंसाची तर पुरेशी किंमत मिळतेच पण कारखान्यास मिळणाऱ्या नफ्यातहि ते हक्काचे भागीदार झाले आहेत. दोन्ही कारखान्यांत मिळून २१०० सभासद शेतकऱ्यांचा ऊंस दरसाल गाळला जात असून त्यांना ऊसाच्या टनामागे ५० रु वर निश्चित किंमत मिळत आहे.

दि मालेगांव सहकारी साखर कारखाना लि. मालेगांव बु. (शिवनगर)

	सभासद	भाग भांडवल	ऊस गळीत टन	साखर उत्पादन ४ पोती	उंसास दिलेला भाव	वार्षिक नफा
१९५५-५६	८४२	६,६३,४०५	—	—	—	—
१९५६-५७	१००५	११,३३,७२८	—	—	—	—
१९५७-५८	११६०	१८,३६,०४३	१,०५,०७१	१,१७,२६२	४२ रु.	१,५५,९०२
१९५८-५९	१३१३	२१,३१,०८४	१,२८,२७९	१,५७,७६१	५२ रु.	३,७३,८९०
१९५९-६०	१४१०	२१,९०,२६१	१,३५,१९२	१,६६,८४५	५८ रु.	३,५३,८५३

श्री छत्रपती शिवाजी सहकारी साखर कारखाना लि. सणसर (भवानीनगर)

	सभासद	भाग भांडवल	उस गळीत टन	साखर उत्पादन टन	उसास दिलेला भाव	वार्षिक नफा
१९५५-५६	—	९,५२,६०५	—	—	—	—
१९५६-५७	५०९	९,८८,७७८	३७,०७७	४४६०	४८	२,५०,०००
१९५७-५८	५११	१२,११,७४२	१६,७७०	११,१३७	५२	३,२४,०००
१९५८-५९	६४१	१२,१९,९९४	८९,७८८	१०,२७९	५०	३,६१,०००
१९५९-६०	१६,७९,१५०	९८,५७३	११,६५१	ताळेबंद पुरा नाहीं.		

दोन्ही कारखान्यांत मिळून १३०० वर कामगार काम करीत आहेत. याशिवाय कारखान्याच्या वसाहतीमुळें अनेक व्यापाऱ्यांना उदरनिर्वाहासाठीं व्यापार व्यवहार करणें सुकर झालें आहे.

कोऱ्हाळे ता. बारामती हा जिल्ह्यांतला तिसरा सहकारी साखर कारखाना लवकरच सुरू होणार असून भारत सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ह्या कारखान्यास मंजुरी दिली आहे.

वेअरहाऊसिंग

१९५६ सालीं मुंबई राज्याकरितां २ कोटी रु. भांडवल असलेलें वेअरहौसिंग कॉर्पोरेशन स्थापन झाले. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर ३० सप्टेंबर १९६० रोजीं महाराष्ट्र राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशनमध्यें रूपांतर झाले. नियंत्रित कोठारांच्या अभावी देशांत दरसाल साधारणपणें २५० ते ३०० कोट रु. पर्यंत किंमतीच्या धान्याची नासधूस होत असते. नियंत्रित कोठारामुळें ही हानी तर थांबेलच शिवाय शेतकऱ्यांना त्यांच्या मालाच्या तारणावर कांहीं रक्कमहि देण्याची सोय आहे. पुणें शहरांत भवानी पेठेंत अशा तऱ्हेचें नियंत्रित कोठार नुकतेंच उघडण्यांत आलें आहे.

शेतकी बाजारांचे नियमन

शेती मालाच्या उत्पादकांना आपला माल योग्य रितीने विकणें सुलभ व्हावे आणि त्यांची व्यवहारांतील फसवणूक थांबावी म्हणून सरकारने जिल्ह्यांत पुढील नऊ ठिकाणीं बाजारपेठांचे मार्केट ॲक्टानुसार नियमन केले आहे. १) बारामती, २) खेड, ३) नीरा, ४) शिरूर,५) पुणें,६) मंचर,७) इंदापूर,८) दौंड, ९) जुन्नर. योग्य भाव मिळणे, मालाचे योग्य वजन केले जाणे, उघडपणे लिलांव किंवा भाव ठरविणे इ. अनेक तरतुदी मार्केट ॲक्टमध्यें असून त्यामुळें शेतकऱ्यांस आपल्या मालाची जास्तीत जास्त किंमत मिळते आणि मालविक्रीसाठीं अवास्तव खर्च येत नाहीं.

५. व्यवसाय आणि उद्योग धंदे

फॅक्टरी ॲक्टान्वये रजिस्टर करण्यांत आलेलीं ६६४ उद्योग केंद्रें जिल्ह्यांत आहेत. या केंद्रातून सरासरी १०५ कामगार काम करीत आहेत. जिल्ह्यांतील कारखान्यांपैकीं ५३ टक्क्याहून अधिक पुणें शहराच्या पांच मैल त्रिज्येंत आहेत आणि त्यांतून ४० हजारावर कामगार काम करतात. जिल्ह्यांतील औद्योगिक कामगारांची संख्या ९० हजाराचे आसपास आहे. बारामती, इंदापूर व हवेली या तालुक्यांतून कांहीं कारखाने विखुरलेले आहेत तर आंबेगांव व वेल्हे या भागांत कारखाने मुळीच नाहींत. पुणे शहराच्या परिसरांत उद्योगधंद्याची वाढ झपाट्यानें होत असून पुढे नमूद केलेले महत्वाचे उत्पादक कारखाने जिल्ह्यांत चालू आहेत.

औद्योगिक वाढ

१) हिंदुस्थान अँटी बॉयाटिक्स लि. चा पेनीसीलीन कारखाना. २) सेंट्रल कॉन्क्रीट डेपो, लोणावळा. ३) वालचंद नगर इंडस्ट्रिज लि. (साखर कारखाना व त्यांची मशीनरी). ४) श्री. छत्रपती शिवाजी सहकारी साखर कारखाना लि. भवानीनगर. ५) मालेगांव सहकारी साखर कारखाना, लि. मालेगांव. ६) साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. येरवडा. ७) राजा बहादूर मोतीलाल मिल्स, पुणें (कापड गिरणी). ८) भोर इंडस्ट्रीज लिमिटेड, भोर. ९) डेक्कन पेपर मिल्स कं. लि. मुंढवा. १०) स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. खडकी. ११) अरलाबस प्रायव्हेट लि. भाटघर. १२) सुदर्शन केमिकल इंडस्ट्रिज, पुणें २. १३) पैसा फंड ग्लास वर्क्स, तळेगांव दाभाडे. १४) किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. खडकी. १५) रस्टन हॉर्नसबी (इंडिया) लि. आकरडी, चिंचवड. १६) गुजरात मेटल फॅक्टरी पुणें. १७) महिंद्र ओवेन प्रायव्हेट लि. पिंप्री. १८) फिलिप्स इंडिया लि. लोणी काळभोर (रेडिओ). १९) किर्लोस्कर न्युमॅटिक्स, हडपसर. २०) इंडिअन ह्यूम पाईप कंपनी, हडपसर. २१) उद्यम इंजिनीअरिंग, पुणें ४.

पुणें महानगरपालिका, लोणावळा नगरपालिका इ. संस्थांनीं आपल्या परिसरांत नवीन उद्योग धंद्यांना चालना देण्याचे उद्देशानें दहा वर्षांसाठीं जकात माफ इ. सवलती ठेवल्या आहेत.

विणकाम, सुतारकाम, कातडी कमावणे, विटा व भांडी बनविणें, जोडे तयार करणे, तेल घाणे, इ. ५ हजारावर छोटे उद्योगधंदे करणारांची जिल्ह्यांत नोंद असून त्यातून १२ हजार लोकांना रोजगार मिळतो.

मच्छीमारीच्या धंद्यामुळें मासे धरणाऱ्या कोळी लोकांना काम मिळते आणि पकडलेल्या मासळीचा पूरक अन्न म्हणून उपयोग होतो. पुणें जिल्ह्यास समुद्र किनारा नसल्यानें मच्छीमारीचे क्षेत्र पाण्याच्या अंतर्गत साठ्यापुरतेच मर्यादित आहे. हडपसर येथें माशांची निपज करण्याचे केंद्र १९५८-५९ मध्यें उघडण्यांत आले असून तेथे लहान मासे मोठ्या पाण्याच्या साठ्यांत वाढण्यासाठीं पाठविले जातात. या ठिकाणी माशांच्या पैदाशी संबंधी संशोधनहि केलें जाते. भाटघर धरणांत बाराही महिने भरपूर पाणी असल्यानें तेथें माशांची पैदास वाढविण्यासाठीं शास्त्रोक्तरित्या प्रयोग करण्यांत येत आहेत.

मच्छिमारी

६. शैक्षणिक प्रगति

पुणें हें विद्येचें माहेरघर म्हटलें जातें. येथील विविध शैक्षणिक संस्थांत शिकलेल्या शेंकडो विद्यार्थ्यांनीं विद्वत्ता, शास्त्र, संशोधन, साहित्य इ. क्षेत्रांत मोलाची कामगिरी करून दाखविली आहे. शिक्षणाच्या सर्व शाखांची अद्यावत् सोयींची महाविद्यालयें पुण्यांत असून शिक्षणासाठीं भारतांतूनच नव्हे तर परदेशाहूनहि येथें विद्यार्थी येत असतात.

प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया समजला जातो. ते अधिकाधिक चांगले होण्यासाठीं सुंदर शालागृहें बांधणें, ट्रेंड शिक्षकांची संख्या वाढविणें, विद्यार्थ्यांना मूलोद्योग शिक्षण देणें, आदि अंगाकडे राज्य सरकार आणि स्कूलबोर्ड विशेष लक्ष पुरवित आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळें आणि सक्तीच्या शिक्षण कायद्यामुळें प्राथमिक शिक्षणाचा व्याप दरसाल झपाट्यानें वाढत आहे. पुणें जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षणाची वाढ पुढील तक्त्यावरून लक्षांत येईल—

साल	पुणें शहरांतील प्रा. शाळा	विद्यार्थी	पुणें जिल्ह्यांतील प्रा. शाळा	विद्यार्थी
१९५०-५१	१८८	५३,०२१	१२१८	१,३८,१७८
१९५५-५६	२१६	७३,९८४	१४९८	१,६५,४७२
१९६०-६१	२५२	९७,९४५	१५२०	२,१०,२५१

जिल्ह्यांतील प्राथमिक शाळांतून सूतकाम, विणकाम, शेती, सुतारकाम, पुठ्ठाकाम, बांबूकाम इ. मूलोद्योगांचे शिक्षण देण्यांत येतें. दरसाल अधिकाधिक शाळांतून मूलोद्योग शिक्षणाची सोय करण्यांत येत आहे.

वर्ष	सूतकाम–विणकाम मू. शाळा	सुतारकाम मू. शाळा	शेती मू. शाळा
१९५०–५१	१३६	२०	१२
१९५५–५६	१६९	२५	३७
१९६०–६१	२३७	३९	४३

शालागृहांची वाढती गरज भागविण्यासाठीं स्कूल बोर्ड (जि. लोकल बोर्डामार्फत), समाज विकास योजना, स्थनिक विकास योजना आदीं तर्फे शालागृहें बांधण्यांत येत आहेत. स्कूल

शालागृहें

बोर्डातर्फे बांधावयाच्या शाळांसाठीं ४० टक्के रक्कम ग्रामस्थांना रोख भरावी लागते. समाज विकास योजनेंत ५० टक्के पर्यंत रक्कम रोख सरकारी मदत देऊन ग्रामस्थांना स्वतः शालागृहें बांधावी लागतात. स्थानिक विकास योजनेत शाळा बांधणाऱ्या गांवकऱ्यांना येणाऱ्या खर्चाच्या निम्मी रक्कम सरकार रोख देतें. जिल्ह्यांत या योजनांनुसार पुढीलप्रमाणें नवीन शालागृहांचें काम झालें आहे.

स्कूल बोर्डानें स्थानिक विकास व समाजविकास योजनांच्या मदतीनें बांधलेल्या शाळा

१९५०–५१ : २२२; १९५५–५६ : ३१६; १९६०–६१ : ४५६.

जिल्ह्यांत पूर्व प्राथमिक शाळा ४२७ असून त्यांतून दरसाल हजारो विद्यार्थी प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षेस बसतात. या शिवाय १६ वर्षांहून मोठ्या स्त्रीस आणि २० वर्षांहून मोठ्या पुरुषांस या परीक्षेस बाहेरून बसतां येतें. पुणें, भोर, सासवड, बारामती, इंदापूर, दौंड, खेड, मंचर, जुन्नर इ. प्रमुख ठिकाणीं परीक्षा केंद्रें ठेवण्यांत आली असून दरसाल त्यांत वाढ करण्यांत येते.

वर्ष	प्राथमिक शाळा प्रमाणपत्र विद्यार्थ्यांची संख्या	परिक्षेस बसलेले उत्तीर्ण विद्यार्थी
१९५०–५१	६२५१	३५३७
१९५५–५६	८३१०	४७७०
१९५९–६०	११८९७	७१८९

पांचवीपासून इंग्रजी–मराठी पांचव्या इयत्तेपासून इंग्रजी शिकवण्याचे सरकारी धोरणानुसार गेल्यावर्षी ४०० एस्. एस्. सी. पास झालेल्या प्राथमिक शिक्षकांना इंग्रजी शिकविण्याचें प्रशिक्षण देण्यांत आले असून जिल्ह्यांतील सर्व शाळांतून इंग्रजी शिकविण्याची सोय गेल्या वर्षींपासून (१९५९–६०) करण्यांत आली आहे.

माध्यमिक शिक्षण-शिक्षणाच्या वाढत्या गरजेबरोबरच जिल्ह्याच्या खेड्यांतून नवीन माध्यमिक शाळा निघत आहे. शहरातील माध्यमिक शाळांतहि मुलांची संख्या बेसुमार वाढत असून चालकांनी दुबार शाळा चालवूनहि कित्येक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळविणें कठीण पडते.

पुणें जिल्ह्यांतील माध्यमिक शाळांची वाढ पुढील प्रमाणें झाली आहे.

साल	पुणें शहरांतील माध्यमिक शाळा	विद्यार्थी	पुणें जिल्ह्यांतील माध्यमिक शाळा	विद्यार्थी
१९५०–५१	५५	३०,५५०	२८	७८८४
१९५५–५६	६१	३४,८२७	४१	११,८६५
१९६०–६१	७५	३९,०५७	६०	१८,८१३

पूर्वीं दुय्यम शाळांना सरकार त्याच्या मान्यवर खर्चावर शहरात ३० टक्के आणि ग्रामीण भागांत ३३ टक्के अनुदान देत असे. १ नोव्हेंबर १९५९ पासून दुय्यम शाळेतील शिक्षकांची वेतन-

श्रेणी वाढविण्यांत आली. हा वाढता खर्च भागविण्यास मदत म्हणून १९५९–६० सालापासून अनुदानाची ही रक्कम अनुक्रमें ४५ टक्के आणि ५० टक्के केली आहे.

दुय्यम शाळांना इमारती बांधण्यास सरकार कर्ज देतें. ही रक्कम १५ वर्षांत परतफेड करावी लागते. या योजनेचा फायदा २८ शाळांनीं घेतला असून त्यांना देण्यांत आलेल्या कर्जाची रक्कम ४,२४,००० रु. इतकी आहे. वसतिगृहांसाठींहि अशीच कर्ज देण्याची सोय असून त्याचा फायदा सहा शाळांनी घेतला आहे. त्याना एकूण ८०,००० रु. कर्ज देण्यांत आले. इमारती बांधण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अनुदान देण्याची तरतूद करण्यांत आली आहे. एकूण खर्चाच्या ५० टक्के इतकी रक्कम सरकार शिक्षण संस्थांना अनुदान म्हणून देते. मात्र अशा इमारतींचे भाडे मान्यवर खर्चात संस्थांना दाखवितां येत नाहीं. २० शाळांनीं या योजनेचा फायदा घेतला असून एकूण अनुदान रक्कम ३,३४,००० रु. वर जाईल.

शालागृहांस मदत

२८ शाळांना शैक्षणिक साहित्य, शास्त्रीय उपकरणें, फर्निचर आदि गरजेच्या गोष्टी विकत घेण्यासाठीं सरकारनें आतापर्यंत १,१९,४१० रु. मदत दिली आहे.

व्यापार, गृहशास्त्र, गायन, चित्रकला आदि व्यवसायांचे शिक्षण देण्याची सोय जिल्ह्यांतील सहा शाळांनी केली असून त्यांना इमारत साहित्य आदींसाठीं सरकार दरवर्षी अनुदान देत असतें. तीन शाळांतून मुलांना धंदेशिक्षण देण्यांत येते. अशा शाळांना सरकार ५० टक्के इतकी रक्कम अनुदान म्हणून देते. खुलीं नाट्यगृहें, पोहण्यासाठीं तलाव, चित्रपट, साहित्य, इ. साठींहि माध्यमिक शाळांना अनुदान देण्यांत येत असून अधिकाधिक संस्था त्याचा फायदा घेत आहेत. ऐतिहासिक, भौगोलिक व शैक्षणिक दृष्ट्या प्रसिद्ध ठिकाणांना भेटी देण्यासाठीं सहली काढणाऱ्या शाळांना सरकारतर्फे मदत दिली जाते. या योजनेचा फायदा आठ दुय्यम शाळांनीं गेल्या चार वर्षांत घेतला असून ५८२५ रु. अनुदान मिळविले आहे.

विविध शिक्षण व मनोरंजन

हिंदी प्रचार—हिंदी या आपल्या राष्ट्रभाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून हिंदी साहित्यातील चांगली पुस्तकें भारत सरकारकडून दरसाल भेट म्हणून शैक्षणिक संस्थांना देण्यांत येतात. शंभर शाळांना अशी पुस्तकें मिळत आहेत. याशिवाय दहा शाळांना इतर निवडक हिंदी पुस्तकें खरेदी करण्याकरितां ९०० रु. ची मदत गेल्या चार वर्षांत देण्यांत आली आहे.

दरसाल फेब्रुवारी महिन्यांत माध्यमिक शालान्त आणि दुय्यम शालान्त शिष्यवृत्त्यांकरितां परिक्षा घेतल्या जातात. पहिल्या विभागांत जिल्ह्यांकरितां ३० शिष्यवृत्त्या असून दुसऱ्या विभागांत २९ शिष्यवृत्त्या, गुणानुक्रमें दिल्या जातात. या शिष्यवृत्त्यांपैकीं $\frac{1}{2}$ ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांकरितां राखून ठेवलेल्या असतात. माध्यमिक शालान्त शिष्यवृत्तीच्या परिक्षेस चवथ्या अियत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बसता येते. ही शिष्यवृत्ती पांचवी ते सातवी इयत्तांपर्यंत दरमहा चार रुपये प्रमाणें दिली जाते.

शिष्यवृत्त्या

दुय्यम शालान्त शिष्यवृत्तीच्या परिक्षेस सातव्या इयत्तेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बसतां येते. ही शिष्यवृत्ती दरमहा रु. ५,६,८,८, याप्रमाणें आठवी ते अकरावी पर्यंत विद्यार्थ्यांस मिळते.

वरील दोन्ही शिष्यवृत्त्यांकरितां कोणाही विद्यार्थ्यांस परिक्षा देता येते. परंतु ज्यांच्या पालकांचे उत्पन्न सालीना ३६०० रु. हून अधिक आहे. त्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळत नाहीं अशांना ऑनररी स्कॉलर म्हणून जाहीर केले जाते.

कर्जाऊ शिष्यवृत्त्या–दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार विद्यार्थ्यांना ८ वी ते ११ वी पर्यंत दरमहा १० रु. प्रमाणें कर्जाऊ शिष्यवृत्ति देण्याची तरतुद झाहे. ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठीं पालकांचे उत्पन्न ३६०० रु. पेक्षा कमी असल्याचा मामलेदारांचा दाखला आवश्यक असतो. जिल्ह्यासाठीं १९५८–५९ सालाकरितां ३३ आणि १९५९–६० सालाकरितां ३८ शिष्यवृत्त्या ठेवल्या असतांनाही फक्त तीनच विद्यार्थ्यांनीं या योजनेचा फायदा घेतला आहे. १९६०–६१ सालाकरितां ३८ शिष्यवृत्त्या ठेवण्यांत आल्या आहेत.

ग्रामीण भागांतील शिष्यवृत्ती

ग्रामीण भागांतील गरीब विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेपर्यंतचा अभ्यासक्रम पुरा करतां यावा या उद्देशानें १९५९--६० सालापासून ही योजना अंमलांत आली. इयत्ता ४ थीच्या वार्षिक परिक्षेस उत्तम यश मिळविलेल्या २० विद्यार्थ्यांची चांचणी परिक्षा घेऊन शिक्षणाधिकारी लायक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देतात. या शिष्यवृत्तीसाठींहि पालकांचे उत्पन्न ३६०० रु. चे आंत असले पाहिजे असा नियम आहे. शिष्यवृत्तीची रक्कम ५ वी ते ७ वी दरमहा १५ रु., ८ वी ते ११ वी दरमहा २५ रु. आणि विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमासाठीं दरमहा ५० रु. अशी असते. जिल्ह्यांत तीन विद्यार्थ्यांना गतवर्षीं ही शिष्यवृत्ती देण्यांत आली आहे.

फी-सवलतः—प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या मुलांना पुढील दोन अटींवर संपूण फी माफ केली जाते.

१) १ जूनला विद्यार्थ्यांची वयोमर्यादा पुढीलप्रमाणें असावी.

५ वी	६ वी	७ वी	८ वी	९ वी	१० वी	११ वी
१२	१३	१४	१५	१६	१७	१८

२) पालकांचे एकूण उत्पन्न (महागाई भत्ता वजा करून) दरमहा १०० रु. पेक्षां अधिक नसावें.

आर्थिक सवलत

१९५९–६० सालांत सरकारनें सालीना ९०० रु. चें आंत उत्पन्न असलेल्या पालकांच्या सर्व मुलांना फी माफ केली आणि १९६०–६१ सालाकरितां उत्पन्नाची मर्यादा १२०० रु. पर्यंत वाढविली. शैक्षणिक सवलतींत सर्वांत महत्वाची आणि समाजवादाकडे पाऊल टाकणाऱ्या क्रांतिकारक अशा या सरकारी योजनेचें सर्व गोडवे गायले जात असून तिचा प्रत्यक्ष फायदा ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना फार मोठ्या प्रमाणांत होत आहे. १९५९–६० सालांत या योजनेचा फायदा ७९१० विद्यार्थ्यांना झाला तर १९६०–६१ सालाकरितां विद्यार्थ्यांची हीच संख्या १५००० वर गेली आहे. फीसाठीं संस्थांना दिलेली रक्कम अनुक्रमें ५,४६,७३१ रु. आणि १२ लाख रु. वर आहे.

व्यवसाय मार्गदर्शन केंद्र

एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी विश्वविद्यालयीन अभ्यासक्रम सुरू करतात. परिणामी कित्येकांना पश्चात्तापाची पाळी येते. असे होऊ नये आणि आपल्या आवडीनुसार

आयुष्याचे निश्चित ध्येय ठरविणें प्रत्यक्ष विद्यार्थ्यांस सुलभ व्हावें म्हणून १९५७ सालापासून जिल्ह्यांत पुणें येथें व्यवसाय मार्गदर्शन केंद्र सुरूं करण्यांत आले असून आपली आवड आणि लायकी याप्रमाणें शिक्षणक्रम निवडण्यास विद्यार्थ्यांस सर्वतोपरी सहाय्य दिलें जातें. शेकडो विद्यार्थी दरसाल या केंद्राचा लाभ घेत असून कित्येकांनी या केंद्रामुळें आपला प्रत्यक्ष मोठा फायदा झाल्याचें कळविले आहे.

नाट्यस्पर्धा—विद्यार्थ्यांमधील अभिनयकला आणि सभाधीटपणा या गुणांची वाढ व्हावी म्हणून दरसाल आंतरशालेय नाट्यस्पर्धा घेण्यांत येऊन यशस्वी शाळांना चांदीची फिरती ढाल आणि विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षिसें देण्यांत येतात. पंचवार्षिक योजनेच्या प्रसिद्धीसाठीं गतवर्षी शालेय नाट्यस्पर्धा घेण्यांत आल्या होत्या.

नेहमीचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्थाशिवाय पुणें शहरांत इतर दहा प्रकारचें शिक्षण देणाऱ्या ६२ संस्था आहेत. त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे.

अध्यापक विद्यालयें–६, संस्कृत विद्यालयें–३, संगीत विद्यालयें–३, नृत्यकला विद्यालयें–२, चित्रकला व कला शिक्षण विद्यालयें–३, अंध–मूक–बधीर विद्यालयें–२, हिंदी शिक्षक सनद विद्यालयें–२, पूर्व प्राथमिक शाळा–२७, शारीरिक शिक्षण संस्था–६, प्रौढ स्त्री पुरुषांसाठीं इंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्था–२.

लोकसाहित्य व समाजशिक्षणः—मराठी भाषेंतील लोकसाहित्याचे संकलन करून तें जनतेस उपलब्ध करून देण्याकरितां १९५५ सालीं सरकारनें डॉ. चिं. ग. कर्वे, यांच्या अध्यक्षतेखालीं लोकसाहित्य समिती स्थापन केली, या समितीनें आतांपर्यंत पुढील पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत.

१) लोकसाहित्याचे स्वरुप, २) खानदेशी लोककथा-लोकगीतें, ३) दंतकथा–दैवतकथा–आख्यायिका, ४) महाराष्ट्रांतील आदिवासींचे लोकसाहित्य व तिचे उपासक.

समाज शिक्षण

१९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें जिल्ह्यांत २८·१३ टक्के लोक साक्षर आहेत. जिल्हा विकास मंडळाची समाजशिक्षण उपसमिति १९५४ सालीं स्थापन झाली असून तिच्यामार्फत पुणें जिल्ह्यांतील ग्रामीण भागांतील समाजशिक्षण कार्याला योग्य मार्गदर्शन करणें, उत्तेजन देणें, जरूर ती मदत करणें हीं कामे चालतात.

गल्या चार वर्षांत समाज शिक्षणाचे कार्य पुढीलप्रमाणें झाले आहे

सन	प्रौढ वर्ग संख्या				साक्षर झालेले प्रौढ			
	पहिली कसोटी		दुसरी कसोटी		पहिली कसोटी		दुसरी कसोटी	
	पु.	स्त्रि.	पु.	स्त्रि.	पु.	स्त्रि.	पु.	स्त्रि.
१९५५-५६	३७७	६१	१४६	१९	२६२६	४११	५५२	५७
५६-५७	५०८	७७	२०७	३२	४०९८	५४४	१०९८	९०
५७-५८	६१६	१०४	२२६	४२	२८५९	५२२	८४५	१४६
५८-५९	३९९	५०	१४६	१७	२८७९	४४२	११४९	१६९
५९-६०	३५७	६९	१२०	१८	२७२३	३३५	६९६	४८

समाजशिक्षण प्रसाराकरितां पुणें जिल्ह्यांत पुढील योजना आहेत.

(१) **लेखन वाचन चढाओढ**—शिकलेल्या प्रौढांची साक्षरता टिकावी आणि त्यांची शिक्षणाची गोडी वाढावी म्हणून गेल्या पांच वर्षांत या जिल्ह्यांत नवसाक्षर प्रौढांसाठीं लेखन वाचन चढाओढ चालू आहे. या चढाओढींत प्रत्येक तालुक्यांतील पहिल्या क्रमांकाला १० रुपयांचे व दुसऱ्या क्रमांकाला ५ रुपयांचे बक्षीस दिले जाते. १९६० सालीं झालेल्या चढाओढींत ६३५ प्रौढांनीं भाग घेतला होता.

(२) **फिरतीं वाचनालयें**—प्रत्येक भागशिक्षण अधिकाऱ्याचें फिरतीच्या भागांत एक नवसाक्षर प्रौढांसाठीं लिहिलेल्या ५०–६० पुस्तकांचे फिरतें वाचनालय चालवावें असें ठरलें त्यासाठीं सुमारें २५ रु. किंमतीचा पुस्तकांचा एक संच लहान ट्रंकांत घालून देण्याची सोय केली. अशी ३६ फिरती वाचनालयें सुरूं करण्यांत आली. ग्रामीण वाचनालयांना मदत व फिरती वाचनालयें या दोन योजनांसाठीं मिळून ४८०० रु. चीं पुस्तकें पुरविली आहेत. त्यामुळें नवसाक्षर प्रौढांची साक्षरता टिकण्याला मदत होईल.

(३) **ग्रामीण वाचनालयें**—ग्रामीण वाचनालयें हें समाजशिक्षणाचें एक अंग आहे. पुणें जिल्ह्यांत २९३ ग्रामीण वाचनालयें चालू आहेत. नवसाक्षर प्रौढांना योग्य असें वाङ्मय ग्रामीण भागांतील लोकांच्या वाचनांत येण्यास या वाचनालयामुळें मदत झाली आहे.

(४) पुणें जिल्ह्यांत समाजशिक्षणाचें उत्तम काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा वेळोवेळीं गौरव करण्यांत येऊन त्यांनाहि बक्षिसें दिलीं जातात. नवसाक्षर प्रौढांचा आणि कार्यकर्त्यांचा दरसाल मेळावा घेण्यांत येतो.

(५) **समाज शिक्षण मोहीम**—भोर येथें दिनांक २७ ते ३० जून १९६० अखेर
भरलेल्या शिक्षकांच्या शिबिरांत सन १९६०–६१ सालांत २०,००० प्रौढ साक्षर करण्याचा
संकल्प जिल्ह्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांनीं केला आहे. जिल्हा विकास मंडळाचे समाज शिक्षण उप-
समितीनें त्याचा पुरस्कार केला आहे. जिल्ह्यांतील शिक्षकांनीं आणि जनतेनें या योजनेस सक्रीय
सहकार्य दिलें आहे. १३३० शाळांतील ३७५६ शिक्षकांनीं समाज शिक्षणाचें कार्य निष्ठेनें कर-
ण्याच्या प्रतिज्ञा घेतल्या असून ४५००० वर प्रौढांना साक्षर करण्याचा त्यांचा संकल्प आहे. त्या-
नुसार डिसेंबर १९६० अखेर ३३१७ प्रौढांचे वर्ग जिल्ह्यांत चालू झाले. या वर्गांत ५५५०५
प्रौढ पटावर होते. यांपैकीं १७०९३ प्रौढ साक्षर झालेले आहेत. या आंकड्यावरून यंदा पुणें
जिल्ह्यांत संकल्पित २०,००० प्रौढांपेक्षांहि अधिक प्रौढ साक्षर होतील अशी खात्री वाटते.

या मोहिमेमुळें समाज शिक्षणाचे कामीं जनता जागृत झाली असून ते आपलेंच काम
समजून लोकांना पाट्या, पुस्तकें, फळे, कंदील असें शिक्षण साहित्य भरपूर प्रमाणांत पुरवित आहेत.

(६) **लोकशिक्षण दिन निधी**—लोकशिक्षणाचें काम आर्थिक मदतीवांचून अडूं नये
म्हणून गेल्या वर्षीपासून समाज शिक्षण दिनाचे निमित्तानें निधी गोळा केला जातो. गेल्या वर्षी
८४२३ रुपये ८८ नये पैसे निधि जमला. यंदाचा समाज शिक्षण कार्यांचा व्याप लक्षांत घेऊन वीस
हजार रुपये लोकशिक्षण दिन निधि जमेल असा अंदाज आहे.

राज्याच्या औद्योगिक वाढीसाठीं कसबी कामगार आणि तंत्रज्ञ यांची वाढती जरुर भासत आहे. पुण्यासारख्या शिक्षणाचें केंद्र समजल्या जाणाऱ्या शहरांत राज्य सरकारनें तांत्रिक शिक्षणासाठीं पुढें नमूद केल्याप्रमाणें पुरेशा सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

तांत्रिक शिक्षण

शहरांत तांत्रिक शिक्षण देणाऱ्या तीन प्रकारच्या संस्था आहेत. १) टेक्निकल हायस्कूल्स २) इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटस् व सेंटर्स ३) टेक्निकल अँड इंडस्ट्रिअल इन्स्टिट्यूटस्.

एस्. एस्. सी. साठीं मान्य केलेले १) वर्कशॉप टेक्नॉलॉजी २) जॉमेट्रिकल मशीन ड्रॉईंग ३) एलिमेंटस् ऑफ इलेक्ट्रिकल अँन्ड मेकॅनिकल इंजिनिअरिंग या तीन विषयांचे स्थानिक माध्यमिक वर्ग सरकारी टेक्निकल हायस्कूलमध्यें शिकविले जातात.

टेक्निकल हायस्कूल्स

त्यासाठीं वेगळी फी आकारली जात नाहीं. पुणें महानगरपालिकेचें व्हिक्टोरिया ज्युबिली म्युनिसिपल टेक्निकल हायस्कूल ही एकच स्वयंपूर्ण तांत्रिक माध्यमिक शाळा आहे. मोलेदिना अँग्लो उर्दू हायस्कूल, आय. सी. एस्. गुजराथी हायस्कूल व जे. एन्. पेटीट स्कूल या पुण्यांतील शाळांतून तांत्रिक शिक्षणाची सोय आहे.

वेगवेगळ्या शैक्षणिक पात्रता असलेल्या विद्यार्थ्यांना धंदे शिक्षण देणाऱ्या पुण्यांत दोन सरकारी संस्था आहेत. इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, औंध, या संस्थेस ५०० विद्यार्थ्यांना आणि इंडस्ट्रिअल ट्रेनिंग सेंटर (वाडिया कॉलेज) या संस्थेस २५६ विद्यार्थ्यांना

इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिटयूट्स व सेंटर्स

ड्राफ्टस्मन इलेक्ट्रिशिअन इलेक्ट्रोप्लेटिंग, फिटर, ग्राईंडर, मशिनिस्ट, रेफ्रिजेटर, मोटार–रेडिओ घड्याळ दुरुस्ती, टर्नर, वेल्डर, वायरलेस ऑपरेटर, वगैरे धंद्यांचे शिक्षण देण्याची सोय आहे. एकूण विद्यार्थ्यांच्या ३३$\frac{1}{3}$ टक्के विद्यार्थ्यांना दरमहा २५ रु. स्टायपेंड (शिक्षणक्रम वेतन) देण्यांत येते. स्टायपेंड देण्या-साठीं विद्यार्थ्यांची निवड एका कचेरीमार्फत केली जाते. सुतारकाम, लोहारकाम, या व्यतिरिक्त सर्व शिक्षण क्रमांसाठीं विद्यार्थ्यांचा अधिक ओढा असल्याचे दिसते.

महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार शिक्षण देणाऱ्या शहरांत सरकारमान्य तीस संस्था असून त्यामध्यें शिवणकाम, भरतकाम, कशिदा काम, बुक बाइंडिंग व पुठ्ठाकामाचें शिक्षण दिलें जाते. सेवासदन, महाराष्ट्र मुद्रण शाळा, हस्त-

टेक्निकल अँड इंडस्ट्रिअल इन्स्टिटयूट

व्यवसाय शिक्षक शिक्षणालय, महिलाश्रम हायस्कूल, अनाथ हिंदु महिला-श्रम, क्वीन मेरी टेक्निकल हायस्कूल या संस्थांना सरकारतर्फे आर्थिक मदत दिली जाते. सरकारी पॉलीटेक्नीक मध्यें इलेक्ट्रीकल व सिव्हिल इंजिनिअरींगच्या डिप्लोमा शिक्षणक्रमाची सोय नसून त्यामध्यें उच्च बौद्धिक व शारीरिक पात्रतेच्या कमीतकमी एस्. एस्. सी. पास विद्यार्थ्यांस घेतले जाते.

पूर्वीं मॅट्रिक किंवा अकरावीची परिक्षा विश्वविद्यालयामार्फत घेतली जाई. शैक्षणिक कार_भाराच्या सोयीसाठीं या परिक्षेचे सर्व कामकाज पाहण्यासाठीं सरकारनें एस्. एस्. सी. बोर्ड स्थापन केलें. बोर्डाची मुख्य कचेरी पुण्यांतच आहे. या बोर्डामार्फत राज्यांतील

एस्. एस्. सी. बोर्ड

माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची एस्. एस्. सी. (११ वी) ची परीक्षा घेतली जाते. पुणें जिल्ह्यांत एस्.एस्. सी. परीक्षेची पुणें शहर, पुणें लष्कर व बारामती अशी तीन केंद्रें असून त्यांतून जिल्ह्यांतील ९६ (पूर्ण) माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाते.

१९५५ मार्चपासून आजपर्यंत या केंद्रांतून ५२,५६६ विद्यार्थी परीक्षेस बसले आणि २८,४७० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

पुणें विश्वविद्यालय

पुणें विश्वविद्यालयाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजीं झाली. त्यापूर्वीं पुण्यांतील सर्व महाविद्यालयें मुंबई विश्वविद्यालयांशी संलग्न होती. पुणें विश्वविद्यालयाची वाढ झपाट्यानें होत असल्याचे पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

	सन १९४९	सन १९५९
१) संलग्न महाविद्यालयें	२३	३५
२) संलग्न मान्य संस्था	४	५
३) निरनिराळ्या परीक्षेस बसलेले विद्यार्थी	५१११	२५,९१३
४) पैकीं पास झालेले विद्यार्थी	३११७	१३,२७१
५) पदवी परीक्षेस बसलेले विद्यार्थी	११०२	५०६३
६) पैकीं पास विद्यार्थी	८०९	३२६३
७) संशोधन करून पदवी घेतलेले विद्यार्थी	२(५०–५१)	११
८) बाहेरून परिक्षेस बसलेले विद्यार्थी	४६४(१९५२)	३१५४
९) पैकीं पास विद्यार्थी	२६२	१२४१
१०) विश्वविद्यालयाचें उत्पन्न	४,४५,६८९ रु.	४१,६६,४६० रु.
११) विश्वविद्यालयाचा खर्च	४,१६,७९५ रु.	४१,८४,२०७ रु.

विश्वविद्यालयाशीं संलग्न असलेली पुणें शहरांतील महाविद्यालयें व त्यामध्यें शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या.

सन १९५९–६०

१) फर्ग्युसन कॉलेज, पुणें ४	१९१८	२) सर परशुराम भाऊ कॉलेज, पुणें २.	२४६५
३) न. वाडिया कॉलेज, पुणें १	१८८६	४) एम्. ई. एस्. कॉलेज, पुणें ४	९९६
५) लॉ कॉलेज, पुणें ४	४१२	६) टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणें २.	२१६
७) एस्. एन्. डी. टी. कॉलेज, पुणें ४.	८०	८) बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें ४.	१०४१
९) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणें ३.	७०८	१०) बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणें १.	६०१
११) आयुर्वेदिक कॉलेज, पुणें २.	२२७	१२) कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर	४१५
१३) डिप्लोमा इन टीचिंग, संस्था–वाडीया कॉलेज	६२		

पदव्युत्तर––अभ्यासक्रमाची सोय पुणें विश्वविद्यालयांतर्फे १९५० पासूनच सुरू करण्यांत आली आहे. सुरवातीस १) संस्कृत २) मराठी ३) राज्यशास्त्र, ४) प्रायोगिक मानसशास्त्र, ५) गणित, ६) भूगोल, ७) रसायनशास्त्र, ८) प्राणिशास्त्र, ९) फिजिक्स, ऐवढ्या विषयांचीं त्यांत सोय होती. त्या नंतर पुढील विषयांच्या अभ्यासक्रमाची भर घालण्यांत आली आहे.

१०) वनस्पतिशास्त्र, ११) संख्याशास्त्र, १२) अिंग्रजी, १३) आधुनिक युरोपियन भाषा, १४) पर्शियन उर्दू, १५) हिंदी, १६) अर्थशास्त्र, १७) तत्वज्ञान, १८) अितिहास, १९) समाजशास्त्र २०) प्राचीन भारतीय संस्कृति, २१) भाषाशास्त्र.

विश्वविद्यालयांतर्फे उच्च शिक्षणासाठीं परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस सर्वतोपरी सहाय्य देण्यांत येते. १९५८-५९ या एका वर्षांत १७४ विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण संस्थांत प्रवेश मिळवून देण्यांत आला. त्यापैकीं ७१ विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप्स, फेलोशिप्स, प्रवास वगैरे सवलती देण्यांत आल्या.

मांजरी येथील शेतकी शिक्षण

पुण्यांपासून सुमारे ७ मैल अंतरावर पुणें सोलापूर रस्त्यावर मांजरी फार्म येथें १८९४ सालीं प्रथम ऊस संशोधन केंद्र सुरू झाले. त्यानंतर हें केंद्र पाडेगांव येथें १९३५ सालीं हलविण्यांत आलें. १९४१ सालापासून येथें ग्रामीण सहाय्य केंद्र, १९४४ सालापासून ॲग्रिकल्चर ट्रेनिंग सेंटर आणि १९४७ सालापासून दोन वर्षांचा शेतकी शाळेचा कोर्स मांजरी या ठिकाणीं सुरू झाला.

समाज विकास शिक्षण केंद्र २ ऑक्टोबर १९५२ रोजीं कोल्हापूर येथें सुरू झाले. तेथून दोन वर्षांत हें केंद्र मांजरी येथें १ ऑक्टोबर १९५४ सालीं हलविण्यांत येऊन शेतकी शाळा व विकास शिक्षण केंद्र या दोन्ही संस्था एकत्रित करण्यांत आल्या.

संस्थेच्या शाखा

समाज शिक्षण केंद्र व शेतकी शाळा या संस्थेच्या पुढीलप्रमाणें चार शाखा असून त्यांचें कार्य प्राचार्यांच्या देखरेखीखालीं चालते.

१) समाज विकास शिक्षण केंद्र.

२) सरकारी शेतकी शाळा.

३) ग्रामसेविका शिक्षण विभाग.

४) ग्रामीण कारागीर शिक्षण विभाग.

वरील चारहि शाखांमधून सध्यां निरनिराळ्या विषयांकरितां त्यांतील तज्ज्ञ व अनुभविक असे सुमारें २० अध्यापक काम करीत आहेत.

शैक्षणिक विभाग—संस्थेच्या वरील शाखेतील विद्यार्थी–विद्यार्थिनींना अभ्यासक्रमा-प्रमाणें सर्व शिक्षण मिळावे म्हणून तेथें पुढील विभाग ठेवण्यांत आले आहेत.

(१) **शेती फार्म**—या संस्थेच्या नियंत्रणाखालीं तीन ठिकाणीं मिळून सुमारें ४२६ एकर क्षेत्र आहे. बहुतेक सर्व शेतींची कामें विद्यार्थी व ग्रामसेवक यांच्यातर्फे करवून घेण्यांत येतात.

(२) **पिकें**—शेतावर प्रामुख्यानें ऊस, हळद, केळी, आले, सुरण, मिरची व भाजीपाला वगैरे बागाईत पिके घेतली जातात. निळवा, ज्वारी, बाजरी, भात, मका, गहूं, कापूस, भुईमूग, कडधान्यें हीं जिराईत पिकें घेतली जातात. शेतांतून येणारा धान्य, भाजीपाला वगैरे माल प्रथम विद्यार्थ्यांना विकला जातो.

(३) **कामाची जनावरे**—वरील शेतीवर एकूण ३२ कामाचे बैल आहेत. शिक्षणाच्या दृष्टीनें खिलार व डांगी जातीचे बैल ठेवले आहेत.

(४) **डेअरी**:—या विभागांत एकुण १२ दुभत्या म्हशी आहेत. शैक्षणिक दृष्ट्या पंढरपुरी, सुरती, दिल्ली या तीन प्रकारच्या म्हशी ठेवण्यांत आल्या आहेत.

(५) मेंढ्यांची पैदासः—या ठिकाणीं मटणाचे प्रमाण वाढविण्याच्या उद्देशानें संशोधनाकरितां मेंढ्या ठेवल्या आहेत. गांवठी जातीशीं निरनिराळ्या उत्कृष्ट जातीचा संकर करण्यांत येतो. त्यामुळें मेंढ्यांची मटण देण्याची कुवत वाढते. सध्या एकूण ८० मेंढ्या फार्मवर आहेत.

(६) कोंबडी-जोपासनाः—फार्मवर एकूण ६० पक्षी आहेत. शैक्षणिक दृष्ट्या व्हाईट लेगहॉर्न, ब्लॅक मिनोर्का, र्‍होड आयलंड रेड, ऑस्टॉलॉर्प व बर्ड प्लीमॉथ रॉक या पांच जातींचे पक्षी ठेवले आहेत.

(७) औतें, जनावरें:—फार्मवरील सर्व शेती स्थानिक व सुधारलेल्या अवजारांनीं केली जाते.

(८) वाचनालय व ग्रंथालयः—विद्यार्थ्यांसाठीं एक वाचनालय व ग्रंथालय आहे. ग्रंथालयांत वेगवेगळ्या विषयावर जवळ जवळ १२५० पुस्तकें असून व २५-३० नियतकालीकें येतात.

(९) वस्तुसंग्रहालयः—विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयाची ओळख चांगल्या रीतीनें व्हावी म्हणून एक चांगल्या प्रकारचे पदार्थ संग्रहालय आहे. यांत वेगवेगळ्या विषयांचीं मॉडेल्स, नमुने तक्ते, नकाशे ठेवण्यांत आले आहेत.

(१०) रेशमाच्या किड्यांची जोपासनाः—तुतीच्या झाडांवर वाढणाऱ्या रेशमांच्या किड्यांची जी जात असते, त्यांची पैदासहि या संस्थेंत केली जाते.

(११) मधमाशापालनः—अखिल भारतीय ग्रामोद्योग संस्थेतर्फें महाबळेश्वरला जे मधमाशांचे मुख्य केंद्र चालविण्यांत येतें त्याचें दुय्यम केंद्र या ठिकाणीं ठेवण्यांत आले आहे. या केंद्रावर २५-३० पेट्या ठेवण्यांत आल्या असून, त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या प्रात्याक्षिकांकरितां करण्यांत येतो.

शेतकी शाळाः—शेतकऱ्यांच्या मुलांना सुधारलेल्या पद्धतीच्या शेतीची माहिती मिळावी आणि त्यांनीं परत आपल्या शेतीवर जाऊन व ती सुधारून आपले राहणीमान वाढवावें या उद्देशानें ही शाळा १९४७ सालापासून सुरूं आहे.

समाज विकास शिक्षण केंद्र

या शिक्षण केंद्रांत ग्रामीण कार्यकर्ते तयार केले जातात व त्यानंतर त्यांची नेमणूक समाज गट अगर राष्ट्रीय विकास योजनांमध्ये ग्रामसेवक अगर सुपरवायझर म्हणून केली जाते. यांची निवड जिल्हा निवड बोर्ड करते. ग्रामसेवकांस प्रत्येकी दरमहा रु. २५ विद्यावेतन दिलें जातें. सुपरवायझरच्या कोर्सकरितां शेतकी खात्याचे डायरेक्टर शेतकी ऑफिसरांची निवड करून पाठवितात. त्यांना दरमहा रु. ४० विद्यावेतन दिलें जातें.

या शिक्षण केंद्रांत दोन प्रकारचें शिक्षण दिलें जातें.

(१) ग्रामसेवक शिक्षणक्रम (२) सुपरवायझरचा शिक्षणक्रम.

ग्रामसेविका शिक्षण विभाग

ग्रामसेविका तयार करण्याचे उद्देशानें ही योजना १ ऑगस्ट १९५६ पासून सुरूं झाली.

हा शिक्षणक्रम एक वर्षाचा असून दरवर्षी एकूण २० ग्रामसेविकांना प्रवेश दिला जातो. ज्या भगिनी २० ते ३५ वर्षांच्या आहेत व ज्यांचे कमीत कमी शिक्षण मातृभाषेंतून शेवटची परीक्षा पास एवढें आहे व ज्यांना खेड्यांतील जीवनाचा थोडाफार अनुभव आहे अशांची निवड केली जाते. त्यांना दरमहा रु. ५० विद्यावेतन देण्यांत येते. शिक्षण क्रमानंतर पांच वर्षे नोकरी करीन असा बाँड द्यावा लागतो.

ग्रामीण कारागीर शिक्षण विभाग

खेड्यांतील शेतकऱ्यांना लागणारीं औतें अवजारें दुरुस्त करणें अगर नवीन सुधारलेलीं लहान सहान औतें अवजारें तयार करून योग्य किंमतीला त्याच ठिकाणीं पुरवितां यावीत, या दृष्टीनें ही योजना ७ ऑगस्ट १९५६ पासून सुरू करण्यांत आली आहे.

खेड्यांतील सुतार, लोहार अगर त्यांच्या होतकरू मुलांची निवड या शिक्षणक्रमाकरितां केली जाते. एकूण २० कारागिरांना प्रवेश दिला जातो. शिक्षणक्रमाच्या मुदतीत त्यांना दरमहा रु. ३० विद्यावेतन मिळतें.

समाज कल्याण

हरिजन, गिरीजन, विमोचित जमाती, भटक्या जमाती आणि आर्थिक मागासलेल्या वर्गाच्या कल्याणाचे कार्य समाज कल्याण खात्यामार्फत पाहिलें जातें.

शैक्षणिक सवलती—मागास जमातींच्या सर्व विद्यार्थ्यांना नादारी, परिक्षेची फी आणि विशेष पात्रता असणाऱ्यांना शिष्यवृत्त्या खात्यामार्फत दिल्या जातात. १९५७–५८ मध्यें २५१ विद्यार्थ्यांना अशा शैक्षणिक सवलती देण्यांत आल्या तर गतवर्षीपासून ९००रु.च्या आंत उत्पन्न असलेल्या पालकांच्या सर्व विद्यार्थ्यांना फी सवलत देण्यांत आल्यानें फायदा मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तीन हजारापर्यंत गेली.

वसती गृहें—जेवणा राहण्याची चांगली सोय असल्याशिवाय विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष-केंद्रीत करतां येत नाहीं म्हणून मागास वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांना सरकारी विशेष सवलती दिल्या जातात. जिल्ह्यांत ३२ अशी सरकारी मदतीने चाललेली वसतीगृहें असून त्यामध्यें ८९८ विद्यार्थी राहतात. या वसतीगृहांना १ लाख तेरा हजार रु. वर रक्कम मदत म्हणून दिली जाते. सर्व हिंदू मुले असलेल्या संमिश्र वसतीगृहांना तर विशेष अनुदान देण्यांत येतें.

आर्थिक सहाय्य—स्वतंत्रपणें उपजीविका करण्यासाठीं छोटे उद्योगधंदे करणाऱ्या मागास वर्गाच्या लोकांना ७५ टक्के कर्ज (बिनव्याजी) आणि २५ टक्के मदत देण्यांत येते. या योजनेनुसार आतांपर्यंत ५८ लोकांना ६६०० रु. इतके आर्थिक सहाय्य देण्यांत आले आहे. दूध-दूभत्याचा धंदा करण्यासाठींहि अशी मदत दिली जाते.

घरांची दुरुस्ती करणें, पिण्याच्या पाण्यासाठीं विहीरी बांधणे, संस्कार केंद्रें, बाल वाड्या चालविणे या करिताहि मागास जमातीना सरकार विषेश सवलती देते.

फी सवलत—आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्यां मुलांना फी माफीची सवलत सरकारतर्फे दिली जाते. गतवर्षी ही सवलत ९०० रु. पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पुरतीच मर्यादित होती तर १९६०–६१ सालापासून उत्पन्नाची मर्यादा १२०० रु. पर्यंत वाढविण्यांत आली आहे. शिक्षण संस्थांना त्यांनीं या योजनेनुसार दिलेल्या फी माफी इतकी रक्कम अनुदान म्हणून देण्याचें कार्य समाज कल्याण कचेरीमार्फतच होतें.

अविकसित भागांसाठींहि समाज कल्याणाच्या अनेक योजना हातीं घेण्यांत आल्या असून त्यांत शेतीसाठीं अवजारें, बैलजोड्या, बैलगाड्या पुरविणें, दूधदुभत्यासाठीं जनावरें इ. चा समावेश आहे.

पुणें जिल्ह्यांत अनाथ, अपंग आणि तत्सम मुलांमुलींकरितां रिमांड होम्स, सर्टिफाईड स्कूल्स, इंडास्ट्रिअल स्कूल, फिटपर्सन इंस्टिटयूशन वगैरे संस्था असून या संस्थांतून मुलांना योग्य वळण लावणें, शाळेत धंदे शिक्षण देणें, शिस्त लावणें, इ. साठीं प्रयत्न केले जातात. पुणें जिल्ह्यांत तीन रिमांड होम्स, तीस फिटपर्सन इंस्टिटयूटस आणि सहा सर्टिफाईड स्कूल्स आहेत.

रिमांड होम्स

नांव	मुलांची संख्या	वार्षिक खर्च
१) मुलांचे रिमांड होम, ११६२–६ शिवाजीनगर पुणें–५	२४२	१,०६,४४३ रु. (१ व २ मिळून)
२) मुलींचे रिमांड होम, ४०२ नाना पेठ, पुणें–२.	१०८	
३) मुलांचे रिमांड होम, मारवाड पेठ, बारामती.	५३	१६,३५८ रु.

सर्टिफाईड स्कूलः—ज्युव्हेनाईल कोर्टानें मर्यादित काळासाठीं ताब्यांत दिलेल्या मुलेमुलीं या संस्थांतून ठेवण्यांत येतात. येरवडा इंडस्ट्रिअल स्कूल या जुन्या सरकारी सर्टिफाईड स्कूलमध्यें ४०० वर मुले ठेवण्यांत येतात व त्यांना सुतारकाम, शिवणकाम, लोहारकाम, चांभारकाम, वेतकाम, शेती, धोबी काम, सूतकाम, वगेरे धंद्याचे शिक्षण दिलें जाते.

सर्टिफाईड स्कूल्स	मुले	वार्षिक खर्च
१) येरवडा इंडस्ट्रिअल स्कूल, (सरकारी) पुणें ६	४००	२,६६,७८७
२) हिंदू वुईमेन्स रेस्क्यू होम, २९९ नारायण पेठ, पुणें २	१००	३१,००० रु.
३) हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणें ४.	१५०	४०,८२३ रु.
४) सेवासदन होम, सदाशिव पेठ, पुणें २.	१२	१३६६ रु.
५) सर्टिफाईड स्कूल फॉर गर्ल्स, शिरुर, (सरकारी)	१३०	५३,६०९ रु.
६) सर्टिफाईड स्कूल फॉर गर्ल्स, (सरकारी) मुंढवा	१००	१६,८६३ रु.

याशिवाय अनाथ, अपंगांसाठीं ३० सरकारमान्य संस्था जिल्ह्यांत असून त्यांत अंध, परित्यक्ता यांचीहि सर्व सोय केली जाते.

पुणें शहरांत महानगरपालिकेच्या सहकार्यानें बॉंबे बेगर्स ॲक्ट लागू करण्यासाठीं प्रयत्न चालू आहेत. या कायद्यानें भिक मागण्यास बंदी करण्यांत येऊन गुन्हेगारासाठीं स्वतंत्र वसाहत उघडण्यांत येईल.

भटक्या जमाती

बेलदार, डोंबारी, कैकाडी, घिसाडी, कोल्हाटी, नाथ, फासे–पारधी, भामटे, वडार, कंजारभाट, जोशी, वैदू, लमाण, टकारी आदि शंभर भटक्या जमातीच्या लोकांनी एके ठिकाणीं कायम वस्ती करून राहावे म्हणून त्यांना सरकारतर्फे सर्वतोपरी मदत करण्यासाठीं २१ डॉ. आंबेडकर रोड, पुणें १ येथें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार १९५६–५७ मध्यें एक कचेरी उघडण्यांत आली. या कचेरीच्या कार्यक्षेत्राखालीं पुण्याजवळपासचे १३ जिल्हे असून तिच्यामार्फत वर उल्लेखिलेल्या जमातीतील लोकांना धंद्यासाठीं कर्जे पुरविणें, धंदेशिक्षण देणें, पिण्याच्या पाण्यासाठीं विहीरी खोदायला आर्थिक मदत देणें, शेतीसाठीं जनावरे $\frac{3}{4}$ किंमतीत देणें वगैरे प्रकारची मदत केली जाते. १९५६–५७ पासून पुढीलप्रमाणें अशी मदत दिली गेली आहे.

	५६-५७ खर्च रु.	५७-५८ खर्च रु.	५८-५९ खर्च रु.	५९-६० खर्च रु.	६०-६१ मंजुरी रु.	किती लोकांना मदत दिली
पुरविलेली जनावरे	९९५	१०००	१८०००	५५५०	८०००	२१६
धंद्यासाठीं मदत	—	—	१०५०	२२५०	—	५६
ग्रामोद्योगासाठीं मदत	—	—	—	—	५०००	
पिण्याच्या पाण्याच्या विहिरी	—	—	१५००	४०००	४०००	२ विहिरी
शिवण वर्ग चालविणें व शिकलेल्यांना मोफत मशीन देणें. इ.	—	—	४३९६	५३९७	६०००	

भटक्या जमातीतील लमाण स्त्रियांचा शिवण वर्ग येरवडा येथें घेण्यांत येऊन शिवण शिकलेल्या स्त्रियांना प्रत्येकीं एक उषा मशीन व २५ रु. रोख देण्यांत आले. याशिवाय शिक्षण काळांत त्यांना ५ रु. महिना याप्रमाणें मानधन देण्यांत आले.

हडपसर नजिक भटक्या जमातीतील लोक मोठ्या प्रमाणांत राहात असलेल्या भागांत बालवाडी चालविण्यांत येत असून वाडीत येणाऱ्या मुलांना खाऊ, दूध व कपडे विनामूल्य देण्यांत येतात.

७. सार्वजनिक बांधकाम व दळणवळण

पुणें जिल्ह्यांत १६४५ मैल लांबीचे लहान मोठे रस्ते आहेत. यापैकीं ८४५ मैल लांबीचे पक्के रस्ते असून ७९४ मैलांचे कच्चे रस्ते आहेत. पक्क्या रस्त्यापैकीं ८१ मैल लांबीचे रस्ते कॉंक्रीटचे असून २३६ मैल लांबीचे रस्ते डांबरी आहेत. पुणें शहर शेंकडों वर्षें महाराष्ट्रांत सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक बाबतींत अग्रेसर राहिले आहे. महाराष्ट्राच्या सर्व भागांतील लोकांचे पुण्याशी अनेकविध कारणांनीं संबंध आले. व्यापार व्यवहाराच्या सोयीसाठीं रस्ते आवश्यक असतात. पुण्याचा संबंध इतर भागाशीं जोडणारे महत्वाचे रस्ते पुढीलप्रमाणें आहेत.

दळणवळण

१) पुणें–मुंबई रस्ता	डांबरी व कॉंक्रीटचा	११२ मैल
२) पुणें–सोलापूर रस्ता	डांबरी रस्ता	१५० मैल
३) पुणें–अहमदनगर रस्ता हा रस्ता लवकरच औरंगाबादला जोडण्यांत येत आहे.	कॉंक्रीट रस्ता	७४ मैल
४) पुणें–सातारा–कोल्हापूर बेंगलोर रस्ता	डांबरी रस्ता	५२५ मैल
५) पुणें–नाशिक रस्ता	डांबरी रस्ता	१२६ मैल

या सर्व रस्त्यांच्या दुरुस्तीचें काम पी. डब्ल्यू. डी. खात्यामार्फत केलें जातें.

वरील महत्वाच्या रस्त्यांशिवाय जिल्ह्यांत लहान–मोठ्या पक्क्या रस्त्यांचे जाळेंच पसरलेलें आहे. तालुक्याच्या गांवांना जोडणारे सर्व रस्ते पक्के आहेत. यापैकीं कांहीं रस्त्यांचे काम पी. डब्ल्यू. डी. आणि कांहीं रस्त्यांचे काम जिल्हा लोकल बोर्डामार्फत पाहिले जातें. समाज विकास योजनेंत आणि स्थानिक विकासाच्या कार्यक्रमानुसार गांवकऱ्यांनीं श्रमदानानें बांधलेल्या जोडरस्त्यांची लांबीहि शेकडो मैल भरेल.

जिल्ह्यांतील इतर रस्ते

१) पुणें ते पौड–मुळशी	२५ मैल दगडी पक्का रस्ता
२) पुणें ते पानशेत धरण	२५ मैल डांबरी रस्ता
३) पुणें ते इंदापूर (नीरा बारामती मार्गें)	९० मैल डांबरी व कॉंक्रीटचा करण्याचें काम चालू आहे.

४) नारायणगांव ते जुन्नर	१० मैल	डांबरी रस्ता
५) मंचर ते भिमाशंकर	३० मैल	पक्का दगडी रस्ता
६) मंचर ते शिरूर	३० मैल	पक्का दगडी रस्ता
७) खेड ते शिक्रापूर	२५ मैल	पक्का दगडी रस्ता
८) शिरूर ते केडगांव	२७ मैल	,, ,, ,,
९) केडगांव ते बारामती (सुपे मार्गे)	२५ मैल	,, ,, ,,
१०) पाटस ते दौंड	१० मैल	,, ,, ,,
११) करकंब ते दौंड	८ मैल	,, ,, ,,
१२) इंदापूर ते बावडा (पुढें अकलूज माळीनगर	१५ मैल	,, ,, ,,
१३) कुंभारगांव वालचंदनगर	२० मैल	,, ,, ,,
१४) किकवी ते भोर	९ मैल	,, ,, ,,
१५) नसरापूर ते वेल्हे	१० मैल	,, ,, ,,
१६) पुणें ते खडकवासला (पाषाणमार्गें) एन्. डी. ए.	१२ मैल	डांबरी रस्ता
१७) तळेगांव ते चाकण	१४ मैल	पक्का दगडी रस्ता
१८) पुणें-आळंदी चाकण	१८ मैल	,, ,, ,,

पुणें हें रेल्वेचे जंक्शन आहे. मुंबई-पुणे–सोलापूर–मद्रास–या सेंट्रल रेल्वेच्या ब्रॉडगेज रेल्वे मार्गावरील पुणें हे महत्वाचे स्टेशन आहे. तसेच दक्षिण रेल्वेचे पुणें हें अखेरचे स्टेशन असून हा रेल्वेमार्ग पुणें–मिरज बेळगांव–बंगलोर असा गेलेला आहे.

पुण्यापासून १० मैलावर लोहगांव येथें विमानतळ असून लष्करी आणि मुलकी विमानाची वाहतूक तेथून चालत असते.

खार्वजनिक बांधकाम

पुणें शहराची वाढ झपाट्यानें होत आहे. वाढत्या गरजेसाठीं शहरांत आणि जिल्ह्यांत तांतडीनें इमारती बांधून देण्याचे कार्य पुणें जिल्ह्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें हातीं घेऊन गेल्या ५–७ वर्षांच्या कालावधींत पुढील महत्वाचीं कामें पुरी केली आहेत.

सन १९५६–५७ मध्यें गव्हर्नमेंट फोटो · झिंकोग्राफिक छापखान्यांतील नवीन गुदामाचे काम व ग्रामोद्योगिक प्रात्यक्षिक वर्कशॉपमधील शोरूम व प्रयोग शाळा बांधण्यासाठीं रु. १,९०,६४६ खर्च करण्यांत आले.

सन १९५७–५८ मध्यें पुणें येथील ससून हॉस्पिटलच्या तयार झालेल्या अिमारती, पुणें शेतकी विद्यालयांतील अग्रानॉमी इमारत, पुणें सेंट्रल बिल्डिंग्ज् प्रांगणातील वायव्य बाजूकडील भागावरील दुमजल्याची इमारत, पुणें येथील ससून हॉस्पिटलच्या तृतीय श्रेणींच्या नोकरासाठीं चाळी, पुणें येथील शेतकी कॉलेज मधील नोकरांच्या चाळी, पुणें मध्यवर्ति डेअरीकरितां इमारत, पुणें डिस्ट्रिक्ट कोर्ट मधील प्रॉपर्टी शेडची इमारत, येरवडा तुरुंग पुणें मधील कर्मचारी यांचेसाठीं बांधलेल्या चाळी. इ. साठीं रु. २,०८,१४,५३७ खर्च करण्यांत आले.

सन १९५८–५९ मध्यें लोणी येथें दोन गाळ्यांची प्रत्येकी १२ क्लास रूमची शाळेची इमारत, पुणें इंजिनियरिंग कॉलेजमध्यें मेस्यालर्जी खात्याकडील इमारत, पुणें इंजिनियरिंग कॉलेज-मध्यें नवीन वसतीगृहाची इमारत, पुणें इंजिनियरिंग कॉलेजामध्यें पदव्युत्तर मॅटलर्जी विषयाच्या उच्चतर शाखेसाठीं इमारत, बी. जे. मेडिकल कॉलेज पुणें येथें विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाची इमारत, बी. जे. मेडिकल कॉलेज पुणें या इमारतीचे सुधारणाबाबत, सेंट्रल मेंटल हॉस्पिटल पुणें येथें अधिक रुग्णांच्या सोयीसाठीं इमारत (अदमासे १६० रुग्णांसाठीं), पुणें शेतकी कॉलेजांतील अध्यापक वर्गा-साठीं चाळी, मांजरी येथील शेतकी अवजार वर्कशॉपची वाढ करण्यासाठीं इमारत, मांजरी येथें गृहविज्ञानशास्त्र शाखेसाठीं इमारत, पुणें शेतकी विद्यालयांत सायकल स्टँडची इमारत, पुणें शेतकी विद्यालयांत वेत आणि फळें संग्रहासाठीं प्रयोग शाळा, पाषाण येथें मेंढ्यांच्या जोपासनेच्या केंद्राची इमारत, पुणें येथें औद्योगिक रसायन शाखेची इमारत, हरिजन विद्यार्थ्यांसाठीं पुणें येथील वसति-गृहाची इमारत, हरिजन विद्यार्थिनींसाठीं पुणें येथील वसतीगृहाची इमारत, कलेक्टर कचेरी पुणें या इमारतींत वाढ, मध्यवर्ती तुरुंग येरवडा पुणें येथें ७७ चाळींची इमारत, मध्यवर्ती तुरंग येरवडा या इमारतीत वाढ, शिवाजीनगर पुणें येथें ४८० पोलीसांच्या चाळीची इमारत, औंध (पुणें) येथील पोलीस मोटार ट्रॅन्स्पोर्टची इमारत, भवानी पेठ पुणें येथें ६० पोलीसांच्या चाळीची इमारत, स्वारगेट पुणें येथें ६ पोलीसांच्या चाळीची इमारत, पुणें कँटोनमेंट पोलीस स्टेशनची इमारत, स्वार गेट पुणें येथें २८८ पोलिसांच्या चाळीची इमारत, पुणें शहर येथें एक पोलिस इन्स्पेक्टर व आठ पोलिस फौजदार यांच्या वसतिस्थानाची इमारत, पुणें येथें एस. टी. विभागाकडील २ पोलिस इन्स्पेक्टर व ३ पोलिस फौजदार यांच्या वसतिस्थानाची इमारत, औध (पुणें) येथें १६ पोलिसांचे चाळीची इमारत, बी. जे. मेडिकल कॉलेज पुणें येथील परिचारिकांचे वसतिगृहाची इमारत, बी. जे. मेडिकल कॉलेज विद्यार्थिनींच्या वसतिगृहाची इमारत, पुणें सिव्हिलमॉर्टरी व कॉरीनेर कोर्ट इमारत, पुणें ग्रामीण औद्योगिक प्रायोगिक वर्कशॉप इमारत, गव्हर्नमेंट फोटो झिंको प्रेस पुणें या इमारतीची वाढ, सेंट्रल मेंटल हॉस्पिटल येरवडा येथील दोन निद्रागृह जोडण्यासाठीं इमारत. वगैरे ३४ इमारतीसाठीं रु. १,०८,९३,३९७ खर्च करण्यांत आले.

सन १९५९–६० मध्यें कार्ला येथील हॉलिडे कँपच्या वाढीसाठीं इमारत, महाबळेश्वर गव्हर्नमेंट हौस बिल्डिंग प्रांगणांतील इमारतीची सुधारणा, भांबुर्डा (पुणें) येथील पोलीस हेडक्वार्टर्सचे दवाखान्याची इमारत, पुणें येथील २४ पोलीस मोटारीसाठीं गॅरेज बांधणे, भांबुर्डा पुणें येथील पोलीस हेडक्वार्टर्स मधील हत्यारांची इमारत, पुणें येथील टेक्निकल हायस्कूलची इमारत, सिनियर एन्. सी. सी. विभाग, पुणें यांचेसाठीं इमारत भाग पूर्ण, छातीचे विकारासाठीं औंध (पुणें) येथील हॉस्पिटल बराकींची सुधारणा व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्याच्या चाळीची इमारत, सीरम व्हॅक्सीन संस्थेची पुणें येथें नवीन इमारत, खडकी (पुणें) येथें कुक्कट जोपासना केंद्रासाठीं स्टोअररूम इत्यादीसाठीं इमारत, आर. टी. ओ. पुणें यांचे ऑफिसचे इमारतींत सुधारणा, येरवडा तुरुंग (पुणें) छापखान्यांतील कागद ठेवण्यासाठीं बांधलेली इमारत, व्हायरस (पुणें) संशोधन केंद्राची इमारत इ. १३ इमारतीसाठीं रु. २७,०५,००० खर्च करण्यांत आले.

सन १९६०–६१ (सप्टेंबर १९६० पर्यंत) मध्यें लोणावळा येथें शेती संशोधनासाठीं कांच गृहाची इमारत, पुणें येथील मेंढ्यांच्या जोपासना केंद्रामधील इमारत, सिमेंट व पोलादासाठीं पुणें येथें गुदामाची इमारत. इ. ३ इमारतीसाठीं रु. २,५६,००० खर्च करण्यांत आले.

१०. सरकारी पॉलिटेक्निक बिल्डिंग, पुणें

ही अिमारत चतु:शृंगीच्या पायथ्याशीं गणेशखिंड रोडवर सरकारी प्लॉट नं. १०९ मध्यें बांधण्यांत येत आहे. एस्टिमेट प्रमाणें या अिमारतीस सर्वसाधारण रु. २२,४०,००० खर्च येणार आहे. या अिमारतीला सिव्हिल, मेकॅनिकल, अिलक्ट्रिकल वगैरे शास्त्रांचे सर्वसाधारण ३०० विद्यार्थी शिकू शकतील अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. या अिमारतीत मुख्यत: मेन बिल्डिंग, लॅबोरेटरी बिल्डिंग, वर्कशॉप ।बील्डिंग आणि कॅन्टिन अशा इमारती समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. या अिमारतीमुळें पुणें जिल्ह्याच्या व पर्यायानें महाराष्ट्राच्या तंत्रज्ञांत भर बरीच पडेल. ही बिल्डिंग जवळ जवळ पूर्ण होत आलेली आहे व पुढील वर्षोपासून तींत तंत्रज्ञ शिकूं शकतील.

२. नर्सेस कार्टर्स, पुणें

बी. जे. मेडिकल कॉलेजच्या कंपौंडमध्यें १२० नर्सेसची रहाण्याची सोय करावयाची ही योजना आहे. ही अिमारत तीन मजली असून तिचे भाग करण्यांत आलेले आहेत. पुढील भागांत सर्वसाधारण रहाण्याची व्यवस्था, ऑफिसच्या खोल्या, रीडिंम रूम, करमणूक गृह हे विभाग आहेत. बाकीच्या दोन भागांत रहाण्याची व्यवस्था, स्वयंपाकघर, जेवणाच्या खोल्या इ. ची व्यवस्था करण्यांत आली आहे. इमारतीचा खर्च रु. ६,९७,२७८ आहे. नोव्हेंबर १९५८ मध्यें या इमारतीच्या कामास सुरवात होऊन यावर्षी तें पूर्ण झाले आहे.

३. तिसऱ्या वर्गाच्या सरकारी नोकरांसाठीं राहण्याची व्यवस्था

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सरकारी तिसऱ्या व चवथ्या वर्गाच्या नोकरासाठीं घरें बांधण्यास रु. ३० लाख मंजूर करण्यांत आले. त्यांतील २ लाख तिसऱ्या वर्गाच्या नोकरांसाठीं व १० लाख चवथ्या वर्गाच्या नोकरांसाठीं थोड्या कमी जास्त फरकानें खर्च करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें क्विन्स रोड बंगला नं. १५ च्या कंपौंडमध्यें तिसऱ्या वर्गाच्या नोकरासाठीं इमारती बांधण्याची कामे सुरू झाली. कामाच्या व्यवस्थेसाठीं याचे ४ विभाग करण्यांत आले असून ते २३ ब्लॉक्समध्यें विभागण्यांत आले आहेत. या २३ ब्लॉक्समध्यें ९२ टेनामेंटस् आहेत. त्यांतील पहिल्या दोन विभागांतील ४८ टेनामेंटसचें काम पाणी पुरवठा व ड्रेनेज अरेजमेंटस् याशिवाय पूर्ण झालेले आहे. विभाग ३ मधील ब्लॉक्सपैकीं २० ब्लॉक्स पूर्ण झालेले असून बाकीचे काम चालू आहे.

४. चौथ्या वर्गाच्या सरकारी नोकरांसाठीं राहण्याची व्यवस्था

वर नमूद केल्याप्रमाणें सरकारी चवथ्या वर्गाच्या नोकरांसाठीं पुण्यांत पर्वतीजवळ व येरवड्याला या इमारती बांधण्याचें ठरलें आहे. पर्वतीला ३० टेनामेंटस् बांधावयाचे असून ते दोन ब्लॉक्समध्यें बसविले आहेत. १५ टेनामेंटस एका मजल्यावर याप्रमाणें ते बांधले जाणार आहेत. या इमारतीस साधारण ५,८४,००० रु. खर्च येणार आहे. वरीलप्रमाणें दुसरी योजना येरवडा येथें करावयाची ठरली आहे. येथें ७२ टेनामेंटस् बांधावयाचे असून ते दोन ब्लॉक्समध्यें विभागले आहेत. एका मजल्यावर १८ टेनामेंटस याप्रमाणें ते बांधण्यांत येतील. या इमारतीस ४,४७,५२३ रु. खर्च येणार आहे.

वरील दोन्ही योजनेमध्यें प्रत्येक बिऱ्हाडकरूस बसण्याउठण्याची खोली, स्वयंपाक घर व सर्वांमिळून एक व्हरांडा अशी व्यवस्था करण्यांत आली आहे व वरील दोन्हीहि कामें लवकरच सुरूं होणार आहेत.

५. पोलिसांसाठीं चाळी

स्वारगेटला २८८ पोलिसांसाठीं चाळी बांधण्याची ही योजना आहे. ७२ टेनामेंटस् एका ब्लॉकमध्यें याप्रमाणें ४ ब्लॉक्समध्यें हे टेनामेंटस बसविले आहेत. इमारत चार मजली असून प्रत्येक बिऱ्हाडकरूस स्वयंपाकघर बसण्याउठण्याची खोली व स्वतंत्र बाथरूम अशी सोय करण्यांत आली आहे. एस्टीमेटप्रमाणें त्या इमारतीस रु. १५,७१,१२० खर्च येणार आहे. या वर्षींच ह्या चाळींचें काम जवळजवळ पूर्ण झालें आहे.

६. वेल्हे ता. भोर येथें २४ पोलिसांसाठीं चाळ बांधण्याची योजना

वेल्हे येथें २४ पोलिसांसाठीं चाळ बांधण्याची ही योजना आहे. ही इमारत एक मजली असून हे २४ टेनामेन्टस् प्रत्येकी ८ याप्रमाणें ३ ब्लॉक्समध्यें बांधण्यांत येणार आहे. वरील प्रमाणेंच प्रत्येक बिऱ्हाडकरूची सोय केली आहे. या योजनेला अदमासे १,१०,३५२ रु. खर्च येणार असून ही योजना सर्वसाधारण १९६१ मध्यें सुरू होईल.

७. इंदापूर येथें ४७ पोलिसांसाठीं चाळ बांधण्याची योजना

सन १९६०–६१ मध्यें इंदापूर येथें ४७ पोलिसांसाठीं चाळ बांधण्याची ही योजना आहे. हे ४७ टेनामेन्टस् प्रत्येकी ८ याप्रमाणें ५ ब्लॉक्स व शेवटच्या ७ टेनामेंटचा एक ब्लॉक अशा सहा ब्लॉक्समध्यें बांधावयाची आहे. प्रत्येक बिऱ्हाडकरूची बसण्याउठण्याची खोली, स्वयंपाकघर, पुढील व्हरांडा व स्वतंत्र बाथरूम अशी वरीलप्रमाणें सोय करण्यांत आलेली आहे. या योजनेला अंदाजे रु. २,१४,७७९ खर्च येणार असून लवकरच कामास सुरवात होणार आहे.

८. दौंड येथें पोलिसांच्या राहाण्याची व्यवस्था करण्याची योजना

वरीलप्रमाणेंच दौंड येथें ३६ पोलिसांसाठीं चाळ बांधण्याची ही योजना आहे. हे ३६ टेनामेन्टस प्रत्येकी ९ टेनामेन्टस् याप्रमाणें ब्लॉक्समध्यें बांधावयाचें असून त्यास अंदाजे रुपये १,६९,२४७ खर्च येणार आहे. आंतील सर्व व्यवस्था वर नमूद केल्याप्रमाणेंच आहे. कामास लवकरच सुरवात होणार आहे.

९. पुण्यांतील भवानी पेठेंत ६० पोलिसांच्या रहाण्याची व्यवस्था करण्याची योजना

पुणें येथें ६० पोलीसासाठीं चाळ बांधावयाची ही योजना पूर्ण झाली आहे. ही तीन मजली इमारत असून त्यांत हे ६० टेनामेंटस् विभागले आहेत. एस्टीमेटप्रमाणें या इमारतीचा खर्च रु. ३,१६,५३८ होता. आंतील सोयी वरीलप्रमाणेंच आहेत. मागील वर्षींच ही इमारत पूर्ण झाली आहे.

१०. स्वारगेट पोलीस लाईनच्या कंपौंडमध्यें ६ पोलीस सब् इन्स्पेक्टर्सचे क्वार्टर्स बांधण्याची योजना

स्वारगेट पोलीस लाईनच्या कंपौंडमध्यें ६ पोलीस इन्स्पेक्टरासाठीं घरें बांधण्याची ही योजना पूर्ण झालेली आहे. या इमारतीचा अंदाजे खर्च रु. १,४२,९७२ असून प्रत्येक टेनामेन्ट-मध्यें झोपावयाची खोली उठण्याबसण्याची खोली, स्वयंपाकघर, व्हरांडा, बाथरुम, संडास यांची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. इमारत बांधून पूर्ण झाली आहे.

११. दौंडला दवाखाना बांधण्याची योजना

ही योजना रु. १,३१,३२० ची असून जवळ जवळ पूर्ण होत आलेली आहे. या इमारतीत सर्जन क्वार्टर्स, पुरुषांचा वॉर्ड, स्टाफसाठीं क्वार्टर्स, नोकरांसाठीं क्वार्टर्स, स्वच्छता करणाऱ्या लोकांसाठीं क्वार्टर्स, स्पेशल वॉर्ड अशा मुख्य इमारती आहेत.

१२. पुण्यांत २०८ पोलीसांसाठीं चाळी बांधण्याची योजना

पुणें शहरांत २०८ पोलीसासाठीं इमारत बांधण्याची योजना आहे. या योजनेसाठीं अंदाजे रु. १५,७१,९२० खर्च येणार असून हे क्वार्टर्स १६० व ४८ असे दोन ठिकाणीं विभागले आहेत. त्यांतील १६० क्वार्टर्स स्वारगेट पोलीस लाईन येथें असून बाकीचे राहिलेले ४८ क्वार्टर्स भवानी पेठ येथें बांधण्याचे ठरविले असून दोन्हीही कामास सुरवात झालेली आहे.

खडकवासला धरण

पुणें जिल्ह्याच्या पूर्वेकडील हवेली, दौंड, बारामती, इंदापूर या तालुक्यांत पाऊस पुरेसा तर पडत नाहींच पण तो अनियमित असतो. यामुळें वारंवार या भागातील पिके सुकतात आणि टंचाईची स्थिती सारखी भेडसावीत असते. यावर उपाय म्हणून १८७४–७५ सालीं खडकवासल्यास मुळा नदीवर धरण बांधण्यांत आले.

सध्याचे खडकवासला धरण

१) उंची १०२ फूट २) पाण्याचा सांठा ३०९१ दशलक्ष घनफूट

१) उजवा कालवा ७० मैल २) डावा कालवा १८ मैल.

या धरणामुळें डाव्या कालव्यावर २०० एकर व उजव्या कालव्यावर ४९८०० एकर जमिनीला पाणी देण्यांत येत असे. पुण्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढल्यानें पाणीपुरवठ्यासाठीं अधिकाधिक पाणी घेतले गेले आणि आज धरणाच्या पाण्यापैकीं $\frac{1}{3}$ पाणी यासाठीं वापरले जात आहे. अर्थात्च त्यामुळें भिजणारे क्षेत्र कमी झाले असून ते केवळ ५००० एकर एवढेच राहिले आहे.

खडकवासला धरणाची उपयुक्तता फारच मर्यादित असल्यानें व या धरणाच्या वरच्या बाजूस भरपूर पाऊस पडत असल्यानें मुठा नदीच्या अंबी आणि मोसी या दोन उपनद्यांवर पानशेत आणि वरसगांव येथें मातीचीं धरणें बांधून खडकवासला धरणाचा पाण्याचा सांठा वाढवावा आणि हें पाणी पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येस आणि दौंड इंदापूर बारामती या दुष्काळी तालुक्यास शेतीसाठीं द्यावें यासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस १० कोटी ५४ लाख रु. खर्चाची योजना तयार करण्यांत येऊन ती दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत करण्यांत आली.

जुने खडकवासला धरण व नवीन होणारी दोन धरणें यांचे स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.

	पानशेत धरण	वरसगांव धरण	सध्याचे खडकवासला धरण
१) धरणाचा प्रकार	मातीचे	मातीचे	सिमेंट, दगड, बांधकामाचे
२) लांबी	२४००'	२१८०'	४८२७'
३) उंची	१६८'	१७२'	१०२' ६"
४) धरणाची माथ्यावरील रुंदी	३०'	३०'	११.१६'

५) पाणलोटाचे क्षेत्र	४७ चौ.मैल	५१ चौ.मैल	१९९ चौ. मैल
६) पाण्याची धारण शक्ती द. ल. घनफूट	७५४३	७५५५	४०००
७) धरणाचे बांधकाम व मातीकाम द. ल. घनफूट	१२२.५१	१११.२३	१०.२५

कालवे

	नवीन योजनेनुसार	जुना कालवा
१) नवीन कालवा ० ते $\frac{६}{५}$ मैल	६१ लाख रु.	—
२) जुन्या कालव्यांची सुधारणा $\frac{६}{५}$ ते $\frac{६९}{२}$	१ कोटी ८५.७५ लाख रु.	—
३) नवीन वाढविलेला कालवा $\frac{६९}{२}$ ते $\frac{१०१}{२}$	१ कोटी ३२.५ लाख रु.	० ते $\frac{६९}{२}$ मैल २६ लाख रु.
४) नियंत्रणाखालील क्षेत्र	१,८१,०८० एकर	५०,००० एकर
५) बागायत करतां येण्याजोगे क्षेत्र	१,२३,२०० एकर	
६) बागायत होणारे क्षेत्र	७७,००० एकर	५००० एकर

पानशेत धरणाच्या कामास १९५६–५७ सालांत सुरवात झाली. आज त्या धरणाचें
काम $\frac{३}{४}$ हून अधिक पुरे झाले असन १९६१ च्या जून महिन्यांत ते पूर्ण होईल. या कामावर सरा-
सरी २००० मजूर आणि बरीचशी अवजड यंत्रे रात्रंदिवस काम करीत आहेत. वरसगांव धरणाचे
काम १९६१ नंतर हातीं घेण्यांत येऊन ते १९६७ साल अखेर पुरे होईल.

कालवा खोदण्याचें कामहि जारीनें हातीं घेण्यांत आले असून त्यासाठीं २ एक्झिक्युटिव्ह
इंजिनीयर नेमण्यांत आले आहेत. पहिल्या ७९ मैलांतच उजव्या कालव्यांचे कामावर सर्व लक्ष
केंद्रित करण्यांत आले असून हें काम १९६३ अखेर पुरे होईल असा अंदाज आहे. राहिलेल्या
१०१ मैलांपर्यंतचे काम १९६७ अखेर पुरे होईल.

खडकवासला धरणाची साडेदहा कोटी रुपयाची ही योजना पुरी झाल्यानंतर ७७०००
एकर जमिनीस पाणी मिळणार असून पुणें शहराच्या वाढत्या लोकसंख्येस (१० लाख) पुरेसे पाणी
देण्याची व्यवस्था होईल.

घोड धरण योजना

पुणें आणि नगर जिल्ह्यांतील दुष्काळी भागांस पाणी पुरवठा करण्याचे उद्देशानें १९५४
मध्यें ४.८५ कोटी रु. ची घोड धरण योजना मंजूर करण्यांत आली.

भिमाशंकर (आंबेगांव) येथें उगम पावणाऱ्या घोडनदीवर पुणें, नगर जिल्ह्यांच्या सर-
हद्दीवरील चिंचणी या गांवी मातीचे धरण बांधण्याची ही योजना जून १९५४ पासून सुरूं झाली.
योजनेचे तीन भाग करण्यांत आले असून ते पुढीलप्रमाणें आहेत. (१) मातीचे धरणाचा भराव
सांडे (वेस्ट वेअर) सुद्धां. (२) उजवा कालवा १५ मैल लांब. (३) डावा कालवा ५४ मैल
लांब.

धरण योजनाः—धरणाची लांबी ९८७० फूट.
धरणाची उंचीः —९३·४ फूट.
तलावाचे क्षेत्रः—८८०० एकर.
धरणाचे पाणलोट क्षेत्रः—१४०१ चौ. मैल.
नियंत्रण क्षेत्रः—९६४३० एकर (डावा कालवा).
(कमांडेड एरिआ):—३४५०० एकर (उजवा कालवा).
पाण्याखालीं भिजणारे क्षेत्रः—४४८०० एकर डावा कालवा.
,, १७६०० उजवा कालवा.
तलावाखालीं बुडालेली गांवेः —पांच.
तलावांतील पाण्याचा सांठाः—६०३१ दशलक्ष घनफूट.
कालव्यांची लांबीः— ५४ मैल डावा.
१५ मैल उजवा.
सांडेच्या बांधकामाची लांबीः—११३२ फूट.
सांडेच्या बांधकामावरील दरवाजेः—३०'×२०' आकाराचे तीस दरवाजे.

धरणाचे एकूण मातीकाम ३६.३७ दशलक्ष घनफूट झाले असून ते ऑगस्ट १९५७ मध्यें पुरें झाले आहे. अजस्त्र यंत्र सामुग्री वापरूनही दुष्काळानें गांजलेल्या या भागांतील सुमारें ४५०० लोकांना सहा वर्षें मजुरी काम पुरविण्यांत आले.

सांडेच्या जागेच्या १९·५० द. लक्ष घनफूट खोदाईपैकीं १७·४० घ. फू. काम झालें आहे.

उजवा कालवा एकूण १५ मैल लांबीचा होणार असून त्याची संपूर्ण मोजणी होऊन मंजुरी मिळालेली आहे. ऑगस्ट १९५८ पासून कालवा खोदण्याचें काम सुरूं झाले असून मार्च १९६१ अखेर ते पुरें होईल.

डाव्या कालव्याचे काम १९५४ पासूनच सुरूं करण्यांत आले असून मैल नं. १ ते ४० पर्यंत ते जवळ जवळ पूर्ण झाले आहे. राहिलेल्या १४ मैलांत कालव्याचें काम जारीनें सुरूं असून मार्च १९६१ अखेर ते पुरे होईल. भिजणाऱ्या क्षेत्रांतील मैल नं. १ ते १६ पर्यंत लहान पाटांचे काम जून १९५८ अखेर पुरे झाले असून १७ ते ३४ मैलापर्यंतच्या पाटांचें कांम १९६० अखेर पुरे झाले आहे.

या कालव्यांतून १९५८–५९ सालीं नगर जिल्ह्यांतील ५००० एकर क्षेत्रांस आणि १९५९–६० सालीं १५००० एकर क्षेत्रांस पाणी देण्यांत आलें. कालव्याचें पाणी वापरण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठीं सरकार पहिल्या वर्षीं विनामूल्य पाणी देतें आणि त्यानंतरच्या वर्षांत $\frac{1}{4}$, $\frac{1}{2}$, $\frac{3}{4}$ या प्रमाणें पाणीपट्टी आकारते. चौथ्या वर्षानंतर मात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पूर्ण पाणीपट्टी द्यावी लागते.

घोड धरण योजनेचा	मंजूर झालेला खर्च	झालेला खर्च
१) मातीचे धरण दगडी सांडी सुद्धां	२,०४,७०,१७३ रु.	१,५२,४३,००० रु.
२) उजवा कालवा	४५,२१,२८८ रु.	६,५३,००० रु.
३) डावा कालवा	२,३४,८९,८४१ रु.	२,०३,७३,००० रु.
	४,८४,८१,३०२ रु.	३,६२,६९,००० रु.

धरण पूर्ण झाल्यानंतर नगर जिल्ह्यांतील श्रीगोंदा, कर्जत आणि पुणें जिल्ह्यांतील शिरुर तालुक्यांतील दुष्काळी भागांतील शेतीस पुढीलप्रमाणें पाणी मिळेल.

पिकाचे नांव	उजवा कालवा	डावा कालवा	एकूण क्षेत्र
ऊंस	१२००	३६००	४८००
आडसाली	४००	१२००	१६००
दुहंगामी पिकें	४०००	१००००	१४०००
खरिप	७०००	१८०००	२५०००
रब्बी	५०००	१२०००	१७०००
	१७,६००	४४,८००	६२,४००

भाटघर धरण व वीर योजना

पुण्यापासून दक्षिणेकडे ३२ मैलावर भोर नजिक येलवंडी नदीवर जिल्ह्याच्या आग्नेये-कडील दुष्काळी भागास पाणी मिळावें म्हणून १९२७ सालीं भाटघरचें प्रसिद्ध धरण बांधण्यांत आले आहे. या धरणाच्या डाव्या कालव्याच्या नियंत्रणांत दुष्काळी भागांतील ३ लाख एकर क्षेत्र आहे. उजव्या कालव्याच्या भागांतही पाणी पुरवठ्याची आवश्यकता भासल्यामुळें भाटघर धरणाखालीं १७ मैलावर वीर येथें छोटेसे धरण १९२८ मध्यें बांधण्यांत आले. भाटघर धरणाचें पाणी नीरा नदीचे पात्रांतूनच १७ मैल वीर गांवांपर्यंत वाहात जाते. तेथें पाणी पुन्हां अडवून नदीचे दोन्ही बाजूस कालवे काढण्यांत आले असून त्याखालच्या भागास या कालव्याचे पाणी मिळते.

भाटघर धरण व त्याखालील वीर येथें बांधलेली सांड दगड, चुना व सिमेंटमध्यें बांधण्यांत आली असून धरण बांधण्याचें काम त्यावेळीं यांत्रिक सहाय्य अधिक प्रमाणांत उपलब्ध नसल्यानें १५ वर्षें चालले होतें. धरणासाठीं पांच मैलाच्या परिसरांतील दगडाचाच उपयोग करण्यांत आला चुनखडी मात्र दिवा, शिरवळ, नीरा, वीर, वगैरे भागांतून आणावी लागली.

भाटघर धरण :—

१) लांबी ५३३३ फूट.
२) उंची १६३ फूट.
३) धरणाची तळाशी रुंदी १२४ फूट.
४) धरणावरील रस्त्याची रुंदी १९ फूट.
५) पाण्याचा सांठा २४,१९८ दशलक्ष घनफूट.
६) पाणलोट क्षेत्र १२८ चौ. मैल.
७) डावा कालवा १०१ मैल भिजणारे क्षेत्र १,०३, ६८१ एकर.
८) उजवा कालवा १०५ मैल " ८३,९९८ एकर.
९) पाणीपट्टीचे उत्पन्न २२ लक्ष रुपये.
१०) योजनेचा एकूण खर्च ४,९१,१०,८६० रुपये.

शेटफळ तलाव

भाटघर धरणाच्या डाव्या कालव्याच्या टोकाला इंदापूर तालुक्यांत शेटफळ येथें छोटा तलाव दुष्काळी काम म्हणून बांधण्यांत आला आहे. त्यांत पावसाळ्यामध्यें कालव्याने पाणी सोडून

सांचविलें जातें व तें नंतर बागायतीसाठीं उपयोगांत आणलें जातें. शेटफळ तलावाची थोडक्यांत माहिती पुढीलप्रमाणें आहे.

१) उंची ६६ फूट
२) तलावाच्या भिंतीची लांबी १०,५३५ फूट
३) पाण्याचा साठा ६२० दशलक्ष घनफूट
४) व्यापलेले क्षेत्र २ चौ. मैल.
५) नियंत्रण क्षेत्र २५,०९८ एकर

वीर धरण योजना

भाटघर धरणामुळें भिजणाऱ्या क्षेत्रांतील शेतकऱ्यांना बागायत शेतीची उपयुक्तता पटल्यामुळें पाण्याची मागणी एकसारखी वाढत आहे. या वाढत्या मागणीची पूर्तता करता यावी म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत वीर धरण योजनेचा समावेश करण्यांत आला. वीर धरण योजनेनुसार भाटघर खाली १७ मैलावरील वीर येथें (पुण्याहून ४३ मैल) हल्ली ज्या ठिकाणाहून भाटघर धरणाचें पाणी कालव्यांत सोडलें जाते त्याचेनजिक नीरा नदीवर दगड व सीमेंट कॉन्क्रीट वापरून पक्की भिंत उभारण्यांत येत आहे. या धरणामुळें उजव्या कालव्यात अधिक पाणी सोडता येईल व त्यामुळें अंदाजे ६६००० एकर जमीनीस पाणी मिळेल. वरील क्षेत्रांत पंढरपूर तालुक्यांत बांधावयाच्या तिसंगी तलावामुळें भिजणाऱ्या क्षेत्राचाही समावेश आहे.

वीर धरणाची सर्व साधारण माहिती

१) दगड व सिमेंट कॉंक्रीटची भिंत	१०७९ फूट लांब.
२) डाव्या बाजूस करावयाचा मातीचा भराव	७००० फूट
३) उजव्या ,, ,, ,, ,,	३५०० फूट
४) पाणलोट क्षेत्र	६७८ चौ.मैल
५) धरणाची उंची	११८ फूट
६) धरणाची तळाशी रुंदी	९० फूट
७) धरणाची माथ्यावर रुंदी	२२ फूट
८) धरणाखाली जाणारी गांवें	१३
९) धरणास येणारा खर्च	५ कोटी ४१ लाख रु.

धरणाचें बांधकाम जून १९६१ अखेर पुरे होणार आहे. पाणी सोडण्याचे दरवाजे जून १९६२ पर्यंत बसविले जातील. उजव्या कालव्यातून जादा पाणी सोडावयाचे असल्याने तो कालवा रुंद करण्याचे काम ५० मैलापर्यंत पुरें झाले आहे व पुढील भागात काम चालू आहे.

वीर धरणाखाली २६ गांवांची सुमारे ९००० एकर जमीन जाणार आहे. आठ गांवे त्याखालीं संपूर्ण जाणार असून पांच गांवांचा बराच भाग पाण्याखालीं जाणार आहे. जमीनी अथवा घरे यांची भरपाई म्हणून १ कोट रु. सरकारला द्यावे लागणार आहेत. शक्यतो जमिनीचे बदल्यांत कॅनालखालीं येणारी नवीन जमीन देण्यांत येत आहे. पुणें–बंगलोर रस्त्यावरील नीरा नदीवरील हल्लीचा पूल पाण्याखाली जाणार असल्याने त्यानजिक १० लाख रु. खर्चून नवीन पूल बांधण्याचें काम हाती घेण्यांत आले आहे. सध्याचा महाड–पंढरपूर रस्ताहि ५ मैल धरणाच्या पाण्याखालीं जाणार असल्याने तो वळवून नवीन रस्ता करण्याचें काम चालू आहे.

इ. स. १९५० पूर्वी पुणें जिल्ह्यांत भाटघर धरण, खडकवासला धरण, राख तलाव आणि विहिरी यांतूनच बागायतीसाठीं जमिनींना पाणी मिळत असे. बागायतीखालीं त्यावेळीं दोन लाख एकरावर जमीन भिजत होती. पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत अधिक धान्योत्पादनाचे योजनांवर विशेष भर देण्यांत आला. त्यानुसार पाटबंधाऱ्याच्या योजनांना प्राधान्य देण्यांत आलें. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत जिल्ह्यांत मध्यम आणि छोट्या पाटबंधाऱ्याच्या योजनांवरच विशेष भर देण्यांत आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण झालेले तलाव आणि बंधाऱ्याची ३५ कामें पुढीलप्रमाणें आहेत. त्यामुळें ३५७३ एकर क्षेत्र बागायतीखालीं आले.

पाटबंधारे

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण झालेलीं कामें

१) लोणीकंद तालुके हवेली येथील बंधारा, २) कोंढवे तालुके हवेली येथील बंधारा, ३) चोराची आळंदी तालुके हवेली येथील बंधारा नं. १, ४) चोराची आळंदी ता. हवेली येथील बंधारा नं. २, ५) चोराची आळंदी ता. हवेली येथील बंधारा नं. ३, ६) चोराची आळंदी ता. हवेली येथील बंधारा नं. ४, ७) चोराची आळंदी ता. हवेली येथील बंधारा नं. ५, ८) आगळंबे ता हवेली येथील बंधारा, ९) सावरगांव ता. जुन्नर येथील बंधारा नं. १, १०) सावरगांव ता. जुन्नर येथील बंधारा नं. २, ११) पिंपरी पेंढार ता. जुन्नर येथील बंधारा नं. १, १२) पिंपरी पेंढार ता. जुन्नर येथील बंधारा नं. २, १३) अणे ता. जुन्नर येथील बंधारा नं. १, १४) अणे ता. जुन्नर येथील बंधारा नं. २, १५) निरगुडे ता. जुन्नर येथील बंधारा नं. १, १६) निरगुडे ता. जुन्नर येथील बंधारा नं. २, १७) खामगांव ता. जुन्नर येथील बंधारा, १८) कुसुर ता. जुन्नर येथील बंधारा, १९) येनेरी ता. जुन्नर येथील बंधारा, २०) चांबळी ता. जुन्नर येथील बंधारा, २१) केंजळ ता. पुरंधर येथील बंधारा, २२) भूगांव ता. मुळशी येथील बंधारा, २३) माळे ता. मुळशी येथील बंधारा, २४) बावधन ता. मुळशी येथील बंधारा, २५) घोडेगांव ता. आंबेगांव येथील बंधारा, २६) चास ता. आंबेगांव येथील बंधारा, २७) धानमतवाडी ता. आंबेगांव येथील बंधारा, २८) भावडी ता. आंबेगांव येथील बंधारा, २९) पेठ ता. आंबेगांव येथील बंधारा, ३०) कुणेवाडी ता. खेड येथील बंधारा, ३१) चास ता. खेड येथील बंधारा नं. १५, ३२) दौंडे ता. खेड येथील बंधारा नं. ३, ३३) निमगांव महाळुंगे ता. शिरूर येथील बंधारा, ३४) शिक्रापूर ता. शिरूर येथील बंधारा नं. ३, ३५) ढाकाळे ता. बारामती येथील पाझर तलाव.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत वीर आणि खडकवासला या योजनांशिवाय बारा छोट्या आणि मध्यम पाटबंधाऱ्यांच्या योजना हातीं घेण्यांत आल्या असून त्यापैकीं आठ पूर्ण करण्यांत आल्या. एकूण चार कामें चालू आहेत. पूर्ण झालेल्या योजनामुळें जिल्ह्यांत आणखी २७३५ एकर क्षेत्रासाठीं पाणी मिळाले. राहिलेल्या चार योजना पुऱ्या झाल्यानंतर ४५०० वर एकर क्षेत्रास पाणि मिळणार आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण झालेलीं कामें

१) कान्हाटी तालुका बारामती येथील बंधारा, २) लवळे ता. मुळशी येथील बंधारा, ३) आलमे ता. जुन्नर येथील बंधारा, ४) खांमगांव ता. दौंड येथील तलावास दुरुस्ती, ५) तरंगवाडी ता. इंदापूर येथील बंधारा, ६) पिसर्वे ता. पुरंधर येथील तलाव, ७) भांडगाव ता. दौंड येथील तलाव, ८) निमगांव भोगी ता. शिरूर येथील तलाव.


जुन्नरपासून ७ मैलांवर पुष्पावती नदीवर बांधलेल्या बंधाऱ्यामुळें ४००० वर एकर जमिनीस पाणी मिळूं लागलें आहे. हा बंधारा १९५८–५९ मध्येंच पुरा झाला आहे.

पुढील २, ३ वर्षांत घोड, वीर आणि खडकवासला धरणांचीं कामें पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यांतील बागायत क्षेत्रांत २ लाख एकरांचीं भर पडेल.

जिल्ह्यांत विहिरींची संख्या ४०,००० पर्यंत असून त्याखालीं १ लाख एकरावर क्षेत्रांत बागायती पिकें घेण्यांत येतात.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील चालू कामें

१) सायबाची वाडी ता. बारामती येथील पाझर तलाव, २) नारोळी तालुका बारामती येथील पाझर तलाव, ३) कान्हाटी ता. बारामती येथील पाझर तलाव, ४) नेरवड (पुष्पावती) ता. जुन्नर येथील बंधारा–दोन्ही कालव्यासह.


संदर्भः-
१) दवाखाना
२) प्राथमिक आरोग्य केंद्र
३) हेल्थ युनिट
४) इस्पितळे

८. आ रो ग्य व्य व स्था

सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय मदत (ग्रामीण विभाग)

सन १९५५ पूर्वी सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय मदत हीं कामें दोन वेगवेगळ्या खात्यामार्फत चालत असत. जिल्ह्यांत हीं कामें पुढील संस्थांमार्फत चालत.

सरकारी दवाखाने			
दवाखाने	एस. एम. पी. सेंटर्स (डॉक्टरांना आर्थिक मदत देऊन चालविलेले दवाखाने)	लोकलबोर्ड व नगरपालिकांचे दवाखाने	खाजगी दवाखाने
१ खंडाळा	१) राजूर (आतां येणेरे)	अ) म्यु. दवाखाने	तळेगांव
२ भोर	२) पिंपळवंडी	(सरकारी मदतीनें	(दाभाडे)
३ दौंड	३) आंबेगांव (पेठा)	१) जुन्नर	जनरल
	४) निरगुडसर	२) आळंदी	हॉस्पिटल
	५) वाडे	३) तळेगांव दाभाडे	
	६) शेळ पिंपळगांव	४) शिरूर	
	७) आंबेगांव (मावळ)	५) बारामती	
	८) टाकवे (बु॥)	६) इंदापूर	
	९) माण	७) सासवड	
	१०) मुठा खोरे	८) जेजुरी	
	११) वाघोली	ब) केवळ म्युनिसिपालिटीचे	
	१२) खडकवासला	१) लोणावळा	
	१३) कवठे	क) लोकल बोर्ड दवाखाने	
	१४) न्हावरे	(सरकारी मदतीनें)	
	१५) राहू	१) पौड	
	१६) पणदारे	२) घोडे	
	१७) लोणीभापकर	३) तळेगांव ढमढेरे	
	१८) कळस	४) खेड	
	१९) सणसर	केवळ लोकल बोर्डाचे	
	२०) गराडे	१) नारायणगांव	
	२१) माळशिरस	२) वेल्हे	

सरकारी दवाखाने			
दवाखाने	एस. एम्. पी. सेंटर्स (डॉक्टरांना आर्थिक मदत देऊन चालविलेले दवाखाने)	लोकलबोर्ड व नगरपालिकांचे दवाखाने	खाजगी दवाखाने
	२२) भोंगवली	३) कोळवण	
	२३) वाफगांव	४) हिरडोशी	
	२४) आडले (बु।।)	५) जोगवाडी	
		६) डिकसळ	
		७) बावडा	
		८) नसरापूर	
		९) वेल्हे	

वरील दवाखान्यांतून वैद्यकीय मदत देण्यांत येई आणि सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे नेमलेले देवी डॉक्टर, सॅनिटरी इन्स्पेक्टर आणि एपिडेमिक मेडीकल ऑफिसर हे रोगराई प्रतिबंधक उपाय योजना करीत असत.

वाढत्या लोकसंख्येस वरील सोयी अपुऱ्या पडू लागल्या म्हणून दोन्ही खात्यांची पुनर्रचना करून ग्रामीण भागापुरते ते एकत्र करण्यांत आले आणि १९५५ च्या मे पासून प्राथमिक आरोग्य केंद्राची योजना सुरू करण्यांत आली. प्रत्येक केंद्रासाठीं एक डॉक्टर, एक नर्स, एक मिडवाईफ, एक सॅनिटरी इन्स्पेक्टर, दोन पुरुष सेवक आणि एक दायी इतका नोकरवर्ग देण्यांत आला. जिल्ह्यांतील तीन सरकारी दवाखाने, २२ एस. एम्. पी.सेंटर्स व १३ लोकलबोर्डाचे दवाखाने अशा ३८ ठिकाणीं प्राथमिक आरोग्य केंद्रें सुरू झाली. प्रत्येक केंद्राच्या कार्यक्षेत्रांत सर्वसाधारणपणें २० ते ३० गांवे आणि २० ते २५ हजार लोकसंख्या होती.

रुग्णावर औषधोपचार करणें या सर्वसामान्य कामांबरोबरच गरोदर व बाळंत स्त्रीयांच्या आरोग्याची काळजी घेणें, बाळंतपणाच्या सोयी उपलब्ध करून देणें, बालसंगोपनाची माहिती देणें, कुटुंब नियोजनाचा प्रचार करणे, देवी टोचणें, साथीच्या रोगांस प्रतिबंधक लस टोचणें, पिण्याच्या पाण्याचे साठे स्वच्छ ठेवणें, स्वच्छतेच्या दृष्टीनें संडास मुत्र्यांची पाहणी करणें, दूध वांटप करणें आदि अनेकविध कामें प्राथमिक आरोग्य केंद्रें करू लागली.

जिल्ह्यासाठीं १९५५ मध्यें सुरू असलेली ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रें लोकसंख्येच्या गरजेच्या मानानें कमी पडू लागल्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १९५६–५७ मध्यें आणखी २७ प्राथमिक आरोग्य केंद्रें सुरू करण्यांत आलीं. हीं केंद्रें पुढील गांवीं उघडण्यांत आलीं.

जुन्नर तालुका...१) मढ २) उदापूर
आंबेगांव...३) महाळुंगे पडवळ
४) तळेघर ५) धामणी
खेड...६) पाईट ७) कार्ला
मावळ...८) वडगांव ९) आडले बु।।
भोर...१०) आंबवडे.

बारामती...११) शिर्सुफळ १२) होळ १३) मुरटी
दौंड...१४) यवत १५) वरवंड.
हवेली ..१६) खडकवासला १७) मोशी १८) देहू
१९) थेऊर २०) खेडशिवापूर २१) खानापूर २२) फुरसुंगी
इंदापूर...२३) पळसदेव २४) इंदापूर
पुरंदर...२५) पारिंचे २६) सासवड २७) जेजुरी.

वरील पैकीं सासवड, इंदापूर व जेजुरी येथील मूळच्या म्युनिसिपल दवाखान्यांचे रूपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रांत करण्यांत आले.

याशिवाय उरुळी कांचन (ता. हवेली) येथेहि नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यांत आले.

नवीन उघडलेल्या या केंद्रामुळें ग्रामीण भागातील लोकसंख्येस सुलभ वैद्यकीय मदत उपलब्ध झाली आहे.

शहरांतील दवाखान्यांत मिळणाऱ्या सर्व उपचार–सोयी खेड्यांतील या दवाखान्यांतून मिळा-ण्यात म्हणून भारत सरकारच्या मदतीनें आणि जागतिक आरोग्य संघटना आणि युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंड (युनिसेफ) यांच्या सहकार्यानें ज्या तालुक्यांत विकास गट सुरू झाला त्या तालुक्यांतील ६०००० वस्तीच्या विभागासाठीं एक प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याचे कक्षेत तीन किंवा चार उपकेंद्रें देण्यांत आलीं. या केंद्रावर एक एम्. बी. बी. एस्. डॉक्टर, एक नर्स किंवा एक हेल्थ व्हिजीटर, एक मिडवाईफ, एक कंपाऊंडर, एक सॅनिटरी इन्स्पेक्टर, तीन पुरुष सेवक व एक दायी असा नोकरवर्ग ठेवण्यांत आला असून युनिसेफ मार्फत एक जीप मोटारहि देण्यांत आली. या मोटारींतून वरील नोकरवर्गास गांवोगांव हिंडून तांतडीने वैद्यकीय व आरोग्यविषयक मदत पोहोचविणें शक्य झाले आहे. उपकेंद्रास ट्रेंड मिडवाईफ व अर्धवेळ सेवक असा नोकरवर्ग असतो व त्यांना गरोदर व बाळंत स्त्रीयांना मदत करणें, दूधवांटप करणें इ. प्राथमिक स्वरूपाचीं कामेंच करावयाची असतात.

सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना सर्वसाधारणपणें सालीना १०००रु. किंमतीची औषधें पुरविण्यांत येतात. याशिवाय फर्निचर व उपकरणेंही नियमित पुरविली जातात. युनिसेफ संस्थे-मार्फत नर्सेसना ए टाईप किट (ज्यामध्यें प्रसूतिसाठीं लागणारी उपकरणें असतात) पुरविलेली आहेत. आणि दूधाची भूकटीहि विनामूल्य पुर- आरोग्य विली जाते. मोठ्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा वार्षिक खर्च २५००० रु. पर्यंत असतो. तर लहान केंद्रांचा खर्च १२००० रु. पर्यंत असतो. हा सर्व खर्च महाराष्ट्र सरकार-तर्फे केला जातो. आणि त्यावर भारत सरकार आणि युनिसेफ संस्था यांचेकडून मदत मिळत असते.

वरील योजना १९५८–५९ सालापासून सुरू झाली असून आतापर्यंत पुढील ठिकाणी अशा मोठ्या स्वरूपाची आरोग्य केंद्रें उघडली आहेत.

तालुका	केंद्राचें नांव	उपकेंद्रें
हवेली	देहू	१) मोशी, २) वडगांव, ३) आडले बु.
	खडकवासला	१) खानापूर, २) खेड–शिवापूर, ३) फुरसुंगी, ४) उरुळी कांचन
पुरंदर	सासवड	१) परिंचे, २) गराडे, ३) माळशिरस
आंबेगांव	घोडे	१) आंबेगांव पेठा, २) महाळुंगे पडवळ ३) तळेघर.

पुढील ठिकाणीं लवकरच वरील स्वरूपांची केंद्रें काढण्यांत येणार आहेत.

तालुका	केंद्राचें नांव	उपकेंद्रें
आंबेगांव	धामणी	१) कवठे २) मुरवअी ३) पाबळ
शिरुर	घोडनदी	१) न्हावरे २) तळेगांव ढमढेरे ३) मांडवगण फराटा
खेड	वाडे	१) डेहणे २) चास ३) आवटे
	चाकण	१) कण्हेरसर २) शिवे ३) बहुल
भोर—वेल्हे	भोर	१) हिर्डोशा २) भोंगवली ३) नसरापूर ४) आंबवडे
बारामती	सुपे	१) पुर्टी २) होळ
जुन्नर	जुन्नर	१) मठ २) उदापूर ३) येणेरे
	नारायणगांव	१) वेल्हे २) पिंपळवंडी ३) सादरगांव

रॉकफेलर फाऊंडेशनच्या मदतीनें शिरूर (घोडनदी) येथें स्त्रिया व मुलें यांच्या आरोग्य संवर्धनासाठीं विशेष प्रयत्न केले जातात. परिचारिका, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स इ. च्या अभ्यासक्रमांतील प्रत्यक्ष कार्य करण्याचें शिक्षणहि येथील आरोग्य केंद्रामार्फत दिलें जातें.

कुटुंब नियोजन

देशाच्या विविध विकास योजनांचा लाभ पूर्णांशानें जनतेला मिळावयाचा असल्यास लोकसंख्या आटोक्यांत राहणें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत संततीनियमनाचा प्रचार करण्यांत येतोच. पण याशिवाय पुढील ठिकाणीं संतति नियमन केंद्रें सुरूं करण्यांत आली आहेत.

सरकारी केंद्रें

ता. हवेली : १) खडकवासला २) देहू
ता. इंदापूर : १) डिकसळ २) इंदापूर
ता. दौंड : १) दौंड

इतर संस्थातर्फे

१) मंचर हेल्थ युनिट
२) तळेगांव दाभाडे जनरल हॉस्पिटल
३) पिंप्री पेनिसिलीन फॅक्टरी

पौड, धामणी व सासवड येथें नवीन केंद्रें लवकरच सुरूं करण्यांत येतील.

सासवड, बारामती, इंदापूर, शिरूर, भोर वगैरे महत्वाच्या ठिकाणीं संतती नियमनासाठीं शस्त्रक्रिया शिबिरें नुकतीच घेण्यांत येऊन ७०० वर पुरुषांवर शस्त्रक्रिया करण्यांत आल्या.

मलेरिया निर्मूलन

जिल्ह्यांत जुन्नर, आंबेगांव, भोर, मुळशी आणि वेल्हे महाल या भागांत तसेंच मुठा आणि नीरा कॅनॉल भागांत आणि पुणें शहरांत मलेरियाचा प्रादुर्भाव विशेष असे. सरकारनें १९४४ सालीं पुणें शहरांत, १९४८ सालीं हवेली व मुळशी तालुक्यांत आणि १९५३ पासून सर्वत्र मलेरिया विरोधी मोहीम हातीं घेतली. १९५८ मध्यें राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन कार्यक्रमानुसार मलेरिया संपूर्णपणें आटोक्यांत आणण्याचें कार्य हातीं घेण्यांत आलें आहे. १९५१ पासून शहरांत घरोघर डी. डी. टी. फवारण्यांत येत आहे. १९५५ पासन त्यामध्यें सुधारणा करण्यांत आली. शहरांतील १४ सार्वजनिक दवाखान्यांत १९४४ सालीं १८६४३ मलेरिया केसेस आल्या. १९५५ सालीं हा आंकडा २१८ होता तर १९५९ मध्यें तो फक्त ५ वर आला आहे. जिल्ह्यांतील १० सार्वजनिक दवाखान्यांत १९५०

सालीं १८०२६ मलेरियाचे रोगी आले तर १९५९ मध्यें रोग्यांची ही संख्या १४१५ आहे.

मलेरिया निर्मूलन कार्यक्रमानुसार जिल्ह्यांतील प्रत्येक घरांत वर्षांतून दोन वेळां डी. डी. टी. चे फवारे मारण्यांत येतात. नदी किंवा कॅनॉलच्या कडेला असलेल्या खेड्यांतून तर प्रसंगी तीन वेळां असे फवारे मारण्यांत येतात. १९६० ते ६४ च्या दरम्यान घराघरांतून मलेरिया विभागाचे अधिकारी दर पंधरा दिवसांनीं जाऊन रोगाचा प्रादुर्भाव होऊं नये म्हणून दक्षता घेणार आहेत.

जनतेनें मलेरिया निर्मूलन मोहिमेस मदत करण्यासाठीं आपापल्या घरांच्या कोपऱ्यांत देखील डी. डी. टी. फवारे मारून घ्यावेत व त्यानंतर तीन महिने पर्यंत भींतीस रंग सफेती अगर सारवण करूं नये. मलेरिया झालेल्या रोग्याची (हिवताप) माहिती त्वरित नजिकच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांस द्यावी.

बी. सी. जी.

क्षयरोग प्रतिबंधासाठीं बी. सी. जी. लस टोचण्याची मोहिम ऑगस्ट १९५४ पासून हातीं घेण्यांत आली. १९५५-५६ मध्यें ७,६७,६०१ ची तपासणी करण्यांत येऊन २,३४,४४५ लोकांना बी. सी. जी. लस टोचण्यांत आली.

पुणें शहरांत रेल्वे स्टेशनजवळ ससून हॉस्पिटल या सरकारी दवाखान्याची एक आधुनिक भव्य इमारत व एक जुनी इमारत असून त्यांत रुग्णांकरितां ६२० खाटांची सोय करण्यांत आली आहे; त्यापैकीं २० रुग्णांकरितां आयुर्वेदिक विभाग आहे. वाढत्या मान्यतेमुळें त्यांत दररोज ९०० पर्यंत रुग्ण अंतर्गत उपचारासाठीं येतात. **ससून हॉस्पिटल** शिवाय बाहेर राहून (आऊट डोअर) औषध घेणाऱ्यांकरितां एक स्वतंत्र विभाग असून याचा फायदा दररोज १००० रुग्ण घेतात. या दवाखान्यांत पॅथॉलॉजी, बी. एम. आर; ए.पी.पी.पी; रेडिओलॉजी, डीप एक्स–रे, डायर्थीम, मासेज, ब्लड ट्रान्सफ्युजन, अॅनास्थेशिया, कारर्डिऑलॉजी, अॅन्टिनॅटल, कुटुंब नियोजन, दोन अॅम्बुलन्स इत्यादि सोयी आहेत. या शिवाय रुग्णांच्या मदतीसाठीं मेडिको स्पेशल वर्कर नेमण्यांत आला आहे.

या दवाखान्यांत कामाकरितां नियमित तज्ज्ञ डॉक्टर वर्गाशिवाय सन्माननीय डॉक्टर वर्ग आहे. हा दवाखाना पुणें येथील बी. जे. मेडिकल कॉलेजला जोडण्यांत आला असून या दवाखान्यांत काम करणारे तज्ज्ञ या कॉलेजमध्यें शिकविण्याचेंहि काम करतात. दवाखाना व कॉलेज यांची व्यवस्था पाहाण्याकरितां व त्यांच्यांत एकसूत्रीपणा आणण्याकरितां डीन या अधिकारपदाची जागा निर्माण करण्यांत आली असून हे अधिकारी त्या दृष्टीनें आपले काम पहातात.

दवाखान्यांत ६ ऑपरेशन थिएटर्स असून त्यांतील ४ नव्या इमारतींत व २ जुन्या इमारतींत आहेत. बाहेरून औषध घेणाऱ्या रुग्णांकरिता सकाळीं ८–३० ते १२–३० ची वेळ ठेवण्यांत आली असून तांतडीच्या केसेस उपचारासाठीं केव्हांहि घेतल्या जातात. रेसिडेंट मेडिकल स्टाफ करितां व नर्सिंग स्टाफ करितांहि दवाखान्याजवळ रहाण्याची सोय करण्यांत आली असून ज्यांची उपस्थिती अत्यंत आवश्यक असते अशांच्या करितांहि राहण्याची सोय करण्यांत आली आहे. दवाखान्यांत भरपूर व उत्कृष्ट व्यवस्था आहे; या शिवाय नर्सिंगचें शिक्षण देण्याचीहि व्यवस्था या दवाखान्यात करण्यांत आली असून त्यांत स्त्री उमेदवारांना शिक्षण दिलें जातें आणि त्यांच्या रहाण्याची व जेवण्याचीहि सोय करण्यांत आली आहे. सदरचा शिक्षणक्रम ३ वर्षांचा असून त्यांत एकूण २२५ उमेदवार एकावेळी शिक्षण घेत असतात.

ससून हॉस्पिटल शिवाय जिल्ह्यांत आणखी दहा इस्पीतळें आहेत. संसर्गजन्य रोगांचे डॉ. नायडू हॉस्पिटल, छातीच्या उपचारांचे औंध हॉस्पिटल, आयुर्वेद पद्धतीचे शेठ ताराचंद रामनाथ हॉस्पिटल, स्त्रीयांसाठीं किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल, तळेगांव दाभाडे जनरल हॉस्पिटल हीं महत्वाचीं होत.

या दवाखान्यांत १९५७ पासून उपचार करण्यांत आलेल्या रुग्णांची संख्या खालील प्रमाणें आहे:—

वर्ष	आंतील रोगी (इनडोअर)	बाहेरील रोगी (आऊट डोअर)
१९५७	२५,५८९	१८,०३,५७
१९५८	२५,६९७	११,२२,४४
१९५९	२७,८४७	१४,२९,८९

बी. जे. मेडिकल कॉलेज व वसतिगृह

बी. जे. मेडिकल कॉलेज ससून हॉस्पिटलच्या अिमारती मध्यें १९४६ सालापासून सुरूं झाले असून त्यांत आज ४६६ मुले व १९७ मुली मिळून ६६३ विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. त्यांत एस्. बी. बी. एस्. व एम्. डी., एस्. एस्. चे शिक्षणक्रम असून जिमखाना, खेळण्याचे मैदान, वाचनालय व उपहार गृह वगैरे सोयी आहेत. तसेंच या कॉलेज मधील मुलांकरितां व मुलींकरितां स्वतंत्र वसतिगृहें आहेत.

महारोगावर औषधोपचार करणारीं जीं कांहीं प्रमुख रुग्णालयें भारतात आहेत त्यापैकीं पुण्यापासून ६–७ मैल अंतरावर असलेलें कोंढवा कुष्ठ रुग्णालय हें एक आहे.

कोंढवा कुष्ठ रुग्णालय

कांहीं भूतदयावादी स्कॉटिश खिश्चन मिशनऱ्यांनीं १९१० मध्यें कोंढवा येथें हें हॉस्पिटल सुरू केलें. परराष्ट्र मिशनतर्फे मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर या रुग्णालयाचा संसार चालू होता. पुढें पुढें ही मदत अपुरी पडूं लागल्यामुळें विस्कळीतपणा येऊं लागला. म्हणून सरकारनें १९४२ मध्यें सदरहू संस्था मिशनऱ्यांकडून विकत घेऊन त्याची व्यवस्था पुण्याचे सिव्हिल सर्जन यांचेवर सोपवली. पुढें डॉ. एन्. जे. बंडोरवाला यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें जिल्हा कुष्टरोग समिती स्थापन झाली आणि मे १९५६ पासून या हॉस्पिटलची व्यवस्था या समितीकडे आहे. संस्थेला सरकारकडून प्रतिवर्षी एक लाख रुपयांची ग्रँट मिळते आणि त्यांतून या हॉस्पिटलचे कामकाज चालते.

आज या कोंढवा कुष्टरोग रुग्णालयाचे आंवती भोंवतीचें वातावरण हॉस्पिटलला साजेसेच आहे. संस्थेच्या लहानमोठ्या अशा एकूण सुमारें वीस इमारती ३५ एकर जमिनीच्या क्षेत्रासह आहेत. या रुग्णालयांत औषधोपचारासाठीं सुमारे ३०० रोग्यांना दाखल करून घेण्यांत आले आहे. २०० पेक्षां अधिक असणाऱ्या प्रत्येक रोग्यामागें या संस्थेला दरमहा दहा रुपये अधिक मदत मिळते. सरकारनें या रुग्णालयासाठीं एकूण शंभर एकर जमीन देण्याचें ठरविलें आहे. औषधोपचारासाठीं जरूर तीं औषधेहि सरकारकडून दिली जातात. पुण्या–मुंबईची कांहीं प्रमुख डॉक्टर मंडळी या हॉस्पिटलला वेळोवेळीं भेटी देऊन रोग्यांवर उपचार करतात.

कुष्ठरोगाला महारोग असेहि म्हणतात कारण हा फार पूर्वीपासून असाध्य म्हणून ओळखला जातो. महारोग्याच्या झडलेल्या अवयवामुळें त्याचा दिसणारा भेसूर देह, रोग सांसर्गजन्य असल्यानें दुसऱ्याला होण्याची भीति आणि तो पुन्हां बरा होणार नाहीं यांमुळें हा रोग झालेल्या माणसांची स्थिती अगदीं शोचनीय होते अशा लोकांना आसरा देणारी ही संस्था आहे.

महारोगावर सल्फोन आणि डी. डी. एस्. टॅबलेट्स् हीं औषधें आहेतच पण या कोंढवा रुग्णालयानें याहि पुढची मजल मारली आहे. आणि ती म्हणजे प्लॅस्टिकसर्जरीचा विभाग या हॉस्पिटलमध्यें १९५८ पासून सुरूं झाला आहे. रोगामुळें विद्रुप झालेल्या भागाचें ऑपरेशनकरून त्या ठिकाणीं प्लॅस्टिकचे कृत्रिम अवयव अत्यंत व्यवस्थितपणें बसविण्यांत येथें यश मिळालें आहे. दोनवर्षांत या रुग्णालयांत अशीं सुमारें २०० ऑपरेशन्स झालीं आहेत.

" स्वावलंबन " हें या संस्थेचें ध्येय आहे. हॉस्पिटलच्या खर्चांत कांहीं प्रमाणांत बचत व्हावी आणि या ठिकाणचे रोगी चांगले बरे होऊन बाहेर पडल्यावर त्यांना स्वतःच्या पायावर उभे रहातां यावें म्हणून या रुग्णालयांत शिवण काम, विणकाम, सुतारकाम, लोहारकाम, शेती, साबण, फिनाईल व पोल्ट्रीफार्म आदि विविध विभाग सुरूं करण्यांत आले आहेत. या विभागांतून शिक्षण देणारे व घेणारे दोघेहि रोगीच आहेत; बहुतेक सर्व कामें रोगीच करत असतात. हॉस्पिटलला लागणाऱ्या ३०० खाटा, १६० साईडस्टॅंडस्, कापड, फर्निचर वगैरे सामान याच ठिकाणीं तयार झालेलें आहे. २० एकर जमीनींतून २ महिने पुरेल येवढें ज्वारी, बाजरी, गहूं, हरभरा, मका आदि धान्य आणि ४ महिने पुरेल येवढा भाजीपाला निघतो. पूर्वी जमिनीवर पोते टाकून झोपणारा रोगी आज तेथीलच रुग्ण लोहारानें तयार केलेल्या लोखंडी कॉटवर, तेथीलच रुग्णांनीं तयार केलेल्या सतरंजी, चादरी वापरून आराम मिळवतो.

रोजच्या वापराला लागणारें पाणी पुणें महापालिकेनें ३ मैल लांबीचा एक नळ टाकून पुरविले आहे. रुग्णालयाच्या आवारांत दोन विहिरी आहेत. तीवर पंप बसविण्यांत आलेला असून त्याचा उपयोग बाग आणि शेतीकडे करण्यांत येतो. एक खास जनरेटर बसवून वीजेची सोय करण्यांत आली आहे.

रोग्यांची करमणूक व्हावी म्हणून अनेक सांस्कृतिक कार्यक्रम योजले जातात. ग्रामोफोन, रेडिओ, बॉयस्काऊट बँड, नाट्य मंडळ, वाचनालय आदि गोष्टी आहेत. यामुळेंच रोग्यांचें मनरंजन होऊन त्यांचे ज्ञानांत भरहि पडते. रोगी मुलांचेसाठीं प्राथमिक शाळा आणि प्रौढांचेसाठीं साक्षरता वर्ग चालू आहेत. सणासुदीला या रोग्यांना मिष्टान्न दिलें जातें.

सेंट्रल मेंटल हॉस्पिटल, येरवडा

मानसिक विकृतीवर औषधोपचार करणारे महाराष्ट्र राज्यांतील सर्वांत मोठें मेंटल हॉस्पिटल म्हणून पुण्याजवळील येरवडा सेंट्रल मेंटल हॉस्टिपलचा उल्लेख केला जातो. पुणें रेल्वे स्टेशनपासून अवघ्या चार मैल अंतरावर हें हॉस्पिटल असून तेथें जाण्यायेण्याकरितां सोयीचें व्हावें या दृष्टीनें पुणें रेल्वे स्टेशनवरून या हॉस्पिटलकडे दररोज सकाळीं सव्वा सहा वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत बस सर्व्हिस सुरूं आहे. या हॉस्पिटलचें कामकाज १९१५ सालापासून सुरूं असून त्यामध्यें ८२९ पुरुष आणि ४६८ स्त्री मिळून १२९७ रोग्यांची औषधोपचार करण्याची व्यवस्था आहे. पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाच्या रोग्यांसाठीं दररोज अनुक्रमे १२ रुपये आणि ८ रुपये घेऊन खास व्यवस्था करण्यांत आली आहे.

रोग्यांची आवड निवड लक्षांत घेऊन, व्यवसाय चिकित्सा विभागाद्वारें रोग्यांचेसाठीं खास व्यवसाय शिकविले जातात; त्यामध्यें विणकाम, सुतारकाम, शिवणकाम,. बागकाम, आदींची सोय आहे. प्रत्येक व्यवसायांतील तज्ज्ञ माणसाच्या देखरेखीखालीं रोगी आपापलें काम करण्यांत गढून गेलेले असतात. स्त्रियांचेसाठीं स्वयंपाक आणि विड्या वळणें इत्यादि व्यवसाय ठेवले आहेत.

हॉस्पिटलच्या आवारांत रोग्यांचेसाठीं खास करमणुक केंद्र उघडण्यांत आलें आहे. त्यामध्यें स्त्री–पुरुषांसाठीं वेगवेगळे विभाग असून रोगी कॅरम, पत्ते, बिलीअर्ड, बुद्धिबळ आदि बैठे खेळ खेळतात; रेडिओचे कार्यक्रम ऐकतात; वर्तमानपत्रें, पुस्तकें, मासिकें आदींचें वाचन करून वेळ आनंदांत घालवितात. देशी खेळाबरोबरच व्हॉलीबॉल, क्रिकेट आदि खेळ खेळण्याची व्यवस्था आहे. रोग्यांना आठवड्यांतून एकदां इंडियन न्यूज रिव्ह्यु फिल्म्स दाखवून करमणुकीसाठीं महिन्यांतून एकदां सिनेमाचा कार्यक्रम आयोजित करण्यांत येतो. रोग्यांसाठीं खेळांच्या वार्षिक स्पर्धा घेऊन उत्तेजन दिलें जातें.

छातीच्या रोगांवरील उपचार केंद्र, औंध हॉस्पिटल, पुणें

या रुग्णालयांत ३८० खाटांची व्यवस्था असून क्षयरोगाशिवाय छातीच्या इतरहि सर्व रोग्यांना या रुग्णालयांत प्रवेश देण्यांत येतो. या रुग्णालयांत फुप्फुसे आणि हृदयावरील सर्व अद्यावत शस्त्रक्रियेसाठीं अत्यंत आवश्यक असलेल्या रक्तपेढीची (Blood–Bank) सोय करण्यांत आली आहे. तसेंच व्यवसाय चिकित्सेचा (Occupational Theorapy) एक स्वतंत्र विभाग सुरूं करण्यांत आला आहे.

हृदयाच्या विशेष " क्ष " किरण परीक्षेसाठीं एक अद्यावत् नव्या 'क्ष' किरण यंत्राची (Cardiac Catherisation unit) स्थापना करण्यांत येत आहे. रुग्णालयासाठीं आणखी एक ३५० खाटांच्या नवीन इमारतीची योजना हातीं घेण्यांत आली आहे.

९. स्थानिक स्वराज्य संस्था व इतर विविध

जिल्हा लोकल बोर्ड

या बोर्डांत एकूण ६० सभासद प्रतिनिधी असून त्यांच्या निवडणूका दर पांच वर्षांनीं होत असतात. पुणें जिल्हा लोकल बोर्डाचें बजेट सर्वसाधरणपणें ३५ लाख रु. चें असतें आणि त्यांतून रस्ते, शाळा, धर्मशाळा, विहिरी, दवाखाने, छोटे पाटबंधारे, अशी अनेक सार्वजनिक कामे केली जातात. पुणें जिल्ह्यांतील ९६६·५ मैलांचे रस्ते बोर्डाकडे असून त्यापैकीं २३२. १२१/२ मैलांचे पक्के आणिं ७३४. ३७१/२ मैलांचे कच्चे रस्ते आहेत. गेल्या चार वर्षांत ७·४ मैल लांबीच्या सात जोड रस्त्यांची कामे पुरी करण्यांत येऊन त्यावर १,३१,०४८ रु. खर्च झाला. १३.६ मैल लांबीचे १२ रस्ते या काळांत दुरुस्त करण्यांत आले.

एस. टी. फंडांतून बोर्डास दरसाल ६२००० रु. ग्रँट मिळते. त्याशिवाय पी. डब्ल्यू. डी. कडून ९० मैल लांबीचे रस्ते दुरुस्त ठेवण्यासाठीं एक लाख रु. पर्यंत रक्कम सालीना मिळते. या रकमेमधून बोर्डानें पुढील रस्त्यांची कामे अलिकडे केलेलीं आहेत.

१) जेजुरी–बारामती–मोरगांव रस्ता.
२) खेड–वाडा रस्ता.
३) मंचर–शिंगवे–पारगांव रस्ता.
४) बारामती पाटस रस्ता.
५) खेड–शिरूर रस्ता.
६) चाकण शिक्रापूर रस्ता.

गेल्या चार वर्षांत बोर्डानें २९ मैल लांबीचे खडीचे आणि ३६ मैल लांबीचे मुरमाचे नवे रस्ते तयार केले आहेत. त्यासाठीं सहा लाख रु. पर्यंत खर्च करण्यांत आला.

बोर्डाला पाणीपट्टीच्या करावर लोकल फंड सेस मिळतो. हवेली, दौंड, बारामती व इंदापूर या तालुक्यांतून मिळणाऱ्या या उत्पन्नापैकीं २/३ रक्कम त्या भागांतील रस्त्यावर खर्च करावी लागते. गेल्या चार वर्षांत १५ रस्त्यांची कामे करण्यांत येऊन त्यावर ३१/२ लाखावर रु. खर्च करण्यांत आले.

पाणी पुरवठा

बोर्डाच्या मालकीच्या जिल्ह्यांत १२३२ विहिरी आहेत. गेल्या चार वर्षांत लोकल बोर्डानें ७५००० रु. पर्यंत रक्कम खर्च करून २१ नवीन विहिरी बांधल्या. १४ जुन्या विहिरींची दुरुस्ती केली. याशिवाय ५८ इतर पाणी पुरवठ्याचीं कामें सध्यां चालू आहेत. पाणी पुरवठ्यासाठीं केलेल्या या कामांकरितां सरकार संपूर्ण खर्च देते.

छोटे पाटबंधारे

लोकल बोर्डानें चाकण, भोसे, लोणी (आंबेगांव), काऱ्हाटी, लवणें, आलपे व नारायणगांव अशी सात बंधाऱ्यांची कामे हातीं घेऊन त्यापैकीं सहा पूर्ण केली आहेत. नारायणगांव येथील बंधाऱ्याचें काम चालू आहे.

दवाखाने

पुणें जिल्हा लोकल बोर्डाचे १३ दवाखाने असून चौदावा दवाखाना वाल्हे येथें नुकताच सुरू करण्यांत आला आहे. शिवाय सुपे व सांगवी येथें लवकरच आयुर्वेदिक दवाखाने सुरूं करण्यांत येणार आहेत. चौदा दवाखान्यांपैकीं ११ दवाखान्यांच्या इमारती बोर्डाच्या मालकीच्या असून त्या पैकीं बावडा आणि सांगवी येथें नवीन अद्यावत् सोयीचे दवाखाने नुकतेच बांधण्यांत आले आहेत.

जिल्ह्यांत १९५५ सालीं फक्त २३ एस. एस. सी. सेंटर्स चालू होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ही संख्या ८० वर जाणार आहे. या औषधोपचार केंद्रांच्या खर्चापैकीं $\frac{3}{4}$ खर्च बोर्डास करावा लागतो.

बोर्डाच्या मालकीची एक आयुर्वेदिक औषधें तयार करणारी फार्मसी असून तीमधून औषधांचा पुरवठा करण्यांत येतो.

बोर्डातर्फे १८ व्हॅक्सीनेटर्स जिल्ह्यांत ठिकठिकाणीं नेमण्यांत आले असून ते देवी टोचण्याचे कार्य करतात.

गुरांचें दवाखाने—बोर्डाच्या सात दवाखान्यांपैकीं चार सरकारकडे देण्यांत आले असून आतां फक्त कडगांव, खेड व मंचर येथील दवाखानेच बोर्डाकडे राहिले आहेत.

शाळा बांधकाम

ग्रामस्थांकडून ४० टक्क्यापर्यंत रोख वर्गणी घेऊन लोकल बोर्डाच्या स्कूल बिल्डिंग कमेटीतर्फे शाळा बांधून देण्यांत येतात. पुढीलप्रमाणें नवीन शाळा इमारती बांधण्यांत आल्या.

जिल्ह्यांत २६ गांवातून नळाचें पाणी पुरविण्याची सोय आहे.

दनंदिन वापरासाठीं जिल्ह्यांत १४ शहरे आणि १७ खेड्यांना वीज उपलब्ध झाली आहे. लोणावळा, भोर, बारामती, दौंड, वालचंदनगर, नीरा, जुन्नर येथें स्वतंत्र वीज पुरवठा कंपन्या असून स्टेट इलेक्ट्रीसिटी बोर्ड व पुना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी यांचेकडूनहि वीज पुरवठा होतो.

निम दुष्काळी कामे

बोर्डातर्फे गेल्या चार वर्षांत दुष्काळ पिडीत जनतेस काम पुरविण्यासाठीं सहा कामें हातीं घेण्यांत आलीं व त्यावर सव्वा लाखावर खर्च केला आहे.

बोर्डानें सव्वा चार लाख रु. खर्चून पुणें शहरांत अद्यावत् इमारत बांधली असून बारामती येथेंहि सब् डिव्हिजन ऑफिसकरितां २५ हजार रु. खर्चून इमारत बांधण्यांत आली आहे.

धंदा, व्यापार, व्यवसाय कर

बोर्डानें १९५४ पासून हा कर पंधराशें वस्तीवरील गांवावर बसविला. १९५५–५६ मध्यें तो १००० वस्तीवरील गांवांवर बसविण्यांत आला. १ एप्रिल १९६० पासून हा कर सर्व गांवावर बसविण्यांत आला असून हें उत्पन्न आतां सव्वा लाखावर गेलें आहे.

डिस्ट्रिक्ट स्कूल बिल्डिंग कमेटीतर्फे बांधण्यांत आलेल्या शाळा.

सन	शाळा	खोल्या	लोकवर्गणी	सरकारी मदत
१९५३–५४	५९	२७३	१,८०,५१९	६,२०,१७९
१९५४–५५	१९	७७	५६,०४६	१,७६,७४६
१९५५–५६	१८	५१	३४,७१३	१,२३,००३
१९५६–५७	२२	४५	३४,९०९	१,१२,३४६
	११८	४४६	३,०६,१८७	१०,३२,२७४

सन	शाळा	खोल्या	खर्च
१९५७–५८	१०	२३	८०,२६४
१९५८–५९	१३	२६	७६,९२५
१९५९–६०	७	२१	९०,८३५

ग्रामपंचायती

ग्रामपंचायत संस्था आपल्याकडे नवीन नाहीं. वैदीक काळांतहि गांवाच्या कारभारासाठीं पंचायती
पंचमंडळ असल्याचा उल्लेख आढळतो. मध्ययुगीन कालांतील शीला लेखावरून त्यावेळीहि इंग्रजी
असाव्यात असा निष्कर्ष काढता येतो. मराठेशाहीतहि या संस्था कार्यक्षम होत्या, परंतु ब्रिटिशांनी
अमदानीच्या सुरवातीपासून मात्र त्यांच्या ऱ्हासास सुरवात झाली. १९२० सालीं कायद्यानें मात्र
ग्रामपंचायतींच्या स्थापनेचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. १९३२ च्या राज्य
पंचायतींची व्याप्ती आणि कार्यक्षेत्र वाढल्यानें पंचायती स्थापन होऊ लागल्याचे आढळते. करण्याच्या
सरकारच्या १९५८ सालच्या ग्रामपंचायत कायद्यानें मात्र प्रत्येक गांवी पंचायत स्थापन १९६०
भारतीय घटनेच्या ४० व्या कलमान्वयें दिलेल्या आदेशाची पूर्तता झाली आणि ३१ मार्च गट
अखेर सर्व गांवें पंचायतींच्या कार्यक्षेत्राखालीं आली. अर्थात त्यासाठीं लहान लहान गावांचे
बनवून एक पंचायत करणें अपरिहार्य झाले.

सुरवातीच्या कालावधीत गांवाची साफसफाई करणें, सार्वजनिक ठिकाणीं व रस्त्यावर ग्रामपंचायतीचे
दिवे लावणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणें, इ. प्राथमिक गोष्टी पुरतेच अर्थानें
कार्यक्षेत्र मर्यादित होते. परंतु १ जून १९५९ च्या नवीन कायद्यान्वयें गांवागावातून खऱ्या करणें,
पंचायत राज्य सुरू झाले असून जमीन वसूल करणे, जमीनींचे रेकॉर्ड ठेवणें, न्यायदान सुधारणेची
यासारखे मूलभूत अधिकार पंचायतींना देण्यांत आले आहेत. गांवच्या सर्वांगीण
जबाबदारी पंचायतीवरच टाकण्यांत आली आहे.

गांवच्या महसूलाच्या २५ ते ३० टक्के पर्यंत भाग पंचायतींना कारभार सर्वांसाठीं देण्यांत येत असल्यानें त्यांचे उत्पन्नहि वाढले आहे. पंचायतींना उत्पन्नाची अितर साधनें पुढीलप्रमाणें उपलब्ध करून देण्यांत आलीं आहेत. जिल्ह्यांतील पंचायतींना सालीना ५,९५,००० रु. अशा तऱ्हेनें म्हणून ग्रँट देण्यांत येतात.

१) घरपट्टी २) आरोग्य पट्टी (सॅनीटरी सेस) ३) बाजारकर ४) कोंडवाडा ५) वाहन-कर ६) दुकानकर ७) पाणीपट्टी वगैरे. जिल्ह्यांतील पंचायतींचे एकूण उत्पन्न ३१,१५,३०६ रु. आहे.

ग्रामपंचायती हा भारतीय लोकशाहीचा पाया आहे. गांवाचे विभाग पाडून प्रत्येक भागाचे लोकनियुक्त सभासद मिळून पंचायत होते. अर्थात स्त्रीया आणि मागास जमाती यासाठीं कांहीं जागा राखून ठेवलेल्या असतात. पंचायतींची निवडणूक दर चार वर्षांनी होऊन लोकनियुक्त सदस्य सरपंचाची निवड करतात. सेक्रेटरी हा सरकारनें नेमलेला असतो. तो सरपंच आणि पंचायतीचे सभासद यांच्या सहाय्यानें गांवचा दैनंदिन कारभार पाहतो. सरपंचानें आपलें धोरण बहुमताच्या कौलाप्रमाणेंच ठेवलें पाहिजे असें त्याच्यावर बंधन असते. गांवच्या लोकसंख्येनुसार पंचायतींत सभासदाच्या जागा पुढीलप्रमाणें असतात.

१००० लोकसंख्येपर्यंत	७
२००० लोकसंख्येपर्यंत	९
३००० ,,	११
४००० ,,	१३
४००० च्या पुढें	१५

प्रत्येक पांच किंवा अधिक गांवाच्या गटासाठीं न्यायदान मंडळे स्थापण्यांत येतात व या मंडळावर प्रत्येक पंचायतीनें नियुक्त केलेला एकेक सभासद असतो. न्याय पंचायतीची सभा ज्या गांवचे तंटे ऐकावयाचे असतात तेथें सर्वसाधारपणें होते. मात्र अशा वेळीं ज्या गांवचा झगडा मंडळापुढें येतो त्या गांवचा प्रतिनिधी मंडळांत बसत नाहीं. न्यायदान मंडळास देवी न टोचणें, सक्तीचें शिक्षण, चोरी, मारामारी, दारू पिणे, शांतता भंग, वगैरे लहान स्वरुपाच्या गुन्ह्याबद्दल २५ रु. पर्यंत दंड करण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत. गांवचा कारभार एकजिनसीपणानें चालविण्यासाठीं अशा मंडळाचा फार मोठा उपयोग होतो.

पुणें जिल्ह्यांत ग्रामपंचायतींची वाढ पुढीलप्रमाणें झाली आहे:—

मार्च १९५६ अखेर	मार्च १९५८ अखेर	मार्च १९५९ अखेर	मार्च १९६० अखेर
२४५	४६१	६५४.	७०४

आज प्रत्येक गांवासाठीं पंचायत असून त्यांची कामे पाहाण्यासाठीं ६४५ सेक्रेटरी—कम्—तलाठी यांच्या नेमणूका झाल्या आहेत.

जिल्ह्यांतील खेड, नारायणगांव, वेल्हे, नीरा आदि गांवच्या पंचायती पंचवीस वर्षांपूर्वीं स्थापन झाल्या असून त्यांचे काम आदर्शवत चालू आहे. खेड पंचायतीनें ड्रेनेज व नळानें पाणी पुरवठा करणें यासारखी अंदाजे ३ लाखावर रकमेची कामे केलीं आहेत. तर धामणी या छोट्या गांवानें विकास योजनेच्या मदतीनें १½ लाख रु. किंमतींच्या इमारती बांधून दाखविल्या आहेत. झेंडेवाडी या पुरंदर तालुक्यांतील सातशे वस्तीच्या छोट्या गांवानें घरोघर ७५ नळ बसवून विहिरीं-तून पाणी पुरविण्याची योजना पुरी केली आहे.

विकास गटांतील विविध कामें स्थानिक पंचायती मार्फतच करण्यांत यावीत असा दंडक असल्यानें जिल्ह्यांतील पंचायती गांवच्या विकासासाठीं अहमहिकेनें काम करू लागल्या आहेत. या बाबतींत उदाहरणच घ्यायचें झालें तर देहू, या हवेली तालुक्यांतील गावानें दवाखाना, तालीम, संडास, गटारे, आदि ९४,६१९ रु. किंमतीची एकोणीस विकास कामें पुरी केली आहेत.

ग्रामपंचायतींच्या कामांची व्याप्ती वाढत आहे. गांव सुधारण्याची संपूर्ण जबाबदारी पंचायतीवर टाकण्यांत आली आहे. दवाखाने, विहिरी, तळीं, रस्ते, गटारें, आदि अनेकविध कामें जिल्ह्यांतील पंचायती यशस्वीपणें पार पाडत आहेत. पंचायतीतर्फें जिल्ह्यांत पुढील कामें पाहिलीं जातात.

विहिरी	—	८४३
तळी	—	५१
बालसंगोपन केंद्रें	—	२५
दवाखाने	—	६०
रस्ते	—	६७१ मैल
गटारे	—	५०,००० यार्ड
धर्मशाळा	—	८३
वाचनालयें	—	१५१
धान्यदुकानें	—	३१७

जिल्हा ग्रामपंचायत मंडळातर्फें पंचायतींच्या कामावर देखरेख ठेवली जाते. या मंडळाचे कलेक्टर हे अध्यक्ष असतात.

पुणे शहर

पुणें शहराची हवा समशीतोष्ण आणि आरोग्यदायक असल्यानें येथील वस्ती झपाट्यानें वाढत आहे. वाढत्या वस्तीसाठीं पाणी-पुरवठा, रस्ते रुंदी, वाहतुकीसाठीं बसेस, राहण्यासाठीं घरें, खेळण्यासाठीं मैदानें, बगीचे, दवाखाने, शाळा, इ. अनेक सुखसोयी उपलब्ध करून देण्याबाबत पुणें महानगरपालिका जागरूक असून शहराच्या सौंदर्यांत सतत भर घालण्याचें कार्य ती करीत आहे.

पुणें नगरपालिकेची स्थापना १८५७ सालीं झाली. तिची वाढ कशी झाली आहे हें पुढील आंकडयावरून दिसेल.

वर्षे	क्षेत्रफळ	लोकसंख्या
१८५७	१९१२ एकर	९०,४३६
१८९०	४०५८ एकर	१,०२,६८३
१९३१	४६४४ एकर	१,६३,२६७
१९५०	१०,२४० एकर	४,००,०००
१९५२–५३	५१.४९ चौ. मैल	५,१६,०००
१९५९–६०	५३.६४ चौ. मैल	५,८८,५४५

१९५२–५३ सालीं महानगरपालिकेचें अंदाजपत्रक १,१०,१८,९६८ रु. चे होते तर तेच १९५९–६० सालीं १,६५,२८,८५२ रु. होतें. सन १९५९–६० सालांतील महानगर-पालिकेच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी पुढीलप्रमाणें होत्या.

सर्वसाधारण कर	४०,४२,७२२	रु.
कॉन्झर्व्हेन्सी कर	८,१९,१९९	रु.
पाणी पट्टी	६,०३,६०९	रु.
सायकल कर	१,२४,०१२	रु.
वाहन कर	१,९९,८६३	रु.
हॉटेल कर	५९,९४६	रु.
करमणूक कर	१,१८,५८२	रु.
स्थावर मिळकत कर	८,८९,३६४	रु.
जकात	६५,५६,०८८	रु.
माणशीं कराचें प्रमाण	१४.२६	रु.

सन १९५९–६० सालांतील प्रमुख बाबीवर झालेला खर्च—

प्राथमिक शिक्षण	२२,७८,१५६	रु.
आरोग्य	३६,७१,२९४	रु.
पाणी पुरवठा	११,१८,२३४	रु.
कर्जफेड	२५,९१,९२७	रु.

पाणी पुरवठाः—पुणें शहरास १८८५ सालापर्यंत कात्रज तलाव व स्थानिक विहिरींतून ७,१५,००० गॅलन पाणी पुरविलें जात असे. इ. स. १८८५ मध्यें खडकवासला धरण झाल्यानंतर पुण्याच्या १ लाख लोकसंख्येस १५ लाख गॅलन पाणी पुरविले जाऊ लागलें. १९१५ मध्यें स्वार-गेटावरील टाक्या बांधण्यांत आल्या आणि त्यामुळें २४ लाख गॅलन पाणी शहरास पुरविले जाऊ लागले. १९२९ मध्यें पाणी वाटपाच्या पद्धतींत बदल करण्यांत येऊन वाढत्या लोकसंख्येसाठीं ५६ लाख गॅलन पाणी पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली.

१९४९ सालीं स्वारगेट पाणी पुरवठा केंद्राची वाढ करण्यांत येऊन १६० लाख गॅलन पाणी पुरवठ्याची सोय करण्यांत आली आहे. याशिवाय खडकी, पाषाण व कॅन्टोन्मेंट येथूनहि शहरास पाणी पुरवठा होतो.

वाहतूकः—पुणें शहरांतील अंतर्गत वाहतुक महानगरपालिकेनें १९५० सालामध्यें आपल्याकडे घेतली. गेल्या दहा वर्षांत जनतेची वाहतुकीची वाढती गरज भागवून पुणें म्युनिसिपल ट्रान्स्पोर्टनें आपलें मूळचें २२ लाखाचें भांडवल साडे त्रेसष्ट लाखावर नेलें आहे.

	१९५०	१९६०
१) एकूण बसेस	५७	१३५
२) रोजचें उत्पन्न	४४५० रु.	१०,२०० रु.
३) रोज वाहून नेण्यांत येणार उतारू	४५०००	१,२०,०००
४) सेवक	४७०	९००
५) बस स्टँड्स	२२	१००

शिक्षणः—पुणें महानगरपालिकेतर्फे ७१ मुलांच्या आणि ३६ मुलींच्या प्राथमिक शाळा चालविण्यांत येतात. या शाळांपैकीं ३९ शाळासाठीं महानगरपालिकेनें स्वतःच्या इमारती गेल्या कांहीं वर्षांत बांधून पुऱ्या केल्या आहेत.

शहरांत ३८ मोफत वाचनालयें महानगरपालिकेतर्फे चालविण्यांत येतात.

घरें:—गेल्या दहा वर्षांत महानगरपालिकेनें कनिष्ठ सेवकांसाठीं राहायला घरें बांधण्याचें काम मोठ्या प्रमाणावर केलें असून त्यांतून १३०० वर बिऱ्हाडांची सोय केली आहे.

औद्योगिक वसाहतः—पुणे शहराची औद्योगिक वाढ होण्याच्या दृष्टीनें पुणें-सोलापूर रस्त्यावर हडपसर येथें २१६ एकर जागा घेऊन त्यावर औद्योगिक वसाहत स्थापन केली आहे. वसाहतीच्या तीन भागांपैकीं पहिल्यांत ८३ प्लॉटस असून ते सर्व विकले गेले आहेत. या भागांत सहा मोठे कारखाने सुरू झाले आहेत. दुसऱ्या भागांत २१ प्लॉटस् असून ते सर्व एकाच कंपनीस देण्यांत आले आहेत. तिसऱ्या भागांत २६ प्लॉटस् असून ते लहान लहान धंदेवाल्यानाच देण्यांत येणार आहेत.

या वसाहतींत वीज, पाणी, ड्रेनेज, वगैरेची सोय करण्यांत आली असून पोस्ट, बँक, रेल्वे सायडिंग वगैरे सोयी करण्यांत येत आहेत. महानगरपालिकेनें या वसाहतींवर आतांपर्यंत ६,७७,७६६ रु. खर्च केले आहेत. वसाहतींतील जागा अल्प किंमतींत उद्योगासाठीं देण्यांत येतात.

आरोग्यः—पुणें महानगरपालिकेतर्फे ३६ औषधोपचार केंद्रें चालविण्यांत येतात. त्यामध्यें लघवी, रक्त, थुंकी तपासणे, पिसाळलेलीं कुत्री चावल्यावरचे उपचार केंद्र, छातीच्या रोगांचें उपचार केंद्र, सांसर्गिक रुग्णालय, प्रसूतीगृहें वगैरेंचा समावेश आहे. या केंद्रातून नाममात्र फी घेऊन सर्व तऱ्हेच्या रोग्यांवर उपचार केले जातात. महानगपालिकेने शहरांत अकरा सार्वजनिक उद्यानें, दोन पोहण्याचे तलाव, मत्स्यालय, प्राणी संग्रहालय, खुले नाट्यगृह आदि विश्रामस्थानें जनतेसाठीं गेल्या कांहीं वर्षांतच निर्माण केलीं आहेत. पैकीं संभाजी उद्यान, पेशवे उद्यान, शनिवार-वाडा, हीं ठिकाणें विशेष आकर्षक आहेत.

कॉर्पोरेशन इमारतः—महानगरपालिकेनें ४० लाख रुपयांवर खर्च करून बांधलेलें अद्यावत कार्यालय हें शहराचे भूषण झालें असून या कार्यालयामुळें पालिकेच्या सर्व कचेऱ्या एकत्र आल्या आहेत.

नगरपालिका

पुणें जिल्ह्यात पुणे महानगरपालिकेव्यतिरिक्त भोर, तळेगांव दाभाडे, आळंदी, जुन्नर, शिरुर, दौंड, इंदापूर, बारामती, सासवड, जेजुरी, लोणावळा या अकरा महत्वाच्या गांवी स्थानिक कारभाराकरितां नगरपालिका आहेत. या संस्थांनी शहर सुधारणेसाठीं अनेक महत्वाचीं कामें स्वातंत्र्योत्तर कालांत केलीं आहेत.

१०. समाज विकास

जिल्ह्यांतील विकास योजनांच्या बाबतींत सरकारला सल्ला देऊन मार्गदर्शन करण्याकरितां प्रत्येक जिल्हयाकरितां जिल्हा विकास मंडळें गेल्या दहा वर्षांपासून राज्य सरकारनें स्थापन केलीं आहेत. स्थानिक आमदार, खासदार, समाज सेवक आणि जिल्हा पातळीवरील सरकारी खात्यांचे अधिकारी हे विकास मंडळाचे सभासद असतात आणि जिल्ह्याचे कलेक्टर त्याचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. या विकास मंडळाच्या ग्रामविकास, पाटबंधारे, समाज कल्याण, दारुबंदी, प्रसिद्धी, इ. ३५ समित्या नेमलेल्या असतात. जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष हे सरकारनें नेमलेले असतात आणि सर्व उपसमित्यांचे ते अध्यक्ष असतात. संबंधित खात्याचे जिल्ह्याचे अधिकारी या उपसमित्यांचे अधिकारपरत्वे चिटणीस असतात. जिल्हा विकास मंडळ किंवा त्याच्या उपसमित्या यांनीं केलेले ठराव सरकारवर बंधनकारक नसतात.

जिल्हा विकास मंडळ

जिल्हा विकास मंडळाचे ऑनररी सेक्रेटरी हे बिनसरकारी असतात तर जिल्हा प्रकल्पाधिकारी हे त्याचे सहकारी चिटणीस म्हणून काम पाहतात. जिल्हा प्रकल्पाधिकारी यांची स्वतंत्र कचेरी कलेक्टर कचेरीच्या आवारांत असून जिल्हा विकास मंडळाच्या कक्षेंतील सर्व दैनंदिन कामें उदा. सिमेंट पत्रा, खत वांटप, जिल्हा क्रीडा स्पर्धा, समाज विकास गटांच्या कामावर देखरेख, ग्राम सुधारणा बक्षीस, वनमहोत्सव इ. तिच्यामार्फतच केलीं जातात. २ ऑक्टोबर १९६० पासून नव्यानें अस्तित्वांत आलेल्या पुणें जिल्हा विकास मंडळांत ११६ सभासद आहेत.

दर पावसाळ्यांत अधिकाअधिक झाडें लावून जगवून दाखविणाऱ्या गांवासाठीं जिल्हा विकास मंडळातर्फे स्पर्धा जाहीर करण्यांत येते. गांवच्या क्षेत्राच्या प्रमाणांत जास्तीतजास्त झाडे लावून ती एक वर्ष जगवून दाखविणाऱ्या तीन गांवाना रोख बक्षिसें देण्यांत येतात. तसेच गांवच्या सर्वांगीण सुधारणेसाठीं कंपोस्ट खताचे खड्डे घेणें व नियमित भरणें, सुधारलेले बी वापरून शेतीच्या नवीन पद्धती उपयोगांत आणणें, अधिक क्षेत्र बागायतीखालीं आणणे, सहकारी सोसायटी कार्यक्षमतेनें चालविणें, कोंबड्यांची पैदास वाढविणें, जोड धंद्यास उत्तेजन देणें, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण इ. कार्य करणाऱ्या गांवांचीहि दरसाल स्पर्धा घेण्यांत येऊन त्यांना ग्रामसुधारणेची रोख बक्षीसें देण्यांत येतात.

ग्राम सुधारणा स्पर्धा

बक्षिसांच्या रकमांचा विनियोग गांवच्या कोठल्याहि सार्वजनिक कामांसाठीं जिल्हा विकास मंडळच्या संमतीनें करतां येतो.

जिल्ह्यांत १९५३ पासून पुढील गांवांना वरील बक्षीसें देण्यांत आलीं.

सन	ग्रामसुधारणा बक्षिसें	वनमहोत्सव बक्षिसें
१९५३–५४	ता. भोर, उत्रौळी २०० रु.	ता. आंबेगांव महाळुंगे पडवळ, २०० रु.
१९५४–५५	ता. आंबेगांव, धामणी २०० रु. ता. जुन्नर, राजूर १५० रु. ता. जुन्नर, निरगुडे १०० रु.	वेल्हे महाल, पाल बु. २०० रु. ,, कानंद १०० रु. आंबेगांव घोडेगांव ५० रु.
१९५५–५६	ता. बारामती, करंजे २०० रु. ता. शिरुर, केंदूर १५० रु. ता. भोर, नसरापूर १०० रु.	ता. हवेली, वडगांव २०० रु. ,, वडगांव खु. १०० रु. ता. मुळशी, धारवली ५० रु.
१९५६–५७	ता. आंबेगांव, महाळुंगे पडवळ २०० रु. ता. भोर, कैंजळ १५० रु. ता. इंदापूर पळसदेव १०० रु.	ता. मुळशी, लवळे २०० रु. ता. वेल्हे, म. खरीव १०० रु. ता. जुन्नर, कुरण ५० रु.
१९५७–५८	वेल्हे म. खरीव २०० रु. ता. आंबेगांव, घोडेगांव १५० रु. ता. इंदापूर, सणसर १०० रु.	ता. बारामती, शिरवली २०० रु. ता. पुरंदर, दिवे–झेंडेवाडी, १०० रु. ता. शिरुर, रांजणगांव गणपती, ५० रु.
१९५८–५९	वेल्हे, म. दापोडे २०० रु. ता. इंदापूर, निमगांव केतकी १५० रु. ता. जुन्नर, सुराळे १०० रु.	ता. मुळशी, आंबरवेल २०० रु. ता. ,, मालेगांव १०० रु. ता. ,, मांदेडे ५० रु.
१९५९–६०	ता. जुन्नर, ओतुर २०० रु. ता. खेड, दोंदे १५० रु. ता. मावळ, इंदुरी १०० रु.	ता. खेड, झेंडे २०० रु. ता. जुन्नर, ओतुर १०० रु. ता. शिरुर, पाबळ ५० रु.

स्थानिक विकास योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सरकारनें मोठमोठीं धरणें, कारखाने, रस्ते, वगैरे योजना हातीं घेतल्या. या योजनांत जनता प्रत्यक्षरित्या सहभागी होऊ शकत नव्हती. देशाच्या ग्रामीण भागांत राहणाऱ्या कोट्यावधी लोकांमध्यें योजनेविषयीं आस्था निर्माण व्हावी आणि देश विकासाच्या कामात त्यांना प्रत्यक्ष भाग घेता यावा म्हणून १९५३–५४ सालापासून प्रत्येक जिल्ह्यांत स्थानिक विकासाची कामें ग्रामस्थांच्या सहाय्यानें आणि सहकार्यानें हाती घेण्यांत आलीं. या योजनेनुसार गांवासाठीं शाळा, रस्ता, चावडी, विहिर, धर्मशाळा, घाट, गटारे, संडास वगैरे सारखी सार्वजनिक स्वरूपाची कामे, ग्रामस्थांना पन्नास टक्के इतकी रोख रक्कम मदत देऊन आणि तांत्रिक सल्ला देऊन त्यांच्याकडूनच पुरी करून घेतलीं गेलीं.

स्थानिक विकास कामाचा तपशील

अनुक्रम नंबर	स्थानिक विकास कामाचा प्रकार	३१-१-६० पर्यंत मंजूर कामें	३१-१-६० अखेर पूर्ण कामें
(१)	विहिरी	३४२	२०८
(२)	रस्ते	६६	४४
(३)	शाळा	१११	३६
(४)	छोटे पूल	३	१
(५)	संडास	१४	१०
(६)	तळी	७	७
(७)	चावडी	८४	३१
(८)	बंधारे	९	५
(९)	धर्मशाळा	२	—
(१०)	आखाडे	५	—
(११)	इतर	९	६
	एकूण	६५२	३४८

पूर्ण झालेल्या कामाची एकूण किंमत १२,१६,२५० रु. आहे.

समाज विकास गट

जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांत आतां समाज विकास गट सुरू झाले आहेत. मंजूर झालेल्या विकास गटाची माहिती पुढील प्रमाणें आहे:—

तालुका	मंजूर ब्लॉक्स	योजना सुरू झाल्याची तारीख	योजना पुरी होण्याची तारीख
राष्ट्रीय विकास			
योजना, हवेली...	२¾	२६- १ -५४	३०-१०-५६
,, पुरंदर...	१½	२-१०-५४	३०- ४ -५६
समाज विकास			
योजना, हवेली...	२¾	१-११-५६	३०-१०-५९
,, पुरंदर...	१½	१- ५ -५६	३०- ६ -५९
(स्टेज नं. १ विकासगट प्रथमावस्था)			
शिरूर	१½	१- ४ -५७	१- ४ -६२
आंबेगांव	१½	१- ४ -५८	१- ४ -६३
भोर वेल्हे	१½	१-१०-५९	१-१०-६४

(स्टेज नं. २ विकासगट द्वितीयावस्था)

हवेली	२¾	१–११–५९	१–११–६४
पुरंदर	१½	१–७–५९	१–७–६४

विकास पूर्व गट

खेड	२	१–४–५९
इंदापूर	१½	१–४–५९
बारामती	२	२–१०–५९
जुन्नर	२	२–१०–५९
दौंड	१½	१–४–६०
मुळशी	१	२–१०–६०
मावळ	१½	२–१०–६०

हवेली तालुका विकास

पुणें शहराच्या सभोवतालीं १२-१५ मैल विस्तार असलेल्या हवेली तालुक्यांत सर्वांत अगोदर म्हणजे २६ जानेवारी १९५४ रोजीं विकास पर्व सुरू झालें. १ लक्ष ८० हजार लोकसंख्या असलेल्या या तालुक्यांत १२४ गांवें आहेत. आक्टोबर १९५९ पर्यंत सरकारनें विविध विकास योजनांवर २९ लाख रु. खर्च केले असून जनतेने श्रम किंवा वर्गणी रूपानें सुमारें पंधरा लाख रु. ची कामें पूर्ण केली आहेत.

शेती:—तालुक्यांत ४२ आदर्श शेतकी केंद्रें असून त्यावर सुधारलेल्या शेतीच्या पद्धती, रासायनिक खतांचा वापर, सुधारलेली बियाणे व अवजारें यांचा वापर इ. प्रात्यक्षिकें वेळोवेळीं केलीं जातात. याशिवाय प्रत्येक गांवीं किमान एक शेती प्रात्यक्षिक प्लॉट घेऊन त्यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं नवीन पद्धतीनें शेती करून दाखविली जाते.

सुधारलेलीं बियाणे शेतकऱ्यांना वेळेवर पुरविता यावे म्हणून तालुक्यांत चऱ्होली येथें सीड फार्म काढण्यांत आला असून तेथून गहूं, हरभरा, बाजरी, ज्वारी इ. चें बियाणें पुरविलें जातें. एकूण ४९२४ मण बियाणें आतांपर्यंत वाटण्यांत आलें आहे.

अधिक बागायतीसाठीं शेतकऱ्यांना तगाअी कर्जें पुरवून ३४८ नव्या विहिरी बांधण्यांत आल्या आणि ३८२ जुन्या विहिरींची दुरूस्ती करून घेण्यांत आली. १८२ ऑईल इंजिनेहि शेतकऱ्यांना कर्जाऊ स्वरूपांत देण्यांत आलीं. वरील सवलतीमुळें तालुक्यांत ६००० एकरापेक्षा अधिक जमीन बागायतीखालीं आली आहे.

तालुक्यांतील ११३ खेड्यांत शेतकरी संघ स्थापण्यांत आले असून त्यांचे ४५१२ सभासद आहेत. या संघामुळें शेतकऱ्यांमध्यें सांधिक भावना निर्माण होत असून शेती विषयक अडचणी सोडविण्यास मदत होत आहे.

तालुक्यांतील एकूण दोन लाख एकर लागवडीखालीं असलेल्या जमिनीपैकी नैऋत्येकडील ६००० एकर क्षेत्रांत भातशेती होते. यापैकी २००० एकर जमिनींत जपानी पद्धतीनें भात शेती करता येईल. विकास गटाच्या मार्गदर्शनाखालीं १२०० एकर क्षेत्रांत आतां अधिक उत्पादनासाठीं शेतकरी जपानी पद्धतीनें भात शेती करूं लागले आहेत.

पुणेरी ज्वारीची पद्धत—ही पद्धत तालुक्यांत गेल्या दोन वर्षापासून सुरू केली आहे. तालुक्यांत ज्वारीचे एकूण क्षेत्र ४७७६० एकर आहे. ह्या पद्धतीनें आतांपर्यंत एकरी जास्तीत जास्त ५० मण उत्पन्न काढण्यांत आले आहे.

भुईमूगाचा प्रचार—या तालुक्यांत भुईमूगाचे १८८२ एकर क्षेत्र असून जवळ जवळ सर्व क्षेत्र गांवठी जातीखालीं होते. गेल्याच वर्षापासून सुधारलेले स्पॅनिश पिनट जातीचे बियाणे व सुपर फॉस्फेटचे खत घातले असतां जवळ जवळ दीड पट उत्पन्न येते असे आढळून आलें आहे म्हणून यंदा प्रात्यक्षिकाकरितां भुईमूगाचें पिकास खत घालण्यासाठीं सुपर फॉस्फेटची ५० पोतीं मोफत पुरवण्यांत आलीं आहेत. या पद्धतीनें चालू वर्षी धानोरी गांवी एकरी ५५ मण उत्पन्न काढण्यांत आले आहे.

फळझाडें—आतापर्यंत सुमारे २००० आंब्याचीं कलमें, ४००० कागदी लिंबू व ८ मण काजू बियाणें पुरवण्यांत आलें तसेंच ५३० गावठी आंब्यावर हापूस पायरीचीं कलमें बांधण्यांत आलीं आहेत.

भाजीपाला—हवेलीचे पूर्व भागांत भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणांत लागवड होते व त्या शेतकऱ्यांना शुद्ध व जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीचे बियाणें पुरविण्यांत येते.

विकास गटाच्या कालावधींत शेतकऱ्यांची शंभरावर शिबिरे घेण्यांत येऊन शेती–ग्रामोद्योग–सहकार–आरोग्य–शिक्षण–आदि विषयांवर बौद्धिकें देण्यांत आलीं आणि प्रात्यक्षिकेहि दाखविण्यांत आलीं. वेळोवेळीं शेतकी प्रदर्शनें घेऊन त्यामधूनहि शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाच्या सर्वांगीण विविध विकासासाठीं करावयाच्या कार्याचें दिग्दर्शन करण्यांत आले.

पीक संरक्षणासाठीं प्रत्येक ग्रामसेवकांकडे औषधी पावडर आणि फवारे मारण्याची ९७ यंत्रें ठेवण्यांत आली असून शेतकऱ्यांना तीं विनामूल्य वापरतां येतात. अधिकाधिक शेतकरी त्यांचा उपयोग करू लागले आहेत.

पीक स्पर्धामुळें शेतकऱ्यांत चढाओढ लागून अधिक उत्पादनास मदत होते. विकास गटातर्फे दरसाल एक हजार रु. बक्षीस किंवा अन्य बाबींवर खर्चून अशा स्पर्धा घेण्यांत येतात.

पीक स्पर्धेत शेतकऱ्यांनीं काढलेले एकरी जास्तीत जास्त उत्पन्नः—

१) भात : ७६ मण
२) ज्वारी : (रब्बी) ५० मण
३) गहूं : २४ मण
४) बाजरी : ५२ मण
५) भूईमूग : ५५ मण

पशु संवर्धनः— जनावरांचे पैदाशीसाठीं खिलार जातीचे ८ वळू पुरवण्यांत आले आहेत. खानापूर, लोणीकंद व मोशी येथे जनावरांचे दवाखाने चालू असून तेथें नवीन इमारती बांधण्याचें काम चालूं आहे.

आतापर्यंत शेतकऱ्यांना उत्तम जातीचे ३४० पक्षी व उबविण्याची ५२४ अंडी पुरविण्यांत आली आहेत. तसेंच ७१७०५ रुपये कोंबडी पालनाचे धंद्यासाठीं कर्जावू दिले आहेत.

तसेंच २० शुद्ध जातीच्या मेंढ्या शेतकऱ्यांना पुरवल्या असून आतांपर्यंत या धंद्यामध्यें ४३३८ रुपये शेतकऱ्यांना कर्जाऊ दिले आहेत.

दुग्ध व्यवसायः—कोंढणपूर व खेड शिवापूर येथें दूध गोळा करण्याचीं केंद्रें काढण्यांत आलीं असून सरासरी रोज ३० ते ३५ मण दूध शेतकऱ्यांचेकडून गोळा करून पुणें सरकारी दूध योजनेस पुरवण्यांत येते. या धंद्याकरितां आतापर्यंत १,३८,२३९ रु. कर्जाऊ देण्यांत आले आहेत.

आरोग्यः—खेड शिवापूर, खडकवासला, खानापूर, देहू, मोशी, उरळी कांचन, फुरसुंगी, कुंजीरवाडी व वाघोली येथें प्राथमिक आरोग्य केंद्रें सुरु करण्यांत आलीं आहेत.

पिण्याचें पाणीः— पिण्याच्या पाण्यासाठीं आतापर्यंत ४९ नवीन विहीरी खोदण्यांत आल्या असून अनेक जुन्या विहीरी दुरुस्त करण्यांत आल्या आहेत.

समाज शिक्षण

तालुक्यांत साक्षारतेचें प्रमाण ३५ टक्के आहे व ह्या वर्षी १५२ प्रौढ वर्ग सुरू केले आहेत. त्यांतून सध्या १५०० प्रौढ शिक्षण घेत आहेत. नवीन ३५०० प्रौढ साक्षर झाले आहेत. अितकेंच नव्हे तर गोम्हे बु. व धानोरी ह्या गांवानी ९५ टक्के साक्षरता गांठून नवीन उच्चांक निर्माण केला आहे. तालुक्यांत ११३ शेतकरी संघ, ५० भजनी मंडळे, ७४ युवक दलें, ८० महिला मंडळे, ३० बालवाड्या व ८ नभोवाणी शेतकरी मंडळे आहेत. नाटकाचे कलेला उत्तेजन देण्याचे दृष्टीनें वेळोवेळीं नाट्य-स्पर्धा घेण्यांत येतात. या खेड्यांतील नाट्य मंडळांना मार्गदर्शन करस्यासाठीं चालू वर्षापासून नाट्य शिक्षकाची नेमणूक केली आहे. सध्या गटांत १२ नाट्य मंडळे आहेत व ते वार्षिक चढाओढींत भाग घेतात. त्याचप्रमाणें वाचनालयाची संख्या १२४ आहे व ८० खेड्यांतून फिरत्या वाचनालयांचा उपक्रम सुरूं करण्यांत आला आहे. तसेंच ४९ खेड्यांतून चर्चा मंडळे निघालेली असून त्यांचे काम चांगले चालले आहे.

शालागृहें— तालुक्यांत सरकारी मदतीनें ५२ गांवात १३७ खोल्यांची शालागृहाची कामें पूर्ण झालीं असून इतर ४२ गांवातील १३० खोल्यांच्या शालागृहांचे काम चालू आहे.

रस्तेः— तालुक्यांत आतांपर्यंत २९·५ मैल लांबीचे रस्ते करण्यांत आले आहेत. विशेष म्हणजे इतिहास प्रसिद्ध सिंहगड किल्ल्याला जाण्यासाठीं कल्याण कोंढणपूर मार्गें रस्ता करण्यांत आला.

सहकारः—तालुक्यांत विकास योजना सुरूं होण्यापूर्वी ३७ सहकारी सोसायट्या होत्या; त्यांची सभासद संख्या २५२४ व शेअर भांडवल ६७७१५ रुपये होतें. आज ८८ सोसायट्या असून सभासद संख्या ८१८५ व शेअर भांडवल ३३९८४० रु. आहे व आतांपर्यंत गटांतील ५० टक्के शेतकरी सहकारी संख्येनें सभासद झाले आहेत. सर्व खेडीं सहकारी संख्येनें व्यापिलीं आहेत.

कुटीरोद्योग व औद्योगिक सहकार

आतांपर्यंत शिवणकामाचें वार्षिक मुदतीचे ३ व तीन महिने मुदतीचे १८ वर्ग घेण्यांत आले. ४२१ स्त्रिया पुरुष शिकून तयार झाले आहेत. कांचखेळणी तयार करण्याचेहि ३ वर्ग घेण्यांत आले असून त्यांत १६ विद्यार्थी तयार झाले आहेत. बांबूकामाचा १ वर्ग झाला असून १४ लोकांनीं त्यांत शिक्षण घेतलेले आहे. आतापर्यंत सुतार कामाचे २ क्लासेस झाले व २१ लोक ट्रेंड झाले आहेत. खडकवासला येथील सहकारी पद्धतीवर चाललेला बाहुल्यांचा छोटासा कारखाना हें ह्या गटांतील एक भूषण आहे. प्रथम दोन वर्षें विकास गटातर्फें खडकवासला येथें बाहुल्यांचा

शिक्षणवर्ग चालविला होता. त्या वर्गांमध्यें एकूण ५२ स्त्रिया शिकून तयार झाल्या. त्यांनीं सहकारी उत्पादन संस्था मे महिन्यांत स्थापन करून बाहुल्यांचा कारखाना चालविला आहे. दर महिन्याला ५०० मे ६०० रुपयाचा माल तयार होऊन विकला जातो. इतकेंच नव्हे, तर या वर्षी ६०० रुपयांच्या बाहुल्या चीनला पुरविण्यांत आल्या.

पुरंदर तालुका

पुणें शहराच्या आग्नेय दिशेस असलेल्या पुरंदर तालुक्याचें क्षेत्रफळ ४२६·५ चौरस मैल इतके आहे. लोकसंख्या १९९५०६ इतकी असून ती ७९ गांवांतून पसरलेली आहे. तालुक्यांतील पर्जन्यमान पश्चिमेकडील भागांत ४० ते ६० इंच तर पूर्वेकडील भागांत फक्त १० ते १५ इंच असे आहे. पश्चिमेकडील भाग डोंगराळ असून या भागांत प्रसिद्ध शिवकालीन पुरंदर किल्ला आहे. या किल्ल्याची उंची समुद्र सपाटीपासून ४५६० फूट असून तेथें थंड हवेचे ठिकाण वसविण्याचा महाराष्ट्र सरकारचा इरादा आहे. तालुक्यांत जेजुरी हें खंडोबाचे देवस्थान असून चैत्र शुद्ध पौर्णिमेस तेथें मोठी यात्रा भरते.

२ ऑक्टोबर १९५४ रोजीं या तालुक्यास विकास योजना सुरू होऊन तेथील जनतेच्या सर्वांगीण विकासाकरितां सरकारनें अठरा लाख रुपये मंजूर केले होते.

शेती:—तालुक्यांतील मुख्य उद्योगधंदा शेतीच आहे. ह्या भागांतील शेतकरी नवीन प्रयोग करून वेगळ्या हंगामांत वेगवेगळी अधिक उत्पन्न देणारी पिकें काढण्यांत कुशल आहेत. विकास योजनेमार्फत येथील शेतकऱ्यांना अकोला बाजरी, मोहोळ, $\frac{35}{1}$ ज्वारी, कपाशी, सी ओ ह्व केनफाड गहूं, आंबेमोहोर १५७ इत्यादि जातीचे सुधारलेलें बी दर हंगामांत पुरविण्यांत येत आहे. अमोनियम सल्फेट, सुपर फॉस्फेट, मॅन्यूअर मिक्श्चर, पेंड हिरवळीचें खत इत्यादि रासायनिक खतांचा वापर केव्हां आणि कसा कोणत्या पिकास करायचा याचा सल्लाही वेळोवेळीं शेतकऱ्यास देण्यांत येत आहे.मशागतीच्या सुधारलेल्या पद्धतींचीं प्रात्यक्षिकेही शेतकऱ्यांना, वेळोवेळीं करून दाखविण्यांत आल्यानें जपानी भातशेती, निफणीचा पातळ पेरा, टोकण पद्धत वगैरे शेतीच्या पद्धती शेतकरी अवलंबीत आहेत. कीडनाशक द्रव्यें, त्यांचे उपयोग आणि कीडप्रतिबंधक उपाय यांचीही शेतकऱ्यांना वेळोवेळीं माहिती मिळाल्यानें एरवी वाया जाणारी पिकें आतां शेतकऱ्यांच्या पदरांत पडूं लागली आहेत. दरसाल घेण्यांत येणाऱ्या पीक स्पर्धांमुळें शेतकऱ्यांमध्यें चढाओढ लागल्याचें दिसत असून अधिक उत्पन्न काढण्यासाठीं ते अहोरात्र परिश्रम आणि विचार करूं लागले आहेत. स्पर्धेमुळें जिराईत ज्वारीचें उत्पन्न एकरी ७३ मण आणि बागायत ज्वारीचें उत्पन्न एकरी ९२ मण ह्या तालुक्यांतील पांडेश्वर व हिवरे येथील शेतकऱ्यांनीं काढून दाखविलें.

शेतीच्या क्षेत्रांत विकास गटातर्फे ३१ मार्च १९६० पर्यंत पुढीलप्रमाणें काम झालें.

(१) कंपोस्ट खड्डे......४३५५
(२) शेणखत खड्डे......१९८९
(३) रासायनिक खतें वांटप......३२३९७ बंगाली मण
(४) बियाणें वांटपी...... ४६४७ ,,
(५) सुधारलेलीं अवजारें वाटली......७७८ ,,
(६) शेती प्रात्याक्षिकांचे प्लॉटस......५०३
(७) शेतकरी संघ स्थापले......... ७९

पशुसंवर्धनासही विकास गटांत योग्य तें प्राधान्य देण्यांत येऊन सुधारलेल्या व्हाईट लेग-हॉर्न जातीच्या कोंबड्याचीं अंडी आणि कोंबडे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानें पुरविण्यांत आलीं. हिवरे, बेलसर, माळशिरस, देवडी, पांडेश्वर, जाधववाडी या गांवी तर देशी कोंबडे नाहींसे करून सर्व पैदास सुधारलेल्या जातीचीच होत आहे. परीनचे, हिवरे, इ. सहा ठिकाणीं स्त्रियांना कोंबड्या पाळण्याचे शिक्षण देण्याचे वर्ग घेण्यांत आले. हा धंदा मोठ्या प्रमाणांत करणाऱ्या शेतकऱ्यांना विकास योजनेमार्फत कर्जही देण्यांत आलें.

दुभती जनावरे ठेवून त्यांचे दूध शहरांत पुरविणें हा या भागांतील मोठा जोडधंदा आहे. विकास योजनेतर्फे या धंद्यासाठीं म्हशी घेण्यास कर्जे देण्यांत आली आणि पूर, पठारवाडी, वारवडी अशा मध्यवर्ती ठिकाणीं डेअरी सोसायट्या स्थापन करून सरकारी दूध केंद्रास दूध पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली. कमी श्रमांत दूधास योग्य भाव मिळाल्यानें या धंद्याची वाढ तालुक्यांत झपाट्यानें होवूं लागली आहे.

या भागांत मेंढपाळाचा धंदाही चालतो. पांढऱ्या लोकरीस चांगला भाव येत असल्यामुळें या लोकरीच्या पैदाशीसाठीं माळशिरस भागांत मारवाडी जातीच्या ७५ पर्यंत मेंढ्या पुरविण्यात आल्या आहेत. जेजुरी येथें मेंढयाचें जोपासना केंद्र उघडावें असे प्रयत्न चालू आहेत.

गुरांच्या रोगावर उपचार करण्याचे केंद्र पूर्वी सासवड येथेंच होते. विकास योजनेतर्फे परींचे, गराडे व राजेवाडी या गांवीं उपकेंद्रें स्थापन करण्यांत येवून अद्यावत उपचार करण्याची सोय चारही ठिकाणीं विकास योजनेमार्फत करण्यांत आली. सासवड येथील केंद्रात कृत्रीम गर्भधारणेची सोय असून आतापर्यंत शेंकडो शेतकऱ्यांनीं आपल्या गायीपासूनची पैदास सुधारण्यासाठीं या केंद्राचा फायदा घेतला आहे. कित्येक गांवी उत्तम खिलार जातीचे वळूही पैदास सुधारण्यासाठीं सरकारी मदतीनें ठेवण्यांत आले आहेत. सुधारलेलीं बियाणें, खते आदि वस्तूंचा संग्रह करून ठेवणें सुलभ व्हावे म्हणून सासवड येथें १६८०० रुपये खर्च करून अद्यावत गुदामे बांधण्यांत आली आहेत.

पशुधनाच्या सुधारणेसाठीं पुढीलप्रमाणें कार्य झाले आहे.

१) जातीवंत वळू पुरविले—३२
२) जातीवंत कोंबड्या पुरविल्या—२०९०
३) ,, मेंढ्या पुरविल्या—११३
४) सुधारलेल्या कोंबड्यांचीं पैदाशीसाठीं अंडी वाटलीं—३३,२१२ डझन
५) कृत्रिम गर्भधारणेपासून झालेलीं जनावरें—३,४३१
६) गुरांवर औषधोपचार केले—५१,६००
७) गुरांना लस टोचली—१,६७,६०१
८) म्हशी, कोंबडया, मेंढ्या आदिसाठीं शेतकऱ्यांना दिलेलीं कर्जे—५१,४०० रु.

विकास योजनेतर्फे पुढील गांवी पक्के बंधारे बांधण्यांत येवून एक हजारावर एकर क्षेत्रास पाणी देण्याची सोय करण्यांत आली.

	भिजणारें क्षेत्र	झालेला खर्च
१) पांडेश्वर बंधारा	१०० एकर	२०७४१ रुपये
२) टेकवडी	१२५ ,,	२३१०६ ,,
३) हरगुडे	९२ ,,	७३७४ ,,
४) गुऱ्हाळी नं. १	५५ ,,	७५५१ ,,
५) गुऱ्हाळी नं. २	५० ,,	४६७७ ,,
६) आंबोडी	६०० ,,	१३५००० ,,
एकूण	१०२२ एकर	१,९८,४४९ रु.

पुढील गांवी वाहणाऱ्या पाण्याचा उपयोग करून लिफ्ट इरिगेशन सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या.

	भिजणारे क्षेत्र	झालेला खर्च
१) आंबोडी लिफ्ट इरिगेशन योजना	१५० एकर	११८०० रुपये
२) सासवड नंदाजी इरिगेशन योजना	११० एकर	१५००० ,,
३) सासवड सिद्धेश्वर ,, योजना	२२२ ,,	२५००० ,,

विहिरी खोदण्यासाठीं आणि दुरुस्त करण्यासाठीं तसेंच ऑईल इंजिन खरेदी करण्यासाठीं विकास योजनेमार्फत शेतकऱ्यांना तगाई कर्जे पुरविल्यानें पुढीलप्रमाणें कार्य झाले आहे.

	संख्या	भिजणारे क्षेत्र अंदाजे
१) नवीन विहिरी खोदल्या	४८६	३११६ एकर
२) जुन्या विहिरी दुरुस्त केल्या	५०९	२०३६ ,,
३) ऑईल इंजिन्स पुरविलीं	३०१	३११० ,,
४) कच्चे बंधारे घातले.	२७	३२४ ,,

५) विहीरीसाठीं कर्जें ४२,५०० रुपये

६) ऑईल इंजिन्ससाठीं ४,१२,५०० रुपये

माळशिरस, रिसे, पिसे, राजूरी, पांडेश्वर, पिंपरी, कोळविहीरे, नाझरे, जवळार्जून, मावडी, टेकवडी या गांवी ताली घालण्याचें काम झाले असून आणखी ११ गावांत ते चालू आहे. याशिवाय १०,००० एकरावर जमीन नवीनच लागवडीखालीं आणण्यांत विकास योजनेचा मोठा वाटा आहे.

आरोग्य—कारदरी खोरे, पानवडी खोरे, माहूर, मांढर, गराडे, खोरे, देवडी इ. १८ ठिकाणीं नवीन विहिरी विकास योजनेमार्फत पिण्याच्या पाण्यासाठीं गांवकऱ्यांच्या मदतीनें बांधून देण्यांत आल्या आहेत. या शिवाय ६ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली आणि गराडे येथील हौदाचे काम पुरे करण्यांत आले. १५ गांवी ४४००० रुपये खर्च करून १७००० फुटापेक्षा अधिक लांबीची गटारे बांधण्यांत आली. ९ गांवांतून १८ गोपुरी व इतर ठिकाणीं ११० संडास बांधण्यांत आले. यासाठीं १६००० वर रुपये खर्च झाले. जेजुरी, माळशिरस, गराडे, सासवड, परिंचे येथें दवाखान्याच्या इमारती रु. एक लाखाच्यावर खर्च करून गांवकऱ्यांच्या मदतीनें बांधण्यांत आल्या.

झेंडेवाडी या लहानशा गांवानें विहिरीवर अिंजिन बसवून ७५ नळाच्या तोट्या मार्फत घरोघर पिण्याचे पाणी पुरविण्याची सोय केली आहे.

शिक्षण— विकास योजनेपूर्वी बऱ्याच शाळा देवळांत, व्हरांड्यांत किंवा मोडक्या तोडक्या अिमारतींत भरत असत. गांवातील मुलांना चांगले शाळागृह असेल तर ती प्रसन्न मनाने शिक्षणाचे पाठ घेतील हें लोकांना पटल्यामुळें आणि गांवच्या सार्वजनिक हिताचें हें काम असल्यानें योजनेच्या सुरवातीच्या काळांत शालागृहांचीं कामे अहमहिकेनें हातीं घेण्यांत आलीं. तालुक्यांत आज जवळ जवळ सर्व गांवी शालागृहें झाली आहेत. शालागृहांची झालेलीं कामे—

शालागृहांच्या अिमारती खालील गांवी बांधण्यांत आल्या.

१) शिवरी, २) पूर, ३) मांढर, ४) पिंपरी, ५) उंबरे, ६) भिवरी; ७) बोपगांव, ८) आंबोडी, ९) माहूर, १०) पारगांव, ११) जवळार्जून, १२) नाझरे,सुपे १३) हरगुडे, १४) नवलेवाडी १५) कामठवाडी १६) राख, १७) यादववाडी, १८) केतकावळे, १९) परिंचे, २०) पठारवाडी २१) बालवाडी, २२) झेंडेवाडी २३) आस्करवाडी, २४) काळदरी, २५) तकारवाडी, २६) शिवरे, २७) दौडज, २८) गुळुंचे, २९) वनपुरी, ३०) नायगांव, ३१) कामथडी, ३२) टोनपेवाडी, ३३) रणनवरेवाडी,.३४) निरा ३५) शिंदेवाडी, ३६) विर, ३७) हरणी, ३८) मावडीकडेपठार ३९) शिंगापूर ४०) टेकवडी, ४१) पिंगोरी, ४२) पिसर्वे, ४३) रिसे, ४४) राजोरी, ४५) धनकवडी ४६) माळवाडी, ४७) मांडकी, ४८) भैरवाडी ४९) हिवरे, ५०) सोमुर्डी, ५१) मावडीसुपे, ५२) बांदलवाडी, ५३) चांबळी, ५४) आंबळे ५५) बागदरवाडी, ५६) कोथळे, ५७) दौनेवाडी, ५८) कनोडी, ५९) फंगारे.

गुऱ्हाळीच्या वाडीच्या लोकांनीं आणि साकुर्ड्याच्या भोंगळे मळ्यांतील लोकांनीं स्वतःच्या खर्चानें शालागृहें बांधलीं आहेत.

शेती मूलोद्योग शाळांत रूपांतर करण्यासाठीं गुळुंचे, पर्थे आणि वाल्हे या गांवांना शेतीचीं अवजारें विकास योजनेमार्फतच देण्यांत आलीं तर सासवडच्या शाळेस एंजिन देण्यांत आलें.

६० शाळांना, मुलांना पाणी पिण्यासाठीं पिपें, पेले आदि साहित्य देण्यांत आलें.

समाजशिक्षण

एकजिनसी प्रगतिशील विचारसरणीचा समाज निर्माण होणें हेंच विकास योजनांचे ध्येय असल्यानें गांवोगांव शिबिरे, मेळावे घेण्यांत आले. सिनेमा, मॅजिक लॅंटर्न, कलापथके, रेडिओ इ. साधनांनीं नवीन विचारांचा प्रसार करण्यांत आला. भजनी मंडळें, महिला मंडळें, युवक संघटना, वाचनालयें, इ. विविध प्रकारच्या संघटना गांवोगांव स्थापन करण्यांत आल्या. त्या द्वारें लोकांना एकत्र आणून आणि आपल्या अडचणी आपण सोडविल्या पाहिजेत याची जाणीव करून देण्यांत आली. ग्रामीण भागांतील लोकांची दृष्टी विशाल व्हावी म्हणून त्यांच्या निरनिराळ्या सहलीही काढण्यांत आल्या.

साक्षरता वर्ग चालविले	...	१७९
करमणूक केंद्रें चालविलीं	...	१८३
महिला मंडळें स्थापिलीं	...	५२
बालकांच्या संघटना केल्या	...	२२
वाचनालयें उघडलीं	...	३४
तरुणांचे संघ स्थापले	...	१०९

पुढील गांवी सरकारी मदतीनें समाज मंदिरें बांधण्यांत आली. १) भुजवडी, २) टेकवडी, ३) हारगुडे, ४) झेंडेवाडी, ५) भिवडी, ६) देवडी (तालीम) ७) पिसे ८) कोळविहीर, ९) बेलसर (तालीम) १०) बांदलवाडी ११) हर्णी १२) हिवरे (तालीम) १३) धिसारवाडी १४) आंबोडी १५) टेकवडी (तालीम) १६) आनकरवाडी.

ग्रामपंचायतीसाठीं पुढील गांवी अिमारती बांधण्यांत आल्या.
१) कोडीत बु. २) राजेवाडी ३) पिंपळे ४) वाधापूर

दळणवळण:—वाहतुकीच्या सोयी वाढल्या कीं लोकांचा व्यापार व्यवहार वाढतो आणि सुधारणेचें लोण गांवात लवकर पोहोचतें हें जाणून तालुक्यांतील लोकांनी श्रमदानानें आणि सरकारी मदतीनें पुढील जोड रस्ते केले.

१) पांगारे	७ फ	१७) वाळुंज	१५ फ
२) शिवरी	५ फ	१८) सासवड–कोडीत	६ फ
३) हिवरे	२ फ	१९) देवडी	३ फ
४) बांदलवाडी	८ फ	२०) केतकावळे	६ फ
५) पोंढे	२४ फ	२१) बेलसर	१५ फ
६) कांबरे	७ फ	२२) परिंचे	२ फ
७) झेंडेवाडी	८ फ	२३) सोनोरी	४ फ
८) पानवडी	१६ फ	२४) जाधववाडी	७ फ
९) अंबोडी	७ फ	२५) सुपे खु।।	१६ फ
१०) कोडीत	२४ फ	२६) सासवड–सोनोरी	१६ फ
११) गराडे	२४ फ	२७) काळदरी किकवी	३६ फ
१२) पिसे	२ फ	२८) आतकरवाडी-शिंदेवाडी	१२फ
१३) यादववाडी	५ फ	२९) कोसळे–भोसलेवाडी	२० फ
१४) कामथडी	४ फ	३०) पानवडी	४० फ
१५) कोळविहीरे	२३ फ	३१) वाळूंज	१६ फ
१६) पोखर	८ फ	३२) जीऊर	३ फ

गराडे येथें छोटा (फूट ब्रीज) पूलही बांधण्यांत आला. कोथळे भांसलेवाडी या गावानें भाजीपाला मुंबईस पाठविणें सुलभ व्हावें म्हणून दोन मैल लांबीचा रस्ता स्वतः श्रमदानानें केला. पानवडीच्या शिवारांतील लोकांनी ५ मैल लांबीचा रस्ता उभा डोंगर फोडून केवळ चार महिन्यांत अहोरात्र राबून तयार केला.

जोडधंदे—तेली, बुरुड, चर्मकार, मातंग, धनगर या लोकांच्या संस्था स्थापून त्यांच्या व्यवसायास भरीव मदत करण्यांत आली. सासवडच्या मातंग सोसायटीस इंग्लंडच्या हायकमिशनरकडून ४००० रु. देणगी मिळाली आहे. वाल्हे येथील चर्मकार आणि धनगर लोकांना त्यांच्या व्यवसायाचे शिक्षण देण्याकरितां विकास गटातर्फे शिक्षक नेमण्यांत आले आहेत.

याशिवाय योजनेतर्फे या क्षेत्रांत पुढील कार्य झालें.

	मुदत महिने	शिकलेल्यांची संख्या
१) शिवण वर्ग	१२	४०
२) लोहारकाम–सुतारकाम	१८	४०
३) वाख–काम वर्ग	८	३०
४) बांबूकाम वर्ग	६	१५
५) महिलांचे शिवण वर्ग	९	९०
६) साबण प्रात्यक्षिक वर्ग	१०	२००
७) कोंबड्या पाळण्याचे वर्ग	२	२००

विकास योजनेतर्फे विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यांत येऊन पुढीलप्रमाणें त्यांना धंदे शिक्षणास पाठविलें.

ठिकाण	विद्यार्थी
१) कांचकाम वर्ग, तळेगांव दाभाडे	१०
२) हस्तकला कौशल्य केंद्र, मुंबई	५
३) ऑईल इंजीन दुरुस्ती, खडकी	२५
४) स्वीच बोर्ड ऑपरेटर्स कोर्स	३
५) कोंबडी पाळणें, खडकी	१८
६) कातडी ओढण्याचा वर्ग, मुंबई	३

तालुक्यांतील विविध कारागीरांना धंद्यासाठीं १४,१२२ रु. चीं वैयक्तिक कर्जें देण्यांत आलीं.

सहकार—तालुक्यांतील सर्व ७९ गांवे सहकारी सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांत असून त्यामुळें ४२·६ टक्के लोकांना प्रत्यक्ष फायदा मिळत आहे. हारगुडे आणि सासवड येथें गुदामे बांधण्यांत आली असून गुळूंचे येथेही गुदाम बांधण्याची योजना आहे. सहकारी संस्थातर्फे १९ गांवी स्वस्त धान्य दुकानें चालविलीं जात आहेत. नीरा व सासवड येथें हरिजनांच्या घरबांधकाम सहकारी संस्था स्थापण्यांत आल्या आहेत.

बेलसर येथें पहिली सहकारी शेती सोसायटी स्थापन झाली असून पोंढे येथेंही अशी संस्था स्थापण्यांत येत आहे.

पठारवाडी, वारवडी व शिवतक्रार येथें डेअरी सोसायट्या स्थापन झाल्या आहेत.

याशिवाय सहा लिफ्ट इरिगेशन संस्था रजिस्टर करण्यांत आल्या असून तीन संस्थांचें काम चालू झालें आहे.

तालुक्यांतील सहकारी संस्था

	संस्था	सभासद	भांडवल
१) पतपेढ्या आणि विविधकार्यकारी	७३	७०१२	३,१८,०२७ रु.
२) लिफ्ट इरिगेशन	३	३२२	५३,०१५ रु.
३) सहकारी शेती	२	४६	१,३५० रु.
४) घरबांधकाम	२	७५	१,९२५ रु.
५) औद्योगिक	११	३९८	२८,०३१ रु.
६) डेअरी वगैरे	६	६२३	६२,८१० रु.
७) खरेदी विक्री	१	६१	१०,००० रु.
८) तालुका डेव्ह. बोर्ड	१	५०७	२२,९५७ रु.
एकूण	९९	९०४४	४,९८,११५ रु.

तालुक्यासाठीं मंजूर झालेल्या १८ लाख रु. पैकीं १७,७१,०९७ रु. खर्च झाले असून लोकांनीं श्रम अथवा वर्गणी रूपानें केलेल्या कामाची किंमत १३,३४,२८८ रु. इतकी आहे.

आंबेगांव तालुका

पुणें नाशिक रस्त्याच्या पूर्वेस आणि पश्चिमेस विस्तार असलेल्या या तालुक्यांत १ एप्रिल १९५८ पासून विकास योजना सुरू झाली. क्षेत्रफळ ४०१.५मैल असून लोकसंख्या ९८८८० आहे. तालुक्यांतील १०० गांवांपैकीं निम्म्याहून अधिक गांवांत आदिवासीच बहुसंख्येनें राहतात. मुख्य पिकें भात, गहूं, ज्वारी, बाजरी आणि बटाटा हीं होत.

विकास योजनेनुसार पांच वर्षांकरितां मंजूर झालेल्या १८ लाख रु. पैकीं तालुक्यांतील जनतेनें उत्स्फूर्त सहकार्य दिल्यानें आजपर्यंत ८ लाखावर रक्कम विविध योजनावर खर्च झाली असून लोकांनी श्रम किंवा वर्गणी रूपानें केलेल्या कामांची किंमत पावणेदोन लाखाहून अधिक आहे.

शेतीः— घोडेगांव या तालुक्याच्या गांवी शुद्ध बियाण्यांचें उत्पादन केंद्र स्थापण्यांत आले आहे. आतापर्यंत पुढील प्रमाणें शुद्ध व सुधारलेलें बियाणें आणि खताचे वांटप शेतकऱ्यांना करण्यांत आले आहे.

बियाणें

भात	१०२ मण
गहूं	१५१ मण
ज्वारी	२८३ मण
बाजरी व गहूं	५८८ मण
कपाशी	७ मण
भुईमूग	९४ मण

खतें

तागाचे बी	६२० मण
अ. सल्फेट	९५८२ मण
सु. फॉस्फेट	३४०७ मण
भुईमूग पेंड	५९९० मण
इतर	२४१३ मण
मॅन्युअर मिक्श्चर	१५३१६ मण

सुधारलेल्या अवजारांचाहि जारीनें प्रचार करण्यांत येऊन त्यांचे वाटप पुढीलप्रमाणें झालें आहे.

ऑईल इंजिन्स	...	४४
लोखंडी नांगर इ.	...	६३
पावडर मारण्याचे पंप	...	२४
औषधे फवारण्याचे पंप	...	२६
कोरडवाहू अवजारांचा संच	...	४३

जपानी भातशेती—तालुक्यांतील ६०३० एकर भातशेतीपैकीं निम्मी शेती सुधारलेल्या जपानी पद्धतीनें करण्यांत येऊ लागली असून या पद्धतीनें दीडपट पीक येतें असें आढळून आलें आहे.

ज्वारीची पुणेरी पद्धत—तालुक्यांतील २५६५१ एकर क्षेत्र ज्वारीखालीं आहे. टोकण पद्धतीनें अंतरावर ज्वारी पेरून एकरी १०७ मणापर्यंत उत्पन्न काढण्यांत येथील शेतकऱ्यांनीं यश मिळविलें आहे. अवसरी खुर्द येथील ग्रामस्थांनीं गांवच्या सर्व म्हणजे ३००० एकर क्षेत्रांत टोकण पद्धतीनें यंदा लावणी केली आहे.

फळझाडें—शेतकऱ्यांना २९०० कलमी आंबे, २५०० मोसंबी, ४५० चिक्कू इ. झाडांची कलमे सवलतीनें पुरविण्यांत आलीं असून ३५३ आंब्याच्या झाडावर कलमे बांधून देण्यांत आली आहेत.

भाजीपाल्याची लागवडही या भागांत वाढत असून ३५० रु. चें बियाणें शेतकऱ्यांना पुरविण्यांत आले आहे.

पीक स्पर्धांत येथील शेतकऱ्यांनी अहमहीकेनें भाग घेऊन पुढील प्रमाणें उत्पन्न काढून दाखविले आहे.

रब्बी बटाटा	एकरी	३८९½ मण.
रब्बी ज्वारी	,,	८७ मण.
रब्बी गहूं	,,	३३ मण.
खरीप भात	,,	९०¾ मण.
खरीप बाजरी	,,	३४ मण.

पशु संवर्धन—जनावरांचे पैदाशीसाठीं १२ खिलार जातीचे वळू सवलतीच्या दरानें पुरविण्यांत आले असून शेतकऱ्यांनी आपल्या खर्चानें आणखी ३६ गांवीं चांगले वळू ठेवले आहेत. धामणी येथें ग्रामस्थांनी वर्गणी देऊन जनावरांचा दवाखाना चालविला असून आंबेगांव येथेही दुसरा दवाखाना लवकरच काढण्यांत येणार आहे.

सुधारलेल्या जातीचे ९५७ कोंबडे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानें पुरविण्यांत आले असून सुधारलेल्या कोंबड्यांचीं १७ केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. ७७०० पेक्षा अधिक रुपये शेतकऱ्यांना या कामीं आतांपावेतो कर्जाऊ देण्यांत आले आहेत. दुभती जनावरें विकत घेण्यासाठीं ७,५५० रु. चीं कर्जें देण्यांत आली आहेत. मंचर येथे जनावरांच्या कृत्रिम पैदाशीचें केंद्र उघडण्यांत येत आहे.

पाणी पुरवठाः— विकास योजनेमार्फत दिलेल्या कर्ज आणि मदतीच्या रकमेंतून तालुक्यांत १९४ नव्या विहिरी बांधण्यांत आल्या असून ९८ जुन्या विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या आहेत. याशिवाय शेतकऱ्यांनी स्वखर्चानें ३२१ नव्या विहिरी बांधल्या आहेत.

बारा नवे बंधारे लवकरच बांधण्यांत येणार असून जुन्या आठ बंधाऱ्यांची डागडुजीही करण्यांत येणार आहे.

आरोग्यः— आंबेगांव, तळेघर, महाळुंगे-पडवळ, निरगुडसर आणि धामणी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केन्द्रें सुरू करण्यांत आलीं असून मंचर येथील आरोग्य केंद्र संस्थेस ५००० रु. मदत देण्यांत आली आहे. इतरत्र दाया आणि ग्रामसेविका यांच्यातर्फें बालसंगोपन, प्रसूति आणि संतति नियमन इ. बाबतींत सहाय्य देण्यांत येते.

पिण्याचें पाणीः— पिण्याच्या पाण्यासाठीं १८ गांवी नवीन विहीरींचे काम हातीं घेण्यांत आले असून ८ जुन्या विहीरींची दुरुस्ती करण्यांत येत आहे. घोडेगांव व मंचर येथें नळानें पाणी पुरविण्यासाठीं योजना आखण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस पिण्याच्या पाण्याची सोय सर्व गांवी करण्यांत येणार आहे.

शिक्षणः— विकास योजनेंत शालागृहासाठीं २४ खोल्यांचें बांधकाम हातीं घेण्यांत आलें आहे. तसेच घोडेगांव येथील हायस्कूल इमारतीसाठीं २०,००० रु. मंजूर करण्यांत आले आहेत. मंचर येथील हायस्कूलसाठीं राज्य शिक्षण खात्यानें ४०,००० रु. मंजूर केले आहेत. जिल्हा स्कूल बोर्डातर्फे तालुक्यांत शाळांच्या २१ खोल्या बांधून पुऱ्या करण्यांत आल्या आहेत. नांदूर येथील ग्रामस्थ स्वखर्चानें तीन खोल्यांची शाळा बांधत आहेत.

तालुका मागासलेला भाग असतानाहि प्राथमिक शाळा प्रमाण पत्र परिक्षांचे निकाल जिल्ह्यांत पहिल्या क्रमांकाचे आहेत. धामणी, शितोळी व पेठ येथें नवीन माध्यमिक शाळा सुरू करण्यांत आल्या आहेत. धामणीच्या हायस्कूलला जोडून वसतीगृह उघडण्यांत आलें आहे.

साक्षरतेचें प्रमाण फक्त १६ टक्के आहे. जिल्हा प्रौढ साक्षरता मोहीमेनुसार तालुक्यांत १२७ प्रौढ वर्ग सुरू करण्यांत आले आहेत.

धामणी येथें तालुका वाचनालय गेलीं २५ वर्षें चालविलें जात असून इतर २६ ग्रामीण वाचनालयें नव्यानें सुरू करण्यांत आली आहेत.

तालुक्यांत ९२ शेतकरी संघ, ४४ भजन मंडळे, ३४ युवकदले, २८ महिला मंडळे, १६ बालवाड्या नव्यानें सुरू करण्यांत आल्या आहेत.

रस्तेः— सातगांव पठार भागांत ९ मैल लांबीच्या रस्त्याचें काम हजारो लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें श्रमदान करून पुरें केलें आहे. याशिवाय पिंपळगांवतर्फें महाळुंगे ते मंचर, माळवाडी-मुळवाडी, मंचर-जिधुरवाडी, घोडेगांव-जुन्नर या रस्त्यांची कामेहि चालू आहेत. इतर १२४ फर्लांग लांबीचे जोड रस्ते करण्यांत आले आणि ७९ फर्लांग लांबीचे नवे रस्ते तयार करण्यांत आलें.

सहकारः— तालुक्यांत विकास योजना सुरू होण्यापूर्वी ३४ सहकारी सोसायट्या होत्या व त्यांची सभासद संख्या आणि शेअर भांडवल अनुक्रमें ४४९५ आणि २४५९९५ रु. होते. गेल्या दोन वर्षांत आणखी ३२ नवीन सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आणि सभासद संख्या व शेअर भांडवल अनुक्रमें ८९१५ आणि ४१६३३९ रु. पर्यंत नेण्यांत आलें.

रांजणी, वळती, लखनगांव आणि कारापूर येथें ४ सामुदायिक शेती संस्था स्थापण्यांत आल्या असून त्यांचे १५५ सभासद आहेत.

कुटिरोद्योग व औद्योगिक सहकार—पेठ, आंबेगांव व अवसारी येथें महिला मंडळा-
तर्फे तीन महिने मुदतीचा शिवण वर्ग चालविण्यांत येऊन ९८ भगिनींना शिवणकाम शिकविण्यांत
आले. मंचर व अवसरी येथें १ वर्ष मुदतीचे शिवणवर्ग घेण्यांत आले. ३७ गरजू स्त्री-पुरुषांनीं
त्याचा फायदा घेतला. अवसरी येथें लोकर विणकामाचा शिक्षणवर्ग सुरू करण्यांत आला असून त्यांत
१३ विद्यार्थी आहेत. कळंब येथें कातडी कमावण्याचा शिक्षण वर्ग लवकरच सुरू करण्यांत येत आहे.
ऑईल इंजिन्स दुरुस्त करण्याचें शिक्षण चार विद्यार्थ्यांनीं पुरें केलें असून आणखी ८ विद्यार्थ्यांस
त्यासाठीं पुण्यास पाठविण्यांत आलें आहे. बाहुल्या बनविण्याचें शिक्षण घेण्यासाठींहि एका महिलेस
मुंबईस ७० रु. शिष्यवृत्ती देऊन पाठविलें आहे.

शिरूर तालुका

पुणें जिल्ह्यांतील शिरूर तालुका हा दुष्काळी आणि मागास समजला जातो. ७९ गांवे
आणि १ लाखावर लोकसंख्या असलेल्या या तालुक्यांत एप्रिल १९५७ पासून विकास योजनेचे पर्व
सुरू झाले. या भागांतील जागरूक शेतकऱ्यांनीं अहमहीकेनें विकास कार्यांत पुढाकार घेऊन मंजूर
झालेल्या १८ लाख रु. पैकीं साडे दहा लाखावर रकमेचा विनियोग अडीच वर्षांचे अल्पावधीत
केला आहे. जनतेनें श्रम, वर्गणी किंवा साहित्य या स्वरूपांत याच काळांत दीड लाख रु. किंमतीची
कामें करून दाखविलीं आहेत.

शेतीः-- रबी ज्वारी हें शिरूर भागांतील प्रमुख पीक आहे. ज्वारीचे मालदांडी
(एम्. ३५-१) हें बियाणें शेतकी खात्यानें संशोधन करून उत्कृष्ट ठरविलें असल्यानें तालुक्यांतील
प्रत्येक शेतकऱ्याला सुलभ रितीनें तें मिळावें म्हणून तालुका खरेदी विक्री संघातर्फे त्याचे वांटप केले
जाते. गेल्या हंगामात संघानें ६०० मण बीयाणे वांटप केले. बाभुळसर, बु. निमोणे (कोंढापुरी व
बाभुळसर खुर्द या गांवानी तर गांवच्या सर्व जमिनीत हे नवीन बियाणें पेरलें, तर मांडवगण,
इनामगांव, तांदळी नागरगांव व रांजणगांव सांडस या गांवांनाही ५० टक्क्याहून अधिक जमिनींत
मालदांडी ज्वारी पेरली आहे. शेतकऱ्यांना आजपर्यंत एकूण वेगवेगळ्या पिकासाठीं ११,३३६ मण
सुधारलेले बियाणें वाटण्यांत आले.

अवजारें—तालुक्यांतील प्रगतिशील शेतकऱ्यांना कोरडवाहू पद्धतीचीं ३३७ सुधारलेलीं
अवजारें वांटण्यांत आली. कित्येक शेतकऱ्यांनी अशीं अवजारे स्वतःच बनवून घेतलीं आहेत.
मांडवगण, फराटा, आंबळे, शिरूर, धामारी आणि केंदूर येथील सहकारी संस्थांनी अशी अवजारे
शेतकऱ्यांच्या उपयोगासाठीं ठेवलीं आहेत.

रासायनिक खतें—तालुक्यांत आतांपर्यंत २३३८७ मणाहून अधिक रासायनिक खतांचे
वांटप करण्यात आले. शिरूर येथील सहकारी संस्थेनें रासायनिक खते वांटपाचें कार्य हातीं घेतले
आहे. या खतांच्या वाढत्या प्रसारामुळें मागणी वाढत आहे. म्हणून मांडवगण, तळेगांव (ढ) व
पाबळ येथेहि खत वांटपाची व्यवस्था करण्यांत आली आहे. हिरव्या खताचा वापर वाढावा म्हणून
तागाचे बीहि सवंलतीच्या दरात पुरविले जाते.

खतें—कंपोस्ट खत आणि शेणखत वापरण्याकडे शेतकऱ्यांची प्रवृत्ती वाढावी म्हणून विकास गटातर्फें प्रयत्न चालू आहेत. दीड हजारावर कंपोस्टचे खड्डे आणि एक हजारावर शेणखताचे खड्डे शास्त्रोक्त पद्धतीनें शेतकऱ्यांकडून भरून घेण्यांत आले आहेत. ग्रामपंचायती मार्फतहि १ हजारावर खड्ड्यांतून खत तयार करण्यांत येत आहे.

पीक संरक्षण—तालुक्यांतील ग्रामसेवकांकडे औषधी फवारे मारण्याचीं १५ यंत्रें ठेवण्यांत आलीं असून गरजू शेतकऱ्यांना ती विनामूल्य देण्यांत येतात. बियाण्यांवर कीड पडूं नये म्हणून त्यावर प्रक्रिया करण्यासाठींहि चार अवजारे (सीड डम्स) विकत घेण्यांत आलीं आहेत. कीडनाशक द्रव्यांचा वापर शेतकरी अधिकाधिक प्रमाणांत करीत असून केवळ गंधकच ५००० पौंडावर सवलतीच्या दरांत पुरविण्यांत आले आहे.

प्रात्यक्षिकें—प्रत्येक ग्रामसेवकाकडे शेती प्रात्यक्षिकासाठीं अद्यावत् अवजारें ठेवण्यांत आलीं असून आजपर्यंत २६० वर प्रात्यक्षिकें शेतवार घेण्यांत आलीं आहेत. ५८८ शेतांवर वेगवेगळी पिकें सुधारलेल्या पद्धतीनें घेण्यांत आल्यानें त्यांचा प्रसार होण्यास मोठीच मदत झाली आहे.

शेतकऱ्यांमध्यें फळे आणि भाजीपाला पिकविण्याची प्रवृत्ति वाढावी म्हणून त्यांना बियाणें, खतें, तांत्रिक सल्ला वगैरे स्वरूपांत मदत केली जाते. त्यामुळें असे क्षेत्र वाढत असून फळबागांचे क्षेत्र २५० एकरावर आणि भाजीपाल्याचें क्षेत्र ७०० एकरावर गेलें आहे. तालुक्यांत शेतकऱ्यांनीं सामुदायिकरीत्या दोन वर्षांत १५००० वर झाडें लावलीं आहेत.

बांधबंदिस्ती:—तालुक्यातील दोन लाख एकर क्षेत्रापैकीं तीन चतुर्थांशाइतक्या जमिनीस शास्त्रोक्त पद्धतीने ताली घालण्यांत आल्या आहेत यापैकीं ५८००० एकर क्षेत्राचं काम गेल्या अडीच वर्षांत झाले आहे.

तालुक्यात पाटबंधाऱ्याची मोठी योजना होणें फारसे शक्य नसल्यानें विहिरीवरच बागायत क्षेत्र वाढविणें हा एकच पर्याय उत्पादन वाढीसाठीं शक्य आहे. जमिनींना मोठ्या प्रमाणावर ताली घालून झाल्या असल्यानें पाणी लागण्याचॊ शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून तालुक्यांत गेल्या वर्षींपासून विहिरी खोदण्याची मोठी योजना हातीं घेण्यांत आली. शेतकऱ्यांना २५०० रु. पर्यंत कर्ज यासाठीं देण्यांत येते. एका वर्षात १७४० विहिरी खोदण्याचें काम तालुक्यांत हातीं घेऊन येथील शेतकऱ्यांनी आपल्या कर्तबगारीची चुणूक दाखविली आहे. या विहिरींपैकीं १२०० वर विहिरींना पाणी लागले आहे.

याशिवाय विकास योजनेतर्फें १४० नव्या विहिरी घेण्यांत आल्या असून ५२ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली आहे. शेतीस पाणी देण्यासाठीं १६४ ऑईल इंजीन्स पुरविण्यांत आली आहेत. वरील सर्व योजनांमुळें ३००० वर एकर जमिनीस पाणी पुरविणें शक्य होईल.

पशुधनः—खिलार जनावरेच या भागांत अधिक उपयुक्त असल्यानें त्यांच्या पैदास वाढीसाठीं प्रयत्न करण्यांत येत आहेत. ४००० वर गांवठी बैल खच्ची करण्यांत आले आणि ४४ शुद्ध खिलार वळू गांवांना सवलतीच्या दरांत पुरविण्यांत आले आहेत. मेंढ्या पाळण्याचा व्यवसाय तालुक्यांतील धनगर लोक करतात. त्यांना सुधारलेल्या जातीच्या ९ रॅम आणि ४८ मेंढ्या सवलतीच्या दरांत पुरविण्यांत आल्या आहेत. ७२२ सुधारलेल्या जातीच्या कोंबड्या आणि २५०० वर अंडीं पिले काढण्यासाठीं शेतकऱ्यांना देण्यांत आलीं. १६ कुक्कुट संवर्धन केंद्रें विकास योजनेच्या सहाय्यानें उघडण्यांत आलीं आहेत.

जनावरावर औषधोपचार करण्यासाठीं २ कवठे व शिरूर येथें नवीन दवाखाने सुरु करण्यांत आले. ५७००० वर जनावरांना रोगप्रतिबंधक औषधें टोंचण्यांत आलीं.

आरोग्यः— कवठे आणि न्हावरे या दोन मध्यवर्ती ठिकाणी दवाखाने व प्रसूतिगृहें सुरू करण्यांत आली. त्यासाठीं नवीन इमारतीहि ग्रामस्थांच्या सहकार्यानें बांधण्यांत आल्या आहेत. गणेगांव खालसा येथें नवीन औषधोपचार केंद्र उघडण्यांत आले आहे.

पिण्याच्या पाण्यासाठीं दोन नव्या विहिरी बांधण्यांत आल्या असून १८ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली आहे. ३३ विहिरींची कामे चालू आहेत.

६४ संडास बांधण्यांत आले. ३१४ शोषखड्डे घेण्यांत आले आणि न्हावरे वगैरे गांवी ४०९ यार्ड लांबीची गटारे बांधून घेण्यांत आली.

शिक्षणः— विकास योजनेच्या सुरवातीनंतर कर्डे, निमोणे व कवठे या तीन प्राथमिक शाळांचे शेतकी मूलोद्योग शाळांत रूपांतर करण्यांत आले. २९ गांवांत ८० खोल्यांच्या नवीन शाळा ग्रामस्थांच्या सहकार्यानें बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें असून त्यापैकीं २९ खोल्यांचे बांधकाम पुरें झालें आहे.

समाज शिक्षणः—प्रौढ साक्षरता मोहीमेनुसार तालुक्यांतील प्रत्येक खेड्यांत समाज शिक्षण वर्ग सुरू करण्यांत आले आहेत. सध्या १२१ वर्ग चालू आहेत. आमळे या गांवातील ८० टक्क्यावर प्रौढ साक्षर झाले असून थोड्याच दिवसांत गांवातील १०० टक्के प्रौढ साक्षर होतील.

तालुक्यांत २६ तरुण मंडळें, १४ महिला मंडळें, २८ वाचनालयें, ३ कलापथकें, ५१ भजनी मंडळें, आणि दोन बालवाड्या सुरू करण्यांत आल्या आहेत.

शिरूर तालुक्यांतील प्रत्येक गांवानें ग्रामीण रेडिओ वर्गणी योजनेनुसार रेडिओ घेतला असून भारतांत या क्षेत्रांत नवीन आदर्श निर्माण केला आहे. तालुक्यांत ७९ गांवें आहेत, पण रेडिओंची संख्या ८९ वर गेली आहे. कोंढापुरी, माळीमळा वगैरे सहा गांवीं नभोवाणी शेतकरी मंडळाचें कार्य चांगलें चालू आहे.

रस्ते—तालुक्यांत विकास अधिकाऱ्यांचे सहकार्यानें १ मैल ३ फर्लांगाचा भामर्डे ते रांजणगांव गणपती हा रस्ता ग्रामस्थांनीं तयार केला असून साडेसोळा मैलांचे इतर रस्तेहि दुरुस्त करण्यांत आले आहेत.

सहकार—समाजविकास गट सुरू होण्याअगोदर शिरूर तालुक्यांत ४३ सहकारी सोसायट्या होत्या. गेल्या अडीच वर्षांत २६ नवीन सहकारी संस्था सुरू करण्यांत आल्या असून ४६४८ नवीन सभासद करण्यांत आलें. शेअर भांडवलांतहि १,८४,६७१ रु. ची वाढ झाली आहे.

नांगरगांव येथील सहकारी घरबांधकाम संस्थेस ३०,००० रु. कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे.

छोटे उद्योगधंदे—शिरूर येथें वाखापासून वस्तू बनविण्याचा वर्ग घेण्यांत आला तर गारकोलवाडी येथें लोकर विणकामाचा वर्ग घेतला गेला. तळेगांव ढमढेरे येथें शिवणकामाचा वर्ग घेण्यांत आला आणि तोच पुढें न्हावरे येथें सुरु करण्यांत आला. पाबळ येथें सुतारकाम लोहारकामाचा वर्ग आणि याशिवाय साबण तयार करणें, खडू करणें याविषयीचे शिक्षणहि ग्रामीण भागांतील स्त्री पुरुषांना देण्यांत आलें.

वरील वर्गात एकूण ४६० लोकांना ट्रेनिंग देण्यांत आलें. छोट्यां उद्योगधंद्यासाठीं ५००० रु. कर्ज कुशल कारागिरांना देण्यांत आलें.

शिरूर तालुक्यांतील जनतेनें सक्रीय सहकार्य दिल्यामुळें पुणें विभागांतील समाज विकास गटांत शिरूर तालुक्याचा क्रम बराच वर लागला आहे.

भोर वेल्हे विकासगट

भोर-वेल्हे विकास गटांत आक्टोबर १९५८ पासून विकास पूर्व गट सुरू झाला आणि त्याचें रूपांतर आक्टोबर १९५९ मध्यें प्रथमावस्थेंत झाले. ३१० गांवे व लोकसंख्या १,०१,१०२ असलेल्या या भागाच्या विकासासाठीं सरकारतर्फें पांच वर्षांत १८ लाखावर रु. खर्च होणार आहेत.

एक वर्षाच्या अल्पावधीत विकास गटातर्फें शेतीला प्राधान्य देऊन पुढील कार्य झाले आहे.

सुधारलेलें बियाणें वांटपः—

(या भागातील प्रमुख पिक भात हेंच आहे.)

भात	४३६ मण	हिरवळीचे खत बियाणे	२५ मण
गहूं	२३ मण	कीडनाशक औषधे	२७७ पौंड
ज्वारी	३५ मण	**इतर**	
इतर	१० मण	लोखंडी नांगर व पाभरी	१३६०
रासायनिक खतें वांटप		कंपोस्ट खड्डे	२२३४
अमोनिअम सल्फेट	२००९ मण	ऑईल इंजिन्स पुरविलीं	१७
सुपर फॉस्फेट	१७११ मण	सुधारलेले वळू पुरविले	११५
पेंड	६५७ मण	सुधारलेले कोंबडे पुरविले	१९५

२८ एकर पडीक जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली आणि ६०७ एकर क्षेत्रास टेरेसिंग करण्यांत आले.

आरोग्यः—पिण्याच्या पाण्यासाठीं एक विहिर बांधण्यांत आली आणि ६ दुरुस्त करण्यांत आल्या.

दळणवळणः—१५२ फर्लांगाचे नवीन कच्चे जोडरस्ते तयार केले आणि १०५ फर्लांगाचे रस्ते दुरुस्त करण्यांत आले.

ग्रामोद्योग व सहकारः—सहकारी पद्धतीवर विटांच्या सात भट्या नव्यानें सुरू करण्यांत आल्या. खेड्यातून ४९ अंबरचरखे शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा म्हणून दिले. ३५ नवीन सहकारी संस्था स्थापन केल्या. त्यांचे २६०० वर सभासद नोंदले.

समाज शिक्षणः—खेड्यांतील तरुण, शेतकरी, महिला यांना वेळोवेळीं एकत्र आणावे म्हणून त्यांच्या संघटना केल्या आहेत. तालुक्यांत अशा संस्था पुढील प्रमाणें आहेत. तरुण मंडळें ७४, शेतकरी संघ २५०, महिला मंडळें १०, बालवाड्या १२, वाचनालयें ४, प्रौढ साक्षरता मोहिमेनुसार तालुक्यांत १०० हून अधिक साक्षरता वर्ग सुरू करण्यांत आले आहेत.

बारामती, इंदापूर, खेड, जुन्नर, दौंड, मावळ, मुळशी या तालुक्यांत विकास योजनेस नुकतीच सुरवात झाली आहे.

सर्वोदय

पुणें जिल्हांतील सर्वांत मागासलेल्या मुळशी तालुक्यांतील मुठे बेलवडे, कोळवण, घोरवडे या खोऱ्यांतील चौपन्न गांवांच्या सर्वांगिण विकासासाठीं १ ऑगस्ट १९५१ पासून पिरंगुट येथें सर्वोदय केंद्र सुरू करण्यांत आले. स्वावलंबन, सहकार, आत्मविश्वास इ. गुणाबरोबरच माणुसकी आणि शेजारधर्म या गांधीजींच्या सर्वोदयी विचारसरणीचा प्रचार आणि प्रसार केंद्रामार्फत गेलीं दहा वर्षें केला जात असून खेडूतांच्या सहकार्यानें पुढील कार्यें केंद्रानें केलीं आहेत.

रस्ते:— ३३ गांवांसाठीं ३२$\frac{1}{2}$ मैल लांबीचे रस्ते ग्रामस्थांनीं श्रमदानानें केले असून बारमाही वाहतूकीच्या सोयींसाठीं ५ पूल बांधण्यांत आले आहेत.

शेती सुधारणा:— पाट-बंधारे-शेतीस पाणी देण्याकरितां १७ पक्के बंधारे आणि २७ कच्चे बंधारे बांधण्यांत आले. केंद्रातर्फे दोन अिंजिन पंप सवलतीच्या दरानें गरजू शेतकऱ्यांना भाड्यानें देण्यांत येतात. दरसाल १५० ते २०० एकरांतील पावसाअभावीं सुकणारी पिकें वांचविण्यास त्यांचा बहुमोल उपयोग होतो.

मुख्य पीक तांदूळ असल्यानें जपानी भातशेतीच्या पद्धतीचा प्रचार करण्यांत येऊन शेतकऱ्यांना त्यासाठीं खते आणि जरुरीपुरतें कर्ज देण्यांत येतें. सालीना दिलेल्या कर्जाची रक्कम ४००० रु. वर असते.

जोडधंदे—पूर्वी चरखा माहित नसलेल्या या भागांतील खेडुतांना सूत कातण्याचें शिकविण्यांत आलें. आज २०० चरखे व दोन हातमाग यांवर खादीचें उत्पादन होतें. अंबर चरखा चालविण्याचें शिक्षण आतापर्यंत ३६ स्त्रियांना देण्यांत आलें आहे. सुधारलेल्या जातीच्या कोंबड्यांचा प्रसार पंधरा गांवांतून झाला असून त्याकरितां पक्षी आणि अंडी सर्वोदय केंद्रातर्फे सवलतीच्या दरानें देण्यांत आलीं. नद्या नाल्यांतून वाया जाणाऱ्या लव्हाळ्यापासून चटया विणण्याचें काम १५ मुलांना शिकविण्यांत आलें असून सध्यां चार माग चालू आहेत. हातसडीच्या तांदळाचा वापर करण्याचा प्रचार केंद्रातर्फे केला जातो. तांदूळ सडण्याचें काम हंगामांत १०० स्त्रियांना पुरविण्यांत येतें. डोंगराळ भागांत पावसाळ्यांत भरपूर पाऊस पडत असला तरी उन्हाळ्यांत पिण्याच्या पाण्याचें दुर्भिक्ष नेहमींच जाणवतें. केंद्रातर्फे ६३ विहिरी बांधून देण्यांत आल्यामुळें या भागांतील लोकांना पुरेसें पाणी उन्हाळ्यांत देखील पिण्यासाठीं मिळूं लागलें आहे.

गांवांत स्वच्छता रहावी आणि मलमूत्राचा खतासाठीं उपयोग करण्याची प्रवृत्ती वाढावी म्हणून १७ गांवांत ३७ संडास बांधून देण्यांत आले आहेत. याशिवाय ६ गोपुरी पद्धतीचे संडासहि बांधण्यांत आले आहेत.

केंद्रातर्फे पिरंगुट येथें दवाखाना चालविण्यांत येतो. या दवाखान्यांतून ४०,००० वर रोग्यांवर बाह्य उपचार केले असून २४३ रोग्यांना दवाखान्यांत ठेवून घेऊन त्यांच्यावर उपचार करण्यांत आले. प्रसूति केंद्राचा लाभ १५० वर स्त्रियांनीं घेतला आहे. घोटवडे येथें बाजारच्या दिवशीं डॉक्टरांकडून वैद्यकीय मदत दिली जाते.

शिक्षणः—केंद्रातर्फे प्रौढ स्त्री पुरुषांना साक्षर करण्यासाठीं नियमित वर्ग चालविण्यांत येतात. त्यांचे ३९ मेळावें, शिबिरें घेण्यांत येऊन तज्ज्ञांकडून दैनंदिन जीवनाविषयीं मार्गदर्शन करण्यांत येतें. १३ गांवांतून वाचनालयें चालविलीं जातात. पिरंगुट येथें बालवाडी चालविण्यांत येते. पांच गांवांतील ३०० मुलांना रोज पावडरचे दूध विनामूल्य वाटण्यांत येतें. पांच गांवांत ड्राय बोर्डिंग चालविलीं जातात. या बोर्डिंगांत मुलें स्वतःचे जेवण आणून अभ्यासासाठीं राहतात. दोन युवक मंडळे व दोन महिला मंडळें केंद्रातर्फे स्थापन करण्यांत आलीं आहेत.

सहकारः—१) जंगल कामगार सोसायटी, २) मजूर सोसायटी, ३) चर्मकार सोसायटी, ४) विधायक सेवामंडळ अशा चार सहकारी संस्था केंद्राच्या कार्यकर्त्यांनीं स्थापन केल्या असून त्यांचें कार्य यशस्वीरित्या चालू आहे.

केंद्रातर्फे पिरंगुट व उरवडे येथें स्वस्त धान्याचीं दुकानें काढण्यांत आली आहेत. गरजू आदिवासींना केंद्रातर्फे खावटीच्या रूपानें आर्थिक मदत व धान्य दिलें जाते. १५० वर लोकांना अशी मदत देण्यांत आली आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम, निरनिराळे राष्ट्रीय व धार्मिक सण केंद्रातर्फे साजरे केले जातात. यावेळीं गांवोगांवच्या लोकांना एकत्र आणून लोकरंजनातून लोकशिक्षणाचे कार्य केले जाते. दरसाल होणाऱ्या जिल्हा प्रदर्शनांत सर्वोदय केंद्रातर्फे भाग घेऊन कार्याचें दिग्दर्शन केलें जातें.

मुळशी धरण विभाग सर्वोदय केंद्र

मुळशी धरणामुळें अलग झालेल्या भागाकरितां ही सर्वोदय योजना १० वर्षांपूर्वीं सुरू करण्यांत आली. हा भाग पूर्ण मागासलेला असून बाहेरील जगाशीं त्याचा औद्योगिक व सांस्कृतिक संबंध तुटलेला आहे. अशा या मागास भागांतील लोकांच्या सर्वांगिण विकासासाठीं सर्वोदयातर्फे शाळा, दवाखाने आणि सांस्कृतिक शेतकी विषयक सुधारणा अशा तऱ्हेचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला.

पुणें जिल्ह्याच्या पश्चिम बाजूस २० मैलावर मुळशी धरणावर गेल्यानंतर समोरच्याच डोंगरावर दिसणाऱ्या लहान लहान झोपड्यांनीं युक्त असलेल्या वाघवाडी या गांवीं सर्वोदय योजनेचें प्रमुख केंद्र आहे. या केंद्राखालीं एकूण १४ गांवें असून त्यांची लोकसंख्या १,५०० आहे व शिवाय आजूबाजूच्या वसत्या, वाड्या आणि खेडी मिळून २,००० लोकांना या केंद्राचा फायदा मिळूं शकतो. या केंद्राचे एकूण ४ विभाग केलेले आहेत. १) वान्द्रा, २) वडगांव, ३) पिंपरी आणि ४) निवे.

या केन्द्राखालीं सध्यां ५ प्राथमिक शाळा चालू असून त्यांतील वाघवाडी येथील शाळा ७ व्या इयत्तेपर्यंत आहे. येथें आजूबाजूच्या विद्यार्थ्यांकरितां एक वसतिगृह चालू करण्यांत आलें आहे. याशिवाय समाज शिक्षणाचे व प्रौढ शिक्षणाचे कांहीं वर्गहि चालविण्यांत येतात. शेतकी मदतनीसाचीहि नेमणूक करण्यांत येऊन त्याच्या मार्गदर्शनाखालीं शेतकीविषयक ज्ञान देण्याचा एक वर्ग गेल्या वर्षीं घेण्यांत आला होता. सदर भागांतील जंगल तोड झालेल्या भागामध्यें लागवडीस योग्य अशी ५० ते ६० एकर जमीन करून घेण्यांत आली असून आज तिथें भात शेतीचें उत्पादन चालू आहे.

या केन्द्राच्या मार्गदर्शनाखालीं वांद्रा विविध कार्यकारी सहकारी सोसायटी स्थापन झाली असून सोसायटीनें हिरडा, आवळस, बांबू इत्यादि जंगलांत उत्पादन होणाऱ्या वस्तू तेथील

जनतेच्या हिताकरितां पुण्याच्या बाजारपेठेंत आणून विकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच काजू, स्ट्रॉबेरी, हापूस, आंबा इत्यादि झाडांची शास्त्रीय लागवड करण्याचा प्रयोग चालू आहे. मधूमक्षीकापालनाची सुरवातहि केंद्रातर्फे करण्यांत आली आहे. वाघवाडी येथें दवाखाना चालू करण्यांत आला असून या दवाखान्याचा फायदा दरसाल सुमारें ३०० रोगी घेतात. त्याप्रमाणें प्रसूतिगृहाचीहि याठिकाणीं सोय करण्यांत आली आहे. नेत्रदान यज्ञहि वर्षांतून एक दोन वेळां घेतले जातात. त्याचाहि फायदा येथील लोकांना भरपूर मिळतो. दळणवळणाच्या सोयीच्या दृष्टीनें हा भाग अतिशय डोंगरी असूनहि खेड्यांना जोडणारे रस्ते तयार करण्यांत आले आहेत. वाघवाडी येथें वर्धापद्धतीचे संडास बांधण्यांत आले आहेत. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व गणेशोत्सव इत्यादि सांस्कृतिक कार्यक्रमहि वेळोवेळीं घेण्यांत येतात.

सर्वोदय योजनेच्या प्रयत्नांतून मुळशी धरणाच्या अलिकडे एक मोठें आरोग्य केंद्र स्थापन करण्याचा विचार असून त्यासाठीं जमीन आणि जरूर ती आर्थिक मदत उपलब्ध होत आहे.

मुळशी सर्वोदयातर्फे आखण्यात येणाऱ्या विविध योजनांवर २० हजार रु. पर्यंत दरसाल सरकारतर्फे खर्च करण्यांत येतो; याशिवाय स्थानिक जनतेनें वर्गणी आणि श्रमरूपाने शेंकडो रु. ची कामें आजपर्यंत पुरी केली आहेत.

कल्याण विस्तार योजना

केंद्रीय समाज कल्याण बोर्डातर्फे अकरा सदस्यांची पुणें जिल्हा समाज कल्याण समितीची स्थापना करण्यांत येऊन १५ ऑगस्ट १९५४ पासून जिल्ह्यांत स्त्रिया, बालकें, अपंग आणि निराधार यांच्या प्रगतीसाठीं विविध योजना हातीं घेण्यांत आल्या.

समितीनें हवेली आणि मावळ तालुक्यांतील किवळे, रावेत, गहूंजे, साळूंब्रे आदि तेरा गांवे निवडून तेथें बालवाड्या, दूधकेंद्रे, शिवण वर्ग, प्रौढ वर्ग, आरोग्य केंद्रें वगैरे समाजोपयोगी योजना सुरू केल्या. या योजनांना जनतेचें सक्रिय सहाय्य मिळालें हें पुढील दैनंदिन उपस्थितीवरून लक्षांत येईल.

गांव	बालवाडी	दूध केंद्रें	शिवण वर्ग	प्रौढ वर्ग	आरोग्य केंद्रें
किवळे	३०	७०	२०	१२	२५
रावेत	३५	७०	२०	१५	२०
गहुंजे	२५	७०	१५	१०	१०
साळुंब्रे	४५	७०	१२	१२	१५
गोडुंब्रे	३०	७०	१२	१०	१०

अिमारती——केंद्राचे कामासाठी किवळे, रावेत, गहुंजे आणि साळूंब्रे येथें अिमारती बांधण्यांत आल्या असून त्यासाठीं केंद्रीय बोर्डाचे प्रत्येकी ४००० रु. रोख मदत ग्रामस्थांना दिली आहे; या मदतीवर किवळे येथे लोकांनी ९४०० रु. किंमतीची अिमारत बांधली. अितरही ग्रामस्थांनी अिमारतींसाठीं श्रम आणि वर्गणी रूपानें सहाय्य दिले.

उद्योगधंदे——केंद्रातर्फे साबण तयार करणें, सूत कांतणें, शिवणकाम इ. चे शिक्षण माहिलांना देण्यांत आले आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम वेळोवेळीं करण्यांत येतात. खेळ, गाणी, भजनें, ओव्या तसेंच हळदी-कुंकू आदींचा त्यांत समावेश केलेला असतो. एकूण सहा शिबीरे घेण्यांत आलीं, त्यांत ५०० भगिनींनी भाग घेतला होता

बारामती प्रकल्पः–बारामती तालुक्यांतील सांगवी भागांतील दहा गांवांतून कल्याण विस्तार योजनेच्या कार्यास १५ नोव्हेंबर १९५६ पासून सुरवात झाली. योजनेतर्फे सुरू केलेल्या बालवाड्या, शिवणवर्ग, आदि कार्यांत स्थानिक जनता उत्साहानें भाग घेत असल्याचे पुढील उपस्थितीवरून दिसून येईल.

गांव	बालवाडी	दूध केंद्रे	शिवण वर्ग	प्रौढ वर्ग	आरोग्य केंद्रे
सांगवी	४०	६०	१०	१०	१५
खांडज निरा वागज	३०	५०	१०	१०	१०
मळद	३०	६०	१०	१०	२५
झारगडवाडी	३०	६०	—	१०	१०
कांबळेश्वर	३०	६०	१०	१०	१०

कल्याण विस्तार योजनेनुसार गरोदर व बाळंत स्त्रियांना वैद्यकीय मदत देण्याचें मोलाचें कार्य केलें जातें. बालसंगोपन, संततीनियमन आदि बाबतींतहि स्त्रियांना मार्गदर्शन केलें जातें.

मुख्यतः स्त्रिया आणि मुलें यांच्यासाठीं कल्याण विस्तार योजनेतर्फे चाललेल्या कार्यांत ग्रामस्थ आपुलकीनें सहकार्य देत असून ग्रामीण महिला या योजनेचा फायदा घेण्यासाठीं अधिकाधिक संख्येनें पुढें येत आहेत.

११. संकीर्ण

मार्च १९५१ अखेर पुणें जिल्ह्यांत ६१ पोस्ट ऑफिसेस् होतीं. यापैकीं ४१ ठिकाणीं तारा पाठविण्याची सोय होती. या पोस्ट कचेऱ्यांना आणखी १२४ पोस्ट ऑफिसेस् जोडलेलीं (ब्रँच) होतीं. पंचवार्षिक योजनेतील कार्यक्रमानुसार टपाल आणि तार पाठविण्याच्या सोयीमध्यें नियोजनपूर्वक वाढ करण्यांत येऊन आज पोस्ट पोस्ट ऑफीसांची संख्या ८९ झाली असून त्यापैकीं ६१ कचेऱ्यांत तारा पाठविण्याची सोय आहे. या पोस्टास जोडलेली २१३ लहान (ब्रँच) पोस्ट ऑफिसेस् आहेत.

	पोस्ट ऑफिसेस्	पोस्ट व तार ऑफिसेस्	लहान (ब्रँच) पोस्ट ऑफिसेस्
मार्च १९५१	६१	४१	१२४
मार्च १९५६	८१	४९	१६५
नोव्हेंबर १९६०	८९	६१	२१३

नवीन उघडलेल्या पोस्ट कचेऱ्यापैकीं तळेगांव दाभाडे हॉस्पिटल, बारामती बाजार, आळंदी देवाची, कद्रूस, आके पौड, खडकवासला, भवानीनगर, चाकण, वाल्ह्याची पेठ व वाल्हा या कचेऱ्या ग्रामीण भागांतील आहेत.

भिगवण वाल्ह्याची पेठ, पौड, चाकण, तळेगांव (दाभाडे) हॉस्पिटल, वाल्हा, आळे, जेजुरी या ग्रामीण भागांतील नवीन तार कचेऱ्यामुळें शेतकरी व व्यापारी यांची मोठी सोय झाली आहे.

पोस्ट आणि तार खात्यानें तयार केलेल्या वाढत्या सोयींमुळें जिल्ह्यातील गांवापैकीं ४११ गांवीं रोज टपाल वाटलें जातें, २६८ गांवीं आठवड्यांतून दोन वेळा आणि २२५ गांवीं आठवड्यांतून तीन वेळा टपाल वाटण्याची सोय झाली आहे.

पुणें जिल्ह्यांतील टेलिफोन व्यवस्था

पुणें जिल्ह्यांत बारामती आणि लोणावळा येथे स्वतंत्र टेलिफोन व्यवस्था असून तेथे प्रत्येकीं १०० टेलिफोन स्थानिक लोकांना देण्यांत आले आहेत. पुढील महत्वाच्या गावीं पब्लिक कॉल ऑफिसेस् असून त्यांचा उपयोग लोक वाढत्या प्रमाणांत करूं लागले आहेत.

१) तळेगांव दाभाडे २) देहू रोड ३) खेड ४) मंचर ५) घोडेगांव ६) नारायणगांव ७) जुन्नर ८) घोडनदी ९) तळेगांव ढमढेरे १०) नीरा ११) भोर १२) इंदापूर १३) दौंड.

पुणें शहराचें वाढते औद्योगिक व शैक्षणिक महत्व लक्षांत घेतां येथील टेलीफोन व्यवस्थेंत एकसारखी वाढ करावी लागत आहे. शिवाजीनगरला २००० टेलिफोनसाठीं नवीन एक्सचेंज उघडली असून पूर्वीच्या एक्सचेंज मध्यें ३००० टेलिफोनची सोय आहे. टेलिफोनची जादा मागणी पुरी करता यावी म्हणून पुण्याच्या एक्सचेंज मध्यें ६०० आणि शिवाजीनगरच्या एक्सचेंजमध्यें १००० टेलिफोनची सोय नव्यानें करण्यांत येणार आहे. मुंबअी–पुणें लाअीनवर जादा ताण पडत असल्यानें नअू थेट डायलिंग सर्कीट सुरू करण्यांत आली आहेत.

टेलिफोन योजनेची वाढ

अ.क्र.	वर्ष	डायरेक्ट कनेक्शन्स	एक्स्टेन्शन	प्रायव्हेट ब्रँच ए.	पी. बी. एक्स.	पब्लिक कॉल ऑफिसेस्
१	एप्रिल १९५१	१६४९	१५९	२४	८६५	७
२	एप्रिल १९५५	२१३५	३३७	३३	१२८६	१५
३	एप्रिल १९५६	२१५१	३८५	३३	१३७५	१७
४	एप्रिल १९५७	२१६६	४१५	३४	१४५६	२०
५	एप्रिल १९५८	२१७०	४२२	३४	१४५७	२५
६	एप्रिल १९५९	३३३०	४६२	३४	१५६२	२२
७	एप्रिल १९६०	३९४५	६९५	४०	१६८२	२३
८	नोव्हेंबर १९६०	४१९१	७६६	४२	१७७२	२३

राष्ट्रीय विकास कार्यास जनतेस हातभार लावतां यावा म्हणून १९४५ सालापासून बचत योजनेची सुरवात झाली. या योजनेनुसार १) बारा वर्षे मुदतीचीं नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस् ज्यावर शेवटीं ५·४१ टक्के व्याज मिळतें. २) दहा वर्षे मुदतीचीं ट्रेझरी सेव्हींग्ज डिपॉझिट सर्टिफिकेटस्, ज्यावर ४ टक्के व्याज नियमित मिळते. ३) पंधरा वर्षांची ॲन्यूईटी सर्टिफिकेटस्, ज्यायोगें ३३२५ रु. च्या पटीत रक्कम भरतां येते आणि मासिक २५ रु. च्या पटीमध्यें पंधरा वर्षांत सव्याज रकमेची परतफेड होते. ४) क्युमिलेटीव्ह डिपॉझीट, ज्यामुळें ५ रु. पेक्षां अधिक रक्कम दरमहा नियमित भरून ५ किंवा १० वर्षांनीं एकदम रक्कम सव्याज मिळते. ५) पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक, ज्यामध्यें २ रु. चक्रवाढ व्याज मिळतें, अशा प्रकारांनीं लोकांना आपल्याला वेळेवर उपयोगी पडण्यासाठीं पैसे शिल्लक टाकतां येतात.

अल्पबचत

जिल्ह्यांत बचत एजंटाचें काम करणाऱ्या ८७१ व्यक्ती असून १९५७–५८ पासून अल्पबचतीमध्यें जनतेनें पुढीलप्रमाणें रकमा गुंतविल्या आहेत.

१९५७–५८	३६,३६,१८७ रु.
१९५८–५९	५५,११,८१३ रु.
१९५९–६०	८०,७७,९८७ रु.
१९६०–६१ (डिसेंबर अखेर)	७९,५४,९१९ रु.

स्टेट ट्रॅन्सपोर्ट पुणें-विभाग

उतारू वाहतुकीच्या राष्ट्रीयकरणाच्या उद्घाटनाचा मान पुण्यास मिळाला आहे. एस्. टी. ची पहिली गाडी राज्यांत प्रथम पुण्याहूनच नगरकडे १ जून १९४८ ला गेली. यावेळीं पुणें विभागांत फक्त ३२ एस्. टी. गाड्या धावत होत्या. गेल्या बारा वर्षांत वाहतूकीच्या वाढत्या गरजेच्या सोयींसाठीं एस्. टी. कॉर्पोरेशनने अंतर्गत खेड्यापाड्यांतूनही आपल्या मोटारी चालवून जनतेची मोलाची सेवा केली आहे. आज एस्. टी. च्या पुणें विभागाकडे २५० गाड्या असून त्या १६२ मार्गावर रोज नियमित धावत आहेत. मोसमाच्या काळांत या गाड्यांतून रोज ४८००० वर उतारू एस. टी. नें नेले आहेत. चिपळूण, मुंबई, नाशिक, अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, धुळें, औरंगाबाद, अलिबाग इ. महत्वाच्या ठिकाणीं जाण्यासाठींहि पुणें विभागानें लांब मार्गावरच्या एक्सप्रेस गाड्या (महत्वाच्या स्टँडवर थांबणाऱ्या) सुरू केल्यानें उतारूंची मोठीच सोय झाली आहे.

उतारूंच्या सुखसोयींकडेही एस्. टी. कॉर्पोरेशन जागरूकतेनें लक्ष पुरवित असून या विभागांत सहा पक्क्या इमारती असलेले आणि अकरा तात्पुरत्या इमारती असलेले मोठे बस स्टँडस् बांधण्यांत आले आहेत. याशिवाय सतरा महत्वाच्या ठिकाणी उतारूंसाठीं विश्रामस्थानें आहेत. या सर्व स्टँडवर उपहारगृह, पिण्याचे पाणी, संडास आदि सोयी आहेत.

महाबळेश्वरला उन्हाळ्यांत होणाऱ्या गर्दीसाठीं खास गाड्या, आराम गाड्या वगैरे ठेवण्याची व्यवस्था तसेच तेथील सौंदर्यस्थळें दाखविण्यासाठीं नियमित गाडी चालविणें हीं कामेही पुणें विभागातर्फेंच केलीं जातात. लोणावळ्यासहि मोसमांत अशीच व्यवस्था केली जाते. मालाची ने-आण करण्याचे बाबतींतही एस्. टी. ने जलद वाहतूक करून मोठीच कामगिरी केली आहे. पुणें विभागांत अकरा ठिकाणीं पार्सलें घेण्याची आणि पोहोचविण्याची व्यवस्था आहे. याशिवाय नारायणगांव, मंचर, खेड, या ठिकाणची मालवाहतूक रेल्वेच्या सहकार्यानें केली जाते. पुणें ते कोल्हापूर पार्सल वाहतूक करणारी गाडीही आठवड्यांतून तीन वेळां जाते आणि येते.

पुणें शहरांत शिवाजीनगर, स्वारगेट आणि पुणें स्टेशन या तीन स्टँडवरून एस. टी. ची वाहतूक चालते. जिल्ह्याच्या पूर्व व उत्तर भागांतील वाहतूक शिवाजीनगर स्टँडवरून होते तर दक्षिण आणि पश्चिम भागांतील वाहतूक स्वारगेट स्टँडवरून होते. दूरच्या आणि महत्वाच्या ठिकाणी जाणाऱ्या सर्व गाड्यांत पुणें स्टेशनवर बसतां येतें.

पुणें जिल्ह्यांतील वर्तमानपत्रें

लोकमान्य टिळकांच्या केसरी–मराठा आणि आगरकरांच्या सुधारकांची परंपरा चालविणारी पुण्याचीं वर्तमानपत्रें महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतच नव्हे तर मराठी जाणणाऱ्या परप्रांतांत राहिलेल्या जनतेकडूनहि औत्सुक्यानें आणि आवडीनें वाचली जातात. शहरांत सध्यां रोज चार मराठी दैनिकें, एक सायंदैनिक व एक इंग्रजी दैनिक निघत असते. याशिवाय पांच साप्ताहिकेंहि नियमित निघत असतात.

सकाळ—डॉ. ना. भि. परुळेकर, यांच्या संपादकत्वाखालीं चालणारे हें दैनिक असून त्याची साप्ताहिक आवृत्ति ‘ रविवारचा सकाळ ’ या नांवानें निघते. ‘ स्वराज्य ’ हेंहि त्यांचेंच स्वतंत्र साप्ताहिक असून ते दर शनिवारी प्रसिद्ध होतें.

विशाल सह्याद्रि—श्री. अ. वि. पाटील यांच्या संपादकत्वाखालीं प्रकाशित होणारे दैनिक असून त्याची साप्ताहिक आवृत्ति रविवारी निघत असते.

तरुण भारत—नागपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या तरुण भारत या दैनिकाची पुणें आवृत्ति श्री. ग. वि. केतकर यांच्या संपादकत्वाखालीं निघत असते. तरुण भारताचीहि साप्ताहिक विशेष आवृत्ति रविवारीच निघते.

प्रभात—श्री. वालचंद कोठारी यांच्या संपादकत्वाखालीं निघणारे दैनिक आहे.

संध्या—हें एकमेव सायंदैनिक श्री. व. स. काणे यांच्या संपादकत्वाखालीं निघतें. तें सोमवार खेरीज रोज प्रसिद्ध होतें.

पूना डेली न्यूजः—इंग्रजींत निघणारे हें एकटेच दैनिक श्री. सी. एच. गांधी यांच्या संपादनाखालीं निघतें. हें सोमवारखेरीज रोज प्रसिद्ध होतें.

याशिवाय साधना (शनिवार), समता (रविवार), दीनबंधु (शुक्रवार) आणि अर्थ (बुधवार) हीं साप्ताहिकेंहि पुणें शहरांतून नियमित प्रसिद्ध केली जातात.

आकाशवाणी

पुण्याच्या ऐश्वर्यांत भर घालणाऱ्या ज्या कांहीं बाबी आहेत, त्यांत पुण्याच्या आकाशवाणी केंद्राचा अभिमानानें उल्लेख करतां येईल. मनोरंजनाबरोबरच ज्ञानप्रसाराचें एक प्रभावी साधन या दृष्टीनें रेडिओचें महत्त्व असाधारण आहे यांत शंका नाहीं. महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र म्हणून पुण्याचा फार पूर्वींपासून उल्लेख केला जातो. या ठिकाणीं आकाशवाणीचें केंद्र असावें ही बाब लक्षांत घेऊन सरकारनें पुणें आकाशवाणी केंद्र १९५३ मध्यें चालू केलें. या पायलट केंद्राचें उद्‌घाटन २ आक्टोबर १९५३ रोजीं महात्मागांधी जयंतीच्या सुमुहूर्तावर झालें. एक किलोवॅट शक्तीच्या ट्रान्समीटरवरून या केंद्राचे कार्यक्रम प्रसारीत करण्यांत येत होते. परंतु १९५५ मध्यें पांच किलोवॅट शक्तीचा ट्रान्समीटर सुरू करण्यांत येऊन त्यावरून कार्यक्रम प्रसारीत करण्यांत येतात.

पूर्वीं मुंबई केंद्रावरीलच ग्रामीण कार्यक्रम सहक्षेपीत करण्यांत येत असत परंतु १ जानेवारी १९५५ पासून तोहि विभाग पुणें येथेंच सुरू करण्यांत आला.

आज पुणें आकाशवाणी केंद्रावरून साधारणपणें पुणें, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, धुळे, जळगांव, नासिक, उस्मानाबाद, औरंगाबाद, भीड, आदि जिल्ह्यासाठीं कार्यक्रम प्रसारीत होत असतात.

शास्त्रीय संगीत, भाव गीतें, भाषणें, नाटकें, फीचर्स, प्रहसनें, चर्चा आदि कार्यक्रम या केंद्रावरून सादर केले जातात. कांहीं मराठी कार्यक्रम मुंबई आणि नागपूर या केंद्राच्या सहकार्यानें सादर केले जातात. तर राष्ट्रीय कार्यक्रम दिल्ली केंद्राद्वारें प्रसारीत केले जातात. पुणें केंद्रावरून १९५७ पासून फार्मफोरम कार्यक्रमही सादर केले जातात.

आज पुणें आकाशवाणीचें केंद्र शिवाजीनगर रेल्वे स्टेशन नजीक स्वतःच्या भव्यइमारतीत आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आदि विविध विभागाचें दर्शन या आकाशवाणीवर घडविण्याचा प्रयत्न केला जातो.

प्रसिद्धि कार्यालयें

पुणें विभागाचे आणि पुणें जिल्ह्याचे प्रसिद्ध कार्यालय डॉ. आंबेडकर रोडवर आहे. त्याचेमार्फत सरकारी कार्यक्रमांना आणि योजनांना वर्तमानपत्राद्वारें, सिनेमा कार्यक्रमांतून, भिंतीचित्रे व माहितीपत्रके तयार करून प्रसिद्धी दिली जाते. याशिवाय जनता संपर्क, हौशी प्रवाशांची वाहतूक, अल्पबचत, दारूबंदी प्रचार वगैरे कामेही या कार्यालयामार्फत होतात. विश्रामबाग वाड्यामध्यें छोटेसें माहिती केंद्र चालविण्यांत येत असून तेथे संदर्भासाठीं पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रें तर ठेवण्यांत येतातच शिवाय सरकारी संबंधित माहिती पुरविण्याची व्यवस्थाही आहे.

पंचवार्षिक योजना प्रसिद्धि विभागाचे कार्यालय प्रभात स्टुडिओत असून त्यामार्फत योजनेवरील चित्रपट दाखविणे व योजनेसंबंधीची सरकारी प्रकाशने प्रसारित करणे हीं कामें होतात.

ग्रामीण रेडिओ विभाग

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागामार्फत खेड्यांतून रेडिओ बसविण्याचें कार्य गेलीं कित्येक वर्षें चालू आहे. सुरवातीस जिल्ह्यांतील निवडक गांवातून वेट बॅटरीचे रेडिओ विनामुल्य बसविले जात आणि ग्रामस्थांकडून तो रेडिओ व्यवस्थित ठेवण्यापलिकडे कोणतीहि अपेक्षा नसे. १९५६ पासून मध्यवर्ती सरकारच्या सहकार्यानें राज्य सरकारतर्फें जास्तीत जास्त खेड्यांना रेडिओ पुरविता यावे म्हणून योजना आखण्यांत आली. या योजेनेनुसार ग्रामस्थांनी रेडिओ करिता १७५ रु. आणि बॅटरी, लायसेन्स, दुरुस्ती वगैरे खर्चासाठीं सालीना ६० रु. दिले तर गांवासाठीं शेकडो लोकांना एकावेळीं ऐकता येईल अशा सोयीचा रेडिओ देण्यात येतो. ही रक्कम स्थानिक ट्रेझरींत भरून चलन आणि अर्ज मामलेदार किंवा विकास अधिकारी यांचे मार्फत टेक्नीशिअन–इन–चार्ज रूरलब्रॉडकास्टिंग, पुणें १, यांचेकडे पाठवावा लागतो. अर्ज आल्यानंतर सर्व साधारणपणें एक महिन्याचे अवधीत गांवास नवीन रेडिओ मिळतो.

पुणें जिल्ह्यांत या योजेनांचा प्रसार आणि प्रचार जारीनें झाल्यामुळें ३१७ खेड्यांतून असे रेडिओ बसविण्यांत आले आहेत. महाराष्ट्र राज्यांत इतके रेडिओ घेतलेला हा एकमेव जिल्हा आहे. पुणें जिल्ह्यांतील शिरूर तालुक्यानें तर प्रत्येक गांवात रेडिओ बसवून भारतांत एक नवीनच आदर्श निर्माण केला आहे. (७९ गांवे व ८९ रेडिओ)

पुणें आकाशवाणी केंद्राच्या सहकार्यानें जिल्ह्यांत ५० वर नभोवाणी शेतकरी मंडळे चालविलीं जातात. गांवातील शेतकरी कारागीर दुकानदार इ. प्रातिनिधीक अशा २० लोकांचे मंडळ तयार करण्यांत येते. हें मंडळ रेडीओ केंद्रातर्फें मंगळवारी व शुक्रवारी सायंकाळीं ७–३० वाजतां ध्वनिक्षेपित केलेले खास कार्यक्रम ऐकून त्यावर चर्चा करतात. चर्चेंत पुढें येणारे प्रश्न रेडिओ केंद्राकडे पाठविले जातात आणि त्यावर केंद्रातर्फें कार्यक्रमांतून संयुक्तिक उत्तरे दिली जातात. नभोवाणी शेतकरी मंडळामुळें शेती सुधारणा, आरोग्य, संततिनियमन, शिक्षण वगैरे बाबतींत खेडुत जागरूक होऊं लागले आहेत. आणि अशी मंडळे आपल्या गांवीं असावीत म्हणून ठिकठिकाणाहून मागणी येत आहे.

पुणें जिल्ह्यांत बसविलेल्या रेडीओंची तालुकावार माहिती पुढीलप्रमाणें आहे.

शिरूर ८९	जुन्नर ३५	आंबेगांव ३२	खेड ३१	मुळशी २९
पुरंदर २९	इंदापूर २३	बारामती १८	हवेली १६	भोर ८
दौंड ४	मावळ २	वेल्हे १		

सावकारी नियंत्रण

पुणें जिल्ह्यांत ५६९ सावकारांची नोंद असून दरसाल लाखो रुपये कर्जाऊ देतात. तालुकानिहाय वर्गवारी पुढीलप्रमाणें :–

	१९५८		१९५९	
गांव	सावकार	दिलेले कर्ज	सावकार	दिलेले कर्ज
आंबेगांव	१३	२१,६१,११५	१४	१६,७७,५३६
बारामती	४३	१७,५४,९२४	४३	६,२१,६१०
भोर	१२	४७,१०९	१२	९९,७१६
दौंड	१०	२,५५,१९९	१०	३,०२,६९६
हवेली	२७	३,५१,००७	२३	३,१०,३७५
इंदापूर	७	७०,८९५	७	५६,५५३
जुन्नर	४७	५,१८,९६९	४५	४,४४,३६५
खेड	१६	१,०३,२३५	१९	१,२८,६२७
मावळ	१३	३,३९,८०४	१३	३,०२,२२०
मुळशी	२	८४०	२	२,५००
पुणें शहर	३६०	८९,१२,३७०	३४७	७३,५४,२२८
पुरंदर	२५	८,२१,८६२	२३	३,८१,९७४
शिरूर	९	२३,४३४	१०	४०,१०८
वेल्हे	१	१,८८६	१	––
एकूण	५८५	१,५३,६२,६४९	५६९	१,१७,२२,५०८

१२. प्रेक्षणीय स्थळें आणि जुनी व नवी तीर्थ क्षेत्रें

आळंदीः—पुण्यापासून बारा मैलावर, इंद्रायणी नदीच्या कांठीं वसलेल्या खेड तालुक्यांतील या गांवी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनीं वास्तव्य केलें होतें. येथेंच त्यांनीं समाधी घेतली. नळाचे शुद्ध पाणी, वीजेचे दिवे, मोठमोठ्या धर्मशाळा, वगैरे सोयी येथें आहेत. दरसाल कार्तिक वद्य एकादशीस येथें मोठी जत्रा भरते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून एक लाखावर लोक एकादशीस येथें येतात. यात्रेच्या वेळीं प्रत्येकास नगरपालिकेस ४० नये पैसे कर द्यावा लागतो.

बनेश्वरः—पुणें–सातारा रस्त्यावर २१ मैल अंतरावर बनेश्वराचें (महादेव) रम्य देवस्थान आहे. तेथील मंदीर पहिले बाजीराव पेशवे यांनीं बांधलें आहे. या ठिकाणीं पिण्याचे पाण्यासाठीं उत्तम तळे आहे. दाट झाडी आणि पाणी यामुळें हें ठिकाण निसर्गरम्य असें आहे.


भाजेः—मावळ तालुक्यांतील हें ठिकाण मळवली स्टेशनपासून दीड मैल अंतरावर असून तेथें २१०० वर्षांपूर्वी कोरलेली बुद्धकालीन लेणी आहे.

भीमा शंकर—बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक भीमाशंकरला असून येथील महादेवाचें जुनें मंदिर नाना फडणविसानें बांधलें आहे. मंदिरांत मोठा नंदी आणि मोठी घंटा आहे. सह्याद्रितील या स्थानाची समुद्र सपाटीपासून उंची ३४४८ फूट असून त्याच्या सभोवती बारामाही हिरवे असणारे दाट जंगल आहे. खेडपासून ३० मैल अंतरावर हें क्षेत्र असलें तरी तेथें जाण्यासाठीं नाशिक रोडवरील मंचर गांवापासून घोडेगांव–आंबेगांव मार्गें जावे लागतें. पुण्यापासून या रस्त्यानें भीमाशंकर ६५ मैल असून तेथें उतरण्यासाठीं उत्तम सरकारी बंगला आहे.

भाटघर—नीरा नदीकांठी पुण्यापासून ३३ मैलावरील या ठिकाणीं येलवंडी नदीवर मोठें धरण बांधलेलें असून धरणाचे भिंतीजवळच दोन अद्यावत सोयींनीं युक्त असे सरकारी बंगले आहेत. धरणाजवळ सुताची गिरणी, रंगाचा कारखाना वगैरे उद्योगधंदे सुरू झाले आहेत. भाटघर धरणांतून पलिकडील गांवाशी व्यापार व्यवहार लहान मोठ्या होड्यांतून चालतो. धरणामध्यें विविध जातीच्या माशांची वाढ करण्यांत येत आहे. धरणाजवळच भोर हें पूर्वीच्या भोर संस्थानच्या राजधानीचें (तालुक्याचें ठिकाण) छोटेसें पण सुंदर गांव वसलेलें आहे.

देहू—पुण्यापासून १८ मैलावर इंद्रायणी काठीं संत तुकारामांनी वास्तव्य केलेलें देहू हें गांव आहे. याच गांवी तुकारामांनी आपली अमर अभंगरचना १७ व्या शतकांत केली. वारकरी सांप्रदायांतील लोकांचे हें पवित्र क्षेत्र असून फाल्गुन वद्य द्वितीयेस म्हणजे तुकाराम सदेह वैकुंठास गेले त्या दिवशीं तेथें मोठी जत्रा भरते. गावांत नळाचे पाणी, विद्युत् दिवे, धर्मशाळा वगैरे सोयीं

प्रेक्षणीय स्थळें आणि तीर्थक्षेत्रें



असून भाविकांची ये जा अखंड चालू असते. जवळच देहू रोड स्टेशनचे आजूबाजूस मिलटरीचे महत्वाचे डेपो आहेत.

जेजुरी— पुरंदर तालुक्यांत पुणें–निरा रस्त्यावर पुण्यापासून ३२ मैल अंतरावर जेजुरी हें खंडोबाचें प्रसिद्ध देवस्थान आहे. जेजुरी हे दक्षिण रेल्वेवरील स्टेशन देवालयापासून १ मैल अंतरावर आहे. खंडोबाचें देवालय गांवा नजीक २५० फुट उंचीच्या लहानशा टेकडीवर उभारलेले असून त्याचे भोंवती फरसबंद चौक आहे. टेकडीचे पायथ्याशीं दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी बांधलेले तळें असून दुसरे तळें १७७० मध्यें अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेले आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमेस आणि सोमवती अमावस्येस जेजुरीस मोठी जत्रा भरते.

कार्लें—२००० वर्षांपूर्वीची बुद्धकालीन लेणी कार्लें गांवानजीक पुणें मुंबई (पुण्यापासून ३६ मैल) रस्त्यापासून १ मैल आणि मळवली स्टेशन पासून २ मैल अंतरावर आहे. तेथें मोठे चैत्य (प्रार्थनेची जागा) आणि लहान लहान विहार (राहण्याची जागा) असून लेणीतील दगडावर तत्कालीन शिलालेख आहेत. लेणीनजीक पिण्याच्या पाण्यासाठीं छोटेसे टाके आहे. ५०० फूट उंचीवरील टेकडीत कोरलेल्या या लेण्याजवळून लोणावळा भागाचे मनोहर दृश्य दिसते.

लोहगड किल्ला—मळवली स्टेशनपासून ४ मैल दूर असलेल्या या किल्ल्याची समुद्र-सपाटीपासून उंची ३४१३ फूट आहे. लागूनच विसापूरचा किल्ला असून तो बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनी बांधला आहे. लोहगड किल्ल्यावर पाण्याची सुंदर टाकी असून सभोवताली दाट झाडी आहे. १६४८–१६७० या काळांत हा किल्ला शिवरायांच्या आमदानी खालीं होता.

लोणावळा–खंडाळा—पुणें मुंबई रेल्वे मार्गावरील आणि रस्त्यावरील हें महत्वाचे थंड हवेचे ठिकाण असून त्याची समुद्र सपाटीपासून उंची २००० फुटाहून अधिक आहे. पुण्यापासून ४० मैल आणि मुंबईपासून ८० मैल अंतरावर सह्याद्रीतील बोरघाटाच्या तोंडाशी वसलेल्या या गांवास निसर्ग सान्निध्यामुळें मोठेच महत्व प्राप्त झाले आहे. दरसाल उन्हाळ्यामध्यें हवा पालट करण्यासाठीं शेकडो शहरवासी लोक येथें येतात. कित्येक श्रीमंतांनी येथें आपले बंगले बांधले आहेत. मध्यमवर्गीयांनाही येथील हवेचा आणि आसमंतातील निसर्गरम्य स्थळांचा फायदा घेता यावा म्हणून सरकारनें येथून ५ मैलावर कार्ल्यांनजीक हॉलीडे कँप उभारलं आहे. या कँपमध्यें ३ रुपये रोज भाड्यानें छोटेसे बंगली वजा स्वतंत्र घर राहण्यास मिळते. भांडी खाटा वगैरे जरूरीचे साहित्यही बंगलीतून ठेवण्यांत आले आहे. टायगर स्लीप, नागफणी (ड्यूक्स नोज) कार्ले, भाजे–लेण्या लोहगड, विसापूर किल्ले, राजमाची पॉईंट, वळवण–तुंगारली तलाव वगैरे प्रेक्षणीय स्थळे लोणावळ्याच्या परिसरांत आहेत.

मल्हारगडः—सासवडपासून ६ मैलावरील ३४६६ फूट उंचीचा हा किल्ला पानसे बंधूनी १७७५ सालीं बांधला. गडावर खंडोबा आणि महादेव यांची देवालये असून पिण्याच्या पाण्यासाठीं तीन विहिरी आहेत.

नरसिंगपूरः—इंदापूर नजिक बारा मैलावर भीमा आणि नीरा यांच्या संगमावर लक्ष्मीनरसिंहाचे देवालय नरसिंगपूर येथें असून तें २०० वर्षांपूर्वी विंचूरच्या महाराजांनी बांधले आहे.

खडकवासला धरणः—पुण्यापासून १२ मैलावर मुठा नदीवर दगडी बांधकाम केलेले ४८२० फूट लांबीचे हें धरण १०७ फूट उंच असून त्याचे पाणी मुख्यतः पुणें शहरवासीयांना पाणी पुरवठा करण्यासाठीं वापरले जाते.

राजगड किल्लाः—शिवाजी महाराजांची पहिली राजधानी या किल्ल्यावर होती. पुण्यापासून ३० मैलावर वेल्ह्यानजीकच्या या किल्ल्याची समुद्र सपाटीपासून उंची ४५७४ फूट आहे. या किल्ल्यास जाण्यासाठीं नसरापूर वेल्हे रस्त्यानें १० मैल मार्गासणी गांवापर्यंत जावे लागते. किल्ल्यावर पद्मावतीचे देऊळ असून अनेक दगडाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

राजमाची किल्लाः—समुद्र सपाटीपासून २७१० फुट उंचीच्या एका सह्याद्री शिखरावर हा किल्ला आहे. बोरघाटापासून १० मैल कच्च्या रस्त्यानें गेल्यावर या किल्ल्यावर जाता येते. हा किल्ला १६४८ मध्यें शिवाजी महाराजांनीं घेतला होता. त्यानंतर तो १७१३ मध्यें आंग्रे यांचेकडे व १७३० मध्यें दुसरे बाजीराव पेशवे यांचेकडे गेला.

रांजणगांव गणपतीः—पुण्यापासून ३० मैलावर पुणें नगर रस्त्यावर अष्ट विनायकापैकीं गणपतीचे हें क्षेत्र असून येथील जुने देवालय हेमाडपंती आहे. हल्लीचे देवालय २५० वर्षांपूर्वी बांधण्यांत आले आहे.

विचित्रगड—भोरपासून ६ मैलावर ३६२५ फूट उंचीवर विचित्रगड किल्ला आहे.

सिंहगड—पुण्यापासून १५ मैल अंतरावर ४३२० फूट सह्याद्रीच्या उंच पठारावर सिंहगड बांधलेला आहे. सिंहगडावर जाण्यासाठीं पुणें पानशेत रस्त्यानें डोणजे गांवापर्यंत एस्. टी ने जावे लागते. पायथ्यापासून चढण बरीच अवघड आहे. सिंहगडावर अनेक पाण्याच्या टाक्या असून तेथील पाणी अत्यंत गोड आहे. किल्ल्यावर अनेक खाजगी बंगले आणि धर्मशाळा आहेत. हा किल्ला १६४७ मध्यें शिवाजी महाराजांनी घेतला आणि परत १६६५ मध्यें मोंगलाना त्यांना द्यावा लागला. इ. स. १६७० मध्यें शिवाजी महाराजांचे सरदार तानाजी मालुसरे यांनी हा किल्ला मोठ्या शिकस्तीनें मोंगलाकडून जिंकला. यावेळीं झालेल्या लढाईत तानाजी ठार झाल्यामुळें किल्यास सिंहगड (गड आला पण सिंह गेला) असें नांव मिळालें. आणिबाणीच्या काळामध्यें मालमत्तेचे रक्षण व्हावें म्हणून मराठी राजवटींत या किल्ल्यावर ती ठेवण्यांत येत असे. राष्ट्रीय उद्यान सिंहगडा भोवतालचे जागेंत उभारण्यांत येत आहे.

शिवनेरीः—पुण्यापासून ५६ मैलावर जुन्नर नजिक ३३४२ फूट उंचीवर महाराष्ट्राच्या भाग्यविधात्या शिवाजी महाराजांचे जन्मस्थानाचें हें ठिकाण आहे. किल्ल्यावरील छोट्याशा दुमजली दगडी इमारतींत महाराजांचा जन्म झाला. इमारत अजूनही चांगल्या स्थितीत उभी आहे. किल्ल्यावर पाण्याची छानशी टाकी असून त्यांत बाराहि महिने उत्तम पाणी असते. किल्ल्याच्या मार्गावर भवानी देवीचे मंदीर असून ते शिवकालीन जुने आहे. किल्ल्याभोवती नवीन जंगल लागवडीचें कार्य हातीं घेण्यांत आले असून नुकताच माथ्यावर महाराज आणि जिजाबाई यांचा पुतळा उभारण्यांत आला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठीं बंगलाही बांधण्यांत येत आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीच जुन्नरचा सर्व सोयींनीं युक्त असा डाक बंगला आहे.

तोरणा किल्लाः—पुण्यापासून ४० मैलावर सह्याद्रीच्या ४६०६ फूट उंचीवरील टेकडीत हा किल्ला आहे. किल्ल्यावर जाण्यासाठीं वेल्हे बुद्रुक येथून रस्ता आहे. या किल्ल्यापासूनच शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापनेच्या कार्यास सुरवात केली.

नॅशनल डिफेन्स अॅकेडमी—पुण्यापासून १२ मैलांवर खडकवासला धरणाचे कांठावर सैनिक दलांतील तिन्ही भागासाठीं (पायदळ, विमानदल व नाविक दल) वरच्या दर्जाचे लायक अधिकारी शिकवून तयार करण्याकरितां सैनिकी शिक्षण विद्यालय १९५५ पासून सुरू करण्यांत आलें आहे. येथें प्रवेशासाठीं विद्यार्थ्यांचे वय साडेसोळा वर्षांचे आंत असावें लागतें व तो एस. एस. सी. पास झालेला असावा लागतो. प्रवेश देण्यापूर्वीं तरुणांची कसून शारीरिक व बौद्धिक चांचणी घेण्यांत येते.

नॅशनल केमिकल लॅबोरेटरी—भारतीय उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं रसायनशास्त्राचा कसा उपयोग करतां येईल या विषयीचें संशोधन करण्यासाठीं पाषाणजवळ ४७० एकर जागेंत नॅशनल केमिकल लॅबोरेटरी १९५० च्या सुमारास स्थापण्यांत आली.

दापोडी वर्कशॉपः—महाराष्ट्र राज्य एस्. टी. कॉर्पोरेशनचे मध्यवर्ती वर्कशॉप पुण्याजवळ दापोडी येथें असून त्यांत एस्. टी. गाड्यांची संपूर्ण दुरुस्ती केली जाते. जुन्या टाकाऊ गाड्या अगदीं नवीन गाडीचे स्वरूपांत येथून बाहेर पडतात. १९५० सालीं सुरू झालेल्या या कारखान्यांतून दर आठवड्यास आठ जुन्या गाड्या नवीन होऊन बाहेर पडतात आणि १२ गाड्यांना नवीन बॉडी बांधण्यांत येते.

वेधशाळा—पुण्यामध्यें अखिल भारतीय स्वरूपाच्या ज्या संस्था आहेत, त्यापैकीं शिवाजी-नगर येथील पुणें वेधशाळा ही एक असून ते भारत सरकारच्या हवामान खात्याचें प्रमुख तांत्रिक केंद्र आहे. येथूनच रोज भारतांतील हवामानाचा अंदाज प्रसारित केला जातो.

शनवारवाडा—पुणें शहराच्या मध्यावर मुठा नदीकांठीं पहिल्या बाजीराव पेशव्यांनीं हा भव्य वाडा १७३० मध्यें बांधला. त्यानंतरच्या पेशव्यांनीं शनवारवाड्याचें सौंदर्य वाढविण्याचा सतत प्रयत्न केला. वाड्यास पांच प्रमुख दरवाजे असून आंत हल्ली जेथें चौथरे दिसतात त्या ठिकाणीं गणपती रंगमहाल, आरसे महाल, गोकाक महाल असे अनेक भव्य दिवाणखाने होते. १८२८ मध्यें लागलेल्या भयंकर आगींत या ऐतिहासिक वास्तूची अपरिमित हानी झाली.

पर्वती—पुण्याच्या आग्नेयेस २६१ फूट उंचीच्या लहानशा टेकडीवर पर्वतीचे रम्य देवस्थान आहे. पेशव्यांनी पर्वती देवस्थानास दैवत मानून तेथें अनेक मंदिरें उभारली आहेत. पहिले बाजीराव पेशवे आणि माधवराव पेशवे हे तर नित्य दर्शनासाठीं येत आणि स्वतः पूजा करीत. पर्वतीवर महादेव, गणपती, दत्त वगैरे मंदिरे आहेत. पर्वतीवरून पुण्याचा देखावा सायंकाळीं दिवे लागणीनंतर विशेष मनोहारी दिसतो.

आगाखान पॅलेसः—या ठिकाणीं महात्माजींना स्वातंत्र्य आंदोलनाचे वेळीं स्थानबद्ध करून ठेवले होते. महात्माजींच्या पत्नी कस्तुरबा आणि चिटणीस महादेवभाई देसाई येथेच निधन पावले. त्यांच्या समाध्या आगाखान पॅलेसच्या आवारांतच आहेत. हें ठिकाण येरवड्यास आहे.

पेनिसीलीन कारखानाः—पुणें-मुंबई रस्त्यावर पुण्यापासून आठ मैलावर हिंदुस्थान ॲन्टीबायोटिक्स लिमिटेडचा पेनिसिलीनचा मोठा कारखाना आहे. १९५४–५५ मध्यें सुरू झालेल्या या कारखान्याने आपले उत्पादन झपाट्यानें वाढविलें असून गेल्यावर्षीं सव्वा तीन कोटीवर रु. चा माल विकला. दरसाल मिळणाऱ्या नफ्यांतून कामगारांच्या वसाहती, दवाखाना, शाळा वगैरे सर्व सुखसोयी नोकरवर्गास उपलब्ध करून दिल्या आहेत. संशोधनाकडेही कारखान्याचे लक्ष असून नवीन औषधे बाजारांत आणण्यासाठीं त्यांचे प्रयत्न चालू असतात. कारखान्यांत १००० कामगार काम करीत आहेत.

१३. कोणाकडे कशाची चौकशी करावी

कामाचें नांव	संबंधित अधिकारी
१) लागवडीकरितां जमीन, तगाई कर्ज, लोखंड, सिमेंट.	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ, पुणें व तालुका पातळीवर तालुक्याचे मामलेदार.
२) शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, रासायनिक खतें, सुधारलेलीं बी-बियाणें व अवजारें आणि कीटक नाशक औषधें.	जिल्हा शेतकी अधिकारी, पुणें ४, अथवा तालुका पातळीवरील संबंधित तालुक्याचे शेतकी अधिकारी.
३) सुधारलेल्या जातींच्या फळझाडांची लागवड	हार्टिकल्चरल डेव्हलपमेंट ऑफिसर, सेंट्रल बिल्डिंग, पुणें १.
४) शेती शिक्षणक्रम, शेती शाळेंत प्रवेश व त्यासंबंधींची माहिती.	प्रिन्सिपॉल, ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर, मांजरी आणि जिल्हा शेतकी अधिकारी, पुणें ४.
५) पीक स्पर्धा व प्रदर्शनें.	जिल्हा विकास मंडळ, पुणें १.
६) जपानी भातशेती व त्यासंबंधीची माहिती	टेक्नीकल ऑफिसर, पॅडी पायलट स्कीम, सेंट्रल बिल्डिंग, पुणें १.
७) सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धति व सहकारी चळवळ.	असिस्टंट रजिस्ट्रार, सहकारी संस्था, लक्ष्मी रोड, पुणें २ किंवा तालुका पातळीवर विकास योजना क्षेत्रांतील सहकारी खात्याचे अधिकारी.
८) शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि त्या संबंधीची माहिती.	जिल्हा शिक्षणाधिकारी, सेंट्रल बिल्डिंग, पुणें १.
९) प्राथमिक शिक्षण व तत्संबंधी माहिती.	शासनाधिकारी, जिल्हा शिक्षण मंडळ, पुणें १.
१०) रस्ते, पूल दुरुस्ती व तत्संबंधीची माहिती.	एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, पूर्व भाग किंवा पश्चिम भाग, सार्वजनिक बांधकाम खातें, पुणें १.
११) ग्रामीण भागांतील लहान उद्योगधंदे, त्यांना मिळणारें सरकारी सहाय्य व मार्गदर्शन आणि वैयक्तिक कलाकारास कला उद्योगास मिळणाऱ्या सहाय्याची माहिती.	असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह, १९६-१ बी. सदाशिव, पुणें २.
१२) जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगांवरील उपाययोजना.	डिस्ट्रिक्ट ॲनिमल हसबंड्री ऑफीसर, १८५ शनिवार पेठ, पुणें २.
१३) कोंबडी पालन	पोल्ट्री डेव्हलपमेंट ऑफिसर, खडकी, पुणें ३.
१४) प्रवाशांची विश्रामस्थानें, लोणावळा व महाबळेश्वर येथें जागा राखून ठेवण्यासाठीं.	एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, सार्वजनिक बांधकाम खातें, पूर्व विभाग, सेंट्रल बिल्डिंग, पुणें १.
१५) ग्रामीण विभागांत ग्रामपंचायती, सहकारी संस्थांतून सामुदायिक श्रवणासाठीं रेडिओ बसविणे व त्यासंबंधीची माहिती.	टेक्निशिअन-इन्-चार्ज, ग्रामीण रेडिओ विभाग, २१ डॉ. आंबेडकर रोड, पुणें १.
१६) अस्पृश्य व मागास वर्गांतील जनतेला मिळणाऱ्या सरकारी सवलती, फी-सवलत वगैरे.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, २१ डॉ. आंबेडकर रोड, पुणें १.

कामाचें नांव	संबंधित अधिकारी
१७) सार्वजनिक आरोग्य संवर्धन उपचार व्यवस्था व सांथीचे रोगप्रतिबंधक उपाययोजनेसंबंधीं.	जिल्हा आरोग्य अधिकारी, रामनारायण बंगला, फर्ग्युसन रोड, पुणें ४.
१८) मलेरिया निर्मूलन व डी. डी. टी. फवारण्यासंबंधी.	आरोग्याधिकारी, (मलेरिया निर्मूलन) रामनारायण बंगला, फर्ग्यूसन रोड, पुणें ४.
१९) विहिरी, तलाव, रस्ते, शाळागृहें आदिंचे स्थानिक विकास कार्यक्रमांतून होणाऱ्या बांधकामासंबंधीं.	जिल्हा विकास मंडळ, पुणें १.
२०) विकास गट क्षेत्रांतील विकास कामें, त्यांची कार्यपद्धति व त्यांस मिळणाऱ्या सहाय्यासंबंधी.	संबंधित विकास गट अधिकारी, किंवा जिल्हा प्रकल्पाधिकारी, पुणें १.
२१) सर्वोदय क्षेत्रांतील विकास कामें व त्यांची कार्यपद्धति.	संचालक, सर्वोदय केंद्र, पिरंगुट, ता. मुळशी व संचालक, मुळशी धरण विभाग सर्वोदय केंद्र, वांद्रा.
२२) वीज योजना व पुरवठ्यासंबंधी.	एक्झीक्यूटिव्ह इंजिनिअर, पुणें इलेक्ट्रिक डिव्हिजन, येरवडा, पुणें ६.
२३) जिल्ह्यांतील पोलिस यंत्रणा व तत्संबंधींची माहिती.	जिल्हा पोलिस प्रमुख (ग्रामीण विभाग, पुणें १.)
२४) शहारांतील पोलिस यंत्रणा व तत्संबंधीची माहिती.	जिल्हा पोलिस प्रमुख, (शहर) पुणें १.
२५) जंगलांचे संरक्षण व संवर्धन आणि तत्संबंधींचे नियम.	डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, मुंबई–पुणें रस्ता, पुणें ३.
२६) गांवांत पोस्ट सुरू करणें, टपालाची अथवा तारेची व्यवस्था किंवा टपाल व तार खात्यासंबंधीची कार्यपद्धती.	सुपरिंटेंडेंट, पोस्ट ऑफिसेस्, पुणें १.
२७) एस. टी. चे मार्ग, त्यांची कार्यपद्धती, सूचना व तक्रारी.	डिव्हिजनल कंट्रोलर, स्टेट ट्रान्सपोर्ट, शंकरशेट रोड, पुणें २.
२८) हौशी प्रवाशांची आकर्षणें व तत्संबंधींची माहिती.	प्रादेशिक व जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, २१ डॉ. आंबेडकर रस्ता, पुणें १.
२९) ग्रामीण भागांत रस्ते, आरोग्य व पाणी पुरवठ्यासंबंधी.	जिल्हा लोकल बोर्ड, पुणें १.
३०) नोकरीसाठीं नांव नोंदणीसंबंधी	सब्–रिजनल एम्प्लॉयमेंट ऑफिसर, ४८१ सरदार मुदलीयार रोड, पुणें २.
३१) माजी सैनिकांच्या, मुलाबाळांच्या व कुटुंबियांच्या हितसंबंधाचे प्रश्नासंबंधी.	जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा माजी सैनिक मंडळ, पुणें १.
३२) जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती.	जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, २१ डॉ. आंबेडकर रस्ता, पुणें १.
३३) अल्पबचत योजना व तत्संबंधीची माहिती.	राष्ट्रीय बचत संघटक, जिल्हाधिकारी कचेरी, पुणें १.

३४) जिल्ह्यांतील विकास कामें व तत्संबंधीची माहिती.	जिल्हा विकास मंडळ, पुणें १.
३५) भूसंरक्षण व बंडिंग योजना.	डिव्हिजनल सॉईल कॉन्झर्व्हेशन ऑफिसर, न्यू इंग्लिश स्कूल समोर, टिळक रोड, पुणें २.
३६) पुणें दूध योजना.	डेअरी डेव्हलपमेंट ऑफिसर, कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणें २.
३७) दारूबंदी प्रचार, स्पिरिट परवाने वगैरे.	डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ प्रोहिबिशन ॲण्ड एक्साईज, १४–ए कॅनॉट रोड, पुणें १.
३८) विक्रीकर वगैरे.	सेल्स ट्रॅक्ट ऑफिसर, विश्रामबागवाडा, पुणें २.
३९) व्यवसाय मार्गदर्शन व विविध अभ्यासक्रम.	व्यवसाय मार्गदर्शनाधिकारी, ट्रेनिंग कॉलेज आवार, सदाशिवपेठ, पुणें २.
४०) पंचवार्षिक योजना.	पंचवार्षिक योजना प्रसिद्धी अधिकारी, प्रभात स्टुडिओ, पुणें ४.
४१) बागायतीसाठीं पाटाचे पाणी आणि छोटे तलाव.	एक्झीक्यूटिव्ह इंजिनिअर, पुणें इरिगेशन डिव्हिजन, लोकल बोर्ड बिल्डिंग, पुणें १.
४२) ग्रामपंचायती, त्यांचा कारभार वगैरे.	जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणें १
४३) बंदूक परवाना–हॉटेल परवाने, पासपोर्ट शांतता व सुव्यवस्था इ.	जिल्हा मॅजिस्ट्रेट, पुणें १.

पुणें जिल्हा सिंहावलोकन

क्षेत्रफळ ६०२७.५ चौरस मैल
लोकसंख्या १९,५०,९७६
नागरी ८,३४,७२३
ग्रामीण ११,१६,२५३
शहरे ३६
खेडी १४७५
तालुके १३, महाल १
लागवडी-खालील क्षेत्र १६,०५,८७२ एकर
बागायत एकूण २,००,१४
जंगलाखालील क्षेत्र ७४०चौ.मैल
प्रमुख पिकें ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, ऊस, बटाटे, इ.
रेल्वे रस्ता १८३ मैल
इतर पक्के रस्ते ५२८ मैल
काँक्रीट किंवा डांबरी रस्ते ३१७ मैल

कच्चे रस्ते ७९४ मैल
सहकारी संस्था १३४६
शेअर भांडवल २,२७,१६,७३६ रु.
सभासद १,९६,८९९
महाविद्यालये १२
अध्यापक विद्यालये ६
तांत्रिक शिक्षण संस्था ४
धंदे शिक्षण संस्था ३२
माध्यमिक शाळा १३५
प्राथमिक शाळा १८७२
पूर्व प्राथमिक शाळा २७
शारीरिक शिक्षण संस्था ६
साक्षरता प्रमाण २८.१३ टक्के
नोंदलेल्या औद्योगिक संस्था६६४
त्यामध्यें काम करणारे कामगार ९०,०००

कॉर्पोरेशन १
नगरपालिका ११
ग्रामपंचायती ७०४
दवाखाने : प्रा. आ. केंद्रे ६५
इस्पितळे ११
लोकसभा सदस्य ३
राज्यसभा सदस्य २
विधिमंडळ सभासद १६
वीज पुरवठा असलेलीं गांवें ३१
पोस्ट व तार ऑफिसेस् ६१
पोस्ट ऑफीसेस् ८९
लहान पोस्ट ऑफीसेस् २१३
टेलिफोन व्यवस्था असलेली गांवे१३
शहरांतील टेलिफोन ५,०००
राज्य सरकारी नोकर १७,३९१
एस्. टी. मार्ग १६२
एस्. टी. गाड्या २५०

अल्प बचत (१९५९-६०) ८०,७७,९८७ रु.